# सप्रेम सादर निवेदन



डॉ.सौ. सुरेखा दिलीप देशमुख

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

# सप्रेम सादर निवेदन

✻ लेखिका ✻

डॉ. सौ. सुरेखा दिलीप देशमुख

✻ सहकार्य ✻

डॉ. सौ. माधुरी प्रकाश पणशीकर

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रकाशन दिवस :**
चैत्र शु. ९, श्रीरामनवमी
शनिवार, दि. २८ मार्च २०१५

**मुखपृष्ठ :**
श्री. सुरेंद्र शिंदे

**मुद्रक :**
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

**प्रकाशक :**
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥ श्री गणेशायनमः॥

या पुस्तकात प.पू. दत्तमहाराजांचा पत्रसंग्रह व त्याचे संदर्भ देताना मला खूप आनंद होत आहे. इ.स. १९८१ ते जवळपास १९९८ हा आम्हा सर्वांच्या आयुष्यातील एक सुवर्णकाळच होता. या काळात प.पू. महाराजांचा प्रत्यक्ष व पत्ररुपाने सहवास घडला. त्यांची इथे येण्याची आम्ही खूप आतुरतेने वाट पहात असू. त्यांच्या येथील मुक्कामात आणि सहवासात स्वर्गीय आनंद मिळे व जेव्हा ते येथून परगावी किंवा पुण्याला परत जात तेव्हा हुरहूर वाटे. एवढी त्यांची या काळात सवय झालेली होती.

पत्र वाचताना पुष्कळसा मजकुर, त्यांच्या मराठवाड्यातील प्रवासाची रुपरेषा कळविणे-त्या दरम्यान बीडला उतरण्याचा, मुक्कामाचा मानस असेल तर तसे विस्तृत कळविणे आणि परत गेल्यावर अभिप्राय व्यक्त करणे असा जरी वर वर दिसत असला तरी प्रत्येक पत्राच्या शब्द समूहात खूप मोठा आशय आढळतो. त्यात अनेक समस्यांवर थोडक्यात उपाय सुचविले आहेत. संकटाच्या प्रसंगी दिलासा दिलेला आहे व काही ठिकाणी, काही सामाजिक जाण असलेल्या समस्यांवर उकल केलेली आहे.

आता वळून पहाताना जाणवते की, त्यांनी कितीतरी भौतिक समस्यांवर दैवी उपाय सुचवून आध्यात्मिक विचारांची सांगड घालून त्या दुःखातून मुक्त केले होते. आमच्या घरी अनेक अनुष्ठाने करवून घेतली व सत्प्रवृत्तीस वाढीला लावले. सर्व कार्यात यजमानादी सर्वांसह म्हणजे लहान-सहान कामे करणाऱ्या पोष्य वर्गाचाही समावेश करुन त्या पुण्यकर्मातील त्या सर्वांचा सहभाग वाढविला. त्यामुळे सर्वांनाच अत्यंत मानसिक समाधान मिळत गेले. आशीर्वाद मिळाले.

सर्व अनुष्ठानांच्या तयारीसाठी योग्य ती मार्गदर्शक पत्रे पाठवून अनुष्ठाने व्यवस्थितपणे करवून घेतली. त्यांच्या वयोमानाप्रमाणे एवढा प्रवास झेपणे अवघडच होते. तरी सुद्धा व्यस्त अशा दिनचर्येतून व भौतिक असुविधा असताना सुद्धा ज़ातीने इथे वेळोवेळी उपस्थित राहून सर्व चंडीयाग यथासांग पार पाडले. त्यांचा सहवास-त्यांचे दर्शन व सहजपणे सांगितलेले त्यांचे चार शब्द सर्व नातेवाईकांना व मित्रपरिवारांस हवेहवेसे वाटत, त्यामुळे प.पू. महाराजांच्या आगमनासोबत सर्व घर गोकुळाप्रमाणे भरुन जाई.

प.पू. महाराजांच्या सोबतच प.पू. सौ. आईसाहेबांचा प्रेमळ सहवास सर्वांना खूप हवासा वाटे. त्यांचे हसतमुख असणे आणि प्रेमार्द्रतेने सगळ्यांशी वागणे भावून जाई. उभयतांचा सहवास म्हणजे जणू श्री लक्ष्मी-नारायणाचे वास्तव्यच असायचे.

आमची पिढी खूपच भाग्यवान व सुदैवी-कारण आम्हाला प.पू. महाराजांचा खूप सहवास लाभला. त्यांना जवळून पहाणे झाले. प्रवचने व श्रीमद्भागवताच्या निरुपणाच्या निमित्ताने त्यांची वाणी प्रत्यक्ष कानावर पडली. प्रवचनातून ते सांगायचे की, श्री ज्ञानेश्वरांचा प्रत्यक्ष सहवास लाभू शकला नाही. जे समकालीन होते त्यांनाही त्यांचे महत्व ज्ञात नव्हते, पण त्यांनी निर्माण केलेली वाङ्मय मूर्ती- श्री ज्ञानेश्वरी याच्या दर्शनाने त्यांच्या कृपेचा लाभ होतो. त्याप्रमाणेच प.पू. महाराजांवर भक्ती करणारी आताची जी तरुण पिढी आहे, ज्यांची त्यांच्यावर अपार श्रद्धा आहे, त्यांना प.पू. महाराजांचे दर्शन त्यांच्या ध्वनिफितीतून-त्या उलगडलेल्या लिखाणांच्या पुस्तकातून होत आहे. मला वाटते या पत्रसंग्रहातून सुद्धा त्यांच्या स्वभावाचे पैलू ज्ञात होतील. एवढ्या मोठ्या संख्येनी

पाठविलेली त्यांची पत्रे हे त्यांच्या वक्तशीरपणाचे व नियोजनबद्ध व्यवस्थित स्वभावाचे दर्शन घडवितात.

प.पू. महाराजांची कृपा खरच असीम आहे. कल्पवृक्षाखाली बसलेल्या व्यक्तीने इच्छा केल्यास त्याचे सर्व मनोरथ जोवर तो त्या वृक्षाखाली आहे तोवरच पूर्ण होऊ शकतात पण प.पू. महाराजांच्या बाबतीत तसे नाही. त्यांच्या कृपेचा नित्य वर्षाव चालूच आहे अन् भविष्यातही तो तसाच राहील. त्यांना सर्वांच्या श्रेयसाची काळजी असते. मनोभावे शरणागत असणाऱ्यांना ते पदोपदी जाणवते.

पत्रांचे वाचन करताना प्रत्येक साधकाला जणू ही आपल्याच साठी लिहिलेले आहे असा भास होईल. खूप गर्दीमध्ये असताना जणू प.पू. महाराज हे आपल्या एकट्यांचेच आहेत-आपल्याकडेच त्यांची दृष्टी आहे ही भावना जशी सुखावह असते-त्यात जो आपलेपणा असतो, तसे ह्या पत्रांच्या वाचनाने जाणवेल असे वाटते.

परमगुरुभक्त सौ. माधुरीताई, श्री गोडसेकाका व इतर साधक मंडळी यांचे कोणत्या शब्दात आभार मानावे हेच कळत नाही. त्यांच्या सांगण्यावरुन हा दैवी ठेवा सर्वांसमोर ठेवण्याची संधी मिळाली.

प.पू. श्री ताईमहाराजांची सर्वांवर अपार माया आहे. या अल्पमतीला शक्ती देऊन हे कार्य करण्याची प्रेरणा त्यांनी दिली. अन् प.पू. महाराजांची सेवा करण्याची संधी प्राप्त करुन दिली. दत्ताश्रम हे प.पू. महाराजांचे परमप्रिय स्थान आहे. सगळ्या साधकांचे ते माहेरघर आहे. तेथे सदैव चाललेल्या अनुष्ठानांना प.पू. ताई महाराजांच्या साधनेचे अधिष्ठान आहे. येथे नामजप, वाङ्मय तप व अन्नदान हे अहोरात्र चालू आहे. त्यामुळे येथील वातावरणात मनाला

परमशांती मिळते. सर्व ताप दैन्य विसरुन सन्मार्गाला लावण्याची शक्ती या परिसरात आहे. प.पू. महाराजांचे अस्तित्व येथे क्षणोक्षणी जाणवते. जिथे जिथे सत्पुरुषांचे पदरज लागलेले असतात ते स्थान पवित्र होऊनच जाते.

प.पू. दत्त महाराज, प.पू. सौ. लक्ष्मी आईसाहेब व प.पू. ताई महाराज यांचे वास्तव्याने बीड येथील आमचे घर पवित्र झाले आहे. हे आमचे पूर्वसुकृतच आहे. आमच्या सर्वांकडून नित्य सत्कर्म घडून त्या परमईशतत्वाची सेवा घडावी हीच प.पू. महाराजांचे चरणी तळमळीची प्रार्थना !

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

डॉ. सुरेखा दिलीप देशमुख
अंकुर रुग्णालय,
बलभिम चौक, बीड
फोन : ९८८१२२०८२०

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः॥

प.पू. दत्तमहाराज कवीश्वर यांचा आश्वासक सहवास डॉ. दिलीप देशमुख, डॉ. सौ. सुरेखा देशमुख आणि त्यांच्या कुटुंबियांना दीर्घकाळ लाभला. देशमुख कुटुंब प.पू. कवीश्वर महाराजांच्या कृपादृष्टीत अक्षरशः चिंब भिजले. सौ. सुरेखाताईंच्या सासुबाई ह्यातर योगिराज गुळवणी महाराजांच्या मानसकन्या होत्या. प.पू. कवीश्वर महाराज अनेक वेळा बीडला डॉ. देशमुखांच्या घरी मुक्कामाला गेले होते. डॉ. देशमुखांनी बोलावले म्हणून तर गेलेच पण पुष्कळ वेळा विश्रांतीसाठी आपणहूनही गेले. त्यांचा झालेला बराच पत्रव्यवहार सौ. सुरेखाताईंनी शिंपल्यातल्या मोत्यासारखा जपून ठेवलेला आहे. प.पू महाराजांनी त्यांना अतीव प्रेमाने कसे सांभाळले ते त्या पत्रातून आपल्या ध्यानात येते. ह्या सर्व पत्रातून प.पू. महाराजांच्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंचे विलोभनीय दर्शन घडते. हा पत्रातील सुखसंवाद वाचकांना सौ. सुरेखाताईंनी उपलब्ध करुन दिला आणि प.पू. ताईमहाराजांच्या आशीर्वादाने प्रस्तुत पुस्तकाची निर्मिती झाली.

ही पत्रे वाचताना प.पू. कवीश्वर महाराजांची सौजन्यशील मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर उभी रहाते. त्यांची कमालीची साधी राहणी, कार्य स्वतः करुन त्याचे श्रेय दुसऱ्याला देण्याचे मनाचे मोठेपण, पलीकडच्याचे गुण हेरुन त्याचे कौतुक करण्याची वृत्ती- एका पत्रात तर 'ड्रायव्हरने गाडी उत्तम चालवून लवकर आम्हाला इथे आणून सोडले'-असेही लिहिले आहे - धर्मकृत्याबरोबर प्रापंचिक जबाबदाऱ्याही योग्य रितीने पार पाडल्या पाहिजेत असे अधिकारवाणीने

सांगणे, 'साधनाभ्यास उघड्या जागेत न करता देवाजवळ किंवा आपल्या खोलीत-दार झाकून करावा' असे केलेले मार्गदर्शन ह्या सर्वांतून प.पू. महाराजांचे ऋषीतुल्य व्यक्तिमत्व न्याहळताना आपल्या मनातील आदरभाव बळकट होत जातो.

देशमुख कुटुंबियांना अनेक कौटुंबिक आपत्तीत प.पू. महाराजांनी मोठ्या आत्मीयतेने सांभाळले आहे. त्या संदर्भातली कृतज्ञता सौ. सुरेखाताईंनी वेळोवेळी व्यक्त केली आहे. चि. नारायणचे आजारपण ही त्यातलीच एक आपत्ती. चि. सौ. मानसीवर ओढवलेल्या भयंकर प्रसंगाने सर्व देशमुख कुटुंब होरपळून गेले. त्या परिस्थितीत ज्या मानसिक आधाराची त्यांना नितांत गरज होती तो प.पू. महाराजांनी त्यांना दिला. हे सर्वच प्रसंग मुळातून वाचण्यासारखे आहेत.

सौ. सुरेखाताईंच्या मागे एकंदर व्याप खूप मोठा आहे. डॉक्टर असल्याने सतत पेशंटच्या सेवेत त्या मग्न असतात. असे असूनही वेळात वेळ काढून त्यांनी त्यांचे अनुभव लिहून काढले. हे विशेष लक्षात घेण्याजोगे आहे. त्यांची भाषा अतिशय साधी पण हृदयाला भिडणारी आहे. त्या भाषेतून महाराजांविषयीचे प्रेम आणि आदर जिव्हाळ्याने व्यक्त झालेला दिसतो. हा पत्रव्यवहार परत परत उलगडून बघताना त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद मिळत होता. हे त्यांनी फोनवरुन अनेकवेळा मला सांगितले. एके ठिकाणी त्या लिहितात, ''मागे वळून पहाताना आज असे जाणवते की खरे स्वर्गसुख प.पू. महाराजांच्या सहवासातच होते. ह्याहून अधिक स्वर्गात ते काय असणार ?'' त्यांच्या लेखनाचा आणखी महत्त्वाचा

विशेष असा की त्यांना वेळोवेळी प.पू. महाराजांनी भविष्याच्या संदर्भात सूचना दिल्या असूनही त्याकडे त्यांचे लक्ष गेले नाही, त्या चुकांचा परिणामही त्यांना भोगावा लागला, हे त्यांनी प्रामाणिकपणे नमूद केले आहे. प.पू. महाराजांसारखे संत जे बोलतात त्याकडे आपण बारकाईने बघितले पाहिजे हे आपल्या ध्यानात येते.

प.पू. सौ. ताई महाराजही देशमुखांच्या घरी काही वेळा गेल्या आहेत. त्यांच्या चरणधुळीने आपले घर पवित्र झाले ही देशमुख दांपत्यांची भावना आहे.

हे पुस्तक आकाराला आणण्यात सौ. शोभा पराडकर आणि डॉ. सौ. प्रतिभा कणेकर ह्यांचे सहकार्य लाभले. त्या दोघींचे विशेष आभार.

प.पू.कवीश्वर महाराज आणि प.पू. ताईमहाराजांच्या सहवासाने डॉ. दिलीप आणि डॉ. सौ. सुरेखाताईंचे जीवन उजळून गेले. आपणा सर्वांवरही परमेश्वराची अशीच कृपा राहो अशी ईशचरणी प्रार्थना !

डॉ. सौ. माधुरी पणशीकर
११, गुडविल बिल्डींग, मनमाला टँक रोड,
माहीम, मुंबई-४०० ०१६.

## ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

आमचे, म्हणजे मी, डॉ. सुरेखा सदाशिव कहाळेकर व डॉ. दिलीप प्रभाकरराव देशमुख यांचे लग्न ९ फेब्रुवारी १९७७ ला झाले. त्यावेळी माझी इंटर्नशिप चालू होती व डॉ. दिलीपचे डी.सी.एच. पूर्ण होऊन त्यांना बीडला शासकीय रूग्णालयात मेडिकल ऑफिसरची नोकरी मिळाली होती. त्या आधीपासून म्हणजे जवळजवळ दीड वर्षे आधी आम्ही भेटत असू. घरच्यांनीही रीतसर पाहून या अनुरुपतेला मान्यता दिली होती. त्यामुळे एकमेकांच्या नातेवाईकांच्या कडेही वेळप्रसंगी जाणे येणे व्हायचे.

डॉ. दिलीपच्या मोठ्या मावशी सौ. माई क्षीरसागर व त्यांचे पती श्री भाऊसाहेब क्षीरसागर हे औरंगाबादला अदालत रोडवरील 'गुरुप्रसाद' या स्वत:च्या बंगल्यात रहात असत. माझ्या ती. सौ. सासुबाई (सिंधुताई) व त्यांच्या इतर चार बहिणी या प.पू. शंकरकाका आजेगावकर यांच्या कन्या व प.पू. गुळवणी महाराजांच्या मानसकन्या होत. प.पू. श्री शंकरकाका आजेगावकर हे प.पू. गुळवणी महाराजांचे गुरुबंधु. प्रत्यक्ष अनेक काळ ते त्यांच्या सहवासात होते आणि त्यामुळे या सर्व बहिणींना प.पू. गुळवणी महाराजांची सेवा करण्याची संधी प्रदीर्घ काळ मिळाली होती.

सौ. माईमावशींच्या स्नुषा, सौ. रोहिणी वहिनी यांनी सोळा सोमवारच्या व्रताचे उद्यापन साधारणत: मे १९७६ मध्ये केले. त्यासाठी प.पू. दत्तमहाराज व प.पू. सौ. आईसाहेबांना प्रमुख अतिथी व मेहूण म्हणून आमंत्रित केले होते. जेवण्याची वेळ संध्याकाळची होती कारण दिवसभर होमहवन आदि अन्हिक चालू होते.

सर्व ब्रह्मवृंदाची पंगत झाली व हात धुण्यासाठी मंडळी बाहेर आली. त्यावेळी सोनसळी पिवळ्या रंगाचे व लालभडक जास्वंदी

काठ असलेले पितांबरधारी प.पू. दत्तमहाराज मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा पाहिले. दुरुनच त्यांचे दर्शन घेतले. काही वेळानंतर सौ. माईमावशींनी 'ही दिलीपची नियोजित वधू' असे त्यांना सांगितले. मी इतकी भारावून गेले होते की, काहीच बोलणे सुचले नाही. नमस्कार करुन बाजूला झाले.

माझ्या ती. सौ. सासूबाईंनी विचारले की, 'उद्या सकाळी येशील का ? साखरपुड्याच्या साडीवरील तुझे ब्लाऊजपीस शिवायला द्यायचे आहेत.' त्याप्रमाणे दुसरे दिवशी मी होस्टेलवरून सौ. माईमावशीच्या घरी गेले. सकाळची वेळ होती. प.पू.सौ. आईसाहेब मधल्या खोलीत केस विंचरीत बसल्या होत्या. समोर छोटा आरसा होता. लांबसडक मऊ केसांचा भार पाठीवर रुळत होता. त्यांचा गोरापान केतकी रंग, ठसठशीत कुंकु, भरघोस अलंकार... मी तर बघून मुग्धच झाले.

''काय सिंधूताई ! नवीन सूनबाई वाटतं ? छान आहेत हं !'' अन् माझ्याकडे बघून गोड हसल्या. मी विरघळूनच गेले. त्यांनतर तन्मयतेने त्या अंबाडा घालू लागल्या. मनातल्या मनात मी प.पू. दत्तमहाराज व प.पू. सौ. आईसाहेब यांना जोडीने पाहू लागले. 'लक्ष्मीनारायण' याहून वेगळे काय असतील !

माझ्या सासुबाईंनी ब्लाऊजपीस माझ्या हातात दिले. प.पू. सौ. आईसाहेब म्हणाल्या-'अहो सिंधूताई ! साडी दाखवा ना तिला ! मुलींना उत्सुकता असते.' पण मी 'नको' म्हणाले अन् तिथून निघाले.

हेच माझे प.पू. महाराजांचे व प.पू. सौ. आईसाहेबांचे पहिले दर्शन. अगदी माझ्या लग्नाच्या आधीचे... कोणत्याही सर्व सामान्यांच्या घरातील वडीलधारे माणूस भेटावे इतके साधे अन् सरळ !!

****

## ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

आमचे लग्न झाल्यानंतर म्हणजे १९७७ पासून आम्ही बीडलाच रहायला आलो. तात्पुरती नोकरी असली तरी भविष्यात स्वतःचे स्वतंत्र हॉस्पीटल असावे ही इच्छा मनात होतीच. त्या अनुषंगाने जागा बघणे सुरु केले होते. सध्याचे आमचे घर नगर रोडला गावाबाहेर होते. पण रुग्णांना येणे सोयीचे व्हावे या दृष्टीने गावातच दवाखाना असणे आवश्यक होते. राहण्याची पण तिथेच सोय असली म्हणजे इमर्जन्सी सर्व्हिसेस उपलब्ध होऊ शकतात.

या सर्व बाबींचा विचार करुन इ.स. १९८१ मध्ये बलभिम चौक (जुन्या व नवीन वस्तीच्या मधोमध) एक जुना वाडा निश्चित केला. त्या वास्तूमध्ये एक विहीर, तीनचार खोल्या ज्यावर जुने सागवानी नक्षीकाम केलेले माळवद, आजुबाजूला कोरीव काम केलेले दगड, अर्ध्या भागात सिमेंटमध्ये उभारलेले व स्लॅब नसलेले जोत्यावरचे आठ-दहा पिलर्स अन् समोर भरपूर मोकळी जागा. वाडा अगदी मध्यवस्तीत म्हणजे समोर तहसिल ऑफिस असल्यामुळे बऱ्याच वर्दळीच्या ठिकाणी होता. बाजार वस्ती पण लागूनच होती.

हा वाडा अहमदनगरला सध्या स्थायिक झालेले मूळचे बीडचे होशींग जहागीरदार (होशींग ही त्यांची पदवी आहे) यांचा होता. त्यांची कुलदेवता श्री योगेश्वरी देवी, त्या मूर्तीची स्थापना त्यांनी त्यांच्या देवघरात केलेली होती. नवरात्रीच्या काळात येथील ग्रामदेवता असलेल्या श्रीक्षेत्र माहूरची प्रतिमा असलेली श्री खण्डेश्वरी देवी व तुळजापूरची, खास बागेतील तुळजाभवानी या देवतांच्या दर्शनाला जशी भक्तांची गर्दी होई त्याप्रमाणे श्री योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी

या होशींग जहागीरदाराच्या वाड्यात पण गर्दी होई. अगदी डाक-संबळ वाजविणारे गोंधळी पण हजेरी लावून जात. त्यामुळे भविष्यकाळात पण इथे अंगणात खूपशा कवड्या सापडत होत्या.

आमच्या ताब्यात वाडा दिल्यावर श्री जहागीरदार त्यांच्या सोबत त्यांचे सर्व देव व देवीची मूर्ती घेऊन गेले. अशा रीतीने श्री योगेश्वरीच्या वास्तव्याने पावन झालेली ही जागा होती. आमच्या सुदैवाने प.पू. महाराजांचे पदरज आम्ही इथे रहावयास येण्यापूर्वी या जागेस लाभले.

त्याचे असे झाले, येथील प्रतिष्ठीत नागरिक व गुरुभक्त श्री. बापुसाहेब थिगळे यांच्या येळंबघाटच्या शेतात एक देवीची मूर्ती आढळून आली. तिच्या पूजेच्या व प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने प.पू. दत्तमहाराज व श्री जगन्नाथ पुजारी हे पुण्याहून येळंबघाटला येणार होते. हे ठिकाण बीडपासून २५-३० कि.मी. अंतरावर आहे. तेथील अर्चन आटोपून दोघेही श्री थिगळेंच्या घरी बीडला येणार होते. हे कळल्यावर सासूबाई व डॉ. दिलीप त्यांना निमंत्रण देण्यासाठी येळंबघाटला गेले व पू.पू. महाराजांनी या नूतन वास्तूच्या उदकशांतीच्या निमित्ताने आमच्या घरी येण्याचे कबूल केले.

त्याप्रमाणे दि. १२ जानेवारी १९८१ रोजी उदक शांतीचा कार्यक्रम प.पू. महाराजांचे उपस्थितीत संपन्न झाला. या क्षणापासून पुढे जवळजवळ १९९४-९५ पर्यंत म्हणजे जवळपास १३-१४ वर्षे त्यांचे सातत्याने येणे झाले. येथे श्रीमद्‌भागवत सप्ताह, श्री देवी प्रित्यर्थ नवचंडी, शतचंडी, सहस्त्रचंडी, अयुतचंडी असे अनेक याग त्यांनी करवून घेतले. विष्णुसहस्त्रनामाचे पाठ, नवार्णवमंत्राचे पुरःश्चरण,

नित्योपासना, जपादी अर्चन या गोष्टींबद्दलही वेळोवेळी मार्गदर्शन करुन ते आमच्याकडून करवून घेतले.

त्या आधीची एक मजेदार गोष्ट म्हणजे डॉ. दिलीपना इथे बीडला स्थायिक होण्याआधी परदेशगमनाचे मोठे आकर्षण होते. परदेशात विशेषतः इंग्लंडला जाऊन पुढचे वैद्यकीय शिक्षण घ्यावे असे त्यांना फार वाटत असे. त्यासाठी लागणाऱ्या पूर्वप्राथमिक परीक्षाही त्यांनी दिल्या होत्या. तेथील विद्यापीठांशी पत्रव्यवहार करुन पुढील जाणे सोयीचे व्हावे या दृष्टीने सर्व तयारी केली होती. त्यांचे एक जिवलग शाळकरी मित्र-रफिक सिद्दीकी त्यावेळी इंग्लंड मध्ये होते. त्यांनी डॉ. दिलीपचा तिथला खर्च करावयाचा व त्या बदल्यात त्यांच्या पिताश्रींना इथे भारतात पैसे वापस द्यायचे असे ठरले होते. पुढच्या महिन्यात व्हिसाची तारीख निश्चित झाली होती.

प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली गेली. तेव्हा 'या गोष्टीला तुमच्या मातोश्रींची परवानगी आहे का ?' असे त्यांनी विचारले. 'मुलांचे हित त्यांचे त्यांना कळते, आपण कशाला नाही म्हणायचे !' असे मत सासूबाईंनी दिले. मनात कुठेतरी या विदेशवारीला प.पू. महाराजांची संमती नाही असे जाणवले व तो बेत रद्द झाला.

पुढे काही काळानंतर प.पू. महाराजांनी श्री देवीची अनुष्ठाने करवून घेतली व 'आपण जर परदेशात गेले असता तर ही अनुष्ठाने कशी काय झाली असती ?'... असे त्यांनी बोलून दाखविले.

आपले श्रेयस फक्त त्यांनाच कळते, अन् अनुभूती आल्यावर त्यांचा थोरपणा आपल्या लक्षात येतो.

******

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

प.पू. दत्तमहाराजांच्या बीड मुक्कामी झालेल्या १५ मार्च ते २१ मार्च या काळातील श्रीमद् भागवत सप्ताहानिमित्त थोडेसे...

प.पू. दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह बीडला आपले येथे व्हावा असे घरातील सर्वांना मनोमन वाटत होते. हा योग म्हणजे प.पू. भगवतीच्या कृपाशीर्वादाचा अत्यूच्च परिपाकच मानावा लागेल. आज या क्षणी वाटते की, प.पू. महाराजांचे बीडला येणे, श्री देवी भगवतीची नियोजित सेवा करवून घेणे, घरातील सर्वांना गुरुमंत्र व दीक्षा देऊन कृतार्थ करविणे ही सगळी पूर्व सुकृताची मोठी देणगीच मानावी लागेल.

प.पू. महाराजांच्या प्रमाणे प.पू. सौ. आईसाहेबांची पण फार माया आम्हा सर्वांना लाभली. अत्यंत प्रेमार्द्र नजरेने व परमकृपेने त्या सगळ्यांच्याकडे पहात, सगळ्यांच्या मध्ये वावरत, सगळ्यांची आवर्जून चौकशी करीत. आलेल्या पाहुण्यांचे नातेसंबंध समजून घेत. या निमित्ताने प.पू. ताईमहाराजांचे पण सारखे येणे होई. त्यांची अबोल, हसरी अन् सतत ध्यानात मग्न असलेली मूर्ती सर्वांच्या दृष्टीत असायची.

सन १९८२ च्या जानेवारी महिन्यात सासूबाई पुण्याला पुण्यतिथीच्या निमित्ताने गेल्या होत्या. त्यावेळी त्यांनी 'श्रीमद् भागवत सप्ताह' बीडला व्हावा अशी इच्छा प.पू. महाराजांच्या जवळ प्रगट केली. पूर्वनियोजित कार्यक्रम बरेच असल्यामुळे त्यावर्षी बीडला येण्याची शक्यता जवळजवळ नव्हती. पण आमच्या मनातील आर्तता

प.पू गुरुमाऊलींनी जाणली असावी, अन् त्यांनी १४ मार्चला बीडला येण्याचे कबूल केले.

आम्हा सर्वांना खूपच आनंद झाला. साऱ्या घरात जणू चैतन्यच फुलले. सासूबाईंनी प.पू. महाराजांचे अनेक सप्ताह ऐकले होते. पुण्यातील इतर कार्यक्रमांनाही त्यांचे नित्य जाणे होत असे. त्यामुळे त्यांना त्यांच्या मोठेपणाची जाणीव होती. पण आम्हा उभयतांना कार्यक्रमाच्या आवाक्याचा अंदाज अजिबातच नव्हता. उत्पन्न जेमतेमच, घरही अगदी लहान, काही भाग माळवदाचा व काही भागावर पत्रे टाकलेले. समोरचे अंगण तसे भरपूर मोठे होते पण घराची वास्तू नीटस नव्हती. आज या सगळ्या गोष्टींची आठवण झाली म्हणजे- विदुरांच्या घरच्या कण्या गोड मानून घेणारे आणि श्री सुदामजींचे पोहे अति आदराने खाणारे श्रीकृष्ण परमात्माच सद्गुरु रुपाने रहात होते असे जाणवते.

डॉ. दिलीप सरकारी इस्पितळात मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरी करत होते. प.पू. महाराजांच्या कृपेने मलाही नव्यानेच आय.टी.आय. कॉलेज मध्ये मेडिकल ऑफिसरची नोकरी मिळाली होती. तेथील प्रिन्सीपॉलकडून मी आठ दिवसांची सुट्टी मागून घेतली. गुरुमाऊलींनी त्यांना ती मंजूर करण्याची बुद्धी दिली. त्यामुळे सगळे व्यवस्थित जमून आले.

घराचे अंगण मोठे असल्यामुळे हा कार्यक्रम घरातच करावा असे वाटले. त्याप्रमाणे प.पू. महाराजांच्या कानावर घातले असता त्यांनी पुढील पत्र पाठविले---

॥ श्री दत्त॥ देऊळगाव राजा

दि. १-३-१९८२

सप्रेम सादर निवेदन, वि.क्षेम,

आपले पत्र मिळाले. त्याप्रमाणे येथील कार्यक्रम ४ मार्चला संपल्यानंतर, इकडे जवळच एका गावी काही कार्यक्रम ठरलेला आहे. तो आटोपून बीडला येण्याचे ठरवीत आहे. काळजी नसावी. ११ तारखेस टेंभूर्णीचा कार्यक्रम संपवून आम्ही येथे १२ तारखेस मुक्कामास येऊ. नंतर दुसरे दिवशी शनिवारी संकष्टी आहे. त्या दिवशी १३ तारखेस सकाळी स्नान संध्या उरकून बीडला जाणेस निघता येईल. तरी आपली गाडी १२ तारखेस सायंकाळी किंवा १३ तारखेस सकाळी येथे आल्यास लगेच येऊन निघणे शक्य आहे. संकष्टीला आम्हाला उपोषण आहे. रात्री जेवणे होईल. तेथे जनी जनार्दनाच्या मंदिरात सप्ताहाचा कार्यक्रम करता येईल, असे सौ. सिंधूताई म्हणाल्या. शनिवारी सायंकाळी महात्म्य कथन होईल. रविवारी १५ तारखेस सप्ताहारंभ होईल. चि. वासुदेव सकाळचे मूल संहितावाचन स्वस्थतेने करील. दुपारी २ ते ६-६॥ पर्यंत अर्थकथन आम्ही करु. २१ तारखेस एकादशीला सप्ताह समाप्ती होईल. द्वादशीस नैवेद्य होऊन कार्यक्रम संपेल. २३ तारखेस आम्ही देऊळगावी परत येऊ. येथे चार दिवस थांबून येथील कार्यक्रम आटोपून पुण्यास परत जाऊ. याप्रमाणे आपणास कळविले आहे. त्याप्रमाणे करावे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

श्रीराम मंदिर द्वारा वे. पुरुषोत्तमशास्त्री मुळे पो. टेंभूर्णी, जि. बुलढाणा या पत्त्यावर उत्तर पाठविले तरी ते लगेच आम्हाला मिळेल.

-दत्तात्रेय कवीश्वर

'कोणाच्याही घरात सप्ताह वगैरे केला तर आमंत्रणाचा अडसर रहातो, त्या ऐवजी मंदिरात केला तर मुक्तपणे सर्वांना येता येते.' असा नंतर त्यांनी उल्लेख केला.

ज्या जनीजनार्दनाच्या मंदिरात अथवा थोरले पाटांगणात हा कार्यक्रम घेण्याचे ठरविले होते ते घरापासून अगदी जवळ आहे. त्यांच्या घरातील सर्व मंडळी अत्यंत धार्मिक वृत्तीची असून सर्वांना खूप मदत करतात. आताचे विद्यमान पीठाधिपती श्री धुण्डीराजशास्त्री पाटांगणकर यांनी या धर्मपिठाबद्दल सांगितलेली माहिती अशी आहे-

मराठवाडा ही अनेक संतांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. वैराग्य अन् मांगल्य ओतप्रोत भरलेली अशी सर्व संत मंडळी समाजाला उन्नत करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. दीनदयाधन असेच ज्यांचे स्वरुप ते श्री एकनाथ महाराज पैठणचे रहिवासी अन् त्यांचे समकालीन असणारे श्री जनीजनार्दन पाटांगणकर त्यांची जन्मतिथी श्रावण वद्य अष्टमी व संजीवन समाधीचा दिवस श्रावण वद्य सप्तमी शके १५२३.

प.पू. जनीजनार्दन स्वामींनी विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारात चाळीस वर्षे नोकरी केली. अगदी कुलकर्णीपणापासून ते बादशहाचे मुख्य सचिव (कमाविसदार) म्हणून काम पाहिले. पुढे सुलतानाशी त्यांचे मतभेद झाल्यानंतर सुलतानाने त्यांना हत्तीच्या पायदळी देण्याची शिक्षा दिली. त्याप्रमाणे त्यांच्या शरीराचे गाठोडे करुन ते मदमत्त हत्तीच्या समोर टाकण्यात आले पण हत्तीने त्यांना स्पर्शही केला नाही. बादशहास आश्चर्य वाटून त्याने त्यांची सुटका केली.

ही देवाची कृपा समजून ते पंढरपुरला पांडुरंगाच्या सेवेत २४ वर्षे राहिले व पुढे दृष्टांत झाल्यावर 'गजाननाने तुम्हास वाचविले आहे, तर गंगेच्या काठी असणाऱ्या गणपतीच्या सेवेस जावे' असा आदेश झाला. ते अशा गणेशाचा शोध घेत गोदावरी काठी असणाऱ्या गंगामसला या गावी असलेल्या गणेश मंदिरात आले. तेथे श्री गणेशाने प्रत्यक्ष प्रगट होऊन त्यांना उपदेश केला व त्यांचे जीवन कृतार्थ झाले. पुढे काशी क्षेत्री जाऊन त्यांनी संन्यासाश्रम स्वीकारला व फिरस्ती सुरु झाली. फिरत-फिरत ते बीडला आले व येथील शहेनशावली दर्ग्यात मुक्काम केला. बीडच्या श्री. नारोजी सिद्धोजी देशमुख यांनी त्यांना गावात येण्याची विनंती केली आणि स्वतःची बाग त्यांना वास्तव्यासाठी दिली. त्या ठिकाणी सध्या त्यांचे आसन आहे, ज्यावर पूजा बांधली जाते (थोरले पाटांगण). जन्मतिथी व संजीवन समाधीचे उत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरे होतात.

श्री जनीजनार्दन स्वामी यांना, श्री नारायण स्वामी हे चिरंजिव, आणि राघवस्वामी व देवाजी असे दोन पौत्र होते. या दोघांत मिळून पाच पुत्र झाले. त्यांची पाच अंगणे म्हणजे 'पाटांगण'. श्री राघवस्वामींचे वंशज; जे सध्या गादीवर विराजमान आहेत ते श्री धुण्डीराजशास्त्री पाटांगणकर, यांनी प.पू. महाराजांच्या भागवत सप्ताहास तन-मन-धनाने सहाय्य तर केलेच व प.पू. वासुदेव महाराजांच्या (प.पू. दत्तमहाराजांचे धाकटे बंधुराज) डोळ्याच्या त्रासामुळे श्री भागवत संहिता वाचनास अडथळा येऊ लागला, तेव्हा स्वतः संहिता वाचन करुन या सत्कार्यास हातभार लावला. या विषयीचा ते एक अनुभव सांगतात की,

पंचमस्कंधाच्या संहितेमध्ये गद्याचा भाग बराच आहे व वाचण्यासाठीही क्लिष्ट वाटणारा आहे. शास्त्री तन्मयतेने वाचत होते व समोर प.पू. महाराजांचे आगमन झालेले पाहून ते सांगतात की, 'मला एकदम नखशिखांत घाम फुटला !' ...पण प.पू. महाराजांनी त्यांचेकडे कौतुकाने पाहिले व 'आपण योग्य वाचन करीत आहात... चांगले आहे !' असे उद्गार काढले. ते ऐकून श्री. शास्त्री मनोमन सुखावले.

श्री. जनीजनार्दन स्वामींनी अनेक स्फुट अभंग व आरत्या रचिल्या. तसेच (१) उद्धव कृष्ण संवाद, (२) जानकी सैंवर (३) चौरिक लिला- ह्या ग्रथांची निर्मिती केली. ते काही काळानंतर त्यांचे जन्मगाव भूम येथे गेले व तेथे त्यांनी संजीवन समाधी घेतली.

पाटांगणावर मंदिरालगतच प्रशस्त घर आहे. मोठे देवघर, स्वामींचे आसन, प्रशस्त ओवरी व पुढे भरपूर मोठी मोकळी जागा आहे. कार्यासाठी सुयोग्य व सुसज्ज असे हे स्थान आहे. या मंदिरातच श्रीमद् भागवत सप्ताह व्हावा अशी प.पू. महाराजांची इच्छा होती, त्यामुळे श्रोत्यांना निमंत्रणाचे बंधन रहात नाही. अन् झालेही तसेच. लोकांची प्रचंड गर्दी होत असे. पूर्ण आवार भरुन जाई.

कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या दिवसांत प्रचंड तारांबळ उडाली. एकतर नियोजनाचा अनुभव नव्हता. धनसंचय नव्हता. या जागेत नव्याने रहायला आलेलो असल्यामुळे आजुबाजूच्या लोकांशी तसा घनिष्ठ संबंध नव्हता. पण प.पू. महाराज घरी येणार याबद्दल अपार उत्साह वाटत होता. त्यांच्या उपस्थितीत सगळे व्यवस्थितच होईल याबद्दल मनात मात्र अजिबात संदेह नव्हता.

सगळे आप्तस्वकीय हळू-हळू जमू लागले. प.पू. गुळवणी महाराजांना होशंगाबादला प.पू. लोकनाथतीर्थ स्वामींचे कडून

शक्तिपाताची दीक्षा प.पू. मातोश्री व प.पू. शंकरकाका आजेगावकर यांच्या साक्षीने झाली. त्या प.पू. शंकरकाकांच्या, माझ्या सासूबाई सगळ्यात धाकट्या कन्या. त्यांना एकंदर पाच कन्या व दोन पुत्र होते. प. पू. शंकरकाकांच्या आजेगावी श्री. केशवराज विराजमान झालेले आहेत. त्यांचे सुंदर मंदिर आहे. तिथे थोरले स्वामी प.पू. वासुदेवानंद सरस्वती व प.पू. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज यांचे राहणे झाले. त्यांना भिक्षा घालण्याचा योग आजेगावकरांना आला. त्यांच्या राहण्याच्या ओवऱ्या पण तिथे आहेत. प.पू. गुळवणी महाराज प.पू. शंकरकाकांच्या घरातीलच एक वडीलधारे म्हणून वावरले. हिंगोलीला व आजेगावला त्यांचा खूप वेळेस मुक्काम असायचा. घरातील सर्वांवर त्यांची खूप माया होती. त्या नात्याने माझ्या सासूबाई व त्यांच्या इतर बहिणींचे श्री.वासुदेव निवास हे हक्काचे माहेर होते. प.पू. दत्तमहाराज हे त्यांचे बंधुराज होते. प.पू. सौ. आईसाहेबांना या सगळ्याजणी 'वहिनी' म्हणूनच संबोधित. आश्रमातील प्रत्येक उत्सवात सर्वजणी आवर्जून उपस्थित रहात व कार्यक्रमात पुढाकार घेऊन जिम्मेदारीने व उत्साहाने कार्यात मदत करीत. थोरले चिरंजीव श्री. दिगंबरराव आजेगावकर हे हैद्राबादला काचीगुडा नजिक 'सदाचार' या इमारतीत राहत. येथेच प.पू. वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांच्या प.पू. गुळवणी महाराजांनी घडवून आणलेला द्वादश पुष्पम् ग्रंथाचा प्रकाशन सोहळा अनेक ब्रह्मवृंदाच्या उपस्थितीत सन १९५५ मध्ये पार पडला होता. सासूबाईंच्या माहेरी सर्वजणच संतांच्या सहवासात वाढलेले, अनुग्रहीत व संस्कार संपन्न असे होते.

प. पू. दत्तमहाराजांचे बीडला आगमन होऊन सप्ताहभराचा त्यांचा सहवास मिळणार म्हणून सर्वांनाच खूप आनंद झाला होता. मावस सासूबाई सौ. माई क्षीरसागर यांचा पुण्याच्या आश्रमात खूप दबदबा होता. कार्यक्रमाच्या नियोजनाचा त्यांना अनुभव होता. त्या व सौ. मथुताई राहेरकर, श्री. भुजंगराव काका राहेरकर, श्री. दिगंबर उर्फ बाबुमामा आजेगावकर, माझे थोरले चुलते व जगन्नाथकाका कहाळेकर ही मंडळी अगदी सुरुवातीपासूनच हजर होती. नंतर इतर नातेवाईक ही हळुहळू जमू लागले. ती. वासुदेव महाराज कवीश्वरांचे पण आगमन झाले.

कार्यक्रम ठरल्याबरोबर सुरुवातीला वे. श्री. धुण्डीराज शास्त्री पाटांगणकरांना, प. पू. महाराजांनी भागवत सप्ताह पाटांगणावर व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली असल्याचे सांगितले असता त्यांना अत्यानंद झाला व त्यांनी सर्वतोपरी साहाय्य करण्याचे कबूल केले. 'या भागवत सप्ताहाच्या निमित्ताने आपले पूर्वसंचितच कामास आले' असे त्यांनी बोलून दाखविले.

ठरल्याप्रमाणे बारा तारखेस प. पू. महाराजांचे घरी आगमन झाले. त्यावेळी पाटांगणावर श्री शृंगेरी पीठाधीश श्रीमत् शंकराचार्यांचा मुक्काम होता. तेरा तारखेस सकाळी नऊ वाजता प.पू. महाराज त्यांचे दर्शनास गेले. त्यांना अति आदराने आसन देण्यात आले. त्यांच्या सन्मानाकडे प.पू. शंकराचार्य, श्री. चंद्रशेखर भारती जातीने लक्ष देत होते. दोघांचा वार्तालाप झाला. आम्ही अत्यंत कुतूहलाने हा सोहळा पाहत होतो. आम्हाला दोघांनाही हे सगळे नवीनच होते. त्यामुळे प.पू. महाराजांच्या बद्दल असणारा आदर द्विगुणित होत

होता. त्याची ऋजुता, विद्वत्ता, त्यांचे देखणेपण हे सगळे-सगळे अगदी भारावून टाकणारे होते.

पाटांगणावरील कार्यक्रम आटोपून आम्ही सर्वजण अकराच्या सुमारास घरी परत आलो. घरी भोजन वगैरे होऊन प.पू. महाराज व रघुनाथराव व इतर सर्व मंडळी वामकुक्षी करत होते. प.पू. शंकराचार्य ही, भिक्षा झाली की, पुढील मुक्कामी दुसऱ्या गावासाठी निघणार होते. दुसरे दिवशी गोकर्ण-माहात्म्य होऊन सप्ताहारंभ होणार होता. पाटांगणावर प.पू. शंकराचार्यांचा निरोप घेण्यासाठी असंख्य मंडळी जमली होती. त्यांनाही या सप्ताहाची माहिती व्हावी म्हणून तशी सूचना तेथील नोटीसबोर्डवर लिहावी म्हणून डॉ. दिलीप तेथे गेले होते.

प.पू. शंकराचार्यांच्या प्रस्थानाची वेळ होऊन गेली होती. त्यांनी त्यांच्या शिष्यांना प.पू. दत्तमहाराजांना बोलावून आणण्याची आज्ञा केली. ''त्यानंतर आपण तिथून निघू'' असे सांगितले. त्यांच्यापैकी कुणालाच प.पू. महाराज कुठे उतरले आहेत हे माहित नसल्यामुळे पंचाईत झाली. 'आचार्य को बुलाव !' असे श्रीमत् शंकराचार्यांचे फर्मान आल्यामुळे शोधाशोध सुरु झाली. नेमके त्याचवेळी डॉ. दिलीप प.पू. महाराजांच्या भागवत सप्ताहाच्या संदर्भातील सूचना लिहिण्यात गर्क झाले होते. ते त्यांच्यापैकी एकाने पाहिले व त्यांनी येऊन सांगितले की, 'आपके घर ठहरे हुए आचार्यजी को लेके आओ, श्रीमद् शंकराचार्य उन्हीं के लिए रुके हुए है।' डॉ. दिलीप धावत-पळत घरी आले व प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली. प.पू. महाराज गडबडीने उठले व खांद्यावर उपरणे टाकून पायात वहाणाही न घालता अतित्वरेने पाटांगणाच्या दिशेने धावले. त्यांची ती उत्कटता पाहून आम्ही थक्क झालो.

प.पू. शंकराचार्य त्यांचीच वाट पहात होते. 'आओ आचार्यजी !' असे संबोधून शंकराचार्यांनी अत्यंत प्रेमाने त्यांना स्वत:जवळ बसवून घेतले. सभोवतालीच्या भक्तगणांना उपदेशपर संबोधन केले व प.पू. दत्तमहाराजांचा यथोचित सत्कार करुन 'श्री शारदांबे'चा फोटो प्रसादरुपाने दिला. प.पू.महाराजांनी तो मस्तकी धारण केला. पुढे सप्ताहानंतर आम्हाला त्यांनी तो फोटो प्रसाद म्हणून दिला. ती शारदांबा प.पू.महाराजांचे कृपेने आज येथील देवघरात विराजमान आहे. पूज्य व्यक्तींबद्दल त्यांनी दर्शविलेला उत्कट आदरभाव पाहून मन थक्क होऊन गेले.

चौदा तारखेस 'गोकर्ण महात्म्य' वाचन झाले व पंधरा तारखेपासून 'श्रीमद्‌भागवत सप्ताहारंभ' झाला. पाटांगणाचे आवार गर्दीने फुलून जायचे. सकाळी सात-साडेसात वाजता संहिता वाचनापासून संध्याकाळी सात सव्वासातपर्यंत अर्थ निरुपण व्हायचे. सगळेजण भक्तीरसात डुंबून जायचे. अगदी 'कानात प्राण आणून ऐकणे' ही म्हण सार्थकी लागत असे. 'उगीचच अवांतर गोष्टीत भरकटत जाणे कधीच नसायचे', असे श्रोते म्हणत. भाग़वत सप्ताह अनेकदा श्रवण करणारेही बरेच श्रोते होते. पण प.पू. महाराजांच्या वाणीला असणारी गोडी, भावोत्कटता, अनुभूतींत भिजलेली शब्दरचना, मधेच दाटून येणारा गहिवर अन् सडेतोडपणा, सगळ्यांचीच उत्कंठता वाढवून जाई. आमच्या आयुष्यातील ही भक्तीरसात डुंबण्याची मोठीच पर्वणी होती. शब्द अपुरे पडतील असा सोहळा संपन्न होत होता. फक्त अगदी थोड्याच वेळाची मध्यंतर घेऊन प.पू. महाराज मांडीही न बदलता अत्यंत एकाग्रपणे अर्थ सांगत. त्यांची नजर समोरच्या ग्रंथाच्या ओळींवरुन परतत्त्वाला स्पर्श करणारी वाटत असे. ते सगळे प्रसंग जणू

प्रत्यक्ष न्याहाळत असून ते सर्वच्या सर्व जसेच्या तसे विदित करत असावेत असे वाटे. सर्व श्रोतृवृंद समाधानाने, संध्याकाळी सगळे आटोपल्यावर प.पू. महाराजांचे दर्शन घेऊन घरी परतत असे.

समोर जमा होणारे धान्य व्यवस्थितपणे गोळा करुन पोते भरुन ठेवले जाई. शेवटच्या दिवशी त्यातील अर्धे धान्य आणि शाल व श्रीफळ श्री पाटांगणकरांना देऊन प.पू. महाराजांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. श्री. धुण्डीराज शास्त्रींना हे औदार्य पाहून गहिवरुन आले. त्यांना अश्रू अनावर झाले. प.पू. महाराजांनी 'याचा प्रसाद बनवून सर्वांना द्यावा' असे त्यांना सूचविले.

शेवटचे दोन-तीन दिवस प.पू. सौ. आईसाहेब त्यांच्या भगिनीसह बार्शीहून इथे आल्या. आता तर काय प्रत्यक्ष लक्ष्मी-नारायणाचा वास या घरात राहिल्यामुळे सर्वत्र आनंदाच्या उर्मी दाटून येत होत्या. सगळीकडे गप्पांना-विनोदाला-आनंदाला काहीच कमी नव्हते. प.पू.सौ. आईसाहेब सगळीकडे जातीने लक्ष देत होत्या. आधीच्या दिवशी रात्री लाडू वळायच्या कार्यक्रमात गाणे-उखाणे, गप्पा-थट्टा-विनोद याला अक्षरशः पूर आला होता. प.पू. सौ. आईसाहेब व माझ्या सासवा, म्हणजे त्यांच्या नणंदा, यांच्यातील नणंद-भावजयीच्या नात्यातील उत्कट प्रेमभावाचे प्रदर्शनही तिथे दिसत होते. कुणीतरी गमतीने प.पू. आईसाहेबांना प्रश्न विचारला की, 'लग्नानंतर कवीश्वरांच्या घरात अजिबात कांदा-लसूण खात नसल्यामुळे तुम्हाला चुकल्यासारखे वाटत असेल नाही का !' त्यांनी हसून उत्तर दिले की, 'बार्शीला आल्यावर सुरवातीला खावेसे वाटे पण पुढे-पुढे त्याची पण गोडी राहिली नाही व नकोसेच वाटू लागले.' अशा गमती-गमती चालत होत्या.

समाप्तीच्या दिवशी खूप लोक प्रसादाचे भोजनास आले. परत परत स्वयंपाक बनविला जात होता व मंडळी सतत वाढत्या संख्येने येऊन जेवून जात होती. कुठेही कमतरता पडली नाही. प.पू. महाराजांनीच हे सगळे घडवून आणले. रात्री उशिरापर्यंत जेवणावळी चालल्या. स्वयंपाकात मदतीला प्रसाद घेण्यासाठी आलेल्या महिलाही धावल्या. सगळ्यांनी आनंदाने व भरभरुन मदत केली. प.पू. महाराजांच्या प्रसादाने सगळेजण तृप्त झाले. दिवसभर धावपळ होत होती. पण अंती प्रसन्न वाटत होते. अजिबात दमणूक झाली नाही.

दुसरे दिवशी 'श्री नवचंडी याग' करावा असे डॉ. दिलीपच्या मनात आले. प.पू. महाराजांना त्यांनी तसे बोलून दाखविले. प.पू. महाराजांनी अनुमती दर्शविली व झटपट तयारी करवून घेतली. सगळे ब्रह्मवृंद तयार होतेच. अन् अशा रीतीने या वास्तुतील पहिला नवचंडीयाग प.पू. महाराजांनी करवून घेतला. त्यांच्या आशीर्वादाने दि. २३ मार्चला हा याग संपन्न झाला.

दि. २४ मार्चला आम्ही उभयता व डॉ. दिलीपचे पिताश्री श्री. प्रभाकरराव (अण्णाकाका) यांना प.पू. महाराजांनी पहाटे विधिवत गुरुमंत्र प्रदान केला. अन् सगळे जीवनच कृतार्थ झाले. प.पू. महाराज व प.पू. सौ. आईसाहेब यांच्या सान्निध्यात अवघे आयुष्य धन्य-धन्य होऊन गेले.

सर्व मंडळी नंतर येथून देऊळगाव राजास गेली. तिथे राहिलेले धान्य ठेवून सर्वांनी पुण्यास प्रयाण केले.

डॉ. दिलीपची लहानपणापासूनची इच्छा होती की, आपल्या उत्पन्नाचा दहावा भाग नित्यनियमितपणे देवीप्रित्यर्थ खर्च करावा. प.

पू. महाराजांनी भागवत सप्ताहात एके ठिकाणी आपल्या संपत्तीचा विनियोग कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन केले होते. ते असे- '२०% धर्मकार्यासाठी खर्च असावा, २०% भोग-उपभोगासाठी खर्च करावे, २०% बचत करावी, २०% परिवारासाठी खर्च करावा व शेवटचे २०% नावलौकिक वाढून किर्ती संपादन करण्यासाठी व्यय करावा.'

पण संकल्पित केलेल्या १०% धनाचा विनियोग देवी प्रित्यर्थ कसा करावा याबद्दल मनामध्ये संभ्रम होता. कारण श्री योगेश्वरी देवीच्या मंदिराचे बांधकाम अंबेजोगाईस सुरु होते. त्यास द्यावे की काय असे वाटायचे. पण प.पू. महाराजांनी श्री चंडीयाग करुन दानधर्मादी कर्मे करावीत. अन्नदान करावे असे मार्गदर्शन केले व पुढेही संपुटित नवचंडी, श्री शतचंडी, संपुटित शतचंडी, श्री सहस्त्रचंडी, संपुटित सहस्त्रचंडी व श्री अयुतचंडी वगैरे याग स्वत: मार्गदर्शनाखाली जातीने उपस्थित राहून करवून घेतले.

अकलूजला पोहोचल्यानंतर दि. १ एप्रिल १९८२ ला त्यांनी पत्र पाठविले, ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

अकलूज
दि. १-४-१९८२

सप्रेम नमस्कार, वि. क्षेम,

आम्ही येथे येऊन दोन दिवस झाले. उद्यापासून येथे सप्ताह सुरु होत आहे. येथे सकाळी ७॥ ते १० व संध्याकाळी ६॥ ते ८॥ अशा दोन वेळा प्रवचनाच्या ठेवल्यामुळे पुष्कळ विश्रांती मिळते. तिथे आपणही सर्वांनी मोठ्या उत्साहाने अत्यंत परिश्रम घेऊन सप्ताह कार्य

उत्तम प्रकारे पार पाडले. श्री. दिलीपराव व सौ. सुरेखाताई या दोघांनीही तन, मन, धनाने हे कार्य पूर्णतेस नेले.त्यावेळी नित्याचा व्यवसायही त्यांनी स्थगित केला ही ईश्वराची कृपा व आपली आणि सौ. सिंधुताईंची मोठी पुण्याई आहे. त्यांच्या विशेष आग्रहानेच सौ. सिंधुताई पुण्यास आल्या, जालन्यास आल्या आणि हे कार्य शेवटी त्यांनी ठरवून पार पाडले. त्यामुळे आम्हालाही बीडला येता आले व श्री शंकराचार्यांचे दुर्लभ दर्शन घडले. अनेक धर्मप्रेमी भाविक मंडळींचा सहवास झाला, त्यामुळे समाधान झाले. येथून आम्ही ९-१० तारखेस पुण्यास जाऊन तेथून १४ तारखेस रात्री रेल्वेने वाडीस श्री नारायणस्वामींच्या उत्सवाकरिता जात आहोत. तेथून २४ तारखेस परत आल्यावर २-३ आठवडे पुण्यास मुक्काम होईल असे वाटते.

सौ. सिंधुताई, श्री. बाबुराव बेलेश्वरकर, श्री. डॉ. दिलीप, सौ. डॉ. सुरेखाताई, श्री. शंकर, कु. मानसीताई सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ.

दत्तात्रेय कवीश्वर

पत्र सासरे श्री. प्रभाकरराव (अण्णाकाका) यांना उद्देशून लिहीले.

****

कर्ते करवीते प.पू. महाराजच आहेत हे सर्वांना ज्ञात असूनही वरील पत्राद्वारे त्यांनी घरातील सर्वांना त्याचे श्रेय दिले. प्रत्यक्ष परमेश्वरच अशी लीला करु शकतात.

प.पू. गुरुमाऊलींच्या सहवासातील क्षण आठवले की, ऊर अगदी भरुन येतो. शब्द तर खूपच अपुरे पडतात. कितीतरी गोष्टी

सांगायच्या राहून जातात. मनातला गहिवर डोळ्यातील अश्रूंनी भरभरुन वाहू लागतो.

प.पू. महाराज हे घरातील ज्येष्ठांपैकी एक वाटायचे. त्यामुळे आमच्या हातून यथोचित सत्कार कधी घडला नाही. पायघड्या घालून कधी स्वागतही केले नाही. उलट घरातील सर्वजण त्यांच्या अवतभवती गप्पा मारत बसायचे. त्यांच्या जेवणाखाण्याकडे किंवा विश्रांतीकडे अधिक लक्ष दिले गेले नाही. एवढेच काय पण दक्षिणेप्रीत्यर्थ कधी धनराशीही अर्पण केली नाही. पत्र पाठविले तर त्यांना उत्तरादाखल परतीच्या टपालासाठी साधे सेल्फ ॲड्रेसड् पाकीटही पाठविले नाही. जणू त्यांचे उलट टपाली पत्र येणे हा हक्कच वाटायचा.

फक्त 'प.पू. महाराज इथे येणार' या कल्पनेने अत्यंतिक आनंद व्हायचा. सगळे आप्तस्वकीय जमायचे. दिवाळी-दसऱ्याप्रमाणे उधाण यायचे. अन् त्यांचे जाणे झाले की उदास वाटायचे, खूप रितेपण जाणवायचे, अगदी मांडववारे लागायचे.

आता हे सगळे आठवले की उरात दाटून येते. प्रत्यक्ष परमेश्वराची महती समजू शकलो नाही. त्यांना आपल्यातीलच एकजण समजत गेलो, खूप काही करु शकलो असतो. पण काहीच केले नाही. प.पू. महाराजांनी सगळी गैरसोय आनंदाने सहन केली. त्यांच्या सहवासातील आठवणींचे अपार सुख हाच निरंतर ठेवा आहे. समृद्धी आणि शाश्वत आनंद आहे. प.पू. महाराजांचे व पू. पू. सौ. आईसाहेबांचे सदैव लक्ष असावे ही दत्तप्रभुचरणी प्रार्थना. दोघेही आपल्यात सदैव आहेतच.

**॥ श्री गुरुदेव दत्त॥**

प.पू. महाराजांच्या सहवासातील क्षणांचा मागोवा घेताना आता असे जाणवते की, त्यांची पत्रे ही केवळ घरगुती कारणानिमित्त किंवा कौटुंबिक विषयांच्या संदर्भातच पाठविलेली नाहीत. तर त्यांनी लिहिलेल्या ओळी या त्रिकालाबाधीत असून अध्यात्माच्या मार्गावर प्रगती करणाऱ्या साधकांना त्या मार्गदर्शकच आहेत. ही सर्व पत्रे अमूल्य ठेवच आहे.

पहिली नवचंडी झाल्यानंतर पुन्हा प.पू. महाराजांचे दर्शन दि. २७-५-१९८२ ला होण्याचा योग आला. त्यांचा खर्ड्याहून देऊळगावराजा व पुढे मेहकर या दरम्यानच्या प्रवासात बीडला मुक्काम झाला. सोबत रघुनाथराव काकाही होते. सकाळी आल्याबरोबर प.पू. महाराजांनी आन्हिक आटोपले. आमच्या आग्रहाखातर पाद्यपुजेचा कार्यक्रमही झाला.

बीडपासून जवळच म्हणजे साधारणत: ४०-४५ कि.मी. अंतरावर 'लिंबागणेश' नावाचे गावी श्री गणेशाचे जाज्वल्य ठिकाण आहे. नुकताच तिथे गणेशयाग पार पडला होता. पूर्वी गणेशाची शेंदूर लावलेली मूर्ती साधारत: ५-६ फुट उंचीची होती. काही शतके त्यावर शेंदुराचे आवरण चढत होते. त्याची खोळ निघाल्यामुळे श्रीगणेशाचे रेखीव मूर्ती स्वरुपात २-२॥ फुट उंचीच्या स्वरुपात दर्शन झाले. त्यानिमित्ताने तेथे गणेश याग झाला होता. प.पू. महाराजांना तेथे घेऊन जावे असे मनोमन वाटले. त्याप्रमाणे त्यांची तशी परवानगी घेतली.

त्या काळात बीडला खाजगी वाहने क्वचितच उपलब्ध होती. बऱ्याच प्रयत्नांती ते मिळविण्यात फारसे यश आले नाही.

डॉ. दिलीप त्यावेळी पोलिस रुग्णालयात मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरीत होते. रुग्णालयाच्या आवारातच बिनतारी संदेश विभागाचेही ऑफीस होते. त्यावेळी तिथे श्री बाणाईत नावाचे फौजदार ड्यूटीवर होते. सहज बोलता-बोलता डॉक्टरांनी आपली ही अडचण त्यांच्याशी बोलून दाखविली. त्या काळात पोलीस खात्यात नोकरी करणाऱ्यांना काही पैसे प्रतिकिलोमीटर प्रमाणे; खाजगी कामासाठी संबंधीत ऑफिसरच्या परवानगीने; योग्य व रिकामे असणारे वाहन मिळत असे. श्री बाणाईतांना काय वाटले कुणास ठाऊक, पण त्यांनी पोलिस व्हॅनसाठी परवानगी दिली. त्याप्रमाणे तसे आदेशपत्रावर सही करुन दिली. त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्याबद्दल फार विशेष म्हणजे ते आस्तिक आहेत का किंवा त्यांचा देवाधर्मावर विश्वास आहे का, हे फारसे कळले नाही. पण डॉ. दिलीप त्यांच्या ऑफिसातून बाहेर पडताना त्यांनी प.पू. महाराजांच्या दर्शनाला येण्याची इच्छा प्रगट केली. आता त्यांनी एवढे काम केले म्हटल्यावर बारा-एक च्या सुमारास दुपारी डॉक्टर त्यांना घेऊन घरी आले.

आमचे स्वयंपाकघर तेव्हा एका चिंचोळ्या बोळीसारखे साधारण सहा बाय बाराचे होते. दोन पायऱ्या उतरुन आत प्रवेश करावा लागे. स्वयंपाक घराच्या पश्चिमेकडील बाजूस स्वयंपाचा ओटा व पूर्वेकडे सामानाचे रॅक वगेरे होते. मधल्या बाजूस प.पू. महाराज व रघुनाथराव काका व माझे सासरे यांचे पाट मांडले होते. पाट व ताटाच्या समोर वाढल्यावर वाढणाऱ्या व्यक्तीपुरती जेमतेम जागा शिल्लक होती.

श्री. बाणाईत डॉ. दिलीप बरोबर घरात आले. प.पू.महाराज व सर्वजण जेवणासाठी पाटावर येऊन बसले होते. अजून जेवण वाढण्यास

सुरुवात झाली नव्हती. बाहेरच्या खोलीतून स्वयंपाक घराकडे जाणाऱ्या दरवाज्यातून श्री बाणाईतांची प.पू. महाराजांशी दृष्टभेट झाली. अन् ते तडक स्वयंपाकघरात आले. प.पू.महाराजांच्या समोर गुडघे टेकून बसले व त्यांना अचानक क्रिया सुरु झाल्या त्या छोट्याशा जागेत; पण त्यांचा तोल गेला नाही. अखेर प.पू. महाराजांचा पदस्पर्श झाला. प.पू. महाराजांनी त्यांना 'शांत व्हा !' म्हणून देवघरात ओट्यावर बसायला सांगितले. ते तिथे काही काळ डोळे मिटून बसले व शांतपणाने थांबून थोड्या वेळानंतर प्रसाद घेऊन निघून गेले.

आम्ही तर या सर्व प्रकाराने थक्कच झालो. कोण कुठला माणूस ! त्याला इथे येण्याची बुद्धी होते अन् पहिल्याच दृष्टीत प.पू. महाराज त्याच्यावर कृपेचा वर्षाव करतात. अगदी पुण्यवानच जीव तो ! त्यानंतर त्यांच्याशी कुठलाही संपर्क झाला नाही. अशा अनंत जीवांचा उद्धार प.पू. महाराजांनी केला असावा.

जेवणे वगेरे आटोपल्यावर आम्ही घरातील सर्वचजण लिंबागणेशला प.पू. महाराजांचे समवेत गेलो. व्यवस्थित दर्शन झाले. प. पू. महाराज श्री गजाननाचे दर्शन घेताना ज्या दृष्टीने न्याहळत होते ते त्यांच्याकडे पाहून खूप आनंद होत होता. जणू ते देवाशी संवाद साधत होते. त्यांच्या हस्ते श्री गणेशाची साग्र पूजा झाली. पुष्पहार अर्पण केला. तेथील पुरोहिताने प.पू. महाराजांना प्रसाद दिला व आम्ही सर्वजण परतलो.

दुसरे दिवशी सकाळी आन्हिक आटोपल्यावर थोडेसे खाऊन प.पू. महाराज देऊळगावी जाण्यासाठी निघाले. बसमध्ये चढताना

गर्दीचा त्रास होऊ नये म्हणून त्यांना डेपोमध्ये नेऊन गाडीत चढवले. सफाई कामगार त्यावेळी स्वच्छता करीत होते. गाडी डेपोतून निघून बस थांब्यावर लागून निघण्यासाठी बराच उशीर झाला. गाडी निघाल्यावर आम्ही घरी परतलो.

आता या सगळ्या गोष्टी आठवल्या म्हणजे अतिशय लाज वाटते. खूप दुःख होते. सुरुवातीच्या काळात बसने जाणे-येणे झाल्याने प.पू. महाराजांना त्यांच्या वृद्धावस्थेत खूप त्रास सहन करावा लागला. वाईट याचे वाटते की हे आमच्या लक्षातही येत नव्हते. खाजगी वाहन मिळणे अवघड होते. पण अशक्यही नव्हते. प.पू. महाराजांना किती दगदग, त्रास सहन करावा लागला, आता याची आठवण सुद्धा मनाला खूप क्लेश देऊन जाते. पण गाडी निघताना प.पू. महाराज सारखे म्हणायचे, 'तुम्ही आम्हाला गाडीत आधी बसवल्यामुळे गर्दीचा त्रास झाला नाही.' या तितिक्षेला काय म्हणावे ? सुदैवाने पुढच्या काळात वाहनासाठी मित्रांनी मदत केली व नंतर स्वतःची गाडी घेतल्यावर तो त्रासही दूर झाला.

माझ्या सासूबाई पुण्याला उत्सवासाठी व इतर बऱ्याच कार्यक्रमांसाठी जात असत. तेथील वैभवाचे, प. पू. महाराजांच्या स्वागत समारंभाचे सुनियोजित व सुंदर असे वर्णन त्या रसभरितपणे करीत असत. ते ऐकून खूप आनंद वाटायचा. आपल्या घरी मात्र त्यांची खूप गैरसोय होते याची बोचणी मनाला जाणवायची. पण काहीही असो, प.पू. महाराजांचे बीड मधील आगमन हे दसरा-दिवाळीच्या आनंदोत्सवापेक्षा खूप-खूप सुख व समाधान आम्हाला देऊन जायचे हे निश्चित !

पुढे मेहकरला पोहोचल्यानंतर प.पू. महाराजांनी पत्र पाठविले ते असे---

॥ श्री दत्त॥

मेहकर, दि. ४-६-८२

सप्रेम नमस्कार, वि. क्षेम

मागील शुक्रवारी तेथून आपला प्रेमाचा निरोप घेऊन निघालो. ते अकरा वाजता देऊळगावी सुखरुप पोचलो. नंतर लोणीस जाऊन काल येथे आलो. येथून ३-४ दिवसांनी देऊळगावी जाणे होईल. तेथे एक आठवडा राहून १५-१६ तारखेच्या सुमारास आम्ही पुण्यास जाणेकरिता निघू. यावेळी बीडला येणे झाल्यामुळे श्री डॉक्टरसाहेबांच्या प्रयत्नाने सर्वांनाच लिंबागणेश येथे श्री मंगलमूर्तीच्या दर्शनाचा योग आला, यामुळे समाधान वाटले.

आपल्या घरी प्राचीन संप्रदायाप्रमाणे शुचिता पाळून सर्व धर्मकार्ये श्रद्धापूर्वक होत असलेली पाहून आपल्यावर असणाऱ्या ईशकृपेचे कौतूक वाटते. श्री महाराजांनाही आपल्यासारख्या गृहस्थाश्रमी धर्मशील सज्जनांचे बद्दल फारच प्रेम वाटत असे. सध्याचे काळात ईश्वराज्ञेप्रमाणे वागून मानवजन्माचे सार्थक करणारी मंडळी सत्पुरुषांचीही कृपापात्रच ठरतात. असो.

सौ. सिंधूताई, सौ. सुरेखाताई, आयुष्यमती मानसीताई सर्वांना मंगल आशीर्वाद. इतर सर्व प्रेमी सज्जनांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे. प्रेमछत्र असावे, ही विनंती.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराज जेव्हा जेव्हा बीडला येत असत, आम्हाला सारखे त्यांच्या अवती भवती असावे, सेवा करावी असे वाटे. एरवी व्यवसायाकारणे इतरत्र जाऊन त्यांचे दर्शन घेणे जमत नसे. पण आम्ही दवाखाना बंद करुन घरात थांबलो की ते लगेच म्हणत, 'आता तुम्ही दोघेही खाली जा. आम्ही बसतो. रुग्ण तुमची वाट पाहताहेत.' मग आम्ही नाईलाजाने दवाखान्यात परत जात असू. प.पू. महाराजांना रुग्णांबद्दल नेहमीच आपुलकी व कळकळ वाटायची.

माझे सासरे ती. श्री. अण्णाकाका (प्रभाकरराव) यांना बरेच वर्षापासून मधुमेहाचा आजार होता. कुपथ्य झाल्यावर तो जास्तीच बळावे. पण त्यांना मनापासूनच खाण्यापिण्याची आवड होती. चमचमीत-गोड सारे काही चाले. ऑगस्ट १९८२ च्या सुरुवातीला त्यांना जेवतानाच अचानक पोटशूळ उत्पन्न झाला. तात्पुरता औषधोपचार केला. पण येथील डॉक्टरांना त्यांच्या पोटात उजव्या बाजूस गाठ उत्पन्न झाली असावी असे वाटले. त्या काळात तपासणीच्या आधुनिक सुविधाही नव्हत्या. क्ष किरण तपासणीतही विशेष निदान झाले नाही. पोटातील दुखणे अचानकच उद्भवे व असह्य वेदनेने ते गडबडा लोळत. अशा वेळी जेवण वगैरे काहीच नकोसे वाटे. त्यामुळे त्यांना पुढील तपासणीसाठी आम्ही औरंगाबादला घेऊन गेलो. नेमके त्याच काळात माझी तात्पुरती नोकरी कायम व्हावी या प्रयत्नात डॉ. दिलीप मुंबईला गेले होते. माझ्या इतर डॉक्टर मित्रांच्या मदतीने ती. अण्णाकाकांच्या बेरियम मिल वगैरे तपासण्या करुन घेऊन आमच्या प्रोफेसर्सना, निष्णात डॉक्टरांना सर्व

रिपोर्टस् दाखविले. त्यांनी मोठ्या आतड्यांच्या कर्करोगाची शक्यता वर्तविली. या आजाराच्या गांभीर्याची कल्पना असल्यामुळे मला धक्काच बसला. मनातल्या मनात खूप रडू येऊ लागले. पण सासूबाईंना खूप काळजी वाटेल म्हणून वर वर मुंबईच्या डॉक्टरांना एकदा दाखविले की उपचार होतील अशी त्यांची समजूत काढून डॉ. दिलीपना त्वरित बोलावून घेतले. त्या काळात सोनोग्राफी मशीन हे फक्त बॉम्बे हॉस्पीटल व टाटा मेमोरियललाच होते. तिथली अपॉईंटमेंट घेतली व जाण्याचा दिवस ठरवला.

प.पू. महाराजांच्यावर अपार श्रद्धा-भक्ती होतीच. म्हणून प्रथम त्यांचे दर्शन घेऊनच पुढे जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पहाटे प.पू. महाराजांच्या घरी डॉ. दिलीप आणि ती. अण्णाकाका 'रेणुका निवास' मध्ये पोहोचले. व्यवस्थित दर्शन झाले. प.पू. महाराजांनी 'रोज एक सप्तशतीचा पाठ ब्राह्मणद्वारा' करण्यास सांगितले. 'प्रकृतीस फरक पडून आतील गोळा जिरुन जाईल' असे सांगितले. मुंबईस जाऊन यावे असे सुचविले.

पुढे मुंबईला सोनोग्राफी व इतर तपासण्या करण्यात आल्या. विशेष गंभीर असे आजाराचे स्वरुप आढळले नाही.

बीडला परत आल्यानंतर प.पू. महाराजांच्या आज्ञेने आमचे उपाध्याय श्री. पुरंदरे यांनी नित्यपाठाचा संकल्प केला व खंड पडू न देता पाठ सुरु ठेवला.

या व इतर अनेक अडचणींना प.पू. महाराज योग्य मार्गदर्शन करीत. त्या संदर्भात त्यांनी पुण्याहून दि. ६-९-८२ ला एक पत्र पाठविले, ते पुढीलप्रमाणे होते.

॥ श्री दत्त ॥

पुणे-४ श्री वासुदेव निवास

दि. ६-९-८२

डॉ. सौ. सुरेखाताई व डॉ. दिलीप देशमुख

यांना सप्रेम सादर निवेदन

आपले सविस्तर पत्र वाचून आनंद झाला. डॉ. वाघमारे यांचेही पत्र मिळाले. त्यांनाही उत्तर दिले आहे. येथे प्रतिवार्षिक श्री भागवत सप्ताह पारायण नुकतेच संपले. यामुळे पत्रास विलंब होत आहे. सौ. सुरेखाताईंची नोकरी तूर्त सुटल्याचे कळले. तथापि घरातील दवाखाना सांभाळण्याचे त्यांचे काम चालूच आहे. आपणा दोघांजवळ सर्वांना आरोग्य मिळवून देणेची उत्तम विद्या असल्याने आपली नित्य अपेक्षा सर्व लोकांना रहाणारच. नोकरीसुद्धा या आपल्या विद्येमुळेच असणार. तो आत्मविश्वास व परमेश्वरावर पूर्ण विश्वास असल्यावर योगक्षेमाची चिंता केव्हांच उत्पन्न होणार नाही.

रोज श्री. वे. बाबुराव सप्तशतीचा पाठ करीत असतीलच. याने प्रपंचातील सर्व समस्या सुटतील, काळजी नसावी. तो पाठ रोज चालू ठेवावा. त्यांचे वाचन सावकाश, व्यवस्थित असते. चांगले आहे. श्री. काका व सौ. सिंधूताई यांना सप्रेम नमस्कार. आमावस्येनंतर नाशिक, जालना इकडे जाऊन नवरात्रीस येथे येऊ. नवरात्री झाल्यानंतर देऊळगावी यात्रेस जाऊन श्री गुरुद्वादशीस वाडीस जाता येईल. आयुष्यमती मानसी ताईस मंगल आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

ती. अण्णाकाकांच्या प्रकृतीस चांगलाच आराम पडला. माझी ही नोकरी व घरचा दवाखाना व्यवस्थितपणे चालू राहिले. प. पू. महाराजांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे त्यांनी सुरु केलेला श्री सप्तशतीचा नित्यपाठ अजूनही व्यवस्थितपणे अखंड चालू आहे. ती. अण्णाकाकांना जाऊन आता चौदा वर्षे झाली पण त्यात खंड पडला नाही. प.पू. महाराजांच्या वरील पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे- '...याने प्रपंचातील सर्व समस्या सुटतील काळजी नसावी. तो पाठ रोज चालू ठेवावा' या त्यांच्या वाचाशक्तीने हा नित्यपाठ व्यवस्थित चालू आहे. योगक्षेमाचा भार तेच वाहत आहेत.

वैद्यकीय ज्ञान जरी संपादन केले तरी 'सर्वांना आरोग्य मिळवून देणेची उत्तम विद्या' व 'तो आत्मविश्वास व परमेश्वरावरील पूर्ण विश्वास' या गोष्टींची जाणीव करुन देऊन प.पू. महाराजांनी पुढील वाटचालीला भक्कम आशीर्वाद दिले. त्याची प्रचिती वेळोवेळी येत राहिली.

पुढे या ना त्या कारणाने पुण्यास डॉ. दिलीपचे जाणे होत असे. तेव्हा 'रेणुका निवास' मध्ये पण आवर्जून दर्शनास जायचे. आल्यावर तेथील वर्णन सांगताना आम्हाला पण दर्शनाचा लाभ झाल्यासारखे वाटे.

पहिली 'नवचंडी' या वास्तूत करवून घेऊन प.पू. महाराजांनी 'श्री जगदंबेच्या' अर्चनाची गोडी मनात करुन दिली. तसेच नित्यपाठ सुरळीत होण्याचीही तजविज करुन ठेवली. देवीभक्तीचा जागर निर्माण झाला व डॉ. दिलीपना, 'सर्व मंगल मांगल्ये....' हे संपूट लावून नवचंडी व्हावी अशी इच्छा झाली. त्याप्रमाणे प.पू. महाराजांशी

पत्राद्वारे विचारणा केली. साधारण उन्हाळा म्हणजे मार्च १९८३ चा काळ होता. प.पू. महाराजांना बरे वाटत नव्हते. तरी त्यांनी २०-३-८३ ला 'श्री वासुदेव निवास-पुणे' इथून पत्र पाठविले-

॥ श्री दत्त ॥

पुणे-४ श्री वासुदेव निवास
दि. २०-३-८३

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम

आपले श्री नानाना आलेले पत्र पाहिले. आम्ही दोन दिवसांपूर्वी नाशिकचा प्रवास आटोपून येथे परत आलो. डॉ. सरदेसाई यांनी काल आमची प्रकृति तपासून सांगितले की, तूर्त प्रवास करु नका. सप्टेंबर नंतर प्रवास करणे बरे. फाल्गुन अखेर पुनः नाशिकला जावयाचे आहे. तेथे शतचंडी याग आहे. परवा येताना त्यांनी आम्हाला आमंत्रण दिले. श्री. नानामहाराज तराणेकर, श्री. धुण्डामहाराज देगलूरकर यांनाही त्यांनी बोलावले आहे. करीता आपला संकल्पित नवचंडी याग आपणास सोयीचे वेळी आपण करुन घेणेस हरकत नाही. उन्हाळ्यामुळे प्रवासाचा त्रास होतो. विश्रांतीची अपेक्षा आहे. आपल्या कार्याचे वेळी देहाने नाही तरी मनाने आम्ही तिथे आहोतच. भगवतीच्या प्रेरणेने पुण्यकर्म आपणाकडून घडत आहे. याबद्दल धन्यवाद. घरी सर्वत्रास यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांची प्रकृती बरी नाही. त्यांना उन्हाळ्याचा त्रास होतो आहे हे वाचून जीव कळवळला. त्यांनी लावलेली ही भक्तीची ज्योत तेवत ठेवणे आवश्यक होते. श्री. उपाध्यायांच्या मदतीने गावातील इतर विद्वत् ब्रह्मवृंदाशी संपर्क साधला व चर्चा करुन 'संपूटित नवचंडीचा' मुहूर्त दि. २२-४-८३ रोजी सुनिश्चित केला. त्याप्रमाणे प.पू. महाराजांना पत्र पाठविले. त्यांचे त्वरित आशीर्वाद पत्राद्वारे आले.

****

॥ श्री दत्त ॥

पुणे-४ श्री वासुदेव निवास

दि. २१-४-८३

सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. उद्यापासून आपल्या घरी नवचंडीस आरंभ होत आहे. हे पुण्यकर्म भगवतीच्या प्रेरणेने होत आहे. याने कल्याणसाधक भगवतीचा प्रसाद सर्वांनाच मिळणार आहे. मागच्या वर्षी हा प्रसाद तेथे आम्हालाही मिळाला होता. आपले पू. पिताजी, सौ. सिंधूताई, सौ. रेखाताई, कु. मानसीताई सर्वांच्याच मनात धर्मभावना, ईश्वरभक्ती आहे. आपलेही पूर्वसंस्कार पुण्यमय आहेत. यामुळे ईश्वर संतोषकारक पुण्यकर्मे आपणांकडून वारंवार घडतात.

'सत्कर्मयोगे वय घालवावे' हा संतांचा आदेश आपणांकडून श्रद्धेने पालन केला जात असल्याचे पाहून आम्हाला समाधान वाटते. नाशिकहून आम्ही पाडव्याच्या आदले दिवशी येथे आलो. देऊळगावी न जाता येथेच विश्रांतीकरिता राहिलो. आता चैत्र पौर्णिमेनंतर

नरसोबावाडीस श्री नारायणस्वामीजींच्या पुण्यतिथी उत्सवास जाऊन यावयाचे आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प. पू. महाराजांनी संकल्प केल्याप्रमाणे 'श्री नवचंडी'च्या संपुटित पाठाची सुरुवात झाली. आदी व अंती 'सर्वमंगल मांगल्ये...' या श्लोकाने करुन मध्ये पाठातील प्रत्येक श्लोक या क्रमाने पाठास सुरुवात झाली. प्रत्येकजण सावकाश व्यवस्थितपणे वाचन करु लागले. प.पू. महाराजांनी नमूद केल्याप्रमाणे त्यांचे अस्तित्व यज्ञमंडपात जाणवतच होते. या दरम्यान आणखी एक आश्चर्याची गोष्ट घडली. ती म्हणजे, या भागातील एक वेदशास्त्र संपन्न अग्निहोत्री तपस्वी व चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व असणारे श्री रंगनाथबुवा सेलूकर महाराज यांचा बीड येथे एका साधकाच्या घरी मुक्काम होता. यज्ञाच्या हवनाला सुरुवात होण्यापूर्वी त्यांचे आशीर्वाद घ्यावे म्हणून डॉ. दिलीप व श्री. मोरेश्वर देवधर गुरुजी (पंढरपुरकर) त्यांचे दर्शनास गेले असता त्यांनी संतोष व्यक्त केला. यज्ञमंडपाचे ठिकाणी आले. बराच काळ थांबले व पूर्णाहुती झाल्यानंतर अग्निमंथन करुन प्रसाद शिजवावा व इथेच भोजन व्हावे; अशी इच्छा त्यांनी प्रगट केली. जणू प.पू. महाराजांनीच इथे येऊन त्यांना आम्हाला आशीर्वाद देण्याची प्रेरणा दिली. आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. येथील कार्य समाप्तीनंतर दुसरे दिवशी विधिवत अग्निमंथन करुन सोवळ्यात

पाकसिद्धी केली. पंचपक्वान्न केले व त्यांच्या पंक्तीत इतर ब्रह्मवृंदानाही आमंत्रित करुन प्रसादाचे भोजन केले गेले.

प.पू. महाराजांना आमच्या अंतरीच्या तळमळीची जाणीव होतीच. म्हणून त्यांनी या दुसऱ्या रुपातून आमचे समाधान केले.

पुढे या प.पू. वे. सेलूकर महाराजांनी बीडला 'आप्तोर्याम याग' व गंगाखेड मुक्कामी 'गवामयन याग' संपन्न केले व गंगाखेड येथे चारही वेद पठणासाठी पाठशाळेची स्थापना केली. आता त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र श्री यज्ञेश्वर शास्त्री सेलूकर हे परंपरा चालवित आहेत. या भागात त्यांचा मोठा शिष्य परिवार आहे.

****

वास्तूत होणारी प.पू. महाराजांनी संकल्पित केलेली सत्कर्मे सर्व परिवाराला खूप समाधान देऊन गेली. त्या गोडीत अजून वृद्धी व्हावी व भगवतीची सेवा घडावी या प्रेरणेने त्याच वर्षी 'शतचंडी याग' व्हावा असे मनात आले, त्याप्रमाणे प.पू. महाराजांना पत्र पाठवून मानस व्यक्त केला. त्यावेळी प.पू. महाराज बेंगलोर मुक्कामी होते. त्यांनी तेथून पत्रोत्तर पाठविले---

**॥ श्री दत्त ॥**

बेंगळूर

दि. २२-६-८३

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आम्ही बरेच दिवसापासून प्रवासात असल्याने उत्तरास विलंब होत आहे. आठ दिवसानंतर पुण्यास जाणे होईल.

ठरल्याप्रमाणे आपल्या घरी नवचंडी झाली. पुनः शतचंडी करण्याची आपली इच्छा आहे हे वाचून समाधान वाटले. 'उपासनेला दृढ चालवावे' या आदेशाप्रमाणे आपले परमार्थाकडेही लक्ष चांगले आहे ही भगवतीची कृपाच आहे. मार्गशीर्ष महिन्यात शुद्ध पक्षात श्री दत्तजयंती उत्सव असतो व वद्य पक्षात अन्यत्र जावे लागते अशी स्थिती आहे. आपण काळ ठरवून कळवावे. त्यावेळी पुण्यास मुक्काम असल्यास दोन दिवस येऊन जाऊ.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांचे हे पत्र वाचून आम्हाला खूप आनंद झाला. पुन्हा एकदा श्री भगवतीचे आवाहन करण्याची संधी मिळत होती. बुद्धीदात्री ही तीच व यथोचित करवून घेणारे प.पू. महाराज असल्यानंतर तिथे न्यूनाधिक दोषांना कुठून थारा असणार?

सर्व ब्रह्मवृंदांच्या संमतीने पौषात वद्य पक्षात कार्यक्रम व्हावा असे ठरले. प.पू. महाराजांना त्याप्रमाणे पत्राद्वारे कळविले. कारण त्यांची व्यग्रता जाणून घेणे आवश्यक होते. त्यांनी तसे इथे येण्याचे कबूल केलेले होते.

त्यांचे दि. ५-१०-८३ चे पत्रोत्तर वाचून आम्हाला अत्यानंद झाला. ते इथे येणार तर होतेच पण पत्रात त्यांनी सविस्तरपणे कार्यक्रमासंबंधीचे मार्गदर्शन केलेले होते. ते पत्र असे :-

॥ श्री दत्त ॥

पुणे-४ वासुदेव निवास
दि. ५-१०-८३

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. पौष वद्यात कार्यक्रम ठरला हे ठीक झाले. २७ तारखेस पाठास आरंभ होईल. २९ तारखेस ९० पाठ पुरे होतील. राहिलेले १० पाठ होऊन हवनास आरंभ ३० तारखेस होईल. त्याच दिवशी देवतादिस्थापनोत्तर हवनास आरंभ होऊन, हवनास दहा ब्राह्मण बसले तर हवनही पूर्ण होईल पण वेळ बराच होईल. सर्व विधीज्ञ मंडळींच्या सोईने योग्य ते घडून येईल. काळजीचे कारण नाही. आपली श्रद्धा, भक्ती दृढ आहे. भगवतीचे कृपेने सर्व व्यवस्थित पार पडेल.

आम्हाला आणण्याकरिता आपण कोणी येणेचे कारण नाही. श्री रघुनाथरावांचे बरोबर आम्ही दुपारचे गाडीने येथून निघून तिकडे येऊ शकतो. २६ तारखेस न निघता २७ तारखेला दुपारी निघाले तर चालेल काय ? त्या दिवशी पाठ सुरु करणेस हरकत नाही. दुसरे दिवसापासून आम्ही आहोतच. येथे २७ तारखेला संस्थेचा वाढदिवस असतो. ट्रस्टींचा आग्रह होण्याचा संभव आहे. त्या दिवशी विशेष कार्यक्रम नाही. नैवेद्य व सुवासिनी भोजन झाले की दुपारी १ ला गाडी असल्यास ती सापडेल. आपली संमती मिळाल्यास तसे करता येईल.

नित्योपासनाक्रमातील श्री तुळजाभवानीचे स्तोत्र रोज सौ. सुरेखाताईंनी म्हणावे.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

शतचंडीचा मुहूर्त ठरल्याबरोबर तो सुनियोजितपणे कसा पार पाडायचा आहे त्याचे सविस्तर पत्र प.पू. महाराजांनी कितीतरी आधी व्यवस्थितपणे कळविले होते.

यापूर्वीच्या नवचंडीयागाच्या वेळेसही जातीने उपस्थित राहून पूर्णवेळ यज्ञ मंडपात बसून सर्व ही कार्य विधीवत विशुद्धपणे करुन घेतले होते. आताही जातीने उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले होते.

या काळात दुसऱ्या वेळेस मी गरोदर होते. थोड्याशा हालचालींनीही रक्तदाब वाढत असे. त्यामुळे बाळाचे वजन व्यवस्थित वाढत नसे. त्यासंबंधी प.पू. महाराजांना मागील पत्रात कळविले असता त्यांनी वरील स्तोत्र नित्य म्हणण्याचे सांगितले. त्यामुळे प्रसूती सुलभपणे पार पडली व आम्हाला दुसरी कन्या झाली. २६ ऑक्टोबर १९८३ला मध्यरात्री तिचा जन्म झाला. प.पू. महाराजांना हे पत्राने कळविताच त्यांचे लगेच आशीर्वादाचे पत्र आले. ते असे-

**॥ श्री दत्त ॥**

नरसोबावाडी
दि. १-११-८३

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही तूर्त श्री गुरुद्वादशीकरिता आलो असून ३ दिवसांनी पुण्यास परत जाऊ. सौ. सुरेखाताई सुखरुपपणे प्रसूत होऊन कन्यारत्न झालेचे आपले पत्र वाचून समाधान वाटले. आयुष्मान बाळबाळंतिणीस मंगल आशीर्वाद.

काही दिवसांपूर्वी आपले पत्रास उत्तर पाठविले होते, ते मिळाले की नाही ते पुण्याचे पत्त्यावर कळवावे. '२६ जानेवारीस आपण कोणीतरी पुण्यास येऊ' असे आपण लिहीले होते. आम्ही

त्याचे उत्तरात लिहीले होते की, २६ च्या ऐवजी २७ ला दुपारी जेवण करुन पुण्याहून निघता येईल का ? म्हणजे २७ चा पुण्याचा कार्यक्रम उरकून भोजनोत्तर पुण्याहून निघून बीडला संध्याकाळपर्यंत पोहचता येईल. २७ ला पाठ सुरु झाले तरी हरकत नाही. २८ पासून आम्ही शेवटपर्यंत तेथे आहोत, असे विचारले होते. याला आपली संमती पत्रोत्तरी कळवावी.

तसेच तेथून कोण येणार तेही कळवावे. म्हणजे बीडच्या एस.टी. चे त्यांचे रिझर्वेशन आमचे बरोबर २७ तारखेचे आधी करुन ठेवणे सोईचे होईल असे वाटते.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद
कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांचे पत्र पाहून आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. आमच्या कन्यकेला जन्मताच श्री सद्गुरुंचे आशीर्वच मिळाले. केवढी भाग्यवान आहे ती !

ठरल्याप्रमाणे प. पू. महाराजांना व रघुनाथराव काकांना इथे आणण्यासाठी गाडी गेली. आताचे पुण्यातील 'मुळे कन्स्ट्रक्शन'चे मालक श्री अनंतराव मुळे हे डॉ. दिलीपचे जवळचे मित्र आहेत, ते त्यांच्या गाडीतून स्वत: गाडी चालवत प.पू. महाराजांना २७ जानेवारीस संध्याकाळी मुक्कामास इथे घेऊन आले.

कार्यक्रमास आप्तेष्ट-मित्रमंडळी बरीच जमली होती. थोरले मामेसासरे श्री. बाबुमामा आजेगावकर यांची प.पू. महाराजांशी बरीच चर्चा होत असे. अधुनमधून आम्हीही ऐकत असू.

'श्रीशतचंडी याग' दि. २७ ते ३१ जानेवारी पर्यंत संपन्न झाला. प्रथम श्री अथर्वशीर्षाचे सहस्त्रपाठ करुन गणेशाचे आवाहन व पूजन झाले. नंतर प.पू. महाराजांची पाद्यपूजा होऊन श्री सप्तशती पाठास सुरुवात झाली. प.पू. महाराजांनी ठरविल्याप्रमाणे दि. २७ ते २९ या काळात ९० पाठ पूर्ण झाले. त्यानंतर ३० तारखेस हवनास १० ब्राह्मण बसले होते व त्यांचा राहिलेला अंशात्मक भाग ३१ तारखेस सकाळी संपन्न होऊन कुमारी पूजन, बलिदान व पूर्णाहुतीचा कार्यक्रम यथासांग पार पडला.

प.पू. महाराज सकाळीच स्वत:चे आन्हिक पूर्ण करुन लवकरच यज्ञाच्या स्थळी येऊन बसत व पूर्ण कार्यक्रम होईपर्यंत तिथेच बसून राहत. या वयातही त्यांची कार्याबद्दलची तळमळ व तितिक्षा वृत्ती पाहून आश्चर्य व अभिमान वाटे.

ठरलेल्या नियोजित कार्यक्रमामुळे ३१ तारखेस संध्याकाळी प.पू. महाराज येथून मार्गस्थ झाले.

मागे एका यज्ञाच्या निमित्ताने प.पू. महाराज येथे आले होते तेव्हांची गोष्ट...

ती. भाऊसाहेब क्षीरसागर- माझे मावस सासरे, व सौ. माई मावशींचे यजमान, हे प.पू. गुळवणी महाराजांचे जवळचे शिष्य- त्यांचे जणू जावईच. प.पू. महाराजांचा पण ते पुण्यात असतानाचा खूप घरोबा. शिवाय 'वासुदेव निवास' मधील नैमित्तिक उत्सवात त्यांचा मोठा सहभाग असे. पुढे ते एस.एस.सी बोर्डाचे सेक्रेटरी झाले होते. प.पू. महाराजांवर त्यांची निस्सीम भक्ती होती. त्यांचा श्री भागवत सप्ताहही श्री. भाऊसाहेबांच्या घरी झाला होता.

त्या काळात भाऊसाहेब अत्यवस्थ होते व औरंगाबादला घाटी रुग्णालयात ॲडमिट होते. त्यांना संडासद्वारे खूप रक्तस्राव होत होता. कॅन्सरचे तात्पुरते निदान करुन त्यांना मुंबईला पुढील तपासणीसाठी नेण्याचे ठरविले. पण एकंदरीत प्रकृती पहाता तेथे नेणेही अवघड होते. डॉ. दिलीपची इच्छा होती की त्यांच्या अंतकाळी निदान एकदा तरी प.पू. महाराजांचे दर्शन घडावे. कारण डॉक्टरांनी पण सांगितले ते आता काही काळाचे सोबती आहेत. तसे डॉ. दिलीपनी महाराजांना बोलून दाखविले व त्याप्रमाणे वाहनाची व्यवस्था करु, असे सांगितले. त्यावर प.पू.महाराज उद्गारले, "कशाला ! आम्ही दोन-तीन महिन्यांनी औरंगाबादला जाणारच आहोत. तेव्हां श्री. भाऊसाहेबांना भेटूच. !"

आम्ही स्तब्ध झालो. मनोमन एवढे मात्र निश्चित झाले की, प.पू. महाराजांचे शब्द म्हणजे सत्यच आहे. ती. भाऊसाहेबांचे आयुष्य निदान महाराजांचे दर्शन होईपर्यंत तरी लांबेल.

पुढे प.पू. महाराज औरंगाबादला भाऊसाहेबांच्या घरी गेले. त्यांनाही खूप आनंद झाला. त्यांची प्रकृतीही बरीच सुधारली व साधारणतः पुढे वर्षभर ते जगले. शेवटी आयुष्य संपण्यासाठी काहीतरी कारण लागते पण ज्यावेळी अत्याधुनिक विकसित झालेल्या वैद्यकीय शास्त्राने ठामपणे सांगितलेले निदान बरोबर झाले नाही पण प.पू. महाराजांनी सहज उच्चारलेले शब्द मात्र भविष्यात खरे ठरले.

प.पू. महाराजांच्याबद्दल अमाप आदर तर होताच पण आता सहवासाने लळा उत्पन्न झाला होता. जीवनात घडलेल्या सुख-दुःखाच्या घटना लगेच पत्राने त्यांना कळविल्याशिवाय चैन पडत नसे.

साधारणतः मार्च-एप्रिल ८४ मध्ये डॉ. दिलीपना सारखी सारखी खूप वाईट स्वप्ने पडू लागली. त्यांचा अर्थही लागत नव्हता व त्यांचे दैनंदिन कामकाज विचलित होऊ लागले. त्याच काळात सासूबाई व ती. अण्णाकाका यात्रेस गेले हाते. प.पू. महाराजांनी पत्राद्वारे योग्य मार्गदर्शन करुन संकट निरसन केले.

आपल्या पत्रात ते लिहितात...

****

॥ श्री दत्त ॥

बुलढाणा
दि. ९-४-८४

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र हैद्राबादला श्री. बाबुरावांचेकडून मिळाले. सौ. सिंधूताई व श्री. प्रभाकरराव यात्रा करुन परत आल्याचे वाचून आनंद झाला. ईश्वरकृपेने प्रवास पार पडला. बरे झाले.

आपली स्वप्ने वाईट नाहीत. आपण वर पुलावर सुरक्षित जागी होता. सर्व दोष जाणेकरिता श्री विष्णुसहस्त्रनामाचे बाराशे पाठ ब्राह्मणद्वारा किंवा स्वतः घरी कोणीतरी करण्याचा संकल्प करुन रोज होतील तितके पाठ वाचावेत. दवाखाना बांधून झल्यावर 'भूशुद्धी होऊन सर्वांचे संरक्षण अखंड चालू रहावे.' अशी प्रार्थना करावी. बांधून झाल्यावर उदकशांती करावी.

आम्ही येथे देऊळगावहून दोन दिवसांपूर्वी आलो. येथून १६ तारखेस बुलढाणा-पुणे गाडीने सकाळी ९ ला निघून औरंगाबादला श्री. भाऊसाहेब, सौ. माई यांना भेटून १० तारखेस

पुण्यास जाऊ. तेथून २-३ दिवसांनी श्री नारायणस्वामींचे उत्सवास जावयाचे आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

जालना-खर्डा किंवा देऊळगावराजा-खर्डा या मार्गात बीड येते. उत्सवाचे किंवा इतर कार्यक्रमाचे निमित्ताने प.पू. महाराजांचे बरेच वेळेस जाणे-येणे होई. काही वेळेस तर प्रवासातून जाता येता त्यांना बीडला यावेसे वाटे. अन् काही कार्यक्रम न होता त्यांची विश्रांती होई. त्या काळात आम्हा सर्वांना अगदी सणासुदीचा आनंद अन् उत्साह वाटे. कारण शेवटी बीडला काही कार्यक्रमानिमित्त प.पू. महाराज येणार असल्याची नुसती कुणकुण जरी लागली तरी बरेच नातेवाईक-मित्रपरिवार दर्शनासाठी जमा होई. गावातील इतर शिष्य परिवारही भोजनाचे आमंत्रण देण्यासाठी येत. अन् या सर्वांना 'नाही' म्हणणे अवघड जाई.

पण काहीवेळेस इथे प.पू. महाराज फक्त विश्रांती इच्छीत. अशाच बार्शीला जाण्यापूर्वीच्या पत्रात ते लिहितात-...

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. १०-५-८४

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथून उद्या बार्शीस जात आहोत. तेथे १६ तारखेपर्यंत मुक्काम आहे. तेथून १७ तारखेस सकाळी जालना गाडीने निघून

आम्ही १०-११ पर्यंत बीडला आपलेकडे येत आहोत. भोजनोत्तर थेट देऊळगावची गाडी असल्यास त्या गाडीने देऊळगावी जाऊ नाहीतर मागच्या प्रमाणे दुसरे दिवशी सकाळी बीड-अकोला गाडीने देऊळगावी जाऊ. मध्ये बीडला विश्रांती मिळून भेटी होतील. विशेष वाच्यता करु नये. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. दत्तमहाराजांच्या येथील वास्तव्यात त्यांच्या पूजेची तयारी करताना, भोजनादी शिजवतांना, तांबुल कुटून ठेवतांना, संध्येची तयारी करतांना, बिछाना घालतांना, प्रवचनाची बैठक घालतांना, वस्त्रे धुतांना, पाय धुवून आल्यानंतर कोरड्या पंचाने पाय पुसतांना आम्हा सर्वांना परमानंद होत असे, जो शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही. वाडवडिलांच्या पुण्याईने व प.पू. महाराजांच्या कृपेने हे सहवासातील क्षण आमचे भाग्य बनून येत गेले.

प.पू. महाराजांनी मागच्या पत्रात सांगितल्याप्रमाणे आमचे येथील पुरोहित श्री. बाबुराव पुरंदरे यांनी श्री विष्णुसहस्त्रनामाचे १२०० पाठ केले. जवळजवळ वर्षच लागले व त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी भोजनांनी सांगता केली. बऱ्यापैकी अन्नदान झाले.

आमचे घर पूर्वीच्या जुन्या वाड्याप्रमाणे होते. चारी बाजूला उंच तटबंदी सारख्या भिंती, आत दगडी जोते व माळवद, काही ठिकाणी छताला पत्रे होते. मागे पुढे प्रशस्त अंगण होते. मुख्य गेटच्या समोर तात्पुरते शेड उभारुन काही काळ बाह्यरुग्ण विभागाची सोय केली

होती. पण आता सर्वच्या सर्व बांधकाम पूर्णपणे पाडून नव्याने आधुनिक पद्धतीने खाली दवाखाना व वर राहते घर बांधण्याचा निर्णय घेतला. प.पू. महाराजांचे कानावर सर्व घातले. सर्व बांधकाम पाडण्यासाठीच बराच काळ लागणार होता. कारण वाड्यात सर्वत्र मोठ्या-मोठ्या लादण्या (तळघरे) होत्या. ज्यांचे छत हे पसरट अशा शिळा एकमेकांना जोडून बनलेले होते. त्या शिळा हलवणे खूप कठीण होते. साधारणतः तीस जोडपी अविरतपणे सहा-आठ महिने ते काम करीत होती.

प.पू.महाराजांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे, जुने सर्व बांधकाम तळघरांचे पायापासून काढून टाकून, पायाच्या जमिनीस सूर्यदर्शन घडविले आणि भूशुद्धी केली. साधारणतः १८-२० फूट खोल खोदकाम करावे लागले. हे सर्व खोदकाम करताना बऱ्याच अस्थी निघत होत्या. त्यामुळे डॉ. दिलीपच्या मनात शंका येत होत्या. प.पू. महाराजांना तसे सविस्तर कळविले असता त्यांनी पुढील पत्र पाठविले, ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १०-११-८४

सप्रेम सादर निवेदन

आपले पत्र येऊन बरेच दिवस झाले. प्रवासात बराच काळ गेल्याने उत्तरास विलंब झाला. १-२ दिवसात आम्ही गुजरात प्रांतात जात आहोत. श्री दत्तजयंती पर्यंत परत येणे होईल.

आपल्या घराचे बांधकाम चालू आहे हे ठीक आहे. पूर्वी भीतीने घरे बंद करुन आतच रहाणेचे प्रसंग असल्याने जनावरांच्या अस्थि निघाल्या असतील. सर्व बांधकाम पूर्ण झाल्यावर वास्तुशांतीचे सुमारास

सर्व कल्याणार्थ शतचंडीही करावी म्हणजे सर्व दोष दूर होतील. काळजीचे कारण नाही. सौ. सुरेखाताईंचे शिक्षण चालू असेलच.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

माझे पदव्युत्तर शिक्षण आजारी पडल्यामुळे रखडले गेले होते. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमापैकी एक वर्ष पूर्ण करुन मी दीर्घकाळच्या आजारी रजेवर घरी परत आले होते. काही काळ औषधोपचारानंतर प्रकृती बरी झाली. पण आता उरलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न चालू होते. पण विद्यापीठातून अजून पाठपुरावा संपत नव्हता. अर्थात प.पू. महाराजांच्या आशीर्वादाने ते पुढे पूर्ण झाले व डी.जी.ओ.ची डिग्री मे १९८६ ला मिळाली.

या घराचे समुळ खोदकाम सुरु असल्यामुळे आम्ही सर्वजण नगररोड वरील जवाहर कॉलनीत असलेल्या आमच्या लग्नाच्या वेळी बांधलेल्या 'श्री सरस्वती निवास' या आमच्या जुन्या घरात रहावयास गेलो. तिथे वरच्या मजल्यावर माझे दीर श्री. शामसुंदर व जाऊ सौ. वैजयंती त्यांच्या तिन्हीं मुलींसह रहात होते. दवाखान्याचा बाह्यरुग्ण विभाग मात्र बलभिम चौकातील घराच्या जवळच भाड्याने घेतलेल्या जागेत चालू होता.

नवीन घराचे प्राथमिक बांधकाम होण्यास २-३ वर्षांचा कालावधी लागला. त्या काळात एकदा प.पू. महाराज, प. पू. सौ. ताई महाराज व इतर मंडळी बीड मार्गे जालन्यास जाणार असल्याचे कळले. त्याकाळात मोबाईलची सुविधा नव्हती. म्हणून आम्ही दोघेही

दुपारपासून त्यांच्या मार्गात बस स्टॅण्ड समोर थांबून गेलो. प.पू. महाराजांची गाडी दिसली आणि आम्ही हात दाखवून ती थांबवली. त्यांना चहापाण्यासाठी घरी येण्याची विनंती केली. त्यांनाही खूप आनंद झाला.

घरी गेल्यावर दारात प.पू. महाराजांना औक्षण केले. तेव्हा त्यांनी, "सौ. ताई महाराजांना औक्षण करा. त्या प्रत्यक्ष भगवती स्वरुप आहेत" असे सांगितले. औक्षण झाल्यावर चहापाणी झाले. सामान हलविताना गोदरेजच्या कपाटाच्या आरशाची काच फुटली होती. 'काच ताबडतोब बदलून टाका, सुवासिनीने फुटलेल्या आरशात पाहू नये' असे ताई म्हणाल्या. लगेच ती काच बदलली गेली. अगदी थोड्या काळासाठी का होईना प.पू. महाराजांचे घरी आगमन झाले. आम्हाला खूपच समाधान वाटले.

प.पू. महाराजांच्या दर्शनाची ओढ सतत असायची. पण व्यवसायातील व्यग्रतेमुळे नुसत्या आठवणींवर भागवायला लागायचे. तसे या भागात जाणे-येणे ठरले गेले असेल तर त्यांचे स्वतःहून पत्र यायचे मग आम्ही त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसत असू. असेच एक दि. ५-२-८५ ला आलेले पत्र---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ५-२-८५

श्रीमान डॉ. दिलीपराव व सौ. सुरेखाताई यांना

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आम्ही दोन दिवसांपूर्वी प्रवासाहून परत आलो. ८ तारखेनंतर पुनः प्रवास आहे. अंदाजे फाल्गुन पौर्णिमेपर्यंत

परगावी रहावे लागेल. नंतर येथे मुक्काम होईल असे वाटते. सध्या प्रकृती बरी आहे. त्रास नाही. औषध चालू आहे. ईश गुरुकृपेने भोग संपून जाईल. आम्ही वैशाख वद्य ६, मे १० तारीख यावेळी खर्ड्यास श्री गोले यांचेकडे लग्नाकरिता येणार आहोत. तिकडे ४-६ दिवस राहून नंतर बीड मार्गे देऊळगावी जाता येईल. तेथे श्री महाराजांचा (पू.पिताजी) जन्मशताब्दी महोत्सव सर्व मंडळी करणार आहेत. त्यावेळी जाताना आपली सर्वांची भेट होईलच.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

आमच्या जुन्या वाड्यातील नवीन वास्तूचा पहिला स्लॅब झाला. आतील बाजूचे व बाहेरील प्लास्टर राहिले होते. फक्त भिंती व चौकटी उभ्या केल्या होत्या. पण पुढे अस्त वगैरे काही असल्यामुळे वास्तूचा मुहूर्त लांबवर होता. म्हणून प.पू. महाराजांच्या सल्ल्याने 'वास्तुशांती' व 'नवचंडी याग' हे दोन्हीही कार्यक्रम दि. ८-३-८५ ला संपन्न झाले.

त्या काळात प.पू. महाराज गुजरातमध्ये गेले होते. तेथून परत आल्यावर त्यांनी सविस्तर पत्र पाठविले.

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २७-३-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आम्ही गुजराथमध्ये द्वारका, सोमनाथादि दर्शन यात्रेस २-३ आठवडे गेल्यामुळे उत्तरास विलंब झाला. आताही १/२ दिवसात अकलूज, वाडी इत्यादी ठिकाणी जावयाचे आहे. अक्षय्यतृतीये पर्यंत परत येऊ. काही दिवस येथे राहून खर्ड्यास १० मे पर्यंत येणे होईल. तिथे एक आठवडा राहाणे होईल असे वाटते. तेथून बीडला येता येईल. पुढे देऊळगावी जाणेचे आहे.

ठरल्याप्रमाणे वास्तुशांतीचा कार्यक्रम झाला असेल. भगवतीच्या कृपेने नवीन वास्तु आपल्या हातून उभारली गेली यात अनेक आर्त जीवांचे दु:ख निवारण करण्याचे पुण्यकर्म आपणा दोघांकडून होत राहून सर्वांचा दुवा आपणास मिळेल, ही भगवतीची कृपा व मातापितरांची पुण्याई आहे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प्रत्यक्षात पेशंटस् तपासताना किंवा ऑपरेशन्स, प्रसूती करताना आतापर्यंतच्या काळात असे जाणवते की, त्यांच्या तक्रारी ऐकताना मनापुढे कोणत्याही औषधोपचाराची रुपरेषा नसते. पण अमुक एका उपचाराने त्या रुग्णाला बरे वाटेलच अशी खात्री वाटू लागते.

एखादी प्रसूती अवघड असली तरी पुष्कळ वेळा आत्मविश्वास दुणावला जायचा आणि सगळे कसे सहज सोपे होऊन जायचे. एखादी स्त्री प्रसूतीसाठी आली असे आमच्या सासूबाईंना कळले की, त्या देवापुढे तुपाचे निरांजन लावत असत. आमचे ती. आण्णाकाका त्यांची थट्टा करीत पण हा त्यांच्या श्रद्धेचा भाग होता. आता हे प.पू. महाराजांचे पत्र वाचले की, जाणवते. वास्तू उभी राहिली की प्रत्यक्ष काम सुरु होण्यापूर्वीच त्यांनी त्यांच्या आशीर्वादाचे बळ आमच्या पाठीशी उभे केले होते. त्यामुळे कोणत्याही रुग्णांच्या उपचारात संदिग्धता मनात रहात नसे. एवढ्या वर्षांच्या प्रॅक्टीसमध्ये कसोटीचे प्रसंग फारच कमी आले. याचे सगळे श्रेय या पत्राद्वारे समजते.

सर्वपीडानिवारणार्थ 'शतचंडी' करावी, असे प.पू. महाराजांनी दि. १०-११-८४ च्या पत्रात कळविले होते त्याप्रमाणे येथील पुरोहितांच्या सल्ल्याने तिथी निश्चित करण्यात आली. त्यावेळी प.पू. महाराज नरसोबावाडीस होते. तेथून त्यांचे पत्र आले, ते याप्रमाणे---

**॥ श्री दत्त ॥**

नरसोबावाडी
दि. १७-४-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे श्री नारायणस्वामींचे उत्सवाकरिता आलो असून २० तारखेस पुण्यतिथीचा प्रसाद घेऊन २१ ला पुण्याकडे जाणेस निघू. नंतर तेथे १-२ आठवडे मुक्काम राहील असे वाटते.

खर्ड्याचे लग्नाकरिता आम्ही वैशाख पौर्णिमा होताच निघून १-२ दिवसात खर्ड्यास जाऊन पोचू. तेथे ४-५ दिवस राहून १४ तारखेस बीडला येण्याचा विचार आहे. त्यावेळी गाडी खर्ड्यास येणे शक्य असल्यास त्या गाडीने आपणाकडे येता येईल.

आपला शतचंडीचा कार्यक्रम ठरला असल्यास तो केव्हापासून सुरु होणार व केव्हा संपणार ते पुण्याचे पत्त्यावर कळवावे. दि. १४ मे ला ठरत असल्यास अथवा १५ मे ला सुरु करता आल्यास करुन चार दिवसात तो संपविता येईल. वे. पाठक गुरुजींना विचारुन सर्व ठरवावे. एखादा दिवस आम्हाला विलंब लागल्यास आरंभ करावा. आम्ही येतच आहोत.

तेथील आपणांकडील कार्यक्रम आटोपून आम्हाला जालन्यास एका कारखान्याचे वास्तुशांतीकरिता जावयाचे आहे. त्यांचे पत्र पुण्यास येईल तसे ते ठरेल. पत्राचे उत्तर पुण्याचे पत्त्यावर पाठवावे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी लिहिलेली पत्रे लंबीचौडी नसली तरी खूप कमी शब्दांत ते पूर्ण आशय व्यक्त करीत. कार्यक्रमाची रुपरेषा व्यवस्थितपणे समजावून देत. त्यांच्या मागच्या पुढच्या कार्यक्रमाचा उल्लेखही ते आवर्जून या पत्रात करीत असत.

वरील नरसोबावाडीहून पाठविलेल्या पत्रानंतर पुण्यास परत गेल्यावर तिथून त्यांनी २ मे ला असेच सविस्तर पत्र पाठविले व कार्यक्रमाची तारीख सुनिश्चित झाली. पुण्याहून पाठविलेले पत्र असे-

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. २-५-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. मजकूर समजला. आम्ही येथून ६ तारखेस निघून ७ तारखेस खर्ड्यास पोचू. मध्ये ६ तारखेस विश्रांतीकरता नगरला थांबू. खर्ड्याचे कार्य १२-१३ तारखेपर्यंत आटोपेल असे वाटते. १४ ला किंवा १५ ला (एकादशीस) बीड ला येणेस हरकत नाही. त्या अंदाजाने कोणास तरी खर्ड्यास पाठवावे. आपण येणेचे कारण नाही. आपण तेथेच असले पाहिजे. १४ ला संध्याकाळपर्यंत कोणी आले तरी चालेल. म्हणजे १५ ला सकाळी निघून बीडला येता येईल. तेथे येऊनच स्नानादि करता येईल. त्या दिवशी एकादशीच आहे. बाकी समक्ष भेटीत बोलता येईल.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

या 'शतचंडी' च्या कार्यक्रमानिमित्ताने प्रसिद्ध ज्योतिषाचार्य व वैदर्भीय पंचागकर्ते श्री. वामनराव उपाख्य दादासाहेब राजंदेकर सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते. त्यांच्या पत्नी म्हणजे सौ. पद्माताई राजंदेकर या डॉ. दिलीपच्या मावशी आहेत. प.पू. शंकरकाकांचे जावई म्हणून प.पू. महाराज त्यांना थोरल्या मेहुण्याच्या ठिकाणी समजून मान द्यायचे. दोघांचा वार्तालापही व्यवस्थित होत असे. त्यांचे चिरंजीव श्री. अरुण राजंदेकर हे टॅक्स कन्सल्टंट आहेत. सूनबाई सौ. विद्या ह्या पंचांगाची सर्व कामे बघायच्या. बऱ्याच

वर्षांनंतर या सर्वांचा या निमित्ताने बीडला मुक्काम झाला. याशिवाय इतरही खूप सगळे नातेवाईक जमले होते. सगळीकडे आनंदाला उधाण आले होते.

प.पू. महाराजांच्या सहवासात थकवा वगैरे तर जवळपासही नसे. सगळ्यांना कामातील सहभाग, काहीतरी मदतीचा हातभार असावा; असे वाटे. हे देवाचे कार्य आहे असे गावातील इतर मित्रमंडळींनाही वाटे. दररोजचे नैवेद्य आरती, प्रसाद याला खूपजण उपस्थिती लावून जात पण पूर्णाहूती नंतरच्या प्रसादाला कुणाला गावात आमंत्रण देण्याचे विसरले तरी ती व्यक्ती 'गडबडीत विसरले असतील, प.पू. महाराजांचे दर्शनही होईल व यज्ञाचा प्रसादही मिळेल' म्हणून आवर्जून येत असे.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत यज्ञमंडपातील सर्व कार्यक्रमाला प.पू.महाराज पूर्ण वेळ उपस्थित रहात. त्यामुळे ब्रह्मवृंदामध्ये पण चैतन्य राही व सर्वही विधी व्यवस्थित पार पडत. हे सगळ्यांचे सद्भाग्यच होते.

येथून प.पू. महाराजांचे जालन्यास जाणे झाले. त्यापुढे त्यांना अहमदाबादला जावयाचे होते. त्याआधी त्यांनी जालन्याहून पत्र पाठविले---

**॥ श्री दत्त ॥**

जालना

दि. २४-५-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे २१ तारखेस रात्री ९ ला सुखरुप पोचलो. ठरल्याप्रमाणे २२ तारखेस श्री काब्राशेटजींचे कारखान्यात वास्तुशांती

झाली. येथे सौ. ताईमहाराजांचे कडेच शेतात मुक्काम आहे. १-२ दिवसात औरंगाबादला जावयाचे आहे. तेथे अष्टविनायकांची स्थापना आहे. ती आटोपून २ जूनला सकाळी एस.टी. ने किंवा जमल्यास स्वतंत्र गाडीने आम्ही पुण्यास जात आहोत. तेथून ७ तारखेस अहमदाबादला जाणेस निघावे लागेल.

आपणाकडील शतचंडीचा कार्यक्रम शास्त्राप्रमाणे व्यवस्थित पार पडला. आपली व परिवारातील सर्व मंडळींची श्रद्धा, भक्ती, आस्था पाहून समाधान वाटले. प्रपंचातील ही सर्व कार्यसिद्धीला हे असे पुण्यकर्म पोषकच आहे. आपल्या पू. मातापितरांचे आशीर्वाद, पुण्याई आपल्या पाठीशी आहे. सहधर्मचारिणीही श्री भगवतीचे कृपेने धर्मश्रद्धासंपन्न मिळाली आहे.

उत्तरोत्तर आपली यशोवृद्धी ईश्वरकृपेने होवो ही प्रार्थना.

सर्वांना यथाधिकार नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी जातीने लक्ष घालून स्वतःच्या उपस्थितीत हे पुण्यकर्म व्यवस्थित करवून घेतले. आम्हा सगळ्यांना खूप समाधान वाटले. सर्वांनाच त्यांचा काही काळ सहवास मिळाला.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला माझे पदव्युत्तर दोन वर्षाचे शिक्षण एक वर्ष जेमतेम पूर्ण करुन अर्धवट सोडून परत यावे लागले होते. उरलेल्या टर्मस् पूर्ण करण्याची व अनुभव मिळवून परीक्षेस बसण्याची परवानगी मिळावी म्हणून डॉ. दिलीपचे अनंत प्रयत्न चालू होते.

विद्यापीठातूनच तशी मान्यता मिळणे आवश्यक होते. अभ्यासक्रम पूर्ण करुन परीक्षा उशिरा देणे, अशी उदाहरणे बरीच होती. पण अभ्यासक्रमच अर्धवट सोडून जाऊन पुन्हा तो परत करता यावा अशी विनंती करणारी मी बहुधा पहिलीच होते. त्यामुळे असा नियम तयार करणे व तशा सूचना कॉलेजला देणे हे सर्वस्वी कुलगुरुंच्या स्वाधीन होते. बऱ्याच प्रयत्नाअंती यास यश आले व जवळजवळ पाच वर्षानंतर मला उरलेल्या टर्मस् पूर्ण करुन परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली. अर्थात प.पू. महाराजांच्या आशीर्वादाचे पाठबळ होतेच. मी दोन्ही मुलींना सासूबाईंच्या जवळ बीडला सोडून औरंगाबादला घाटी रुग्णालयात स्त्रीरोग विभागात दाखल झाले. त्यावेळी धाकटी चि. कु. प्राजक्ता पावणेदोन वर्षांची होती.

प.पू. महाराजांनी आठवणीने ह्या गोष्टीची दखल घेऊन पुण्याहून पत्र पाठविले.---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. १०-६-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. सौ. सुरेखाताईंचे पुढील शिक्षण पूर्ण होणेची अनुकूलता ईश्वर कृपेने मिळाली हे वाचून समाधान वाटले. काळजी राहिली नाही.

श्री. प्रभाकरराव व सौ. सिंधूताई ठरल्याप्रमाणे यात्रेस गेले असतील. आम्ही त्यावेळी अहमदाबादला होतो.

सौ. सिंधूताईंनी दिलेल्या पत्त्यावर जालन्याहून श्री. अंबादासराव जोशी यांना अंबेजोगाईस पत्र पाठविले होते व आपण पुण्यास केंव्हा

येणार, आपली भेट घेऊन आपल्या संमतीने मुलगी दाखविणेकरिता घेऊन येता येईल असे त्यांना विचारले होते. त्यांचे अद्यापि उत्तर नाही. येथील त्यांचे पत्त्यावर जाऊन चौकशी केली असता ते अद्यापि नसल्याचे समजले. बीड येथील त्यांचे डॉक्टर चिरंजीव आपले घरी येताना भेटले होते. त्यांनी पुण्यास वडील, जूनचे पहिल्या आठवड्यात येतील असे सांगितले होते. तरी त्यांना सवडीने विचारुन त्यांचे वडील येथे केंव्हा येणार आहेत ते कळविण्याची व्यवस्था व्हावी. मुलीचे गोत्र काश्यप आहे. मुलाचे भार्गव आहे. गोत्री पटते. त्यांना पत्रिका पाहणे असेल तर पत्रिका पाठविता येईल. मुलगी बी.ए. असून उंची ५/२ आहे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आम्ही गुरुपौर्णिमा (२ जुलै) देऊळगाव व जालन्याकडे जाऊ.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

सदरील पत्र हे त्यांच्या नातीच्या स्थळाच्या संदर्भात होते. श्री. अंबादासराव जोशी हे ति. अण्णाकाकांचे सोबत अंबेजोगाईला कोर्टात एकत्र काम करायचे. त्यांची मुले सुविद्य होती. संसारातील सर्वांच्याच जबाबदाऱ्यांना प.पू. महाराज हातभार लावताना दिसले. घरातील जिम्मेदारी सोबत ते इतरही साधकांची मनापासून काळजी घेत. श्रीमान परमगुरुभक्त बापुसाहेब कुबडे यांचे नातू श्री. रविंद्र कुबडे यांची या भागात नोकरी सुरु झाली. तेव्हा त्यांचेजवळ अश्वासक पत्र देऊन त्यांची व्यवस्था प.पू. महाराजांनी केली. ते पत्र असे---

श्री वामन महाराज व श्री धुण्डीराज महाराज कवीश्वर स्मारक
(रजिस्टर क्र. ए १६११)
श्री वासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणा, पुणे ४११ ००४

---------------

विश्वस्त-* विद्यावाचस्पती राष्ट्रीय पंडीत म.म.द.धुं.कवीश्वर
* प्राचार्य दि. ब. केरुर * श्री प. वा. मनोलकर

---------------

॥ श्री दत्त॥

तुळजापुर, दि. २१-८-८५

श्रीमान रा. डॉ. दिलीप देशमुख, बलभीम चौक, तहशील कचेरी समोर, बीड यांना सप्रेम सादर निवेदन. वि. क्षेम.

आम्ही काल सायंकाळी येथे आलो असून उद्या पूजा-नैवेद्य करुन परवा २३ तारखेस गाणगापुरी मुक्कामास जाऊ. तेथे २४ तारखेस पूजा-नैवेद्य उरकून २५ तारखेस जालन्यास जावयाचे आहे. तेथे एका नवीन साखर कारखान्याचे भूमीपूजन करुन औरंगाबादमार्गे पुण्यास जाऊ.

पत्रास कारण श्रीमान बापूसाहेब कुबडे हे श्री महाराजांचे मोठे भक्त सोलापुरी असतात, हे श्री माई, सौ. सिंधूताईंना माहीत आहे. श्री. बापुसाहेबांचा नातू श्री रविंद्र याचेजवळ हे पत्र देत आहे. त्याची नेमणूक हैद्राबाद स्टेट बँक मादळमोही या गावी नुकतीच झाली आहे. हे गाव बीड जवळ असल्याचे समजते. हे गाव लहान असल्याने व श्री. रविंद्रही लहान नवीन असल्यामुळे त्या गावी रहाण्याची भोजनाची व्यवस्था योग्य अशी अद्याप जमली नाही. तरी तेथे आपल्या ओळखीचे कोणी असल्यास त्या गावी एखादी भाड्याची

खोली त्याला मिळाल्यास पहावे. तसेच जेवणाचीही व्यवस्था चांगली पैसे घेऊन होत असल्यास प्रयत्न करावा अथवा बीडला त्याची भोजनाची व रहाण्याची व्यवस्था होत असल्यास पहावे. तेथे राहून तो रोज मादळमोही गावी जाईल. जसे योग्य होईल तसे त्याला मार्गदर्शन करावे. तो नवीनच घरच्या मंडळीपासून दूर आल्यामुळे सर्वांना चिंता वाटणे सहाजिक आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

योगायोगाने श्री रविंद्र कुबडेंचे बीडला येणे झाले. काही काळ मादळमोहीत काढल्यानंतर त्यांची बीडलाच बदली झाली. अन् सुदैवाने ते आमच्या घराजवळच रहावयास आले. घर जवळ असल्यामुळे श्री. दादासाहेब कुबडे (प.पू. श्री बापुसाहेबांचे थोरले चिरंजीव), सौ. वहिनीसाहेब, श्री. मनोहरराव कुबडे (धाकटे चिरंजीव) यांच्याही सतत भेटी होत गेल्या. सत्संग मिळाला. प.पू. महाराज जेव्हा जेव्हा इथे येत तेव्हा ही सगळी मंडळी आवर्जून दर्शनाला यायची. श्री. रविंद्रांचे, ते जेव्हा मादळमोहीत होते, तेव्हाच लग्न झाले. त्यांची पत्नी सौ. स्मिता सोलापूरचेच माहेर असलेली, प.पू. महाराजांवर तिची पण अपार श्रद्धा जडली.

एकदा प.पू. महाराज बीडला आले होते. तेव्हा हे उभयता त्यांचे दर्शनासाठी इथे आले. प.पू. महाराज घरी इथे पोहोचण्यास वेळ होता म्हणून हे दोघेही पती-पत्नी गावात काही कामासाठी गेले. प.पू. महाराज येऊन पोहोचले. त्यांचे आन्हिक झाले. जेवणाच्या वेळेआधी

सौ. स्मिताच्या माहेरुन फोन आला की, तिच्या बहिणीचे यजमान मित्रमंडळींबरोबर गोव्याला जात असताना त्यांच्या वाहनास अपघात झाला आणि त्यात त्यांचा दु:खद अंत झाला. आता ते दोघेही घरी आले की त्यांना कसे व केव्हा सांगायचे ! प.पू. महाराजांनी बोलावून सांगितले की 'हे बघा ! ते दोघेही घरी आले की त्यांना पोटभर जेवू देत. नंतर सावकाश सांगा. त्यांची जाण्याची व्यवस्था करा.'

किती काळजी प.पू. महाराजांना असते ! दु:खाच्या क्षणीही त्यांचाच आधार असतो !

पुढे श्री. मनोहर काकांच्याकडून प.पू. महाराजांच्या प्रवचनाच्या अनेक ध्वनीफिती उपलब्ध झाल्या. प्रसिद्ध 'द्रव्यशुद्धी' वरील प्रवचनाची ध्वनीफीतही त्यांनी उपलब्ध करुन दिली. याप्रमाणे श्री. कुबडे कुटुंबियांचा बीडशी ऋणानुबंध वाढत गेला. प.पू. महाराजांचीच सर्व कृपा आहे.

माझे पदव्युत्तर शिक्षण सुरु झाले. यावेळी कामात अधिक आत्मविश्वास जाणवत होता. प.पू. महाराजांच्या कृपेने हॉस्पीटलमध्ये मी भरपूर काम करत होते व त्यामुळे अनुभव खूप मिळत गेला. पत्राने प.पू. महाराजांशी नित्य संपर्क होताच. ते अगदी जातीने चौकशी करायचे. एका पत्रात त्यांनी तसा सविस्तर उल्लेख केला होता---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. २७-१२-८५

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. सौ. सुरेखाताईंच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था झाली. त्या येत्या उन्हाळ्यात ते पूर्ण करुन बीडला येऊन

आपल्या हातून कार्याची जबाबदारी घेऊ शकतील, हे वाचून समाधान वाटले. श्री जगदंबेच्या कृपेने हे सर्व ठीक झाले. आता काळजी राहिली नाही.

आज येथील श्री दत्तजयंतीचा उत्सव पूर्ण झाला. आता २ तारखेपासून श्री महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव सुरु होईल. श्री कृपेने सर्व तयारी होत आली आहे. ३० तारखेपर्यंत पुण्यास येऊ असे सौ. सिंधूताई व श्री. प्रभाकरपंत यांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे ते येतील. नंतर ९ तारखेस उत्सवकार्य आटोपून बीडला येतील.

तेथील जागेचे बांधकाम सध्या चालू असल्याचे आपण लिहीले. ते सौ. सुरेखाताई शिक्षण आटोपून तेथे येईपर्यंत पूर्ण झाले पाहिजे. म्हणजे त्यांचेही कार्य लगेच सुरु होईल. पू. माता पितरांची सेवा व भगवतीचीही सेवा आपली चालू असल्याने सर्व संकल्पाची सिद्धी होईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांच्या संकल्पाप्रमाणेच दवाखान्याचे बांधकाम बऱ्यापैकी पूर्णावस्थेत झाले. तिसऱ्या मजल्यावर घरासाठी पण तीन खोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले. त्यामुळे मी डिग्री घेऊन परत आले तेव्हा ऑपरेशन थिएटर, लेबर रुम व वॉर्ड सहीत सगळे पूर्ण झाले होते.

औरंगाबादला शिक्षण घेत असताना गुढी पाडव्याच्या दिवशी प.पू. महाराजांना साष्टांग प्रणिपात करुन त्यांचे शुभाशीर्वाद घ्यावेत

म्हणून मी पत्र पाठविले होते. त्यात येथील सहकाऱ्यांच्याबरोबर होणाऱ्या सामाजिक व राजकीय चर्चांचा उल्लेख केला होता. रामनवमीच्या दिवशी प.पू. महाराजांचे पत्र आले, त्यात त्यांनी रचनात्मक कार्य करीत परमार्थाकडे कशी वाटचाल करता येईल, या संबंधी व्यवस्थित विवरण केले. ते पत्र असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
श्री रामनवमी, दि. १८-४-८६

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले दि. ११-४-८६ चे औरंगाबादचे पत्र मिळाले. त्यात लिहिलेल्या बीडच्या पत्त्यावर हे उत्तर लिहीत आहे. श्री जगदंबेच्या कृपेने आपला अभ्यास लवकरच पूर्ण होत आहे. ही उत्तम गोष्ट आपल्या मनासारखी घडून आली. ज्ञान अधिक मिळविण्याकडे आपल्या मनाचा ओढा असल्यामुळे त्याप्रमाणे सर्व जुळून आले. आता यापुढे बीडला आत्मविश्वासाने आपला व्यवसाय चालू करता येईल.

तरुण पिढीत राष्ट्रोत्कर्षाबद्दल चर्चा होत असतात हे योग्य आहे पण विद्यार्थी दशा संपून प्रत्यक्ष व्यवसाय सुरु झाल्यानंतर आताचा उत्साह दृढ राहिला पाहिजे. म्हणजे प्रपंच साधून परमार्थही घडू शकेल.

श्री. दिलीपरावांनी काही समव्यवसायांचे सह तेथे अपंगाचे करिता काही व्यवस्था करण्याचे योजिले आहे. असे सर्वांनी मिळून कार्य करता येणे सारखे आहे. अंतर्बाह्य प्रतिबंधही फार असतात. पण एखादा ध्येयवादी महात्मा यावज्जीव ध्येयपूर्तीकरिता प्रयत्नशील राहून कर्तव्यनिष्ठतेने सर्वांना आदर्श ठरतो.

सर्वधी प्रेरक जगन्मातेच्या शक्तीने सर्व घडून येणारे आहे.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

आम्ही मे अखेर खर्डा, बीड, जालन्याहून देऊळगावी जाणेचा विचार आहे. काय होते ते पहावे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

द.क.

****

प.पू. महाराजांनी वरील पत्रात उल्लेखल्याप्रमाणे डॉ. दिलीप व इतर काही डॉक्टर्स, व्यापारी, प्राध्यापक मित्र यांनी १९८८ साली 'आयुर्मंगलम् मूकबधिर विद्यालया'ची स्थापना केली. सुरुवातीचे काहीकाळ विनाअनुदानित गेला. जवळपास २-३ शिक्षकांच्या सहाय्याने चालणाऱ्या या शाळेत आता एकंदर ३० शिक्षक आहेत व पाचदहा विद्यार्थ्यांच्या तुटपुंज्या संख्येवरुन आता ही संख्या १२० एवढी झाली आहे. शाळेला स्वतःची इमारत, वसतीगृह आहे. वर्कशॉप सुरु करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु आहे. या इमारतीजवळच अंध विद्यालय पण सुरु केलेले आहे. एकंदर अंध विद्यार्थ्यांची संख्या ३० आहे व शिक्षकवृंद १२ आहेत. दोन्हीही शाळा सध्या अनुदानावर आहेत. या संस्था उभारणीच्या कामात डॉ. दिलीपनी मनापासून परिश्रम घेतले. आता यांच्या प्रगतीकडे पाहून आत्मिक समाधान मिळते. प.पू. महाराजांचे हे आशीर्वादच आहेत.

मी पदव्युत्तर परिक्षा पास झाल्यानंतर प.पू. महाराजांना कळविले असता, त्यांचे लगेचच मंगल आशीर्वादाचे पत्र पाठविले. ते खालीलप्रमाणे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २१-५-८६

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले दि. १४-५ चे पत्र मिळाले. सौ. सुरेखाताईंचा अभ्यासक्रम ईशकृपेने यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचे वाचून आनंद झाला. आता दोघांनाही व्यवसायाकडे पूर्णपणे लक्ष देता येईल. चांगले झाले.

आम्ही येथून २-३ दिवसांनी निघून श्रीगोंद्यावरुन खर्ड्याला जात आहोत. तेथे काही दिवस मुक्काम होईल. आसपासही भूम इत्यादि गावी जाऊन यावे लागेल. तसेच डोंबिवलीस श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या मूर्तिप्रतिष्ठा कार्यास १५-१६ जून पर्यंत जावे लागेल. यामुळे देऊळगावी श्री गुरुपौर्णिमा झाल्यावरच जाणे होईल असे वाटते. यामुळे आता बीडला येणे होईल की नाही सांगता येत नाही. पुढे केव्हांतरी सवडीने येता येईल. काय होते पहावे.

श्री. शेलूकर अग्नीहोत्री यांच्या यज्ञाकरिता श्री पाटांगणकर कार्यवाहांकडे देणेकरिता श्री. रघुनाथरावांनी आपले नावे मनिऑर्डर केली होती. ती पोचल्याचे 'पोस्ट-खर्डा, ता. जामखेड, जि. अहमदनगर C/o. श्री पंढरीनाथ गोले' या पत्त्यावर कळवावे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

सौ. सुरेखाताईंना धन्यवाद व मंगल आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांचे हे मंगल आशीर्वादाचे पत्र वाचून खूपच आनंद झाला. खूप काही चांगले करु शकू अशी उमेद निर्माण झाली. आम्ही दोघेही म्हणजे डॉ. दिलीप-बालरोगतज्ज्ञ आणि मी प्रसूतिशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण करुन अनुभव घेऊन आलेली असल्यामुळे, आमच्या दोघांचे विषय एकमेकांना पूरक आहेत. म्हणून मनात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला.

नुकतेच आम्ही बांधलेल्या घरात तिसऱ्या मजल्यावर रहावयास गेलो होतो. विधीपूर्वक वास्तुशांतीही झाली होती. पण प.पू. महाराजांच्या पदस्पर्शाची आस होती. त्यांनी इथे यावे व त्यानिमित्त भगवतीचे स्मरण व्हावे असा मानस होता. कडक उन्हाळ्याचे दिवस होते. प.पू. महाराज खर्ड्याला जाणार होते. तसे त्यांनी खर्ड्याहून दि. २८-५-८६ च्या पत्रात लिहिले होते.

उन्हाळा फार असल्यामुळे तुळजापूरला जाताना बीडला येऊ असा २५-६ च्या पुण्याहून पाठविलेल्या पत्रात उल्लेख केला.

त्यांचे २८-५-८६ चे खर्ड्याहून पाठविलेले पत्र असे होते--

**॥ श्री दत्त ॥**

C/o. श्री. पंढरीनाथ गोले
जि. नगर
दि. २८-५-८६

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले दि. २२ चे पत्र पुण्याहून निघताना मिळाले. आमचेही तत्पूर्वी पाठविलेले उत्तर मिळाले असेलच. आम्ही येथे परवा सोमवारी

आलो असून, येथे ४ जूनपर्यंत कार्यक्रम आहे. नंतर एखादा दिवस भूमला जावे लागल्यास जाऊन नंतर पुण्याकडे जाणेस निघावयाचे आहे.

तूर्त देऊळगावी उन्हाळा फार, पाण्याचाही त्रास असणार याकरिता पुण्यास आषाढ शु. १ श्री थोरल्या महाराजांची पुण्यतिथी व श्री गुरुपौर्णिमा करुनच नगर मार्गे तिकडे यावे अशी इच्छा आहे. तोपर्यंत उन्हाळाही कमी होईल. मध्ये एखादा दिवस जामखेडलाही थांबावे लागेल.

बीडला याचवेळी येणे आवश्यक आहे का ? पुढे केव्हांतरी सवडीने आले तर चालेल का ते कळवावे. १५ जूनपर्यंत आम्हाला पुण्यास जावे लागेल.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांना येथील कडक उन्हाळ्याचा त्रास होऊ नये असे मनोमन वाटत होते. पण नूतन वास्तूत त्यांच्या उपस्थितीत श्री भगवतीची उपासना व्हावी, श्री नवचंडी संपन्न व्हावी अशी पण इच्छा होती. त्याप्रमाणे ऑगस्ट ८६ मध्ये ते बीडला येण्याची शक्यता होती. त्याकाळात ही नवचंडी व्हावी अशी त्यांचेकडून अनुमती घेतली. तसे त्यांनी त्या संदर्भात पुण्याहून पत्र पाठविले ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २५-६-८६

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. कुशल समजून आनंद झाला. खर्ड्यास सौ. सिंधूताई व श्री शामराव भेटून गेले. आपल्या हॉस्पीटलचे बांधकाम होणेस वेळ लागेल असे त्यांनी सांगितले. ते केव्हा संपेल व त्याचे उद्घाटनाची तारीख कोणती ठरली आहे ? ते सवडीने कळवावे.

आम्ही येथून २१ जुलैला श्री गुरुपौर्णिमा करुन २२ ला देऊळगावी जाणेस निघणार आहोत. ३१ जुलै पर्यंत आमचा देऊळगावी मुक्काम होईल. ९ ऑगस्टला मुक्कामास सोलापुरी पोचल्यास १० तारखेस तेथे श्री बापुसाहेबांच्याकडे श्रावणी करुन सायंकाळी आम्ही तुळजापुरी जाऊ. नंतर वार्षिक तुळजापूर-गाणगापूर यात्रा करुनच पुण्यास परत येणेचा विचार आहे.

तरी ३१ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत या अवधीत बीडचा कार्यक्रम ठरत असल्यास तो आटोपून आम्ही सोलापूर करुन तुळजापुरी जाऊ. तरी बीडचा कार्यक्रम ३१ जुलै ते ९ ऑगस्ट दरम्यान केव्हा ठरेल ? तसे ठरणे शक्य असल्यास तत्काळ उत्तरी कळवून ठेवावे म्हणजे त्या समयी तिकडे येणेचे ठरविता येईल. यावेळी तयारी नसल्यास आम्ही या अवधित मेहेकर वगैरे ठिकाणी जाऊन जालन्यावरुन तुळजापुरी जाऊन तेथील कार्य करुन परत येऊ.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

प. पू. महाराजांचा संकल्प म्हणजे वेदवाणीच ! चांगली तिथी सुमुहूर्त वगैरे सगळे त्यांना आरशातील प्रतिमेसारखे स्वच्छ दिसते. त्यामुळे त्यांनी नियोजित केलेल्या तारखेस पुरोहितांकडे विचारणा केली असता अग्नीतत्व वगेरे सगळे योग्य आहे व या तिथीस नवचंडी हवन वगैरे करणे योग्य ठरेल असे त्यांनी सांगितले.

१० जुलैला अकलूजहून पाठविलेल्या पत्रात त्यांनी त्यांच्या नियोजित कार्यक्रमाची कल्पना देऊन बीड येथील कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले. सर्वांना सुखकारक म्हणून श्री विष्णुसहस्त्रनामाचे पाठही करण्यास सांगितले.

अकलूजहून आलेले पत्र---

****

॥ श्री दत्त ॥

अकलूज (जि. सोलापूर)
दि. १०-७-८६

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आम्ही तूर्त इकडे प्रवासात आहोत. ४-५ दिवसांनी परत पुण्यास जाऊ. येथे श्री गणेश याग आहे. नंतर पुण्याहून २१ तारखेस श्री गुरुपौर्णिमा करुन २२ तारखेस देऊळगावी जाणेस निघू. २३ ते २९ पर्यंत तेथे वाङ्मय सेवा आटोपेल. नंतर २-४ दिवस मेहेकर भागात जाऊन यावे लागेल. करिता ६ ऑगस्टला जालना येथे 'काजळकर महाराज (सौ. ताई महाराज) श्री दत्त मंदिर जुना जालना' येथे गाडी पाठवावी म्हणजे आम्ही त्या गाडीने बीडला येऊ. ६ ते ८ ला बीडला राहता येईल. ८ ला नवचंडी आटोपून त्या

दिवशी सायंकाळी किंवा ९ ला आम्हाला सोलापुरी जावयाचे आहे. तेथे १० तारखेस नागपंचमीला श्रावणी करुन सायंकाळी सोलापूरहून तुळजापुरी जाता येईल.

तरी ९ तारखेस सकाळी किंवा दुपारी आम्हाला सोलापूर मुक्कामी श्री. बापुसाहेब कुबडे यांचेकडे पोचविणेची व्यवस्था झाल्यास बरे होईल.

श्री विष्णुसहस्त्रनामाचे पाठ एकंदर १३०० (तेराशे) करावे. पाठ द्वाराच सर्व होईल. हवन नको. अन्नदान १२ ब्राह्मण सुवासिनींना भोजन दिले म्हणजे झाले.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आमचा मुक्काम २१ जुलैपर्यंत पुण्यास आहे. आवश्यकतेप्रमाणे २१ तारखेपर्यंत पत्र पाठविण्यास हरकत नाही.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

ठरल्याप्रमाणे ६ ऑगस्टला पहाटे प.पू. महाराजांचे मंगल आगमन झाले. दवाखान्याच्या उद्‌घाटनाप्रीत्यर्थ श्री नवचंडीयाग होणार होता. त्यामुळे सर्व आप्तजन व मित्रमंडळी जमले होते. प.पू. महाराजांचा सहवास लाभावा म्हणून सर्वजण मुक्कामासाठीच येऊन राहत. शे-दिडशे जणांमुळे घराचे गोकुळ बने. सर्वत्र आनंदी आनंद दरवळत असे. गावातील स्नेही पण वेळोवेळी येऊन चौकशी करुन जात. बाहेरील प्रसादासाठी लोकांना निमंत्रण देण्याचे काम करीत. सर्वांची सर्वतोपरी मदत होत राही.

श्री नवचंडी यागाचे सुरुवातीला ६ तारखेस श्री अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तने, प.पू. श्री महाराजांची पाद्यपूजा व नंतर ७ व ८ तारखेस नवचंडीचे पाठ, देवता स्थापना, हवन व पूर्णाहुती संपन्न झाली.

८ तारखेस दुपारपासून भोजन प्रसाद संपन्न झाला. रात्री उशीरापर्यंत भोजने चालू होती. ९ च्या सुमारात प.पू. महाराजांच्या खोलीत गेले असता 'तुमचे जेवण झाले नाही का ? अजून कितीजण यावयाचे आहेत ?' अशी त्यांनी चौकशी केली. डॉक्टर्स व व्यापारी मंडळी रात्री ९ नंतरच येणार असल्यामुळे अंदाजे शंभरजण तरी येतील असा अंदाज होता. त्याप्रमाणे त्यांना सांगितले. भराभर पंगती होत गेल्या आणि वाढविलेल्या भाजी, वरण व स्नेही भगिनींनी भरभर केलेल्या गरम-गरम स्वयंपाकाला एक आगळीच चव आली. आता या गोष्टींची जाणीव होते की, प.पू. महाराजांच्या अस्तित्वानेच अन्नाची चवही छान होती आणि अन्न अजिबात कमी पडले नाही. सगळे श्रेय त्यांच्या संकल्पाचेच होते.

रोज रात्री प.पू. महाराजांची प्रवचने होत. दिवसभर काम भरपूर असले तरी अजिबात थकवा जाणवत नव्हता. सगळेजण उत्साहाने प.पू. महाराजांचे शब्द कानात प्राण आणून ऐकण्याचा प्रयत्न करीत.

मागे वळून पहाताना आज जाणवते की, खरे स्वर्गसुख प.पू. महाराजांच्या सहवासातच होते. याहून अधिक स्वर्गात ते काय असणार ?

नियोजित कार्यक्रमाप्रमाणे प.पू. महाराज श्रावणीसाठी सोलापूरला गेले. मांडववारे लागल्याप्रमाणे सगळे घर रिकामे झाले. पाहुणे मंडळी आपापल्या घरी गेले. आमच्या दोघांचेही नित्य काम सुरु झाले.

बाह्यरुग्ण विभाग व्यवस्थितपणे चालू होता. १४ ऑगस्टला संध्याकाळी पहिली बाळंतपणाची केस दाखल झाली. इतके दिवस काम केले होते. ते मोठ्या हॉस्पिटलमध्ये व तेही तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली शिवाय सहाध्यायी डॉक्टर्स पण सोबत आजूबाजूला असायचे. शिवाय ट्रेन्ड सिस्टर्स व सर्वजण मदतीला असायचे. त्या दिवशी पहिल्यांदाच एकटीने हे सर्व करायचे होते. थोडे दडपण आले होते. पण आत्मविश्वासही सोबत होता. सुदैवाने काहीही अडचण न होता ती महिला पहिल्या रात्री एक-दीडच्या सुमारास सुखरुपणे प्रसूत झाली.

मी घरात येऊन हातपाय धुत असता रस्त्यावरील गाडीचा हॉर्न ऐकू आला. गॅलरीत येऊन पाहते तो दारासमोर एक पांढऱ्या रंगाची ॲम्बेसिडर गाडी थांबली होती व गाडीतील उजेडात मला प.पू. महाराजांची मूर्ती स्पष्ट दिसली. आनंदाश्चर्याने मन भरुन आले. आम्ही धावत खाली गेलो. तेव्हा कळले की, मोठ्या वाहनामध्ये प.पू. सौ. ताई महाराजांच्या सोबत अनेक साधक मंडळी तुळजापूरहून जालन्यास निघाले होते. ते पुढे गेले व प.पू. महाराज ज्या ॲम्बॅसिडर गाडीत बसले होते त्यात पेट्रोल कमी असल्यामुळे ती गाडी जालन्यापर्यंत जाणे शक्य नव्हते. तेव्हां प.पू. महाराजांनी 'आपण रात्री बीडला मुक्काम करुन सकाळी लवकर डॉक्टरसाहेब इंधनाची सोय करतील व आपण निघू. रात्रीच्या वेळी जिम्मेदारी घेणे नको.' असा सल्ला दिला आणि प.पू. महाराजांचे पुनरागमन झाले. आणि माझ्या वैद्यकीय व्यवसायाची खरी सुरुवात त्या क्षणापासून झाली.अगदी ठरवून सुद्धा असे उद्‌घाटन होऊ शकले नसते. ते प.पू. महाराजांच्या

कृपेने घडून आले. हा हृदयंगम प्रसंग आयुष्यात कधीही विसरणे शक्य नाही. अजूनही आठवण झाली की, 'गाडीतील लाईटच्या प्रकाशातील प.पू. महाराजांची मूर्ती स्पष्टपणे आठवते. म्हणजे प.पू. महाराजांनी आपले किती लाड करावेत, किती त्यांची अविरत कृपा असावी यालाच सीमाच नाही.

पुढे दुसरे दिवशी सकाळी प.पू. महाराज व रघुनाथराव काका व त्यांच्या सोबत असलेली अग्रवाल शेठ कडील मंडळी जालन्यास परत गेली.

अशा रीतीने आम्ही उभयतांनी माझे शिक्षण झाल्यानंतर म्हणजे मे १९८६ पासून पूर्णतया खाजगी वैद्यकीय व्यवसाय सुरु केला. त्याबरोबरच समाजाचे आपल्यावरील ऋण फेडण्याचे दायित्व म्हणून प.पू. महाराजांचे प्रेरणेने काही कार्य सुरु केले. त्याला आशीर्वाद देताना प.पू. महाराजांनी मार्गदर्शनपर पत्र पाठविले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

नरसोबावाडी

दि. २१-४-८७

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र देऊळगावराजा येथे मिळाले. कुशलवृत्त समजून समाधान वाटले. श्री नारायण स्वामींच्या उत्सवाकरिता आम्ही काल येथे आलो असून १ मे ला पुण्यास परत जाऊ.

मागील महिन्यात आम्ही नागपुरला श्री. राजंदेकर पंचागकर्ते यांना भेटणेकरिता जाऊन आलो. तसेच अकोल्याहून श्री. अच्युतरावांचे बरोबर आजेगावलाही जाऊन श्री. केशवराजांचे दर्शन

करुन आलो. तेथे हैद्राबादहून श्री. बाबुरावही आले होते. ते श्री माईंच्या डोळ्याकरिता त्यांना घेऊन मद्रासला जाऊन येणार आहेत, असे ते म्हणाले. मद्रासचे डॉक्टर प्रसिद्ध उत्तम असल्याचे समजते.

श्री डॉक्टरांनी बीडला अपंगांचे करिता प्रयत्न चालविला, हे उत्तम पुण्यकर्म आहे. परोपकारासारखे पुण्य नाही. संसारात राहून परमार्थ साधता येतो याचे हे उदाहरण आहे. सर्वत्र बुद्धीरुपाने राहणारी भगवतीच हे कार्य करवून त्याचे समाधानही अनुभवीत आहे व मनापासून आशीर्वादही देत आहे.

पुण्याहून कदाचित १३ मे ला विदर्भात जाणेचा संभव आहे. जेष्ठापासून पुण्यास मुक्काम राहील.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

सासूबाईंचे तीर्थरुप श्री. शंकरकाका आजेगावकर हे थोरल्या स्वामी महाराजांचे निस्सीम भक्त. त्यांना प.पू. गुळवणी महाराजांचे सोबतच शक्तिपाताचे दीक्षेचा लाभ झालेला होता. त्यांचे वतनाचे मूळ गाव म्हणजे हिंगोली तालुक्यातील आजेगाव हे होते व व्यवसायानिमित्तचे राहणे हिंगोलीला होते. प.पू. थोरले स्वामी महाराज, प.पू. श्री लोकनाथ तीर्थस्वामी महाराज हे आजेगावी येऊन राहून गेले. प.पू. श्री गुळवणी महाराजांचे नेहमीच आजेगावी येणे व मुक्काम असे. घरातील एक थोरले सदस्य म्हणून त्यांचा मान होता. श्री. बाबुराव व श्री. अच्युतराव हे सासूबाईंचे दोन बंधू.

आजेगावी शेतीवाडी व गढीवरील वाड्यात श्री. अच्युतराव मामांचे राहणे होते.

आजेगावमध्ये श्री केशवराजाची सुबक सुंदर काळ्या पाषाणाची मूर्ती आहे. मंदिर पण छान आहे. या संदर्भातील एक अख्यायिका सासूबाई नेहमी सांगत-

'आजेगावजवळ केसापूर नावाच्या गावाजवळ केशीतीर्थ नावाचे तीर्थ आहे. पूर्वी जुन्या काळात यवनांच्या भीतीने केसापूरच्या लोकांनी ही केशवराजाची मूर्ती भूमीमध्ये पुरुन टाकली. पुढे अनेक वर्षांचा काळ लोटल्यावर एका मराठ्याला शेत नांगरताना ही मूर्ती आढळली. ही मूर्ती घरी ठेवून त्याचे उपचार करणे आपल्याला शक्य नाही हे लक्षात आल्यावर त्याने पंचक्रोशीतील अधिकारी वर्गास या गोष्टीची खबर दिली. सर्वजण ही अप्रतिम लावण्यमय असणारी मूर्ती पहाण्यासाठी त्या ठिकाणी धावले. प्रत्येक अधिकारी आपापल्या सेवकांसह जबरदस्तीने मूर्ती ताब्यात घ्यावयाचे ठरवूनच गेले.

वरुड, पुसेगांव, सावर, आजेगाव, माझोड, कडोळी, नडशी इत्यादी सर्व गावातील जमादार घोड्यावरुन आले. तेव्हा असे ठरले की प्रत्येकाने श्री केशवराजाची मनोभावे प्रार्थना करायची व ज्यांच्याकडे ही मूर्ती झेप घेईल त्याने ती स्वतःच्या गावी घेऊन जायची. प्रत्येक जणानी आपापल्या परीने प्रार्थना केली. आजेगावचे श्री माधवराव देशमुख (सासूबाईंचे पणजोबा) यांनी मनोभावे देवाला आळविले अन् आश्चर्य म्हणजे त्या पाषाणमूर्तीने त्यांचेकडे झेप घेतली. मग त्यांनी त्या मूर्तीला पालखीत घालून आजेगावी आणले. सर्वांनी अत्यंत प्रेमाने त्या मूर्तीचे स्वागत केले. मग एका चाफ्याच्या झाडाखाली स्थापना केली व पुढे मंदिर बांधले.

काही काळानंतर श्री. माधवरावांना दरबारी बाराशे रुपयांचे देणे राहिले म्हणून अरबांनी कैद करुन नळदुर्गच्या किल्ल्यात ठेवले व भोवती पहारा बसविला. त्यांनी मनोमन श्रीकेशवराजांची प्रार्थना केली व सुटकेसाठी साकडे घातले. श्री केशवराज बटूच्या स्वरुपात तेथे प्रगट झाले व त्यांनी श्री माधवरावांची सुटका केली व त्या अरब अधिकाऱ्याच्या स्वप्नात जाऊन एक महिन्याने येऊन तुमचे बाराशे रुपये घेऊन जावे असे सांगितले.

तसेच कोयाळी नावाच्या जवळच्याच एका गावातील अर्जून पाटील नावाच्या नित्य पंढरपूरची वारी करणाऱ्या वारकऱ्यास पुढे वृद्धत्वामुळे वारी करणे अशक्य झाले. तेव्हा श्री केशवराजांनी स्वप्नात जाऊन दृष्टांत दिला की, 'पंढरीचा पांडुरंग म्हणजे मीच आजेगावचा केशवराज आहे. तू इथेच येऊन दर्शन घेऊन वारी पूर्ण करीत जा.' याप्रमाणे येथील देवाला अनन्यसाधारण महत्व आहे.

श्री. माधवरावांचे चिरंजीव श्री. कृष्णराव यांनी पुढे संन्यास घेऊन ते आयुष्याच्या उत्तरार्धात मंदिरातच राहिले. त्यांचे थोरले चिरंजीव श्री भाऊकाका हे व्यावहारिक गोष्टी बघत. दुसरे चिरंजीव श्री. शंकरकाका यांचा पारमार्थिक अधिकार खूप मोठा होता. त्यांना प.पू. थोरले स्वामी महाराजांनी दिनचर्या कशी असावी हे पत्राद्वारे मार्गदर्शन केले होते. धाकटे श्री दत्तूकाका हे नेहमी प.पू. गुळवणी महाराजांचे सहवासात रहायचे. पुढे शंकराच्या पिंडीवर डोके ठेवूनच त्यांनी देहत्याग केला.

श्री. आजेगावकरांचे हे परमदैवत असणारे श्री केशवराजांचे दर्शन घेतल्याचा प.पू. महाराजांनी वरील पत्रात उल्लेख केला. आम्हालाही ते वाचून खूप बरे वाटले.

प.पू. महाराजांच्या कृपेने व त्यांच्या प्रेरणेनेच डॉ. दिलीपचे अपंगांचे कार्य चालू होते. शाळाही बऱ्याच वाढल्या होत्या. सुजाण शिक्षकवृंद मिळाले होते. श्री भगवतीची कृपा व प.पू. महाराजांचे आशीर्वादाने संसारात हे पुण्यकर्म घडून येत राहिले. ही एक समाधानाची बाब होती.

संसारात अजून एक पुण्यकर्म व्यवहार म्हणून करण्याची प्रेरणा प.पू. महाराजांनी दिली व त्याचे पत्राद्वारे मार्गदर्शन करुन स्वत: जातीने हजर राहून सर्व कार्य व्यवस्थीत करवून घेतले, ते म्हणजे ती. आण्णाकाका (डॉ. दिलीप यांचे वडील) यांची उग्ररथ शांती व श्री शतचंडी होय. हे कार्य जुलै १९८७ मध्ये संपन्न झाले. त्या आधी त्यांच्या संमतीसाठी पत्र पाठविले असता त्यांचे उत्तर आले ते असे ---

****

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ६-५-८७

सप्रेम सादर निवेदन. वि. क्षेम

आपले दि. २३-४ चे पत्र मिळाले. वाडीस गेल्यामुळे उत्तरास विलंब होत आहे. सौ. सुरेखाताईंचे पत्र देऊळगावी मिळाले. त्याचे उत्तर पाठविले होते. असो.

श्री. काकांचे ६० वर्षातिथीत उग्ररथ शांती कार्य अवश्य करावे. तीन तासात सर्व आटोपेल. हे शास्त्रविहित आयुरारोग्य वर्धक आहे. तसेच शतचंडी करणे असल्यास करण्यास हरकत नाही.

ब्राह्मणसंख्या जितकी असेल त्याप्रमाणे ३ किंवा ४ दिवसात पाठसंख्या पूर्ण होईल. संपुटित पाठ असल्यास अधिक काळ लागेल. विचार करुन ठरवावे. एक दिवस हवन व एक दिवस उग्ररथशांती कार्य याप्रमाणे पाठ किती दिवसात संपतील ते पाहून सर्व ठरवावे. आषाढ पौर्णिमेपर्यंत इकडे आमचा काळ जाईल (११ जुलै). आषाढ कृष्ण पक्षात आम्हाला तिकडे येता येईल. मध्ये खर्ड्यासही जावे लागेल. आपणाकडे प्रथम येणे झाल्यास ते आटोपून आम्ही खर्ड्यास जाऊ. नंतर आपले ठरल्यास खर्ड्यास जाऊन नंतर बीडला येता येईल. खर्ड्यास कमीत कमी एक आठवडा तरी मोडेल.

३१ जुलैला नागपंचमीस श्रावणीकरिता सोलापुरी जाऊन, श्रावणी करुन आम्ही तुळजापुर-गाणगापुर यात्रा वार्षिक करुन आम्ही परत पुण्यास जाऊ. म्हणजे ३० जुलैला सोलापुरी पोचले पाहिजे, करिता आषाढ पौर्णिमा होताच ११ जुलैनंतर प्रथमच आपणाकडील कार्यक्रम ठरल्यास तो आटोपूनच आम्ही खर्ड्यास जाऊन तेथूनच सोलापुरी जाऊ. हे बरे होईल. याप्रमाणे सर्वांचे विचारे योग्य दिसेल तसे ठरवावे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी कळविल्याप्रमाणे येथील ब्रह्मवृंदाना घरी बोलावून घेतले. आषाढ कृष्ण पक्षातील दोन्हीही पर्याय त्यांचे समोर मांडले. त्यांनी २० ते २४ जुलैचा पर्याय जमतो का ते पाहण्यास

सांगितले. यावेळी घरगुती कार्यक्रमासोबतच भगवतीची आराधनाही होणार होती. त्यातून प.पू. महाराज व प.पू. सौ. आईसाहेबांची उपस्थिती हा दुग्धशर्करा योगच होता. त्यामुळे बरेच नातेवाईक, स्नेहीमंडळी येण्यास उत्सुक होते. तसेच बरेच आधीपासून कळवून ठेवले म्हणजे रजा व रिझर्वेशन दोन्हीही गोष्टी व्यवस्थित जमणे शक्य होते.

२० जुलैला सुरुवात करण्याबद्दल प.पू. महाराजांना कळविले असता त्यांनी २१-५-८७ ला पुढील पत्र पाठविले---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २१-५-८७

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. त्याप्रमाणे २० ते २४ जुलैपर्यंत आपण ठरविलेला कार्यक्रम योग्य आहे.

आम्हाला येथून १२ किंवा १३ जुलैला खर्ड्यास जाणे करिता निघता येईल. तेथे ५-६ दिवसच राहून १९ तारखेस संध्याकाळपर्यंत बीडला यावे लागेल. तेथील कार्यक्रम २४ तारखेस आटोपल्याबरोबर २५ सारखेस पुनः खर्ड्यास येऊन तेथे २६ ते ३० पर्यंत राहून तेथूनच सोलापुरी जाणे करावे लागेल. याशिवाय खर्डेकरांचे समाधान होणार नाही, असे वाटते.

याकरिता खर्ड्याचे कार्य आटोपून २५ ला जर बीडला आले आणि २६ ते ३० पर्यंत पाच दिवसांचा कार्यक्रम आटोपून त्याच दिवशी संध्याकाळी सोलापुरी जाता आले तर पुनः खर्ड्यास जावे

लागणार नाही. याबद्दल तेथील ब्रह्मवृंदाचा विचार घेऊन जे योग्य ठरेल ते कळवावे. म्हणजे त्याप्रमाणे येथून निघणेचे ठरविता येईल.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

सर्व ब्रह्मवृंदांशी परत संपर्क साधला. ही अडचण त्यांना कळवली. प.पू. महाराजांना पुनःपुन्हा प्रवासाची दगदग नको. सलगपणे खर्ड्यासही रहाता येईल व बीडचा कार्यक्रम करुन सोलापुरला जाता येईल असे ठरवावे, असे सांगितले असता, त्यांनीही सर्वानुमते २६ तारीख सुरुवातीस योग्य आहे असे म्हटले. प.पू. महाराजांना पण ३० तारखेस प्रयाण करता येईल. सर्व योग योग्यरीत्या जुळून आला व त्याप्रमाणे प.पू. महाराजांना पत्राने कळविले. त्यांचे लगेचच उत्तर आले व त्यांनीही मान्यता दिली---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ३१-५-८७

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले दि. २५ मे चे पाकीट मिळाले. त्याप्रमाणे खर्ड्यातील कार्यक्रम उरकून २४ तारखेला बीडला येणेचे ठरविता येईल व तेथील कार्यक्रम २६ ते २९ आटोपून ३० तारखेस सोलापुरी मुक्कामास जाता येईल. ही योजना बरी झाली. पुनः खर्ड्यास परत जाणेचे कारण नाही.

राहील. आपल्या इच्छेप्रमाणे २४ तारखेस खर्ड्याहून निघता येईल. कदाचित त्या दिवशी भोजनोत्तर निघाले तर चालेल काय ? अथवा २६ तारखेस बीडला कार्यक्रम सुरु होत असल्यामुळे २५ तारखेस सकाळी आले तर चालेल का ? तो याचा खुलासा स्पष्ट वरील पत्त्यावर खर्ड्यास कळवावा म्हणजे आपले पत्र दाखवून तेथून आपली गाडी येताच निघण्याच्या तयारीत आम्हाला राहता येईल. बहुतेक २४ तारखेसच निघण्याचा प्रयत्न करता येईल.आपली गाडी २४ लाच येणार असे आपले पत्र आल्यास तसे सर्वांना सांगता येईल. आताही गेल्यावर तसेच सांगून ठेवतो.

घरी सौ. मंडळींची प्रकृति मधुमेहाने बरी नसल्याने त्यांचा प्रवास निश्चित नाही. डॉक्टरांची परवानगी मिळाल्यास २४ तारखेस निघून बीडला येणेचा प्रयत्न करतील. आम्ही तर येत आहोतच.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. सौ. बाळ बाळंतिणीस मंगल आशीर्वाद.

द. क.

****

२४ तारखेस खर्ड्याला गाडी पाठविली गेली. प.पू. महाराजांचे व रघुनाथरावकाकांचे सोबत आगमन झाले. प.पू. सौ. आईसाहेबांना पण डॉक्टरांनी परवानगी दिल्यामुळे त्या व सौ. पुजारी वहिनी व सौ. भोपटकर मावशींच्या सोबत पुण्याहून आल्या. जालन्याहून प.पू. सौ. ताईमहाराजांचे आगमन झाले.

घरात सर्वत्र चैतन्याचे वातावरण पसरले होते. दारात मंडप घातला गेला. पताका लावण्यात आल्या. प्रत्यक्ष देवच घरात नांदत होते.

२६ तारखेला सकाळी श्री अथर्वशीर्षाचे सहस्त्रावर्तन मधल्या मजल्यातील हॉलमध्ये झाले. एकंदर १३ ब्रह्मवृंद होते. त्याच दिवशी पाद्यपूजेचा कार्यक्रम संपन्न झाला. २७ तारखेस पाठांस सुरुवात झाली. त्याच दिवशी उग्ररथशांतीचा कार्यक्रम संपन्न झाला. अत्यंत मंगलमय वातावरणात सुरुवात झाली. होम हवन व्यवस्थित झाले. सगळी पाहुणे मंडळी आनंदात सर्व कार्यक्रमात सहभागी झाली होती. सकाळीच सासुबाई व ती. आण्णाकांकाना सर्व सुवासिनींनी तेल लावून मंगल स्नान घातले होते. नंतर प.पू. महाराजांनाही मंगल स्नान घातले. पूजा संपन्न होऊन कार्यक्रमाची सांगता होण्यास संध्याकाळ झाली.

ज्यांचा आवाज गोड होता त्यांचेकडून प.पू. सौ. आईसाहेब भक्तिगीते, गवळणी, अभंग वगैरे म्हणून घेत. देवीची गाणी ऐकण्यास सर्वांना चांगले वाटे.

२७, २८, २९ व ३० तारखेस शतचंडीचे पाठ, हवन व पूर्णाहूतीचा कार्यक्रम झाला. याच काळात वे. धुण्डीराजशास्त्री पाटांगणकर यांचा वाढदिवस असल्यामुळे प.पू. महाराजांचे हस्ते त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या चारपाच दिवसात दररोज संध्याकाळी प.पू. महाराजांची पाटांगणावर प्रवचने झाली. धर्मकार्याव्यतिरिक्त सध्याच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीचा आढावा प्रवचनात घेऊन याबद्दल मार्गदर्शन

त्यांनी या प्रवचनात केले. त्यांना संस्थानाकडून मानपत्र अर्पण करण्यात आले.

आम्हा सर्वांच्या सौभाग्याने हा हृद्य सोहळा प.पू. महाराज, प.पू. सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताई महाराज ह्यांच्या उपस्थितीत त्यांचे आशीर्वादाने सानंद पार पडला. प.पू. महाराज विषय निघाला म्हणजे म्हणत- 'अशा शांती कर्माने त्या व्यक्तीस उत्तम आयुरारोग्याचा लाभ होतो व बघणाऱ्या व्यक्तींना पुण्याचा लाभ होतो.

दुसरे दिवशी प. पू. महाराज सोलापूरला गेले व त्यांचे कुटुंब पुण्यास गेले. सर्वजण आनंदाने आपापल्या घरी गेले.

पुण्याहून दि. १३-८-८७ ला प.पू. महाराजांचे या कार्यक्रमाच्या संदर्भात पत्र आले, ते असे---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि.१३-८-८७

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही तुळजापूर, गाणगापूर यात्रा आटोपून जालना मार्गे येथे ८ तारखेस येऊन पोचलो. आता येथे दसऱ्यापर्यंत मुक्काम राहील असे वाटते.

यावेळी आपणाकडे ४-५ दिवस मुक्काम झाल्यामुळे आपल्या घरातील धार्मिक कार्य व्यवस्थित पाहण्यास मिळून समाधान वाटले. कर्ममार्गात श्रद्धेला विशेष महत्व आहे. भगवतीची शुद्ध भक्ती, श्रद्धा, औदार्य इत्यादि गुणामुळे ईशकृपेने कर्माचे पूर्ण फळ

पदरात पडते. हीही एक प्रकारे भगवतीची कृपाच आपणावर आहे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराज. प.पू. सौ. आईसाहेब व प.पू. ताईमहाराजांचा सहवास, त्यांचे मंगल आशीर्वाद या सत्कर्माची पोच या पत्राने दिले अन् खूप-खूप समाधान वाटले.

खर्ड्याचे रहिवासी असणारे श्री लद्दड यांची बीडला ऑईल मील सुरु झाली. ते प.पू. महाराजांचे निस्सीम भक्त होते. तसे सगळे खर्डा गावच प.पू. महाराजांचे गोकुळ होते. प्रत्येकांना त्यांच्या सहवासाची ओढ होती. श्री लद्दडांच्याकडे श्री भागवत सप्ताह सुरु होणार होता. एखादे दिवस तरी प.पू.महाराजांची उपस्थिती असावी अशी इच्छा त्यांनी प्रगट केली व त्याप्रमाणे प.पू. महाराजांना आमंत्रण दिले गेले. त्या संदर्भात प.पू महाराजांनी नोव्हेंबर ८८ मध्ये पुण्याहून पत्र पाठविले---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ८-११-८७

श्री. रा. डॉ. दिलीप देशमुख यांना सप्रेम सादर निवेदन

वि. क्षेम

सोबतचे पत्र श्री कमलाबाई लद्दड ऑईल मील, बीड यांचेकडे कोणाबरोबर तरी पोचवावे व त्यांना २७ नोव्हेंबरला सकाळी जालन्यास

श्री सौ. ताई महाराजांकडे गाडी पाठविणेस सांगावे. म्हणजे त्या गाडीने आम्ही २७ ला दुपारी जालन्याहून निघून आपणाकडे मुक्कामास येऊ. २८ ला सकाळी त्यांचेकडे सप्ताहस्थळी जाऊन येता येईल व दुपारी भोजनोत्तर बार्शीस रवाना होऊ.

बार्शीस सौ. ताईमहाराजांच्या मुलाच्या लग्नास २८ ला संध्याकाळपर्यंत पोचावे लागेल. वरपक्षाचे वऱ्हाड जालन्याहून बार्शीस येणार आहे. बार्शीची मुलगी असून श्री भगवंत मंदिरात विवाह आहे. या निमित्ताने आपणा सर्वांची भेट होईल.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. २८ ला दुपारी भोजनोत्तर आम्हाला त्यांच्या गाडीने बार्शीस पोचवावे असे श्री कमलाबाई लद्दड यांना कळवावे. तसेच पत्र लिहिले आहे.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

डॉ. दिलीपनी स्वत: ते पत्र लद्दडांच्याकडे नेऊन दिले व अनवधाने प.पू. महाराजांना कळविण्याचे राहूनच गेले. शिवाय श्री लद्दड तशी सर्व व्यवस्था करतील अशी खात्री होतीच. पण तशी पोच प.पू. महाराजांच्यापर्यंत पोचवायची राहूनच गेली. मग वाट पाहून प.पू. महाराजांनी पुन: एकवार पत्र पाठविले, कारण त्याप्रमाणे पुढील प्रवासाचे नियोजन करावयाचे होते, ते असे---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २१-११-८७

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

काही दिवसांपूर्वी आपणास एक पत्र पाठविले होते. त्यासोबत श्री कमलाबाई लद्दड (खर्डेकर ऑईल मील) यांचे नावाचेही पत्र ठेवले होते. त्यांचेकडे २६ नोव्हेंबर पासून श्री भागवत सप्ताह ठरला आहे. त्यावेळी आम्ही एक दिवस येऊन जावे असे येथे त्या सांगून गेल्या म्हणून त्यांचे पत्रात 'जुना जालना सौ. ताईमहाराज चाटूफळे, काजळकर महाराज श्री दत्त मंदिर जालना' येथे २७ तारखेस सकाळी गाडी पाठवावी. म्हणजे त्याच दिवशी दुपारी आम्ही बीडला येऊन, सप्ताहस्थानी दर्शन करुन २८ तारखेस पुढे बार्शीस जाऊ असे त्यांना कळविले होते व आपलेही पत्रात लिहिले होते, ते पत्र आपणास पोचलेले दिसत नाही.

तरी हे पत्र पोचताच त्यांना २७ तारखेस सकाळी जालन्यास वरील पत्त्यावर गाडी पाठविणेस कळवावे व २८ तारखेस दुपारी आम्हाला बार्शीस पोचविणेचे कळवावे.

सर्वत्रास यथाधिकार नमस्कार व आशीर्वाद.

गाडी येऊ न शकल्यास आम्ही एस.टी.ने पुढे जाऊ. कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

पत्रात नमूद केल्याप्रमाणे प.पू.महाराज श्री. लद्दडांच्याकडील श्री भागवत सप्ताहास उपस्थित राहिले व दर्शन घेऊन प.पू. सौ. ताई

महाराजांच्या चिरंजीवाच्या लग्नासाठी बार्शीला रवाना झाले. त्यांचा एक दिवसाचा मुक्काम पण मनाला सुखावून गेला. 'वाहनाची सोय न झाली तर आम्ही बसने जाऊ' इतकी साधी वृत्ती त्यांची होती.

श्री लद्दडांच्याकडे त्यांचा यथोचित सत्कार झाला. त्यांनी सुवर्ण अंगठीसहित सर्व आहेर प.पू. महाराजांना केला. त्यांच्याही श्रद्धेचे मनोहर दर्शन झाले. त्यांच्याकडील प्रसादादी कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

१९८७ अखेरीस-जानेवारी १९८८ मध्ये सासूबाई पुण्यास गेल्या व तिथूनच प.पू. महाराज, प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताई महाराज व इतर अनेक मंडळी त्यात माझ्या मावससासूबाई व सौ. माई क्षीरसागर पण होत्या, यांच्या सोबत त्या कुरुगड्डीला गेल्या. तिथे प.पू. महाराजांचा श्री भागवत सप्ताह होता. दिवस थंडीचे होते. एवढ्या सगळ्या मंडळीची तिथे कशी काय व्यवस्था होणार अशी काळजी वाटत होती. पण प.पू. महाराजांनी श्री दत्तमूर्तींना स्वेटर विणावयास सांगितले आणि सासुबाईंनी सांगितले की तिकडे एकदम उबदार छान वातावरण निर्माण झाले होते.

काकडा आरती, पूजा अर्चन, रोज कृष्णामाईचे स्नान, प.पू. महाराजांचे भागवत कथन, प्रसाद इ. दिवसभर भरगच्च कार्यक्रम असे. सवडीप्रमाणे व सवयीप्रमाणे स्त्रीवर्गात गप्पागोष्टी चालत. प.पू. सौ. आईसाहेबांना सासूबाई त्यांच्या इतर बहिणी 'वहिनी' म्हणून संबोधत.

एके दिवशी गप्पांच्या ओघात सासूबाई प.पू. सौ. आईसाहेबांना म्हणाल्या, 'वहिनीसाहेब आता बीडला केव्हा येणार तुम्ही काय

बाई ! श्रीमंत नणंदाच्या घरी नेहमी जाता, या गरीब नणंदेकडे कशाला याल बाई !' तेव्हा प.पू. सौ. आईसाहेब हसून म्हणाल्या, 'तुम्हाला नातू झाला की त्याच्या बारश्याला आपल्याला जायचं किनई ताई !' प.पू.सौ. ताई महाराजांनी पण दुजोरा दिला. सासूबाईंनी विचार केला, 'दिलीप-सुरेखा दोघेही डॉक्टर, आधीच्या दोन मुली- आता कशाला होऊ देतात ते तिसरे अपत्य ! धाकट्या शामला तीन मुली, त्याही सिझेरियनने झालेल्या व त्यानंतरचे कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन म्हणजे नातवाचे येणे दुरापास्तच !

त्यांनी मग विचारच सोडला अन् तेथील रम्य सोहळा अनुभवू लागल्या. त्यानंतरही पुढे त्या काही दिवस परत आल्यावर पुण्यातच मुक्कामाला होत्या. जवळजवळ २-३ महिन्यांनी बीडला परत आल्या.

प.पू. सौ. आईसाहेबांचा संकल्प व त्यांचे आशीर्वादाने मला धाकट्या कन्येनंतर पाच वर्षांनी दिवस गेले. सासूबाई जेव्हा परत आल्या तेव्हा त्यांनी प.पू. सौ. आईसाहेबांबरोबर झालेला संवाद ऐकविला. त्यांना खूप आश्चर्य वाटले अन् आनंदही झाला.

पुढे प्रसूतीच्या आठवडाभर आधी म्हणजे १३ ऑगस्ट ८८ ला प.पू. महाराजांचे जालन्याहून सोलापूरला जाताना आगमन झाले. यथोचित पाद्यपूजा, प्रसाद झाला व पुढे 'ऑक्टोबर मध्ये बीडला येऊ' असे ठरवून ते वैराग मार्गे सोलापूरला प्रतिवार्षिक कार्यक्रमासाठी रवाना झाले.

२२ ऑगस्ट १९८८ म्हणजे श्रावण शु. नवमी पहिल्या श्रावण सोमवारी माझी सुखरुपपणे प्रसूती झाली. प.पू. सौ. आईसाहेबांचे शब्द

खरे ठरले व पुत्ररत्न प्राप्त झाले. ती. आण्णाकाका, सासुबाईंना खूप आनंद झाला व ती. आण्णाकाकांनी स्वतः पत्र लिहून हे वृत्त प.पू. महाराजांना कळवले. त्यांचे त्वरीत उत्तर आले, ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २७-८-८८

श्रीमान रा. प्रभाकरपंत देशमुख यांना
सप्रेम नमस्कार वि. क्षेम

डॉ. सौ. सुरेखाताई देशमुख प्रसूत होऊन पुत्ररत्न झाल्याची वार्ता आपल्या पत्रावरुन समजून येथे सर्वांना आनंद झाला. भगवतीची कृपा व आपणा सर्वांच्या श्रद्धा-भक्तीचे हे फळ आहे. श्री विष्णूपंतानीही आपल्या पत्रात आनंद व्यक्त केला आहे.

आम्ही अश्विन कृष्ण पक्षात इकडे येताना देऊळगावहून बीडला येऊन आपल्या नातवाला पाहून इकडे परत येऊ. सौ. सिंधूताईंची इच्छा जगदंबेने पूर्ण केली. मुलगा, मुलगी ही सर्वही देवीचेच स्वरुप आहे.

'सर्वरुपमयी देवी'- असे देवी महात्म्यात शेवटी आहे.

श्री. डॉ. दिलीप व डॉ. सौ. रेखाताई दोघेही देवीभक्त आहेत. त्यांची संसाराची सर्व चिंता जगदंबेलाच आहे. चि. बाळाचे नाव 'नारायण' ठेवणेस हरकत नाही. सर्वांचे पसंतीप्रमाणे ठरवावे.


आयुष्यमान बाळबाळंतणीस मंगल आशीर्वाद. कळावे. सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर


****



प.पू दत्तमहाराज कवीश्वर पारंपारिक वेषामधे



प.पू. दत्तमहाराज, श्रृंगेरी पीठाचे अधिपती शंकराचार्य श्री चंद्रशेखर भारती यांचेशी पाटांगण बीड येथे वार्तालाप करताना




बीड येथील श्रीमद् भागवत सप्ताहात प.पू. दत्तमहाराज




बीड येथील श्रीमद् भागवत सप्ताहात प.पू. दत्तमहाराज




श्रीमद् भागवताच्या मिरवणुकीत प.पू. दत्तमहाराज, प.पू. सौ आईसाहेब सह ती. सौ. सासूबाई व ती. अण्णाकाका डोक्यावर ग्रंथ घेऊन




प.पू. दत्तमहाराजांचे आगमन




बीड येथील आगमना प्रीत्यर्थ सत्कार



प.पू. दत्तमहाराजांचा सत्कार करताना डॉ. दिलीप



प.पू. दत्तमहाराजांचे पादप्रक्षालन करताना डॉ. दिलीप व डॉ. सौ. सुरेखा



प.पू. दत्तमहाराज व प.पू. सौ. आईसाहेब यांचे उपस्थितीत पादुका पूजन करताना डॉ. दिलीप व सौ. सुरेखा




प.पू. दत्तमहाराजांचे पादप्रक्षालन करताना डॉ. दिलीप शेजारी चि. नारायण




प.पू. दत्तमहाराज डॉ. दिलीपना आशीर्वाद देताना



ती. अण्णाकाका, ती. सौ. सिंधुताई (डॉ. दिलीपचे माता-पिता)
यांचा सत्कार करताना प.पू. दत्तमहाराज




प.पू. सौ. आईसाहेब व ती. सौ. सासूबाई
चि. नारायणाच्या नामकरण कार्यक्रमाच्या वेळी




प.पू. दत्तमहाराज चि. नारायणला प्रसाद भरविताना सोबत त्याचे आजी आजोबा व बाबा



चि. नारायणचे कौतुक करताना प.पू. दत्तमहाराज



एका विश्रांतीचे क्षणी प.पू. दत्तमहाराज



निरोपाचे क्षणी देवघरातील देवांची प्रार्थना करताना प.पू. दत्तमहाराज

मुलगा काय अन् मुलगी काय सर्वच शक्तीची रुपे आहेत. पण साधकाच्या इच्छेनुसार त्याच्या संसारातील न्यूनता दूर करुन त्याला आनंदी करणे हेही कदाचित त्यांनी घडवून आणले असावे. नाहीतरी प्रवचनात प.पू. महाराज नेहमी सांगत 'सकाम भक्ती करावयास हरकत नाही, पण मागणे देवाकडे मागावे म्हणजे इच्छा फलद्रूप होऊन मन आपोआपच परमार्थाकडे लागते.'

सासूबाई व ती. आण्णाकाका खूप आनंदात होते. पुढे लगेच राखी पौर्णिमा आली आणि बाळाच्या पाचही बहिर्णींनी त्याला राखी बांधली.

श्रावणाच्या शेवटी शेवटी प.पू. महाराजांचे पुण्याहून पत्र आले. त्यांचे नेहमीच्या सहवासातील भक्त व श्री. रघुनाथराव काका यांच्या पत्नीचे निधन झाल्याचे त्यांनी त्यात कळविले. प.पू. महाराज जेव्हापासून बीडला यावयास लागले म्हणजे पहिल्या दोन वेळेस श्री. जगन्नाथराव पुजारी काका सोबत होते, पण त्यानंतर अखेर पर्यंत श्री. रघुनाथकाका त्यांची प्रवासात सर्वतोपरी काळजी घेत. घरी सौ. काकू एकट्याच रहात असत.

त्यासंदर्भात पत्र लिहिताना प.पू. महाराजांनी कळविले---

****

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ८-९-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

सौ. रेखाताईंना पुत्ररत्न झाल्याची आनंददायी वार्ता आपले पिताजी श्री. प्रभाकरपंतांचे पत्रावरुन समजली. आनंद झाला.

श्री भगवतीची कृपा आपणावर पूर्ण असल्याचे पाहून समाधान झाले. त्या पत्रास उत्तर पाठविलेले मिळालेच असेल. चि. बाळ बाळंतिणीस मंगल आशीर्वाद. दोघांचीही खुशाली कळवावी.

येथे ३० ऑगस्टला श्री रघुनाथरावांची मंडळी हार्टफेल होऊन अकस्मात गेली व येथील आमचे एक आप्तही गेले. त्यामुळेही येथेच आम्हाला रहावे लागले. खर्ड्यास जाणे झाले नाही. कदाचित सौ. सिंधूताईंना खर्ड्याचा हेलपाटा पडला काय ते समजत नाही.

आता श्री रघुनाथरावांना आमच्याबरोबर रहाणे होईल का नाही समजत नाही. कारण येथे आता त्यांचे घरी कोणीच नाही. यामुळे कदाचित प्रवास पुढे ढकलावा लागतो का ते कळत नाही.

पत्रानी कुशल निवेदन समजून समाधान राहील. ईशेच्छेनुसार सर्व घडणार आहे.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांच्या पत्रातून सौ. काकूंच्या निधनाबद्दलचे दुःख व्यक्त होतेच, शिवाय सासूबाईंना खर्ड्याला जाण्याचा हेलपाटा झाला की काय, त्यांची गैरसोय झाली की काय याबद्दलची कळकळ दिसत होती. स्वतःला कितीही गैरसोय, दुःख झाले तरी इतरांच्या त्रासाचीच ते सदैव चिंता करताना दिसत असत.

चि. बाळाचे नामकरण प.पू.महाराजांनीच करावे, त्या निमित्ताने प.पू.आईसाहेब व प.पू. सौ.ताई महाराज यांचे आशीर्वाद प्रत्यक्षपणे

बाळाला लाभावेत अशी आमची सर्वांची मनोमन इच्छा होती. त्यानिमित्ताने श्री भगवतीची उपासना व्हावी, श्री नवचंडी व्हावी असे वाटले. प.पू. महाराजांनीही ऑक्टोबरात आम्ही बाळाला पहावयास येऊ असे कळविले होते. सर्वच योग सुंदर जुळून येणार होता. त्याप्रमाणे प.पू. महाराजांचे अनुमतीसाठी पत्र पाठविले होते. तेव्हा त्यांनी उत्तर पाठविले, ते असे---

पत्र पुण्याहून त्यांनी पाठविले होते.

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २८-९-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले २१-९ चे पत्र मिळाले. कुशल वृत्त समजून आनंद झाला.

आम्ही २१ ऑक्टोबर, अश्विन शु. ११ ला येथून निघून औरंगाबादला १-२ दिवस थांबून देऊळगावी पौर्णिमेपर्यंत जाऊ. तेथील कार्य ३० ऑक्टोबरला बहुतेक आटोपेल. मध्ये जालन्यास सौ. ताई महाराजांचे दर्शन घेऊन ३१ तारखेस सायंकाळपर्यंत बीडला येणे होईल असे वाटते. बीडला १-२ दिवस थांबून बार्शीमार्गे आम्ही इकडे परत येऊ.

बार्शीहून श्री चांडक व्यापारी बीडला गाडी घेऊन येतील. आम्हाला बार्शीहून इकडे पोचवितील, असे परवा येथे ते सांगून

गेले. येथून ४ तारखेस वाडीची तिकीटे रिझर्व झाली आहेत. याप्रमाणे आज ठरले आहे.

श्री.रघुनाथराव बरोबर येत आहेत. ते देऊळगावहून फोनने आपणास कळवितील.

सर्वांस यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आयुष्यमान बाळ-बाळंतिणीस मंगल आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. सौ. आईसाहेबांचे बोल खरे ठरले याचा सासूबाईंना मनोमन आनंद झाला. आता सर्वांनी बारशाला यावे अशी घरातील सर्वांचीच इच्छा होती.

पुढच्या पंधरा दिवसात प.पू. महाराजांनी पुण्याहून अजून एक पत्र पाठविले. बारशाआधीच्या काळात त्यांचा देऊळगावी मुक्काम होता.---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ११-१०-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र काल मिळाले. आपण ठरविल्याप्रमाणे २७ तारखेपासून कार्यक्रम सुरु करणेस हरकत नाही. १ नोव्हेंबरला

आम्ही पूर्णाहुती, नामकरण समारंभ करुन, प्रसाद घेऊन सायंकाळी मुक्कामास बार्शीस जाऊन, तेथून इकडे २ तारखेस परत येऊ.

बार्शीहून श्रीमान चांडक व्यापारी गाडी घेऊन बीडला येतील व आम्हाला बार्शीहून इकडे पोचवतील. येथूनही लगेच वाडीस जाणेची गडबड आहे.

आमची मंडळी त्यावेळी येथून कोणास तरी बरोबर घेऊन प्रकृती प्रवासक्षम असल्यास तिकडे येतील.

देऊळगावी २८ तारखेस ललिताचा मुख्य कार्यक्रम आहे. नंतर दोन दिवसांनी आम्हाला तेथून निघता येईल. तरी देऊळगावी आपली गाडी ३० तारखेस संध्याकाळपर्यंत आल्यास, ३१ तारखेस तेथून पहाटे निघून ९-१० पर्यंत आम्हाला बीडला येता येईल असे वाटते. देऊळगावहून श्री. रघुनाथराव फोन करुन निश्चित दिवस कळवतीलच.

सौ. ताईमहाराजांची प्रकृती सध्या बरी नसल्याने औषधे चालू आहेत. त्यांचे काय होते ते पहावे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांप्रमाणे ती. सौ. आईसाहेबांनीही आपण बारशास येत असल्याचे पत्राद्वारे कळवले. ते पत्र असे-

॥ श्री दत्त ॥

पुणे
२४-१०-८८

सौ. सिंधूताईंना स.न.

वि.वि. असो,

तुमचे पत्र पोहोचले. तरी मी व माझ्याबरोबर पुजारी वहिनी दोघीही ता. ३० ला सकाळी १०.३० च्या गाडीने बीडला येत आहोत. तरी स्टेशनवर कोणीतरी येणे. असो.

बीड ते गेवराई या गाडीने येत आहोत.

हेच पत्री थोरांना सा. न. लहानांना आशीर्वाद आणि पुण्याला यायचे रिझर्वेशन करुन ठेवणे. २ तारखेचे तेवढे करुन ठेवणे. असो बाकी सर्व ठीक.

आ.
सौ. लक्ष्मी कवीश्वर

****

घरी बारशाची तयारी जोरात सुरु होती. सर्व नातेवाईकांना निमंत्रणे पाठविली होती. नामकरणाचा कार्यक्रम व प.पू. महाराजांचा सहवास यासाठी सगळेचजण उत्सुक होते. श्री नवचंडी समारोह असल्यामुळे गावातील इतर स्नेहीजनांना प्रसादासाठीच्या आमंत्रण याद्या तयार करुन त्याचे वाटप करण्यात आले होते. ब्रह्मवृंदानाही आमंत्रण पाठविले होते. त्याही मंडळींना प.पू. महाराजांचा सहवास खूप सुखद वाटायचा. त्यांची यज्ञ मंडपातील उपस्थितीही वातावरणात सात्त्विक उत्साह भरुन जायची.

औरंगाबादहून जालन्याला आल्यानंतर प.पू. महाराजांनी पत्र पाठविले ते असे---

****

॥ श्री दत्त ॥

जालना

दि. २५-१०-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही काल रात्री औरंगाबादहून येथे सौ. ताई महाराजांच्याकडे आलो. त्यांची व त्यांचे यजमान श्री. मधुकरराव या दोघांचीही प्रकृती बरी नाही. उपचार चालू आहेत. आमचे आपल्या ५-१०-८८ चे पत्रास पाठविलेले उत्तर मिळाले असेलच. आम्ही आज दुपारी देऊळगावी जात आहोत. तेथे २८ तारखेस लळीत गोपाळकाला होईल. नंतर २ दिवसांनी रविवारी ३० तारखेस प्रसाद मिळेल.

त्यादिवशीच दुपारी किंवा सायंकाळी निघता आल्यास ३० तारखेस सायंकाळी मुक्कामास बीडला आम्हाला येता येईल असे वाटते किंवा ३१ तारखेस पहाटे देऊळगावहून १० वाजेपर्यंत बीडला येणे शक्य होईल. २/४ दिवस फोनची अन्य व्यवस्था न झाल्याने हे पत्र पाठवित आहे.

देऊळगाव येथील फोन नं. १५, श्री जगनशेठ धन्नावत येथे शक्य झाल्यास फोन करुन आपण चौकशी करुन पहावे. आम्हीही फोन करुन पहातो. तरी ३० तारखेस गाडी देऊळगावी आल्यास त्या दिवशीच किंवा ३१ तारखेस पहाटेस निघून तेथेच स्नानास आम्हाला येता येईल.

आयुष्यमान बाळ-बाळंतिणीस मंगल आशीर्वाद.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

अशाच आशयाचे पत्र देऊळगावराजाहून प.पू. महाराजांनी लगेच दुसरे दिवशी म्हणजे दि. २६ ला पाठविले---

॥ श्री दत्त ॥

देऊळगावराजा

दि. २६-१०-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

काल जालन्याहून पाठविलेले पत्र मिळाले असेलच. तेथून काल रात्री आम्ही येथे आलो. आज सकाळी संस्थानचे अधिकारी भेटले. त्यांनी सांगितले की, 'रविवारी ३० तारखेस सकाळी आम्ही यात्रेचा प्रसाद देऊ. दुपारी आपण बीडला जाणेस हरकत नाही.' असे सांगितले. तरी आपण ३० तारखेस रविवारी ११-१२ पर्यंत येथे गाडी पाठविणेस हरकत नाही. म्हणजे आम्ही दुपारी जेवणोत्तर येथून ३० तारखेस निघून संध्याकाळपर्यंत बीडला येऊ. ३१ व १ चा कार्यक्रम आटोपून संध्याकाळी मुक्कामास बार्शीला जाऊन २ तारखेस पुण्यास ते शेटजी पोहोचवतील.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे प.पू.महाराज व रघुनाथरावकाका ३० तारखेस संध्याकाळी मुक्कामाला आले. सायंसंध्या झाल्यावर दशमी खाणे झाले. दुसरे दिवशीच्या कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा झाली. प.पू.सौ. आईसाहेब, पुजारीवहिनी व सौ. भोपटकर मावशींच्या समवेत पुण्याहून दुपारीच आल्या. प.पू. सौ. ताईमहाराज ३१ तारखेस सकाळी १०-११ वाजता इथे पोहोचल्या. घरामध्ये सर्वत्र चैतन्य भरुन गेले होते.

दुसरे दिवशी सकाळी पाठ सुरु झाले. प.पू. महाराजांनी चि. बाळास मांडीवर घेऊन त्यांचे 'नारायण' असे नाव कानात सांगितले. मग त्याला हॉलमध्ये आणून सजविलेल्या पाळण्यात जोजावले गेले. 'नारायण' नावाची साखर पाने वाटली गेली.

दुसरे दिवशी सकाळी पाठाचे हवन व पूर्णाहुती संपन्न झाली. प्रसादाचे भोजन झाले. गावातील साताठशे मंडळी जेवणास होती. रात्री अकरापर्यंत जेवणावळी चालल्या.

प.पू. महाराजांची गुरुद्वादशीची वाडीची वारी जवळ आल्यामुळे कार्यक्रम आटोपला की त्यांचे बार्शीहून पुण्यास जाणे झाले.

घरी पोहोचल्यानंतर त्यांनी वाडीला जाण्यापूर्वी पुण्याहून एक पत्र पाठविले, ते असे---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ३-११-८८

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही काल रात्री बार्शीहून येथे येऊन पोचलो. उद्या रात्री वाडीकडे जात आहोत.

आपल्या घरातील नवचंडीचा उत्सव पाहून समाधान वाटले. यजमानांची श्रद्धा भक्ती व विधिज्ञ ब्राह्मणांचेही उत्तम अनुष्ठान झाल्याने हे पुण्यकर्म सांग पार पडले असे समजण्यास हरकत नाही. अन्नदान ही उत्तम, भरपूर झाले. पुण्यकर्मात कोणतीही काटकसर झाली नाही, असे क्वचितच दिसून येते.

जगदंबेची आपणावर पूर्ण कृपा आहे. आपलीही धर्मनिष्ठा, भक्ति प्रशंसनीय आहे.

आज सकाळी येथे सावंतवाडीची दोन तिकीटे एशियाडची श्री. अशोकने काढून आणली आहेत. सौ. सिंधूताईंनी दोन तिकीटे सांगितली ती मिळाली. त्यांना हे पत्र पोहोचताच इकडे माणगावकरिता दोघींना पाठवून द्यावे. तेथून ९ तारखेस १५-१६ मंडळी, बायका निघणार आहेत.

श्री. शामरावांना पुत्ररत्न होणेकरिता सौ. सिंधूताई माणगावी श्री महाराजांची प्रार्थना करुन येतील. मागे त्यांनी कुरुगड्डीस प्रार्थना केली. त्याचे फळ आपणास मिळाले. तरी हेही श्री शामरावांना श्रीकृपेने मिळेल.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आयुष्यमान बाळ व त्याची सौभाग्यसंपन्न माता यांना मंगल आशीर्वाद.

कळावे. द.धु.क.

****

आता हे पत्र वाचले म्हणजे जाणवते की, सासूबाईंच्या मनातील इच्छेचा प.पू. महाराजांनी आदर केला व प.पू. सौ. आईसाहेबांच्या मध्ये व सौ. सासूबाईंमध्ये संवाद घडवून आणून, 'आपल्याला सिंधूताईंना नातू झाला की त्याच्या बारशाला जायचे आहे ना ताई !' असे निश्चित आश्वासन दत्तप्रभुकृपेने सासूबाईंना देण्यात आले. प्रत्यक्षात वाटणारी अशक्यप्राय गोष्ट प.पू. सौ. आईसाहेबांच्या सत्त्ववाणीने खरी झाली आणि चि. नारायणचा जन्म झाला. या सगळ्या गोष्टींचे श्रेय नेहमीप्रमाणे दुसऱ्यांना देण्याची प.पू. महाराजांची सवय आहे.

सासूबाईंना दोन्ही नातू व्हावे व त्या आनंदात रहाव्यात म्हणून प.पू. महाराजांनी या पत्रात डॉ. दिलीपचे धाकटे भाऊ श्री. शाम यांनाही पुत्र रत्नाचा लाभ व्हावा अशी इच्छा व्यक्त केली होती. हे आलेले पत्र जेव्हा घरात वाचून दाखविले गेले तेव्हा दुर्दैवाने 'शामच्या बायकोचे म्हणजे सौ. वैजयंतीचे तिसऱ्या सिझेरियन नंतर कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन झाले आहे तेव्हा आता पुढील अपत्यप्राप्ती अशक्यच आहे' हाच विचार सर्वांनी केला. पण काही केसेसमध्ये असे ऑपरेशन होऊन सुद्धा गर्भधारणा होऊ शकतात हा विचार तेव्हा का नाही मनात आला ?

मला अजूनही आठवते-प.पू. महाराजांच्या एका मुक्कामात संध्याकाळच्या वेळी सहज बोलत बसलो असता, त्यांनी गुजराथमधील एका स्वामींचा उल्लेख केला, ज्यांचे नाव आठवत नाहीये. 'त्यांनी दिलेल्या आयुर्वेदिक औषधांनी श्री. शामरावांच्या मंडळींना गुण येऊन त्यांना पुत्रप्राप्ती होईल'- 'त्या स्वामींचा पत्ता व सर्व माहिती तुम्ही रघुनाथरावांच्याकडून घ्या.' असे आश्वासक संकेतही त्यांनी दिले होते. पण प्रारब्धात योग नसला म्हणजे माणसाला दुर्बुद्धी आठवते. कोणतीही गोष्ट अनुकूल व्हावी असे वाटत असेल तर दृढ विश्वास हवा. अन् या वेळी तो अजिबात नव्हता असे दिसते. त्यामुळे माणगावी सासूबाईंनी विषयही काढला नाही व तशी इच्छाही प्रगट केली नाही. यावरुन प.पू. महाराजांनी भागवतात सांगितलेला एक प्रसंग आठवतो,...

'श्री कपिलमुनींचे पिताश्री तपश्चर्येसाठी निघून गेले. त्यांना माताजींना ज्ञान देऊन त्यांचा उद्धार करावयाचा होता. मातोश्रींच्या समोर ते स्वस्थ बसले. जोवर जिज्ञासूने प्रश्न विचारला जात नाही तोवर काय करायचे ! स्वस्थ बसले ते !'

जोपर्यंत आपल्याकडून इच्छा प्रगट होत नाही तोपर्यंत सद्गुरु काय करणार ? आपलेच प्रारब्ध ! असो.

माणगावी सर्व साधकांचा मेळावाच जमला होता. सासूबाईंनी आल्यावर तेथील दिनक्रमाविषयी सविस्तर वर्णन केले. परत येताना सासूबाई व श्री आत्याबाई (डॉ. दिलीपच्या आत्या) यांची परतीची काय सोय आहे ? त्यांना व्यवस्थित गाडीत बसवून देण्याची जबाबदारी प.पू. महाराजांनी श्री. गोडसे काकांवर सोपविली. त्यात

त्यांनी जातीने लक्ष घातले. आम्हाला आमच्या व्यवसायामुळे कुठेच जावयास मिळत नव्हते. बीडला प.पू. महाराज येतील तेवढाच काय तो त्यांचा सहवास लाभे. मग सासूबाई जेव्हा अशा कार्यक्रमाचे सविस्तर वर्णन करीत तेव्हां आम्हाला ऐकून खूप समाधान वाटे.

पुढे सप्टेंबरच्या सुरुवातीच्या काळात सर्वांचीच प्रकृती थोडीफार बिघडली. पुढे औषधोपचाराने व विश्रांतीने बरे वाटले. ती. अण्णाकाकांचा मधुमेह ही बळावला होता. इन्सुलिन सुरु केल्यानंतर तोही आटोक्यात आला. प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हा त्यांनी आवर्जून चौकशी केली.

प.पू. महाराजांच्या संकल्पाने-कृपाशीर्वादाने आजवर पाच नवचंडीयाग व तीन शतचंडी याग झाले होते. 'श्रीसहस्रचंडी' संपन्न व्हावी अशी इच्छा डॉ. दिलीपनी प.पू. महाराजांच्या जवळ बोलून दाखविली. संकल्प मोठा असला तरी कार्यसिद्धी करणारी गुरुमाऊली असल्यामुळे काळजीचे कारणच नव्हते.

सप्टेंबर ८९ मध्ये खर्ड्याला जाताना प.पू. महाराजांचा बीडला ३/४ दिवस मुक्काम झाला. श्री अथर्वशीर्षाच्या सहस्रावर्तनाने आरंभ करुन सर्व कल्याणार्थ करण्यात येणाऱ्या श्री सहस्रचंडीचा संकल्पविधी प.पू. महाराजांनी स्वतः सांगितला. आम्हाला खूप आनंद झाला. त्यांच्या या मुक्कामात संध्याकाळी घरातील हॉलमध्येच प्रवचने होत. ३०-४० जण सहज बसू शकतील अशी व्यवस्था होई व प.पू. महाराजांच्या सोयीने त्यांचे वेळेनुसारही प्रवचने होत. म्हणजे विश्रांतीही मिळत असे.

या काळात प.पू. महाराजांच्या कृपादृष्टीच्या साक्षात्काराची गोष्ट अगदी लक्षात राहिलेली व आवर्जून उल्लेख करण्यासारखी आहे. ती म्हणजे-

चि. नारायण एव्हाना वर्षाचा झाला होता. त्याची शारीरिक वाढ तशी बरी होती. पण अजूनही तो व्यवस्थित उभा रहात नव्हता. चालण्याचा प्रयत्न करत नव्हता. त्याला 'नारायण' म्हणून हाक मारली तर तो त्या व्यक्तीकडे पाही, पण चेहऱ्यावर कोणतेच भाव नसायचे. एकदम शांत शांत बसून रहायचा. मला माझ्या हॉस्पीटलच्या व्यग्रतेमुळे फार लक्षात आले नाही, पण सासूबाईंना हे तीव्रतेने जाणवले. घरात एकंदर माझ्या दोन व जाऊबाईंच्या तीन अशा पंचकन्यांना सासूबाईंनी सांभाळले असल्यामुळे त्यांना त्यांच्यात व नारायणच्या वाढीमध्ये खूप फरक जाणवू लागला आणि या जाणीवेची जागा काळजीने घेतली. सासूबाईंना वाटू लागले की, 'आपण नातू व्हावा अशी इच्छा प्रगट केली पण मंदबुद्धीचा निघाला तर आयुष्यभर काळजीच राहील.' त्याच्या काळजीने त्या खूप अस्वस्थ होत.

एके दिवशी संध्याकाळी प.पू. महाराजांचे प्रवचन संपले. हॉलमधील गर्दीही कमी झाली. आम्ही घरचेच सर्वजण हॉलमध्ये बसलो होतो. प.पू. महाराज भिंतीला टेकून गादीवर बसले होते. ती. अण्णाकाकांनी बोलता-बोलता आजींची काळजी प.पू. महाराजांना बोलून दाखविली. चि. नारायण हॉलच्या दुसऱ्या टोकाला शांतपणे बसला होता. प.पू. महाराजांनी तळहातावर खडीसाखरेचा खडा घेतला व हलक्या आवाजात त्याला 'नारायण' म्हणून साद दिली. त्याने लगेच त्यांच्याकडे पाहिले व भराभरा रांगत तो प.पू.

महाराजांच्या जवळ आला. दोघांनी एकमेकांकडे दृष्टिक्षेप टाकला. तो हसला व प.पू. महाराजांच्या तळहातावरील खडीसाखरेचा खडा त्याने तोंडाने उचलला. त्यावेळी प.पू. महाराजांनी त्याच्याकडे टाकलेला कृपाकटाक्ष, आम्ही सगळेजण स्तब्ध होऊन पहातच राहिलो. अविस्मरणीय असा तो प्रसंग होता. दोघेही एकमेकांकडे काही क्षण पाहत होते. 'आता आजीची काळजी दूर झाली का नाही ?'... प.पू. महाराजांनी हसून विचारले.

आजही तो प्रसंग जसाच्या तसा आठवतो. अंगावर रोमांच उभे रहातात. खरे म्हणजे एका प्रवचनात प.पू. महाराजांनी सांगितले होते की, 'मनुष्य रुपात असेल तर प्रत्यक्ष परमेश्वरास आपण ओळखू शकत नाही. कारण त्याचे सर्व वर्तन सामान्य माणसासारखे असते.' असे काही घडलेले पाहिले की, यावर विश्वास ठेवावाच लागतो.

खरे म्हणजे चि. नारायण म्हणजे गुरुकृपाच ! प्रत्यक्ष प.पू. महाराजांचा 'प्रसाद', आम्ही काळजी करण्याचे कारणच नाही. पण अज्ञ जीवाच्या मनातील काळजीची मालिका संपतच नाही. मग असे काही चमत्कार घडून त्याची जाणीव होते.

चि. नारायणची पुढे शारीरिक व बौद्धिक प्रगती व्यवस्थित होऊन त्याने पंचकन्यांना तर मागे टाकलेच पण वर्गातही सतत पहिला क्रमांक टिकवून ठेवला. आता वडिलांची गादी पुढे चालविण्यासाठी तो उच्च शिक्षण घेत आहे. अन् अत्यंत समाधानाची बाब अशी की, त्याची प.पू. महाराजांवर व प.पू. ताई महाराजांवर गाढ श्रद्धा आहे. प.पू. ताईमहाराजांचा तो खूप लाडका आहे. त्या नेहमी आवर्जून त्याची चौकशी करतात. प.पू. महाराजांनी त्यांच्या

पत्रात सतत उल्लेख केला आहे की, 'तुमच्या योगक्षेमाची काळजी भगवतीला आहे.'... त्यामुळे प.पू. ताईमहाराजांचे सतत लक्ष असते. कोणत्याही निर्णयप्रक्रियेत त्या मार्गदर्शक असतात.

आम्हा सर्वांच्या प्रकृतीच्या संदर्भात प.पू. महाराजांच्या कानावर गेले असता दि. २८-९-८९ ला त्यांनी पुण्याहून पत्र पाठविले. ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २८-९-८९

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

तिकडील सर्वांचे कुशल कळवावे. यात्रेहून आल्यावर सौ. सिंधूताईंची, श्री. प्रभाकरपंताची प्रकृती बरी नव्हती असे समजले. सौ. सुरेखाताईंचीही प्रकृति मध्ये बरी नव्हती असे समजले. तरी सर्व लहानथोरांचे प्रकृतिमान कुशल सवडीने कळवावे. आमचीही प्रकृति मध्ये बरी नव्हती. आता हळुहळू सुधारत आहे. औषधे चालू आहेत. अशक्तता आहे. काळजीचे कारण नाही.

चंडीपाठ ब्राह्मणद्वारा चालू असतीलच. चातुर्मासात ब्राह्मणांना सवड अधिक मिळेल. पुढे पाठ पूर्ण होतील.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. दसरा झाल्यावर देऊळगावी-वाडीला यात्रेस जावयाचे आहे.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. दत्तमहाराजांचे मन आईसारखे हळवे आहे. थोडेसे काही बरे नसल्याचे कळले की अगदी काळजीने चौकशी करायचे. त्यांच्या या आपुलकीच्या शब्दांनी खूप बरे वाटायचे.

श्री सहस्त्रचंडीचा संकल्प प.पू. महाराजांनी केला. त्या दिवसापासून संपूर्ण पाठसंख्या होण्यासाठी ३-१-९० उजाडले. प.पू. महाराजांना वरचेवर पाठसंख्येच्या संदर्भात कळवित होतो. शिवाय तयारी संदर्भातही विचारणा करीत होतो. गुरुद्वादशीच्या आधी दि. २२-१०-८९ ला प.पू. महाराजांनी पुण्याहून पत्र पाठविले, ते असे...

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, कर्वे रोड, श्री वासुदेव निवास
दि. २२-१०-८९

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही परवा रात्री देऊळगावाहून येथे आलो. मध्ये थोडावेळ श्री अच्युतराव यांचेकडे थांबलो होतो. तेथे सौ. सिंधुताईंची भेट झाली.

त्याप्रमाणे येथे वे. कृष्णदेव आर्वीकर व वे. दत्तात्रेय सप्रे या दोघांनाही पौषातील सहस्त्रचंडी सांगतेकरिता विचारले असता 'येऊ' असे त्या दोघांनीही सांगितले आहे. ते येथेच आहेत. त्यांचे येथील पत्ते- 'वे. कृष्णदेव आर्वीकर,
श्री वासुदेव निवास कर्वे रोड, पुणे-४'
'वे. दत्तात्रेय सप्रे,
श्री वासुदेव निवास, कर्वे रोड, पुणे-४'
असे आहेत.

हे दोघेही उत्तम याज्ञिकी करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. तरी तेथील ब्राह्मण मंडळींचा विचार पाहून एकाला किंवा दोघांना त्यावेळी येणेबद्दल वरील पत्त्यावर निमंत्रण पत्रे हे पत्र मिळताच पाठवावीत. त्यांची उत्तरे पाहून तसे ठरवावे. दोघांची आवश्यकता नसल्यास एकानाच कोणासही पत्र पाठवावे. तेथील ब्राह्मण मंडळी आहेतच. जसे ठरेल तसे करावे. तेथील ब्राह्मणही चांगले जाणते आहेत.

आम्ही उद्या वाडीकडे श्री गुरुद्वादशी करिता जात आहोत. तेथून इचलकरंजी येथे २ ते १० नोव्हेंबर श्री भागवत सप्ताह आटोपून पुण्यास परत येणे होईल. येथून घरची मंडळी १ नोव्हेंबरला दुपारी ३ चे एस.टी.ने निघून रात्री वाडीस येतील. २ तारखेस सकाळी स्नानदर्शनादि आटोपून इचलकरंजीस पोचतील.

सौ. सिंधूताई येणार आहेत असे परवा औरंगाबादी बोलल्या. तरी त्यांचे येणे निश्चित असल्यास ३०-३१ ला येथे येणे होत असल्यास तसे निश्चित येथे कळवावे म्हणजे त्यांचेही रिझर्वेशन करुन ठेवता येईल. दिवाळीमुळे कसे असेल तसे करावे.

येथील घरचा पत्ता

श्री. डॉ. अशोक दत्तात्रेय कवीश्वर<br>
अत्रेय सहकारी वसाहत ९६४/ब, ९६५/१३,<br>
शिवाजीनगर, पुणे-१६.

हा आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी आज्ञा केल्याप्रमाणे वे. कृष्णदेव आर्वीकरांशी संपर्क झाला व त्यांनी सहस्त्रचंडीच्या सांगता समारोहास येण्याचे कबूल केले. सासूबाई आधी पुण्याला जाऊन ती. सौ. आईसाहेब व कोरे मंडळींच्या सोबत इचलकरंजीस जाणार होत्या. पण मुलांना सुट्या असल्यामुळे आम्ही सर्वांनी महाबळेश्वर, गणपतीपुळे, माणगाव वगैरे ठिकाणी जावयाचे ठरविले. त्यामुळे ती. आण्णाकाकांसह आम्ही प्रवासास गेलो. परतीच्या प्रवासात श्री नरसोबावाडीस श्री गुरुद्वादशीस गेलो व कोल्हापूरला जाताना प.पू. महाराजांचे दर्शनास इचलकरंजीस थांबलो. त्यांचेशी वार्तालाप करुन नाष्टा करुन दुपारी कोल्हापूरला गेलो. श्री महालक्ष्मी दर्शन व मुलांसाठी कोल्हापूरमधील इतर प्रेक्षणीय ठिकाणे दाखविली. संध्याकाळी परत येताना प.पू. महाराजांच्यासाठी कमळाची फुले आणली. इचलकरंजी एवढे मोठे गाव अन् श्री भागवत सप्ताहाचे ठिकाण निश्चित माहित नव्हते. पण अगदी थोड्याच वेळात आम्ही योग्य ठिकाणी पोहोचलो. आम्ही पोहोचण्याच्या काही वेळ आधीच प.पू. सौ. ताई महाराज तिथे जालन्याहून एकट्याच आल्या होत्या. त्यापण विनासायासे व्यवस्थित पोहोचल्या. सगळ्यांची भेट झाली खूप बरे वाटले. दिवाळीसाठी घरी परत येणे असल्यामुळे आम्ही लगेच बीडला परत निघालो.

पौषात होणाऱ्या सहस्त्रचंडीची तयारी दिवाळी झाली की लगेच सुरु झाली. सामानाची जमवाजमवी, आमंत्रणाच्या याद्या, ब्रह्मवृंदांशी संपर्क सुरु झाले. प.पू महाराजांनी चंडीयागाच्या निमित्ताने मार्गदर्शनपर सविस्तर पत्र बेळगावहून दि. २२ डिसेंबरला पाठविले. ते असे---

॥ श्री दत्त ॥

बेळगाव,

दि. २२-१२-८९

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे श्री महाराजांच्या जयंतीउत्सवाकरिता आलो आहोत. २५ तारखेस जयंती होईल. नंतर धारवाड, हुबळी, मुळगुंद येथे सर्वांना भेटून ३१ तारखेस संध्याकाळी येथून निघून १ जानेवारी सकाळी ७ वाजता पुण्यास जाऊन पोचू.

त्या दिवशी आपली गाडी संध्याकाळपर्यंत पुण्यास आल्यास २ तारखेस भोजनोत्तर किंवा पूर्वी लवकर निघून बीडला मुक्कामास येत आहोत. ४ तारखेपासून तेथील कार्यक्रम सुरु होईल.

वे. कृष्णदेव आर्वीकरांना ३१ किंवा १ तारखेस बीडला जाणेस कळविले आहे. तेथील ब्राह्मण मंडळीही चांगली जाणती आहेतच. त्यांचे विचारे कुंड, ओटे वगैरे करण्यास हरकत नाही. शंभर पटीच्या आहूती पुष्कळ असल्याने कुंड त्याप्रमाणे झाले पाहिजे हे लक्षात घेऊन सर्व व्यवस्थित होईल.

आपल्या श्रद्धाभक्तीने श्री भगवतीच्या कृपेने सर्व यथासांग, निर्विघ्न व्यवस्थित पार पडेल. काळजीचे कारण नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

या चंडीयाग सोहळ्यास श्री कृष्णदेव आर्विकर ३१ तारखेला संध्याकाळीच येऊन पोहोचले. दुसरे दिवशीपासून त्यांच्या

मार्गदर्शनाखाली कुंडांच्या बांधकामाची सुरुवात झाली. प.पू. महाराजांनी सुचविल्याप्रमाणे आहुती जास्त असल्यामुळे कुंड प्रमाणात खोल केले. बाजूच्या ओट्यांचेही बांधकाम झाले. वरील छतासाठी पत्रे घातले गेले व समोर बसण्याच्या व्यवस्थेसाठी मंडप घातला गेला. माळा, पताका लावून सुशोभित केला गेला. खालच्या सर्व जमिनीची साफसफाई करवून घेतली. सर्व यज्ञसामग्रींची जुळवाजुळव झाली. वे. कृष्णदेवांनी सर्व तयारी पाहिली व समाधान व्यक्त केले.

२ तारखेस प.पू. महाराज, श्री रघुनाथराव काकांच्या बरोबर येऊन पोहोचले. सोबतच्या गाडीत प.पू.सौ. आईसाहेब, सौ. भोपटकर वहिनी, श्री. पुजारी वहिनी, सौ. सविता वहिनी व त्यांच्या श्री मातोश्री येऊन पोहोचले. जालन्याहून दुसरे दिवशी सकाळी प.पू. सौ. ताई महाराज दहाच्या सुमारास येऊन पोहोचल्या. आल्या आल्याच त्यांनी मला चांदीची डबी दिली. जणू त्या रुपात सारे वैभवच मिळाले. घर एकदम भरुन राहिले. सगळीकडे चैतन्यमय वातावरण झाले होते. माझी सौ. आई, वडील, काका, काकू, मावशा, जाऊ, दीर वगैरे व इतरही सगळी आप्तेष्ठ मंडळी जमली. सगळ्या बहिणी, नणंदा जवळचे-दूरचे नातेवाईक व मित्रमंडळींनी घर भरुन केले होते. घराच्या तीनही मजल्यावर सर्वत्र माणसेच माणसे होती.

सर्व थोर ब्रह्मवृंदांमध्ये बीड व्यतिरिक्त अंबाजोगाईहून वे. देविदासराव धर्माधिकारी यांना वेदाचार्य म्हणून राष्ट्रपतीं कडून पुरस्कार प्राप्त झाला होता, पंढरपुरहून श्री मोरेश्वर देवधर गुरुजी व त्यांचे धाकटे चिरंजीव इंजिनियर श्री गिरीशजी देवधर-हल्ली ते

पुण्यातच पौरोहित्य करतात, शिवाय आजेगावहून श्री अनंतगुरु, श्री नारायणगुरु व श्री त्र्यंबकगुरु आजेगावकर ही ही मंडळी येथे येऊन पोहोचली.

पहिलेच दिवशी म्हणजे चार तारखेस सकाळी डॉ. दिलीपना खूप ज्वर चढला. काहीच कारण कळेना. त्यांना अगदी बसवेना. कसेबसे प.पू. महाराजांच्या दर्शनासाठी ते खोलीत गेले असता त्यांनी 'काही काळजी करु नका' असे सांगितले व एका ब्राह्मणास श्री गुरुचरित्र पारायण करण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री नारायण गुरु आजेगावकरांनी सर्व पीडाहरणार्थ व प्रकृती स्वास्थ्यासाठी श्री गुरुचरित्र पारायणाचा संकल्प करवून घेतला व पारायण तीन दिवसांचे सुरु केले. बाकीच्या ब्रह्मवृंदांना श्री अर्थवशीर्ष सहस्त्रावर्तनाची वर्णी देऊन डॉ. दिलीप झोपले. दोन तीन तासानंतर त्यांना एकदम बरे वाटले व त्यांनी कार्यक्रमात भाग घेण्यास सुरुवात केली.

श्री व सौ. भाऊसाहेब क्षीरसागर - डॉ. दिलीपच्या थोरल्या मावशी व काका यांचे एकुलते एक चिरंजीव श्री. दाजीसाहेब क्षीरसागर हे रक्ताच्या कर्करोगाने व्याधिग्रस्त झाले होते. या यज्ञाच्या सुरुवातीस त्यांना थोडे हिंडता फिरता येऊ लागल्यामुळे प.पू. महाराजांच्या कृपेने ते इथे आले. इच्छाशक्तीच्या जोरावर सर्व कार्यक्रमात त्यांनी अपेक्षेपेक्षा जास्त वेळ भाग घेतला. सर्वांशी मिळून मिसळून वागण्याने सगळ्यांनाही त्यांच्या सहवासाचा आनंद मिळाला. एक चांगली ऊर्जा त्यांच्यात निर्माण झाली होती आणि आश्चर्य म्हणजे इथून औरंगाबादला परत गेल्यावर जवळ जवळ दोन वर्षे त्यांची प्रकृती छान राहिली. फारशी औषधे पण घ्यावी लागली

नाहीत. दोन वर्षांनंतर मुलाचे व मुलींचे संसार व्यवस्थित सुरु झाल्यावर आजाराने पुन: एकदा उचल घेतली व त्यात त्यांचा अंत झाला. प.पू. महाराजांच्या कृपादृष्टीने त्यांना आयुष्याचा शेवटचा काळ व्यवस्थित जगावयास मिळाला.

यज्ञाच्या पहिल्या दिवसापासून प.पू. महाराज प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घालत होते. पूर्ण विधी पार पडेपर्यंत ते दिवसभर यज्ञमंडपात बसून राहत. देवदेवतांची स्थापना, यज्ञकुंडाची मांडणी, हवन, आहुती सगळे विधी ते शांतपणे बसून अनुमोदन देत. ब्रह्मवृंदाच्या कार्यांने ते संतुष्ट झाल्याचे दिसले. प.पू. महाराज, प.पू. सौ. आईसाहेब व प.पू. सौ. ताई महाराज यांची आसने उच्च स्थानावर घातली गेली होती, म्हणजे सर्वांनाच त्यांचे सतत दर्शन होई.

हा आनंद सोहळा पाच दिवस चालला. तो कधी संपूच नये असे वाटत होते. प.पू. महाराजांची मार्गदर्शनपर प्रवचने होत. या काळात बडोद्याहून एक सद्गृहस्थ, त्यांच्या सुविद्य पत्नी व छोट्या मुलासहीत प.पू.महाराजांच्या दर्शनासाठी आले होते. प्रथम ते पुण्यात आले पण प.पू. महाराज इकडे आल्याचे कळताच इथे इतक्या दूरवर दर्शनासाठी आले. प.पू. महाराजांनी त्यांना आवर्जून ठेवून घेतले व दुसरे दिवशी प्रसाद देऊन त्यांची पाठवणी केली. यज्ञाच्या निमित्ताने आहेराची देवाणघेवाण झाली. पू. पू. सौ. आईसाहेबांनी आजवर खूप सारी नऊवार पातळे मला दिली. घरातील सर्वांना यथोचित आहेर केले. त्यांना सहावार पातळे आहेर म्हणून द्यावयास आवडत नसत. सासुबाई म्हणायच्या, 'अहो, वहिनी सहावार साडी तिच्या नेसण्यात येईल, नऊवार काय पडून राहील.' तेव्हा प.पू. सौ. आईसाहेब म्हणायच्या,

'ते धुडके काय नेसायचे ? नेसशील ना गं मी दिलेलं पातळ !'... मग मला पण खूप आनंद व्हायचा. त्यांनी दिलेली सर्व पातळे मी व्यवस्थित जपून ठेवली आहेत. सणावाराला नियमीत नेसते. त्यांची खूप आठवण होते. मायेचे पांघरुण आहे ते !

या कार्यानंतर सर्व मंडळी पुण्यास परतली. प.पू. महाराजांनी पुण्याहून दि. १० जानेवारीस पत्र पाठविले, ते या प्रमाणे...

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. १०-१-९०

श्री. रा. प्रभाकरपंत देशमुख यांना सप्रेम नमस्कार

वि. क्षेम

आम्ही येथे काल सायंकाळी ४॥-५ ला सुखरुप येऊन पोहोचलो. ड्रायव्हरने गाडी उत्तम चालवून लवकर आम्हाला येथे आणून सोडले. तेथून जेवून धनुर्मास सोडून निघाल्यामुळे सौ. सिंधूताईंना सर्वांना समाधान झाले. बरे झाले.

तेथे पाच दिवस सहस्त्रचंडी पाठाचा सांगता कार्यक्रम श्री. डॉ. दिलीपराव व सौ. डॉ. सुरेखाताई यांचेकडून आपल्या आशीर्वादाने निर्विघ्न व्यवस्थित उत्तम प्रकारे यथासांग पार पडला. दान, मान यांनी भूदेवही संतुष्ट झाल्याचे समजते. पुण्यकर्मामध्ये वित्तशाठ्य न करता उदार मनाने शांततेने पुण्यकर्म कसे ईशकृपेने घडते हे प्रत्यक्ष पाहण्यास मिळाल्याने समाधान झाले

डॉ. दिलीप पति-पत्नींची सत्कर्म श्रद्धा, देवीभक्ती उत्तम आहे. आणखीही काही पुण्यकर्म घडावे, असे त्यांनी येताना बोलून दाखविले. त्याप्रमाणे काही विचार यथावार त्यांना कळवावयाचे आहेत.

त्यांचे धर्मकृत्य चालू ठेऊन मुलींचे, मुलाचे शिक्षण, मंगलकार्ये इकडेही त्यांचे लक्ष असले पाहिजे. हे कार्य प्रापंचिक वाटले तरी ईश्वराने नेमून दिलेले कर्तव्य आहे व कन्यादान, विद्यादान हे दानात्मक पुण्यकर्महीं आहे. विचार व्हावा.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

हे पत्र वाचून आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. पारमार्थिक धर्मकृत्यांबरोबर प्रापंचिक जबाबदाऱ्या योग्य रीतीने कशा पार पाडाव्यात याचे अत्यंत मार्मिक विश्लेषण प.पू.महाराजांनी या पत्रात अत्यंत सहजपणे केले आहे.

आता मुले मोठी होत होती. शैक्षणिक व इतरही वाढते खर्च होते. व्यवसायातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सुसूत्रता आणणेही आवश्यक होते. प.पू. महाराज प्रवचनात नेहमी सांगत की, ‘नोकरी मिळाली, की त्याच दिवशी निवृत्तीच्या तारखेवरही शिक्का मोर्तब झालेला असतो.’ त्याप्रमाणे व्यवसायातील चढउतरामुळे पुढची तरतूद करणे आवश्यकच असते. ‘संसार करावा नेटका’ याप्रमाणे त्यांची स्वत:ची उक्ती व कृती होती व योग्यवेळी सहजपणे त्यांच्या उपदेशात ते दिसे. मलाही हे पत्र वाचून खूप बरे वाटले. आता डॉ.

दिलीपही प.पू. महाराजांनी सुचविले म्हणून सर्वच व्यावहारिक गोष्टीत गंभीरपणे लक्ष घालतील.

वरील पत्र ति. आण्णाकाकांना संबोधून पाठविले होते. पुढे लगेचच दोन दिवसांनी त्यांनी डॉ. दिलीपचे नांवे पुढील पत्र पाठविले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. १२-१-९०

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे मंगळवारी सायंकाळी ५ वाजता सुखरुप पोहोचलो. इतर बायका मंडळी बुधवारी सायंकाळी येऊन पोहोचली. सर्वांचाच प्रवास सुखाचा झाला. काही त्रास झाला नाही. श्री. खाडे ड्रायव्हर, कंपौंडर यांचे २-३ दिवस मोडले, असो.

आपला सहस्त्रचंडी पाठांचा सांगता समारंभ व्यवस्थित यथाविधी पार पडला. हे आपणा दोघा पती-पत्नीच्या श्रद्धेचे व भगवतीच्या कृपेचे द्योतक आहे असे समजण्यास हरकत नाही.

“ते सम्मता जनपदेषु धनानी तेषां
तेषां यशांसि न च सीदति धर्मवर्गः।
धन्यास्त एव निभृतात्मजभृत्यदारा
येषां सदाभ्युदयदा भवती प्रसन्ना॥

ही देवांनी केलेली श्री स्तुति यथार्थ आहे. सर्व प्रकारचा अभ्युदय भगवतीचे कृपेने मिळतो. या उपासनेकडे लक्ष असून ती कृतिपर्यवसायी घडण्यासही भगवतीची कृपाच कारण आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, उद्यापासून येथे उत्सव सुरु होत आहे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराज व व. श्री. रघुनाथरावकाका बीडहून निघून सरळ पुण्यालाच गेले. प.पू. सौ. आईसाहेब व इतर सर्वजणी बीडहून निघून अंबाजोगाई-परळी येथील दर्शन घेत पुण्याला दुसरे दिवशी संध्याकाळी पोहोचल्या.

सत्कर्मे करण्याची बुद्धी देण्यात व ती व्यवस्थितपणे करुन घेण्यास देवाचीच कृपा असावी लागते. समर्थ सद्गुरु ते यथासांग करवून घेतात. आपली काळजी त्यांनाच असते. देवीची भक्ती श्रद्धेने करण्यात गोडी वाटू लागली. कर्ते करविते प.पू. महाराज असून पुढील पुण्यकर्मे करण्याची बुद्धीही त्यांचेच कृपेचे निमित्त आहे. त्यांचीच कृपा आहे.

'ॐ ऐं ऱ्हीं क्लीं...' हे बीजमंत्र लावून व

'सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वाथसाधिके
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते'...

हे संपुट लावून श्री सहस्त्रचंडीचे पाठ करावे व त्यांची सांगता करावी असे डॉ. दिलीपना मनापासून वाटू लागले. एका ओवीच्या आधी या ओळी मध्ये तो श्लोक व अंतीं पुन्हा हा कल्याणकारी श्लोक म्हणजे सातशे ओव्यांऐवजी एक पाठाच्या पूर्ततेसाठी एकविसशे ओव्यांचे वाचन व्हावे अशी योजना व्हावी असे वाटू लागले. कार्य अवघड होते. कारण ते यथासांग, व्यवस्थित व विधीवत होणे

आवश्यक होते. तसेच वाचनात सुलभता यावी म्हणून दुसऱ्या पोथीतील ओवीच्या मागे संपुट लावून नवी पोथी तयार करणे कितपत शास्त्रसंमत होईल, कारण अशा प्रकारे नवीन पोथी तयार करताना जुन्यातील पाने कापावी लागणार होती.

हे सगळे प.पू.महाराजांचे आज्ञेशिवाय अशक्यच होते. तसे सर्व निवेदन करणारे सविस्तर पत्र प.पू. महाराजांना पुण्यास पाठविले असता, त्यांचे मार्गदर्शक पत्र पुढीलप्रमाणे पोहोचले---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १०-२-९०

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले श्रद्धादर युक्त पत्र वाचून समाधान वाटले. स्वप्ने ही चांगली आहेत. जगदंबेची कृपा आहे. अनुष्ठान सांगता उत्तम झाली असे समजण्यास हरकत नाही.

संपुटित पोथी नवीन तयार करण्याची योजना चांगली आहे. वाचताना सौलभ्य होईल. दुसऱ्या पोथीतून पाने काढून यात जोडणेसही हरकत नाही. ही पुनः नवीन पोथीच तयार होत आहे. संपुटित सहस्त्रचंडी पाठाचा आपला संकल्प योग्य आहे. याला बराच अवधि लागेल. ब्राह्मणांचे सवडीप्रमाणे सर्व होईल. जगदंबेची कृपा आहेच.

आणखी एक विचार आलेला लिहीत आहे. सर्वांचे विचारे भगवतीचे प्रेरणेने जसे ठरेल तसे करणेस हरकत नाही.

कोणत्याही मंत्राचा जप, त्यात जितकी अक्षरे असतील तितके लक्ष जप झाल्यास ते पुरश्चरण होते. नवार्णव मंत्राचा जप नऊ लक्ष करुन त्याचे दशांश हवन झाल्यास व तर्पण, मार्जनादि अंगसहित पुरश्चरण पुढे होईल.

रोज तीन हजार जप झाल्यास ९-१० महिन्यांचा काळ ही संख्या पूर्ण होणेस लागेल. लागला तरी हरकत नाही. स्वस्थतेने शांततेने सर्व होणे बरे. गडबड होऊ नये. विचार करुन ठरवावे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

चि. अजितची पत्नी काल रात्री प्रसूत होऊन कन्या झाली. सर्व क्षेम आहे.

क.द.क.

****

प.पू. महाराजांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे आमचे येथील पुरोहित श्री. बाबुराव पुरंदरे यांनी श्री. नवार्णव मंत्राचा जप सुरु केला. पुढे आठ-दहा महिन्यांनी त्याची सांगता झाली.

चि. नारायण आता पावणेदोन वर्षांचा झाला होता. त्याच्यात इच्छित अशी व्यवस्थित सुधारणा व वाढ झाली होती. मे. १९९० मध्ये त्याला थोडा ताप आला व तो वाढून अचानक झटका यावयास लागला. आम्ही खूप घाबरुन गेलो. सासूबाई व ती. आण्णाकाका दक्षिण भारतात गेले होते. दोन्ही मुली सुट्टीमध्ये आजोळी गेल्या होत्या. घरी आम्ही दोघेच व चि. नारायण एकटाच... त्याच्या या झटक्यामुळे आम्ही खूप विचलित झालो, कारण अशा

Febrile Convulsion मुळे कधीकधी मेंदूला पण हानी पोहोचण्याची शक्यता असते. त्याच्यावर योग्य तो उपचार केला, पुढे त्याला खूपच ताप व गॅस्ट्रो एन्टेरायटिसचा त्रास सुरु झाला. म्हणून औरंगाबादच्या खाजगी रुग्णालयात भरती केले. पाच सहा दिवस तिथे रहावे लागले व त्याला बरे वाटले.

त्याच काळात श्री. माईमावशी क्षीरसागरांचे नातू चि.श्रीधरचा विवाह समारंभ औरंगाबाद मुक्कामी होणार होता. प.पू. महाराजांनी उपस्थित राहून त्याला आशीर्वाद द्यावेत अशी श्री माईमावशींची इच्छा होती. पण प.पू. महाराजांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे डॉक्टरांनी प्रवास करण्यास मनाई केली होती. त्यांना विश्रांतीची आवश्यकता होती. त्यामुळे इच्छा असूनही प.पू. महाराजांना तेथे येता आले नाही. त्यांना खूप तळमळ वाटली. तसे त्यांनी पुण्याहून पाठविलेल्या १ मेच्या पत्रात कळविले---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १-५-९०

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे वाडीहून श्री नारायणस्वामींचा उत्सव करुन २९ तारखेस आलो. वाडीतच प्रकृति बिघडल्याने येताना मिरजेस २-३ दिवस राहून, प्रकृति संपूर्ण तपासून इकडे आलो. येथेही काल डॉ. सरदेसाई यांनी प्रकृति पाहिली. आता कार्यक्रम जवळ आल्यामुळे व उन्हाळा फार असल्याने औरंगाबादचा प्रवास करु नये असे श्री. डॉ. सरदेसाई म्हणाले. अशक्तता बरीच जाणवते. यामुळे आपण

५ तारखेस इकडे येऊन औरंगाबादी जाणेचे ठरविले होते. पण उगीच आपणास इकडे हेलपाटा कशाला ? तिकडून औरंगाबाद जवळ पडेल असे वाटले. विचार करावा.

श्री माईंना वाईट वाटेल. काय करावे समजत नाही. आमच्या मंडळींचीही प्रकृती प्रवासक्षम नाही. उन्हाळ्यामुळे फुफ्फुसांना त्रास होतो असे श्री डॉक्टरांचे मत आहे. श्री महाराजांची इच्छा काय आहे समजत नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांच्या प्रकृतीत चढउतार चालूच होते. पुण्यातील साधकमित्रांशी संपर्क साधला म्हणजे सविस्तर कळे. मनोमन आई जगदंबेची प्रार्थना करीत होतो. कारण पुढे लगेचच श्री सहस्त्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. सगळेचजण या सोहळ्याच्या वाटेकडे डोळे लावून होतो.

देवी भगवतीच्या कृपेने हा समारंभ अत्यंत उत्साहाने पार पडला. डोळ्याचे पारणे फिटले. आमची जन्मोजन्मीची पुण्याई म्हणून हे सगळे पहावयास मिळाले. कृतार्थ वाटले. आमचे जवळ जवळ सगळेच नातेवाईक तिथे जमले होते. कारण बीडमध्ये होणाऱ्या कार्यक्रमात प.पू. सौ. आईसाहेबांचा सगळ्यांना सहवास होत असे. त्यामुळे सर्वजण अगदी उत्साहाने तिथे आले. प.पू. सौ. आईसाहेब एवढ्या गर्दीत पण सगळ्यांची आपुलकीने चौकशी करत होत्या. सर्वच कुटुंबियांनी आमची आस्थेने चौकशी केली. येणाऱ्या प्रत्येक जणाला हा आपल्या घरचाच कार्यक्रम आहे व प.पू. महाराज आपले

एकट्याचेच आहेत असे वाटू लागे. प.पू. महाराज व प.पू. सौ. आईसाहेबांचे हे प्रचंड विस्तारलेले कुटुंब पाहून खरोखर मनोमनी आश्चर्य वाटून गेले.

प.पू. महाराजांची प्रकृती एवढी नाजूक असताना सुद्धा सर्व कार्यक्रम सुनियोजितपणे यथासांग पार पडले. कार्यक्रमाच्या भव्यतेचे, दिव्यतेचे वर्णन करणे शब्दातीत आहे. सर्व सोहळा दृष्टीत साठविण्यासाठी दोन नेत्र अपुरे पडावेत अशी अवस्था होती. मनही तृप्त होत नव्हते. इथे खरी प.पू. महाराजांच्या मोठेपणाची व आपण जी सेवा करीत आहोत असे आपल्याला वाटते, त्याच्या थिटेपणाची कल्पना आली. सगळ्याच गोष्टी वर्णनातीत होत्या.

प.पू. महाराजांच्या प्रकृतीत हळु-हळू सुधारणा होत गेली. थोडेफार हिंडणे फिरणे शक्य होऊ लागले. त्यांनीच येथील श्री संपुटित सहस्त्रचंडीचा संकल्प बीडला येऊन करावा अशी भगवतीची योजना असावी. आम्हा सर्वांनाही मनोमन तसे वाटत होते. त्यांच्या प्रकृतीत पुढे बरीच सुधारणा झाल्यामुळे पुढे जुलै ९० मध्ये इथे येऊन त्यांनी या चंडीयागाचा संकल्प करवून घेतला.

त्या संदर्भातील त्यांचे पुण्याहून जून महिन्यात आलेले पत्र असे होते---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. २९-६-९०

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. कुशल वृत्त समजून आनंद झाला. उत्सव, कार्यक्रम ईशगुरुकृपेने निर्विघ्न व्यवस्थित पार पडला. गर्दीमुळे

बोलणे बसणे काही झाले नाही. आमची प्रकृती सुधारत आहे. अशक्तता आहे, ती ईशगुरुकृपेने हळुहळू कमी होऊन जाईल असे वाटते.

आता येथे आश्रमात दि. १ ते ७ जुलैपर्यंत श्रीगुरुपौर्णिमेचा उत्सव असून ७ तारखेस गुरुपौर्णिमा आहे. ती करुन आम्ही ९ तारखेस औरंगाबादला मुक्कामास जाऊ व तेथून १० तारखेस देऊळगावी मुक्कामास जाऊ. देऊळगावचा कार्यक्रम ११ ते १७ तारखेपर्यंत आटोपेल असे वाटते. नंतर १/२ दिवस 'धाड' ला जाऊन जालन्यास मुक्कामास सौ. ताईमहाराजांचेकडे येता येईल. तेथून बीड, सोलापूर मार्गे वार्षिक तुळजापूर, गाणगापूर यात्रा आटोपून इकडे परत येणेचा विचार आहे.

आषाढ अखेरपर्यंत तरी बीडला आले पाहिजे. सोलापुरी २४ तारखेस मुक्कामास जाणे व्हावे. म्हणजे २५ ला सकाळी तेथे श्रावणी करुन सायंकाळी मुक्कामास प्रतिवर्षाप्रमाणे तुळजापुरी जाणे होईल.

तरी कसे ठरवावे, याबद्दल ९ तारखेनंतर आपले उत्तर 'देऊळगावराजा देवांचे दुकानासमोर' आमचे नांवे 'जि. बुलढाणा' या पत्त्यावर यावे. तसे ठरविता येईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

चि. नारायणला चार महिन्यानंतर ज्वराबरोबर दुसरा झटका आला. मन एकदम सुन्न झाले. घरच्या दवाखान्यात ताबडतोब

उपचार केले व प.पू. महाराजांना पत्राद्वारे त्वरित ही वार्ता कळविली.

त्यांचेही लगेचच उत्तर आले, ते असे...

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. १७-९-९०

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. चि. नारायणाचे प्रकृतिबद्दल ईश्वरप्रार्थना चालू ठेवावी. प्रतिमहिन्यात एक श्री गुरुचरित्रसप्ताह पारायण ब्राह्मणद्वारा करुन नैवेद्य दाखवून एक ब्राह्मण सुवासिनीस भोजन घालावे.

तसेच 'श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव... घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते' या स्तोत्राचे रोज तीन पाठ त्याच्या आरोग्याकरिता चालू ठेवावेत. ईशकृपेने आरोग्यलाभ होईल. काळजीचे कारण नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे पूर्णपणे श्रद्धेने श्रीगुरुचरित्र सप्ताह पारायणास आरंभ केला. आजही त्यांचे कृपेने ते अखंडपणे व्यवस्थित चालू आहे.

चि. नारायणची पुढे तज्ज्ञ डॉक्टरांच्याकडून बेंगलोरच्या NIMHANS रुग्णालयात संपूर्ण तपासणी करवून घेतली. एकदा

झटका आला की, पुढील झटका टाळण्यासाठी किमान पाच वर्षे तरी दररोज औषध घ्यावेच लागते आणि आमच्या मनाला भीती होती की, या औषधाने बुद्धिमांद्यता येण्याची शक्यता असते. पण बेंगलोरच्या डॉक्टरांनी आश्चर्य म्हणजे असे सांगितले की, 'याला असे कोणतेही रोजचे औषध देऊ नका. फक्त ताप आला तर त्यावर उपचार करा. रोजच्या औषधाची आवश्यकताच नाही.' आमची पण काळजी-औषधाच्या साईड इफेक्टची- दूर झाली.

प.पू. महाराजांनी श्रीगुरुचरित्र पारायणाचे औषध देऊन त्याला व्याधिमुक्त तर केलेच शिवाय त्याचा सर्वांगीण विकासही करविला. त्याची शारीरिक व मानसिक वाढ एकदम चांगली आहे. चि. नारायणचा जन्मच त्यांच्या व प.पू. सौ. आईसाहेबांच्या संकल्पाने झाला व आता दुसऱ्यांदा त्यांच्यावरील कृपेच्या चमत्काराचे प्रत्यंतर आले.

मध्यंतरी दवाखान्यातील अतीव कामाच्या दगदगीमुळे डॉ. दिलीपना बरे वाटेनासे झाले. योग्य वेळी आहार, निद्रा होत नसल्यामुळे अस्वस्थता वाटू लागली. आता संपुटित सहस्रचंडीचे पाठ पूर्ण होत होते. त्यामुळे घरात सांगता समारंभाच्या तयारीची गडबड सुरु झाली होती. ब्रह्मवृंदाना आमंत्रणे पाठवून त्यांना पूर्वसूचना देणे आवश्यक होते. इतरही आमंत्रणाच्या यादीचे काम चालू होते. सामानाची जमवाजमव सुरु झाली होती. प.पू. महाराजांना सर्व कळवले असता त्यांचे पुण्याहून सविस्तर पत्र आले. ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १-४-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आता आपल्या प्रकृतीत सुधारणा होत असून दवाखान्याचे काम सुरु होणार असल्याचे समजून समाधान झाले. तथापि एकदम जास्ती दगदग, श्रम न घेता हळूहळू काम पहावे. सौ. सुरेखाताईंच्या सहाय्याने आपणास विश्रांतीपूर्वक काम पहाता येईल. इकडेही लक्ष असावे.

चंडीपाठ संपत आले ही श्री भगवतीची कृपाच आहे. ठरल्याप्रमाणे २१ ते २७ मे सांगतेचा कार्यक्रम पार पडेल. काळजीचे कारण नाही. २७ तारखेस पुर्णाहूती झाल्याबरोबर प्रसाद घेऊन लगेच आम्हाला इकडे येणेस निघावे लागेल. २८ तारखेस देऊळगावचे श्रीमान जगनशेठ धन्नावत यांचे नातवाचे लग्न पुण्यासच २८ मेला असल्यामुळे त्यावेळी आमची येथे उपस्थिती आवश्यक आहे.

'भूतप्रेतपिशाचाद्या यस्यस्मरण मात्रतः...
दत्तात्रेयं नमामीतम्'...

हे स्तोत्र नित्यउपासनाक्रमात छापले आहे. ते रोज सर्व कार्य आटोपल्यावर सायंकाळी एकदा शांतपणाने म्हणत जावे. आरोग्य, यश, ईशकृपा इत्यादि कल्याण साधेल.

येथे सध्या कोर्टचक्रव्यूहाचा प्रारब्धभोग सुरु आहे. ईशगुरुकृपेने तो तोपर्यंत संपून जाईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

नागपुरला वे. कृष्णदेव आर्विकर यांचेकडे मे च्या २१ ते २७ हा सांगतेचा काळ कळविला आहे.

****

इतर परगावाहून येणाऱ्या ब्रह्मवृंदासाठी म्हणजे अंबेजोगाई, आजेगाव, पंढरपूर, नागपूर इत्यादी ठिकाणी पत्रे पाठवून सर्वांची संमती आली. गावातील पुरोहितांनाही आधीच आमंत्रणे केली गेली. एकतर लग्नसमारंमाच्या तिथी असल्यामुळे त्यांची वेळ मिळणे अवघड गेले असते. पुण्याहून इथे कोणकोण कसे येणार ?.. गाड्यांची कशी सोय करायची ? या संबंधीचे मार्गदर्शन पत्र प.पू. महाराजांनी २६ एप्रिलला पुण्याहून पाठविले. ते असे,---

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २६-४-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही ३० एप्रिलला मंगळवारी बार्शीस जात आहोत. तेथे दि. ३ ते ११ मे पर्यंत श्री भगवंत मंदिरात श्री भागवतसप्ताहादिक कार्यक्रम आहे.येथून घरची मंडळी ३ मे ला बार्शीस येतील. सौ. ताई महाराजांची प्रकृति बरी असल्यास ३ मे ला बार्शीस येतील. असे वाटते. त्यांनाही कळविले आहे.

आम्ही १२ मे ला इकडे परत येऊ. नंतर १५ मे ला नाशिकला जायचे आहे. तेथे १६ तारखेस देवप्रतिष्ठा कार्य उरकून १७ ला इकडे परत येता येईल. १८ ला येथे आश्रमात श्री शंकराचार्य जयंती आहे.

नंतर १९ किंवा २० ला निघून बीडला येणे शक्य आहे. तरी १९ ला संध्याकाळपर्यंत इकडे एकच गाडी पाठवायची. आम्ही व श्री. रघुनाथराव दोघेच इकडून येणार आहोत. बाकीची मंडळी कदाचित सौ. ताईमहाराजही आल्यास त्याही १२ तारखेनंतर वैरागला सौ. सुमनकडे ५-६ दिवस थांबून तेथूनच बीडला येऊ शकतील असे वाटते. तरी वैरागलाच १९ तारखेस दुसरी गाडी पाठविणे झाल्यास पाठवावी व तसे तिकडे- 'श्री डॉ. भातलवंडे, पो.वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर' या पत्त्यावर कळवावे. १० दिवस आमचा मुक्काम बार्शीस श्री भगवंतमंदिरला आहे. तेथेही चौकशी करणेस हरकत नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

ठरल्याप्रमाणे बार्शीहून-वैरागहून प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज, सौ. सविताविहिनी, सौ. सुमनताई, सौ. सुलभाताई, पुजारीवहिनी, सौ. भोपटकर मावशी या सगळ्याजणी २२ मेच्या आतच गाडीने बीडला आल्या. प.पू. महाराज व रघुनाथराव काकांना आणण्यासाठी पुण्याला गाडी पाठविली गेली. घरात खूप सारे नातेवाईक जमले. घर एकदम गोकुळासारखे भरुन गेले. सगळेजण खूप खूप आनंदात होते. प्रत्यक्ष स्वर्गसुखाचाच अनुभव होता तो ! सगळ्यांच्या मिळून गप्पा-गाणी, विनोद कितीतरी अनुभवायला यायचे. प.पू. सौ. आईसाहेब एकदम खुशीत होत्या. समवयस्क सगळ्याजणी होत्या. कामेही उत्साहात पार पाडली जात. रात्री

उशिरापर्यंत जागरण झाले तरी पहाटे लवकरच जाग येई व नित्यकर्मे सुरु होत. देवकार्य असल्यामुळे सगळेचजण मनापासून झटून काम करीत व सौ. सवितावहिनीं तर स्नान झाले की, लगेच कपडे धुवून टाकत. मलाच कसेतरी ओशाळल्यासारखे वाटे. मग आम्ही तसे करण्यास मज्जाव केला.

कार्यक्रमाची भव्यता अवर्णनीय होती. प.पू. महाराज पहाटे लवकरच स्वतःचे आन्हिक उरकून येत. नंतर जमेल तसे गुरुमंत्र व पाद्यपूजा विधी आटोपून अगदी सुरुवातीपासून यज्ञमंडपात येऊन बसत.

यज्ञाची सर्व तयारी वे. कृष्णदेव आर्विकर व आमचे रोजचे उपाध्ये श्री. बाबुराव पुरंदरे पहात. यज्ञासाठी अंबेजोगाईहून वे. देविदासराव धर्माधिकारी, आजेगावहून वे.अनंतागुरु, वे. नारायणगुरु व वे. त्र्यंबकगुरु आजेगावकर ही मंडळी दोन दिवस आधीपासूनच आली होती. बीडचे वे. गंगाधरशास्त्री येळंबकर, वे. कोकीळशास्त्री, पुरंदरेंचे चिरंजीव श्री. दत्तात्रेय पुरंदरे तसेच पंढरपूरहून श्री. दामोदर देवधरगुरुजी व त्यांचे धाकटे चिरंजीव इंजिनीयर श्री. गिरीश ही सगळी मंडळी जमली होती.

प.पू. महाराज सकाळपासूनच यज्ञमंडपात येऊन आसनस्थ होत. सगळीकडे बारकाईने त्यांचे लक्ष असे. सगळे वातावरण मांगल्याने भरुन जाई. 'परब्रह्म प्रगटले...' अशीच काहीशी अवस्था होती. मंत्र घोषाचा नाद सर्वत्र भरुन राही. आरती साधारणतः संध्याकाळी पाचच्या सुमारास होई व त्यानंतर भोजन संपन्न होई. रात्री प.पू. महाराजांची प्रवचने गच्चीवर होत असत.

मध्ये एका अडचणीची शक्यता निर्माण झाली. श्री. राजीव गांधींचे २२ मे ला निधन झाले. त्यामुळे सर्वत्र तणावाचे वातावरण पसरले. आमचे घर मुस्लिम वस्तीच्या जवळ व संवेदनशील म्हणवल्या जाणाऱ्या भागात असल्यामुळे सर्वांनाच चिंता वाटू लागली. हितचिंतकांचे सारखे फोन येऊ लागले. दगडफेक झाली तर सर्व पवित्र वातावरण ढवळून जाईल. खूप काळजी वाटू लागली.

प.पू. महाराज सकाळी पाचलाच उठून बसले होते. कुणीतरी त्यांच्या कानावर ही बातमी घातली व परिणामाची शक्यता वर्तवली. ते शांतपणे म्हणाले, 'रोजच्या कार्यक्रमास सुरुवात करावी. माईक वगैरे वापरु नये.' सगळेजण आत्मविश्वासाने कामाला लागले. काहीही त्रास झाला नाही. कोणतेही विघ्न आले नाही.

प.पू. महाराजांनी सर्व ब्रह्मवृंदाचा यथोचित सत्कार केला. दक्षिणा दान दिले. घरातील सर्व मंडळींना व्यवस्थित आहेर वगैरे केले. कोणत्याही कार्यक्रमाच्या सुरुवातीला ते ती. आण्णाकाकांना सर्वप्रथम बोलावून 'या प्रभाकरपंत ! तुम्ही पिताश्री आहात. पहिला मान तुमचा !' असे म्हणून यथोचित आहेर करीत. त्यांचा प्रथम सत्कार करीत.

यज्ञमंडपात सौ. सुमनताई व सौ. सुलभाताईंच्या सुश्राव्य पदांनी विशेष आनंददायी वातावरण निर्माण झाले होते. सर्वजण या देवकार्यात झटून काम करुन त्याचा आनंद उपभोगीत होते.

प.पू. सौ. आईसाहेबांना प्रचंड उन्हाळ्याचा सुरुवातीला खूप त्रास झाला. ज्वराने त्यांचे अंग पोळू लागले. अन्नपाणी जाईना. दुसरे डॉक्टर येऊन तपासून औषधे देऊन गेले. गोळी कशीबशी त्यांनी घेतली. त्यांना असे आजारी पाहवत नव्हते. संध्याकाळी प.पू.

महाराज वर येऊन प.पू. सौ. आईसाहेबांच्या बिछान्याजवळ गेले. प.पू. सौ. आईसाहेबांनी उश्याजवळची अंगाऱ्याची डबी काढून प.पू. महाराजांच्या हातात दिली. त्यांनी तो प.पू. सौ. आईसाहेबांच्या कपाळाला लावला आणि त्यांना बरे वाटू लागले. तापही उतरला. दुसरे दिवशी अगदी आनंदाने उत्साहाने अगदी हसून सगळ्यांमध्ये वावरु लागल्या. ती उत्सवमूर्ती अशी हास्याच्या-चैतन्याच्या कारंजात नहाताना पाहून सर्व घर अतिआनंदाने भरुन गेले.

यज्ञाची सांगता संपन्न झाली. अन् मन खूप भरुन आले. सगळ्यांचाच इतके दिवसांचा सहवास...आता प.पू. महाराज व प.पू. सौ.आईसाहेबांची गावाला निघण्याची वेळ झाली मन एकदम सैरभैर झाले. माहेरुन निघताना सुद्धा कधीच एवढा आवेग दाटून आला नव्हता, एवढे अश्रूंचे पूर वाहू लागले. सगळ्यांनाच फार गलबलून आले. प.पू. सौ. आईसाहेब वारंवार समजूत काढत राहिल्या. पण आवेग ओसरत नव्हता. त्या मायेने जवळ घेऊन थोपटू लागल्या. तो तो विरह आणखीनच तीव्र होऊ लागला. हा सहवासाचा काळ संपूच नये असे वाटू लागले. सगळ्यांचा निरोप घेऊन अतिशय जड अंत:करणानी आम्ही घरात परतलो.

त्यांच्या सहवासातील गोड आठवणींना मन पुनः पुन्हा उजाळा देत राहिले. ती. सौ. ताई महाराज, प.पू. सौ. आईसाहेबांच्या सोबत देवीला कुंकुमार्चन करुन आल्या. सगळी पुण्यकर्मे प.पू. महाराजांनी व्यवस्थितपणे करवून घेतली.

या काळात आणखी एक चांगली घटना घडली. यज्ञ सुरु होण्याच्या जवळपास पंधरा दिवस आधी मला रात्री अंथरुणावर झोपल्यावर एकाएकी अस्वस्थ वाटू लागले. मग मी अंथरुणातच उठून

बसले. सारखे डोळे भरभरुन येऊ लागले. शरीरात कंप निर्माण झाल्याचा भास झाला. डोळ्यापुढे भगवा प्रकाश पसरला. डोळे मिटल्यावर देवादिकांचे दर्शन होत गेले. प.पू. महाराजही ओंकार स्वरुपात प्रगट झालेले दिसले. शरीर एकदम पिसाप्रमाणे हलके झाले. आतून कुठून तरी शांत शांत वाटू लागले. दुसरे दिवशी उठल्यावर मी जसेच्या तसे वर्णन लगेच लिहून ठेवले. पुढे यज्ञाच्या काळात डॉ. दिलीपने सवडीने तो कागद प.पू. महाराजांच्या समोर ठेवला. त्यांनी तो वाचला. मी काही कामानिमित्त तेथे आले असता प.पू. महाराजांनी, 'आता तुम्हाला दीक्षा देण्याची वेळ आली आहे...' असे सांगितले. आम्हाला खूप आनंद झाला. जीवन एकदम कृतार्थ झाले. प.पू. महाराजांनी वैशाख पौर्णिमेला म्हणजे सहस्त्रचंडीच्या सांगता समारोहाच्या दुसरे दिवशी सकाळी सहा वाजता साधनेला बसण्यास सांगितले. देवात असलेली श्री दत्तात्रेयाची प्रतिमा-प.पू. महाराजांची प्रतिमा व नारळ समोर ठेवावयास सांगितले. आधीच्या दिवशी म्हणजे चतुर्दशीला सर्वजण परतले. बरीच पाहुणे मंडळीही स्वगृही परतली होती. प.पू. सौ. आईसाहेबांना जेव्हा ही दीक्षेची बातमी सांगितली तेव्हा त्यांनीही आशीर्वाद दिले व 'वेळ चुकवू नकोस, मिटलेले डोळे स्वत:हून उघडले जाईपर्यंत उघडू नकोस. रोज नियमीतपणे वेळ ठरवून साधनेला बसत जा. नामस्मरण चालू ठेव. रोज संध्याकाळी देवापुढे दिवा लावून 'करुणात्रिपदी' म्हणत जा. जमेल तेव्हा 'दत्तबावनी' बावन गुरुवारी, बावन वेळा कर...' अशा अनेक मौलिक सूचना दिल्या. त्या जेव्हां रोखून पाहत व चेहऱ्यावरुन हात फिरवित तेव्हा इतके बरे वाटायचे की काय सांगु !

आम्हा उभयतांना अशा रीतीने वैशाखी पौर्णिमेला सकाळी

दीक्षेचा लाभ झाला. मी तर सकाळी सहा ते नऊ पर्यंत साधनेच्या आनंदात नाहत होते. जीविताचे कल्याण झाले.

या काळात घरातील बऱ्याच नातेवाईकांना गुरुमंत्राचा लाभ झाला. साधनाभ्यासातील वरचेवर येणारे अनुभव प.पू.महाराजांना कळविण्यात खूप आनंद होत असे. त्यांचीही वेळोवेळी मार्गदर्शनपर पत्र येत.

कार्यक्रमाच्या सांगतेनंतर सर्व मंडळी पुण्यात परतली. व प.पू. महाराजांनी ३० मे ला पत्र पाठविले. ते याप्रमाणे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ३०-५-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आम्ही येथे सोमवारी रात्री १०॥ ला सुखरुप पोहोचलो. दोन्हीही गाड्या चालकांनी व्यवस्थित आणल्या. तूर्त काही दिवस येथेच मुक्काम होईल असे वाटते.

आपले संकल्पित पुण्यकर्म श्री भगवतीचे कृपेने निर्विघ्न, व्यवस्थित पार पडले. हे पाहून समाधान झाले. सहस्त्रपाठ वेळेवर होऊन लगेच सांगताही झाली. हे आपल्या विशुद्ध संकल्पाचे व श्रद्धेचे फळ समजण्यास हरकत नाही. उन्हाळा असूनही सर्वांच्या प्रकृती चांगल्या राहिल्या.

श्री भगवतीच्या इच्छेने सर्व उत्तम पार पडले. प्रपंचात राहून यथाशक्ती परमार्थ करुन घ्यावा. वृद्धावस्थेत सामर्थ्यहीनतेमुळे घडणे कठीण असते, ही जाणीव ठेवून, व्यावहारिक संग्रह करण्याकडे

दुर्लक्ष करुन 'कर्तव्योधर्मसंग्रहः' याप्रमाणे आपली वृत्ती प्रशंसनीय आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आता दोघांचाही दवाखाना सुरु झाला असेलच. आता चिंता राहिली नाही.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

मध्यंतरीच्या काळात प.पू. महाराजांच्या भेटीचा योग आला नाही. पण साधनाभ्यासातील प्रगती, शंका किंवा इतर बाबींचे संदर्भात कळविले असता त्यांचे मार्गदर्शन लाभे. आता उभयतांच्या प्रकृती पण ठीक होत्या. आश्रमातील नित्य व नैमित्तिक कार्यक्रमही सुरु होते. काही काळच्या पत्र व्यवहारानंतर प.पू. महाराजांनी ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पत्र पाठविले ते याप्रमाणे...

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ४-८-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपली दोनही पत्रे मिळाली. येथील काही कार्यक्रम व प्रकृति यामुळे उत्तरास विलंब होत आहे.

साधनाभ्यास उघड्या जागेत न करता देवाजवळ जागा नसली तरी आपल्या खोलीत दार झाकून केला तरी चालेल. नित्य साधनाभ्यास श्रध्देने चालू ठेवणे हितावह आहे.

धर्मकार्याकरिता संकल्पित द्रव्याचा विनियोग ब्राह्मणद्वारा मंत्रादिजप, देवीमाहात्म्य पाठ, हवन, दान, तीर्थयात्रा, ब्राह्मण सुवासिनी भोजन इत्यादि विविध रुपाने करता येणेसारखा आहे.

धारवाडला मोठे देवीचे उपासक पं. भालचंद्रशास्त्री, श्री शंकराचार्य पाठशाळा, पो.जि. धारवाड-कर्नाटक प्रांत यांना आपले सहस्त्रचंडी वृत्त कळविले होते---

ते उत्तरात लिहितात- 'बीड येथील देवीभक्ती परायण श्री. दिलीप देशमुख यांचे अनुष्ठान (तत्रापि संपुटित सहस्त्रचंडी) केलेले समजून आश्चर्य व समाधान होत आहे. पण त्यामुळे किंचित उग्रकला प्राप्ती त्यांचे ठिकाणी झालेली असावी असे वाटते. तसे नसल्यास ते खरोखर पुण्यवंतच होत. त्यांनी पुढे शक्य झाल्यास श्री त्रिपुरसुंदरी उपासना करणेस हरकत नाही.'

असे धारवाडचे पत्र आहे. देवीची उपासना नित्य आपले घरी चालूच आहे. अधिक काही वाढविणे असल्यास तेथील विद्वान ब्राह्मणांचे विचारे ठरवावे. यापेक्षा अधिक काय लिहावे ? काही कार्यव्यग्रता व प्रकृतीचे अस्वास्थ्य यामुळेच आम्हाला तुळजापूर गाणगापुरी जाता येत नाही. केव्हातरी जाईन.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांचे हे पत्र वाचून खूप आनंद झाला. नित्य साधनेसाठी प.पू. महाराजांचे आशीर्वाद व मार्गदर्शन मिळतच होते.

दिवस उजाडला की, पैसे खर्च करण्यापूर्वी देवासाठी थोडेसे का होईना द्रव्य नियमितपणे बाजूला काढण्याची सवय होती, त्याचा विनियोग कसा करावा हे पण त्यांनी या पत्रात लिहिले. शिवाय पं. भालचंद्रशास्त्री-धारवाडचे यांना येथील चंडीयागाबद्दल कळवून त्यांची प्रतिक्रियाही प.पू. महाराजांनी कळविली. खूप बरे वाटले.

गुरुपौर्णिमेच्या उत्सवानंतर पाठविलेल्या पत्राचे उत्तर प.पू. महाराजांनी लगेचच दिले. यावर्षीपासून बीडला प्रथमच सर्वजण एकत्र येऊन गुरुपौर्णिमा साजरी करण्याचे ठरविले होते. व्यवसायाच्या निमित्ताने पुण्याला इच्छा असूनही आश्रमात जाणे होत नसे. गुरुदर्शनही घडत नसे. त्यामुळे प.पू. महाराजांना पत्राने कळवून इथेच उत्सव करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे तो साजरा झाला. त्याबद्दलचा वृत्तांत प.पू. महाराजांना पत्राने कळविला. त्यांचे ६ ऑगस्टला पत्र मिळाले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ६-८-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. डॉ. दिलीप यांच्या पत्रांचे उत्तर दोन दिवसांपूर्वी पाठविले ते मिळाले असेलच.

श्री गुरुमहाराजांच्या कृपेने आपला दोघांचा साधनाभ्यास व्यवस्थित सुरु झाला आहे. तो रोज सवडीप्रमाणे चालू राहणे हितावह आहे. बैठकीस बसताना आरंभी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा...' या महामंत्राचा जप सावकाश शांतपणे हळू हळू

चालू करावा. ईशकृपेने हळुहळू चित्त शांत होऊन अभ्यास चांगला होईल. निर्विचार स्थितीचा शांतीचा हा अभ्यास आहे. ईशप्रार्थनापूर्वक नित्य चालू असावा.

तेथेही गुरुपौर्णिमापूजन सर्वांनी केले. सर्वांना श्रद्धाभक्ती उत्तम आहे. येथेही आश्रमात प्रतिवर्षाप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा महोत्सव ईशकृपेने निर्विघ्न व्यवस्थित पार पडला. आलेली मंडळी परत आपले गांवी गेली.

चि. कु. मानसीची संस्कृताभ्यास स्वतंत्र करणेची आवड उत्तमच आहे. इंग्रजांच्या वेळी संस्कृत आवश्यक होते. स्वराज्यात ते ऐच्छिक झाले. अशा स्थितीत कु. मानसीची प्रवृत्ति प्रशंसनीय आहे. यामुळे तिला पुढे संस्कृत पीएच.डी. सुद्धा होता येईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

सुख, समृद्धी, शांती, समाधान... यातील एकाच्या प्रवेशाने दुसरेही आपोआप आपल्या जीवनात येत रहातात, एका पुण्यकर्माचे फलित हे दुसरे पुण्यकर्म करण्यास उद्दीपित करते अन् हे सगळे घडवून आणणारी गुरुमाऊली समर्थ असल्यावर आपल्याला त्यातील प्रत्यक्षपणे स्वतःहून काहीच करावे लागत नाही. फक्त त्यांनी दाखविलेल्या वाटेवरुन चालत गेले की झाले.

यज्ञयागाच्या बरोबरीने अन्नदानालाही तेवढेच महत्त्व आहे, किंबहुना तो एक त्याचा भागच आहे. आपला सर्व व्याप सांभाळून ते सहजपणे होऊ शकते आणि त्याचे सौलभ्यही प.पू. महाराजांनी

करवून घेतले. त्यांच्या या पत्रात ते कसे व का करावे याचे मार्गदर्शन त्यांनी केले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ६-१०-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपण येथे भेटून नाशिकला सिंहस्थ पर्वकाळात जाऊन बीडला परत आला असालच. आम्हाला अजून नाशिकला जाणेचा योग आला नाही.

सध्या आपल्या घरी नित्य सप्तशती चंडीपाठ श्री. बाबुदेव करीत आहेतच. साधा पाठ असला तरी ती उपासना नित्य चालू असल्याने इहपर कल्याण साधणारी आहे; यात संशय नाही. सहस्रचंडी दोन वेळा आपल्या घरी घडली. हवनादी उत्तरांगही व्यवस्थित पार पडले. यात ब्राह्मण सुवासिनी भोजनही दशांश पद्धतीने विधीप्रमाणे घडले आहे.

'देवीप्रीत्यर्थ ब्राह्मण, सुवासिनी, कुमारी, बटू यांना भोजन द्यावे'... असे श्री देवी भागवताच्या सप्तम् स्कंधात काहीसं वाचनात आहे. त्याप्रमाणे घडावे. संपुटित सहस्रचंडी म्हणजे जवळजवळ सात त्रिक एकविस म्हणजे दोन हजार श्लोकांचे पठण झाले आहे, त्यामानाने ब्राह्मण, सुवासिनी, कुमारी, बटू भोजन होणे चांगले ! त्याकरिता पक्वान्नच केले पाहिजे असे नाही. रोज आपण जे जेवतो तेच देवाला चालते.

'यदन्ना मानवः प्रोक्तास्तदन्नः देवताःस्मृताः'

असे सांगितले आहे. येथील पं. गणेशशास्त्री शेंडे हे नव्वद वर्षांचे आहेत. त्यांनी आपल्या घरी १-२ ब्राह्मण भोजनास बोलावून सहस्त्रभोजन साध्य करुन काही दिवसात पार पाडले. तसेच रोज १-२ सुवासिनी याप्रमाणे सहस्त्र सुवासिनी भोजनही पार पाडणे जमतील. काही अंशी देवीप्रीत्यर्थ खर्च करणेची आपली इच्छाही याने पूर्ण होईल.

सर्वांनी विचार करुन जसे ठरेल तसे करावे. १० ते १७ नोव्हेंबर श्री भागवत सप्ताह श्री दशपुत्रेंच्या घरी नाशिकात होईल. त्यावेळीच सिंहस्थ कार्य करण्याची इच्छा आहे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

पुढे प.पू. महाराजांशी सविस्तर बोलणे झाले तेव्हा ते म्हणाले, 'प्रपंचात अनेक अडचणी असतात. रोज जरी सुवासिनी भोजन शक्य होत नसले तरी दर मंगळवार, शुक्रवार १-२ सुवासिनी, कुमारी भोजन घालण्यास हरकत नाही. यथावकाश सावकाशपणे हे पुण्यकर्म चालू राहील आणि प.पू. महाराजांचे आशीर्वादाने ऑक्टोबर १९९१ पासून आजपर्यंत म्हणजे २०१४ पर्यंत हे कार्य सतत चालू आहे फारच क्वचित खंड पडला असावा. सुवासिनी, कुमारिकापण देवीचा प्रसाद समजून आनंदाने अन्न ग्रहण करतात. हे व्रत असेच अखंडपणे चालू राहून मनाला समाधान मिळावे असे वाटते. जशी त्यांची इच्छा!

माझे वडील ती. सदाशिवराव कहाळेकर हे बी.एड्. कॉलेज अंबेजोगाईस प्राचार्यपदी कार्यरत होते. प.पू. महाराजांचे ते अनुग्रहित

होते. त्यांना हृदयाच्या स्नायूंचा आजार अनुवंशिकतेने आलेला होता. तरी त्यांचे कार्य व्यवस्थित चालू होते. पुण्याच्या हृदयरोग तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाखाली उपचार चालू होते. त्यांना ऑक्टोबर १९९१ साली रक्ताची गाठ मेंदूत गेल्यामुळे पक्षघाताचा आजार झाला व अंबाजोगाईच्या मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये अचानक भरती करावे लागले. आम्हा चौघींचीही लग्ने झाल्यामुळे सौ. आईसोबत कुणीच नव्हते. कॉलेजच्या स्टाफच्या मदतीने त्यांना रुग्णालयात भरती केले. त्यांच्या डाव्या बाजूची हालचाल पूर्णच बंद झाली. पहिले सात-आठ दिवस खूपच काळजीचे गेले. त्यानंतर मेंदूची सूज हळूहळू कमी झाल्यावर ते शुद्धीत आले. त्यावेळी त्यांचे वय अठ्ठावन्नच्या जवळपास होते. एवढ्या मोठ्या आजाराचे सर्वांनाच खूप वाईट वाटत होते. डॉ. दिलीपनी याबद्दल सविस्तरपणे पत्र पाठवून प.पू. महाराजांना कळविले. त्यांनी लगेचच पत्र पाठवून त्यांच्या आरोग्यलाभाच्या संदर्भात मार्गदर्शन केले, ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २३-१०-९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. श्री. सदाशिवराव यांना योग्य औषधोपचार चालू आहेतच. श्री गुरुचरित्रसप्ताह पारायण ब्राह्मणद्वारा त्यांचे आरोग्य प्रीत्यर्थ सुरु करावे. पूर्ववत आरोग्यलाभ होईपर्यंत पारायण सुरु ठेवावे.

'श्रीदत्तशरणं मम' या मंत्राचा जप त्यांचे सौ. मंडळींनी रोज सवडीप्रमाणे पाच माळा श्रद्धेने चालू करावा. ईश्वर प्रार्थना नित्य करावी. ईश्वरकृपेने कार्यसिद्धी होईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

३ नोव्हेंबरला वाडीस श्री गुरुद्वादशीचा प्रसाद घेऊन दुसरे दिवशी आम्ही इकडे परत येऊ. नंतर ९ ते १७ श्री भागवत सप्ताह यज्ञाकरिता नाशिकला श्री दशपुत्रे यांचेकडे जावे लागेल. ते झाल्यावर त्र्यंबकेश्वरी सिंहस्थ पर्व निमित्त तीर्थविधी आटोपून इकडे परत येणेचा विचार आहे. ईशेच्छेनुसार काय घडते पहावे.

कळावे,

द. क.

****

ती. दादांच्या म्हणजे माझ्या वडिलांच्या प्रकृतीत हळूहळू फरक पडू लागला. हॉस्पीटलमधून सुट्टी झाल्यानंतर काही काळानंतर त्यांना इथेच बीडला आणले गेले. वे. निर्मळगुरुजींनी श्री गुरुचरित्र सप्ताह पारायण सुरु केले होते. सातवे दिवशीच्या समाप्तीनंतर आठवे दिवशी नवीन पारायणाला सुरुवात होई. असे साधारणतः नऊ-दहा पारायणे झाली. त्यानंतर श्री निर्मळगुरुजींना कुठेतरी परगावी जावयाचे होते आणि आमचेही दुर्दैव आडवे आले. प.पू. महाराजांनी पत्रामध्ये स्पष्ट नमूद केले होते की, 'पूर्ववत आरोग्यलाभ होईपर्यंत पारायण सुरु ठेवावे'... या पत्राचे आम्ही पुन्हा अवलोकन केले नाही व पारायण

बंद पडले. ती. दादांची प्रकृती ज्या अवस्थेत होती तिथेच स्थिर झाली. म्हणजे जीवाचा धोका टळला पण पक्षघातामुळे कायमचे अपंगत्व आले. बराच काळ उलटल्यानंतर सहजच प.पू. महाराजांची सर्व पत्रे वाचावयास घेतली आणि या पत्रातील ह्या ओळी वाचण्यात आल्या आणि खूप खूप वाईट वाटले. त्यांनी पूर्ण बरे होण्यासाठी उपाय सांगितला होता पण अज्ञानाने दुर्लक्ष झाले अन् त्याचा त्रास ती.दादांना भोगावा लागला. आयुष्यभर त्यांना परावलंबी रहावे लागले. शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांची ख्याती होती. बालभारतीच्या पाठ्यपुस्तक मंडळावर ते गणिताचे विशेष तज्ज्ञ अभ्यासक म्हणून कार्यरत होते. पण या आजारामुळे सारे काही संपले. अशा अपंगावस्थेत ते पुढे सतरा वर्षे जगले. त्यांना प.पू. महाराजांचा सहवास, त्यांचे दर्शन याची मनापासून ओढ होती आणि ती अखेरपर्यंत कायम राहिली. पूर्वायुष्यात ते जवळजवळ नास्तिकच होते. पण प.पू. महाराजांच्या सहवासात ते पूर्णपणे बदलून गेले. त्यांना 'गुरुचरित्र' वाचनाचीही आवड निर्माण झाली. अनेक देवदर्शनासाठी घेऊन चला असा अट्टाहास ते करीत. प.पू. महाराजांच्या कृपादृष्टीने त्यांचे जीवन पावन झाले. प्रारब्धभोगाचाही विसर पडला गेला. पण मला अजूनही 'हे पत्र पुनश्च वाचून ती. दादांना पूर्ण बरे वाटेपर्यंत सप्ताह पारायण चालू ठेवावयास हवे होते, ते बंद करण्यात आपली मोठी चूक झाली' याचे सतत वाईट वाटते. त्यांचे दुःख टाळता आले असते...

संसारातील व व्यवसायातील वाढते व्याप, अनेक अडचणी, समज-गैरसमज, दुराभिमान हे रोजचे द्वंद्व कधीकधी सहनशीलतेची परीक्षाच पहायचे. माहेरी असे काही कळले तर आईवडील खूप

काळजी करतील, पण कुठेतरी बोलून दुःख हलके करावेसे वाटायचे. एकदा दर डॉ. दिलीप वैतागून आम्हाला न सांगताच वाडीला निघून गेले. आम्हालाही त्यांच्यातील हा बदल अनपेक्षितच होता. तशी फार मोठी आगळीकही कुणाकडून झालेली नव्हती. पण यावर उपायही काही सुचत नव्हता. सासूबाईंना वाटले, 'झाले असतील नवरा-बायकोत काही वाद !' म्हणून त्यांनीही विशेष लक्ष दिले नाही.

प.पू. महाराजांना सर्वच सुख-दुःख कळविण्याची सवय होती. म्हणून याही वेळेस सविस्तर पत्र लिहिले, अन् मन मोकळे झाल्यासारखे वाटले. प.पू. महाराजांनी पुढे सविस्तर पत्र लिहून त्यावर उपायही सूचविला. ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ३०-१-९२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

सौ. सुरेखाताईंचे पत्र येऊन बरेच दिवस झाले. प्रकृति व उत्सव कार्यक्रम यामुळे उत्तरास विलंब झाला. सौ. सिंधूताईंची परवा उत्सवात भेट झाली. आपण वाडीस जाऊन आल्याचे त्यांचेकडूनही समजले.

आपण रोज स्नानसंध्या झाल्यावर गायत्री मंत्रजप दोन माळा व नवार्ण मंत्र जप दोन माळा प्रार्थनापूर्वक करावा. फार वेळ लागणार नाही. गायत्री मंत्र-जप एकंदर दहा हजार व नवार्णमंत्र जप एकंदर

नऊ हजार करण्याचे ठरवावे. महिना-दीड महिन्यात संपेल.

तसेच सौ. सुरेखाताईंनी 'ईं नमस्ते कार्तवीर्याय'...या मंत्राचा जप रोज तीन माळा सवडीने करावा. आपली जन्मपत्रिका योग्य ज्योतिषांचेकडून पाहून कोणी ग्रह प्रतिकूल असल्यास त्याकरिता जपदान करावे. प्रतिबंधक दुरिताचा क्षय होऊन व्यवसायात पूर्ववत उत्कर्ष व्हावा या उद्देशाने प्रार्थना चालू ठेवून अनुष्ठान ईशकृपेने सर्व ठीक होईल.

प्रपंचात चढउतार चालू असतोच. राष्ट्रावरही असा प्रसंग येतो. शांत राहून शास्त्रीय उपाय, ईशप्रार्थना करुन संकटपरिहार करावयाचा असतो. निराश न होता शांतपणाने सर्व करावे. भगवतीचे कृपेने पूर्ण कल्याण होईल. काळजीचे कारण नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांचे हे पत्र वाचून खूप शांत वाटले. आपल्या कुठल्याही समस्या घरातील इतरांच्या सोबत चर्चेत आणण्यापेक्षा प.पू. महाराजांना सांगितले की, खूप मोकळे वाटे व सगळा गुंता सोडविला जाई.

चि. मानसीची एस.एस.सी. ची परीक्षा नुकतीच संपली होती. आजारातून थोडेसे बरे वाटल्यानंतर ती. दादांनाही प.पू. महाराजांचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांना गाडीने चि. मानसीस सोबत घेऊन पुण्याला पाठविले. 'श्री वासुदेव निवास' मध्ये त्यांचे

व्यवस्थित दर्शन झाले. प.पू. महाराजांनी त्यानंतर इथे एक पत्र पाठविले. चि. मानसीने त्यावेळी त्यांच्याकडून गुरुमंत्रही घेतला.

प.पू. महाराजांनी पाठविलेले पत्र याप्रमाणे होते---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २९-३-९२

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम

काल कु.मानसी तिच्या मातामह मातामहींना घेऊन आमचेकडे भेटून गेली. त्यामुळे सर्व कुशल वृत्त कळून समाधान झाले. तिचीही दहावीची परीक्षा चांगली झाली असून पुढे संस्कृत शिक्षण घेणेची इच्छा तिने व्यक्त केल्याचे पाहून कौतुक वाटले. मुलांच्या पेक्षा मुलींचा ओढा संस्कृतकडे विशेष दिसतो. शाळेतून तर शिक्षण व्यवस्था नाही. खाजगी कोणीतरी शिक्षक भेटले तरच अशा जिज्ञासूंची इच्छा पूर्ण होऊन समाधान मिळेल. शहरातून कोणीतरी संस्कृत शिकविणारे भेटतील.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आमची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. अशक्तपणाच फार जाणवतो. वयोमानाप्रमाणे हे राहणारच.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प्रकृती अस्वास्थ्यामुळे प.पू. महाराजांना व प.पू. सौ. आईसाहेबांना पुण्यातच डॉक्टरांच्या देखरेखीखाली रहावे लागेल. प्रवासाची दगदग, बदलते वातावरण आता या वयाला सहन होणे अशक्य होते. सासूबाईंचे अधून-मधून पुण्यास जाणे होईल. तेव्हा कुशल वृत्त समजे. पण एकही दिवस उभयतांच्या आठवणीशिवाय जात नसे. आनंदाच्या क्षणी सर्वप्रथम त्यांचेच स्मरण होई व दुःखाच्या प्रसंगात त्यांच्या आठवाने खूप दिलासा मिळे. बाकी रोजचे आयुष्य दिनक्रमानुसार व्यवस्थित चालू होते.

येथील सहयोगनगर भागातील महिला मंडळ रामसंप्रदायी असून नित्य श्री दासबोध ग्रंथांचे वाचन तेथे चालते. धार्मिकतेकडे ओढा जाणवून त्या महिलांनी शिवथरघळ येथे जो प्रकल्प हाती घेतलेला होता-प.पू. श्री रामदासस्वामींच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचा- त्यासाठी तेरा कोटी रामनाम जप करण्याचा संकल्प करुन निधी संकलन करणे यासाठी सर्वांना आवाहन केले गेले होते. त्या लिखित रामनामाच्या वह्या तेथील बांधकामाच्या पायात घालण्यात आल्या व संकलित झालेला निधी तेथील बांधकामासाठी वापरण्यात आला. त्यानिमित्ताने 'श्रीराम जय राम जय जय राम...' हा मंत्र थोडा थोडा का होईना रोज लिहिण्यात यायचा. चातुर्मासाच्या काळात हे कार्य करण्यात आले. त्या संदर्भात प.पू. महाराजांना पाठविलेल्या पत्रात लिहिले असता, त्यांचे पत्र आले व त्यांनी या गोष्टीचा उल्लेखही केला.

****

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ३१-८-९२

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. कुशल वृत्त समजून आनंद झाला. वयोमानानुसार आमची प्रकृती मध्ये-मध्ये बरी रहात नाही. यामुळे पत्रोत्तर वेळेवर लिहिली जात नाहीत. नाईलाज आहे. आपल्या पू. पिताजींची व श्री. प्रभाकरकाकांची प्रकृती बरी असल्याचे समजून समाधान झाले.

कु. मानसीच्या इच्छेप्रमाणे संस्कृतचा अभ्यास चालू झाला. मार्गदर्शकही भेटले. बरे झाले. अभ्यास करता-करता विशेष वाचनाने त्यात चांगला प्रवेश होईल. संस्कृतची आवड आहे हे उत्तम आहे.

'श्रीराम' नाम लिहिण्याचे कार्य तेथील भाविक मंडळींनी सुरु केले. श्री रामरायांची कृपा आहे. दुरितक्षय होत जाऊन कल्याण साधणारे हे कार्य आहे.

श्री. मथुताई औरंगाबादला हार्टफेलने गेल्याचे समजले. ईश्वरेच्छा.

आमची प्रकृती हळुहळू सुधारत आहे. वैद्यांचे औषध चालू आहे. प्रवास बंद असून विश्रांती आहे. आता दि. ६ ते १२ सप्टेंबर आश्रमात वार्षिक श्री भागवतसप्ताह वाचन पं. आनंदशास्त्री पारखी करणार आहेत.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

मुलांना दिवाळीच्या सुट्या लागल्या व आम्ही गुजराथ, मध्यप्रदेशात जाण्याचे ठरविले. घरची फियाट गाडी होती व ड्रायव्हरही चांगला होता. साधारणत: १०-१२ दिवस फिरुन यावे असे ठरविले. मुलांनाही आवड असल्यामुळे प्रेक्षणीय ठिकाणे फारशी न ठरविता तीर्थक्षेत्रे पाहण्याकडे जास्त लक्ष दिले. त्यात गरुडेश्वर, नारेश्वर, उज्जैन, माहेश्वर, इंदोर इत्यादी ठिकाणी जाण्याचे ठरविले. दिवाळीच्या काळात गरुडेश्वरला अजिबात गर्दी नव्हती. प.प. स्वामी महाराजांची पंचधातूंची मूर्ती नुकतीच बडोद्याहून तिथे आली होती. त्यांना नरकचतुर्दशीला भल्या पहाटे औक्षण करण्याचे भाग्य लाभले. खूप छान एकांत मिळाला. अगदी सकाळीच नर्मदास्नान करुन आल्यावर मंदिरात बसले. चांगली अडीच-तीन तासांची साधना झाली. मुलेही छान रमली होती. परत येताना मात्र पुण्याहून येता आले नाही. प.पू. महाराजांचे दर्शन झाले नाही. म्हणून झालेल्या प्रवासासंबंधी सविस्तर पत्र त्यांना पाठविले. त्यांचेही उत्तर आले, ते याप्रमाणे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १-१-९३

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. सर्वांचे कुशल समजून समाधान वाटले.

आपण सर्व मुलांसह गुजराथ-मध्यप्रदेशात प्रवास करुन सर्व स्थाने पाहून आलात त्यात गरुडेश्वर, नारेश्वरही झाले. सर्वांचे कल्याणाचा हा उपक्रम आहे. चांगले झाले. तीर्थस्नान, देवतापूजन, प्रसादग्रहण सर्वांना घडले. घरची गाडी असेल तर प्रत्येक ठिकाणी

रिझर्वेशनचा त्रास पडत नाही. ईश्वरकृपेने प्रवास निर्विघ्न व्यवस्थित पार पडला.

येथे श्री गुरुमहाराजांचा पुण्यतिथी महोत्सव दि. ९ ते १५ जानेवारी असून १५ तारखेस पुण्यतिथी आहे.

घरी सर्वांना मंगल आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

आपण पाठविलेल्या प्रत्येक पत्राचे प.पू. महाराज घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीप्रमाणे सविस्तर समालोचन करुन नेटक्या शब्दात पत्र पाठवित. त्यामुळे प्रत्यके बारीक-सारीक गोष्टी कळविण्याची सवयच लागली होती आणि मुख्य म्हणजे त्यांचे उलट टपाली पत्र आले की, सगळं घर कसं दिवसभर आनंदाने फुलून निघे. खूप-खूप बरे वाटे.

तीन-चार महिन्यांनी पुढे डॉ. दिलीप व त्यांच्या सहकारी मित्रांनी बीडला अगदी मध्यवर्ती ठिकाणी जवळपास पाऊण एकर जागा विकत घेतली. मागच्या बाजूने जागा ऐसपैस होती. पण मुख्य रस्त्याहून आत जाण्याच्या मार्गातच एक भला मोठा अश्वत्थ वृक्ष होता. त्यामुळे आता जाण्याच्या रस्त्याच्या रुंदीमध्ये अडथळा येत होता व त्या जागेची व्यावसायिक किंमत कमी झाली होती. जागा विकत घेतली खरी पण त्या रस्त्यावरच्या अश्वत्थ वृक्षाचे काय करावे- काही कळेना. इतर सर्व मित्र तो तोडून टाकावा या विचाराचे होते, पण डॉ. दिलीपनी प.पू. महाराजांना पत्राने या संबंधीचे मार्गदर्शन करण्याची विनंती केली. त्यांचेही लगेच यासंदर्भात पत्र आले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ९-६-९३

सप्रेम सादर स्मरण निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. जागेत मध्ये येणारा अश्वत्थ वृक्ष लहान असल्यास, मूळात चहुकडे उकरुन तो काढून अन्य ठिकाणी मध्ये न येईल असा लावण्यास हरकत नाही. त्याकरिता काही विधी करणेची आवश्यकता नाही.

येथे आश्रमात दि. १६ ते २१ जून श्री प.पू. वासुदेवानंद सरस्वती टेंबे महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव असून २१ जूनला पुण्यतिथी आहे. इकडे सवडीप्रमाणे आपण केव्हांही येणेस हरकत नाही. आश्रमात माडीवर श्री महाराजांचे सन्निध साधनाभ्यास व्यवस्थित अनुकूल होईल. काळजीचे कारण नाही.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आमची प्रकृती ठीक आहे. वैद्यांचे औषध चालू आहे.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

दैनंदिन व्यग्रतेमुळे व मुळात मनात होणाऱ्या चलबिचल अवस्थेमुळे साधनेमध्ये खंड पडत असे किंवा समाधानकारक होत नसे. तसेही प.पू. महाराजांना कळविले असता साधना जर पवित्र ठिकाणी-प.पू. सद्गुरुंच्या सान्निध्यात झाली तर त्यातील न्यूनाधिक दोष दूर होऊनं त्यात सुरळीतपणा येतो असे त्यांनी सुचविले.

पत्र लिहिताना बाकीचे सारे सविस्तर लिहिले गेले होते. त्या जागेचे वर्णनही लिहिले होते. पण चुकून तो वृक्ष खूप जुना व मोठा ऊंच आहे हे कळविले गेले नव्हते. त्यामुळे तसे पुढील पत्रात सविस्तर कळविल्यावर प.पू. महाराजांनी पत्रात त्याही संदर्भात मार्गदर्शन केले, ते असे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ३०-६-९३

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. साधनाभ्यास नित्य सवडीने आपला चालू आहे हे उत्तम कल्याणकारक आहे. ईश्वर प्रार्थनापूर्वक श्रद्धेने नित्य चालू ठेवावा.

श्री. डॉ. दिलीपरावांचेही पत्र मिळाले. झाड मोठे असल्यास ते तोडणेचे ठरल्यास ती लाकडे कोणीतरी अग्निहोत्री पाहून त्यांचे होमासाठी पोचविता आल्यास दोष लागणार नाही. श्री अहिताग्नी सेलूकर त्यांचेकडे त्या लाकडांचा उपयोग होमादिकार्यासाठी होईल.

श्री. शामरावांनाही पत्रोत्तर पाठविले आहे. येथे आश्रमात ३ जुलैला श्री गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम प्रतिवर्षाप्रमाणे होईल. आमची प्रकृति ठीक आहे. वैद्यांचे औषध चालू आहे. वयोमान झाल्याने काहीतरी जास्ती रहाणारच. प्रारब्धकर्मभोग आहे. ईशेच्छा.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

त्या पिंपळाच्या झाडाखाली एक मुंजाची प्रतिमा पण होती. मग एक दिवस चांगला मुहूर्त बघून शनीचे राक्षस भुवनहून पाच ब्राह्मण आले व इथले २-३ ब्राह्मण या सर्वांनी मिळून त्या मुंजाच्या मूर्तीवर विधीवत सोपस्कार करुन ती बाजूला उचलून ठेवली व संध्याकाळ पूर्व त्या वृक्षाची तोडणी करण्याचा विधी पण केला. संध्याकाळी भोजनप्रसाद घेऊन ते ब्राह्मण मार्गस्थ झाले. त्यानंतर ते झाड पूर्ण तोडले त्याची लाकडे एका ट्रकमध्ये भरली. तो ट्रक संपूर्णपणे भरला गेला होता. त्यानंतर डॉ. दिलीपच्या एका स्नेह्याने तो ट्रक गंगाखेडला श्री सेलूकर महाराजांचे आश्रमात सकाळी सकाळी पोहोचता केला. श्री सेलूकर महाराजांचे घरी अग्निहोत्र असल्यामुळे त्यांना या समिधा सतत लागत. सौ. मायबाईंनी स्वागत केले. श्री सेलूकर महाराज बाहेरगावी गेले होते. समिधा संपत आल्यामुळे सौ. मायबाईंना काळजी वाटू लागली होती. प.पू. महाराजांच्या कृपेने त्या तिथे वेळेवर पोहोचल्या गेल्या व त्यांचीही काळजी दूर झाली.

सर्व गोष्टी विधीवत झाल्याने सर्वांना समाधान वाटले. पुढे त्या जागेला बरीच किंमत आली. आता तिथे एका अर्बन बँकेचे हेड ऑफीस आहे.

आजकाल शहरात बांधकामे खूप वाढली आहेत आणि मोठीमोठी झाडे काढण्याचे पण प्रसंग येतात. प.पू. महाराजांच्या या मार्गदर्शक पत्रामुळे पिंपळाचे झाड काढताना-लहान किंवा मोठे- योग्य ती काळजी घेतली की त्याचा दोषही लागणार नाही व बांधकामातील अडथळा दूर होऊ शकेल.

****

कामाच्या दगदगीने, वाढत्या ताणतणावामुळे व अनियमित आहारामुळे डॉ. दिलीपची प्रकृती बिघडली होती. हृदयाच्या कमजोरीमुळे दम लागणे, धाप भरणे इ. त्रास होत असावा असे सहयोगी डॉक्टरांचे म्हणणे होते. पण निश्चित असे कोणतेही निदान झाले नाही. प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेली असता त्यांनी त्वरित पत्र पाठवून चौकशी केली.---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २६-७-९३

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपणाकडील श्री गुरुपौर्णिमा दक्षिणा श्री. शामरावांचे कडून मिळाली. सर्वांचे कुशलवृत्त समजून समाधान वाटले. श्री. डॉक्टरांची प्रकृती बरी नाही असे श्री. शामरावांचे कडून समजले. चांगली तपासणी करुन योग्य औषधोपचार वेळेवर होण्याची दक्षता घ्यावी. चांगले वैद्यांचेही औषध लागू पडेल. आम्ही सध्या येथील श्री खडीवाले वैद्य यांचे औषध घेतो. वयोमानाप्रमाणे प्रकृतीत काही कमीजास्ती राहणारच. कर्मभोग आहे. ईश्वरेच्छा.

असो. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

यथावकाश डॉ. दिलीपनी सर्व तपासण्या करवून घेतल्या. फारसे काही काळजी करण्यासारखे निघाले नाही. आधीच आजारपणाच्या बाबतीत त्यांची सहनशीलता कमी, त्यातून प.पू. महाराजांना कळल्यावर त्यांची वाटणारी काळजी पाहून जास्तीच गलबलल्यासारखे

झाले. पुढे पुण्यास जाऊन प.पू. महाराजांचे दर्शन घेतल्यावर त्यांना बरे वाटले.

आमची द्वितीय कन्या चि. कु. प्राजक्ता ही चौथीत शिकत होती. वय वर्षे दहा- एके दिवशी शाळेतून परत आली. तेव्हा तिला प्रचंड मूत्रदाह सुरु झाला. लघवीतून रक्तही जाऊ लागले. सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या. उपचार सुरु होते. थोडे फार बरे वाटे पण चार-पाच वेळेस त्या दुखण्याची तीव्रता खूपच वाढली. शिवाय या काळात तिचे ब्लडप्रेशरही अचानक वाढे. औरंगाबादला नेऊन तिच्या बालरोग शल्यचिकित्सकांकडून सर्व प्रकारच्या तपासण्याही करवून घेतल्या. निर्णयाप्रत येण्यासारखे कोणतेही निदान झाले नाही. चांगली हसणारी खेळणारी मुलगी एकदम तणावाखाली आली. 'आई, तू महाराजांना कळव ना ! म्हणजे ते मला बरे होण्यासाठी प्रार्थना करतील.' असे ती सारखे म्हणून लागली. आम्हालाही प.पू. महाराजांना कळवावेसे वाटले. त्यांचे मागदर्शन आवश्यकच होते. त्यामुळे त्यांना तसे पत्र पाठविले. त्यांचेही लगेच उत्तर आले. अन् आमची काळजी दूर झाली. तिलाही खूप बरे वाटले.

प.पू. महाराजांनी पाठविलेले पत्र असे...

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १-११-९३

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. आमची दोघांचीही प्रकृती ठीक असून औषध चालू आहे. कर्मभोग सर्वांनाच अपरिहार्य आहे.

वाडीस जाऊन प्रभूची प्रार्थना करुन यावे. ईशकृपेने सर्वकल्याण होईल.

कु. प्राजक्ताच्या प्रकृतीवर योग्य औषधोपचार चालू ठेवावा. वंगशील रोज आम्हीही घेतो. चांगले औषध आहे. 'श्री गुरुचरित्र' मासिक पारायण चालू आहेच. 'दिगंबरा.....' मंत्राचा जप ही यथाशक्ती चालू असावा. ईश्वर प्रार्थना नित्य चालू असावी.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. प्रकृती बरी राहिल्यास गुरुद्वादशीस दर्शन वाडीला घेऊन येणेची इच्छा आहे. प्रभूचे इच्छेप्रमाणे घडेल.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे वाडीचे 'श्री मनोहर पादुकांचे' दर्शनासाठी श्रीगुरुद्वादशीस जाण्याचे निश्चित झाले. डॉ. दिलीप, कु. मानसी, प्राजक्ता व चि. नारायण यांचे समवेत आम्ही तिथे एकादशीस संध्याकाळी पोहोचलो. प.पू. महाराजांची श्री नारायणस्वामींचे मंदिरात पुराणसेवेची वेळ झालेली होती. समोरच्या ओवरीत ते बसले होते. दोन्ही बाजूस रांगा करुन सर्व साधक मंडळी नम्रपणे उभी होती. नविन येणारी व्यक्ती प.पू. महाराजांच्या पाया पडून बाजूला उभी राही. आम्ही सर्वजण तेथे पोहोचलो. प.पू. महाराजांचे दर्शन घेऊन बाजूला उभे राहिलो. चि. नारायणने चार-पाच वेळेस त्यांना साष्टांग दंडवत थोड्या थोड्या वेळाने घातला. श्री. रघुनाथराव काका बाजूला बसले होते. त्यांनी विचारले, 'काय

नारायणा ! इतक्या वेळेस का नमस्कार करतो आहेस ?' त्याने उत्तर दिले, 'घरी आजी-आजोबा, काका-काकू व ताई आहेत ना- त्यांनी महाराजांना आमचे दंडवत सांग' असे सांगितले होते. त्यामुळे मी त्यांचा नमस्कार घालत होतो. सगळ्यांना त्याचे खूप कौतुक वाटले. नुकतेच श्री. नीलाताई जोशींच्या 'प्रयाग' या पुस्तकात चि. नारायणचा उल्लेख त्यांनी केलेला होता. प.पू. महाराजांच्या कृपेने त्याच्यावर चांगले संस्कार होताहेत हे पाहून आम्हाला खूप समाधान वाटले.

पुराणसेवा झाल्यानंतर प.पू. महाराजांच्या आजूबाजूची गर्दी थोडी कमी झाल्यावर योग्य वेळ पाहून डॉ. दिलीपनी 'घरात श्रीलक्षचंडीचा संकल्प करवून घ्यावा' असे विचार बोलून दाखविले. 'आपण पुढे विचार करुन' असे प.पू. महाराज म्हणाले व तो विषय तिथेच थांबला. दुसरे दिवशी दुपारी मुक्कामाचे ठिकाणी सर्वजण दर्शनासाठी थांबले होते. प.पू. महाराज विश्रांती घेत होते. झोपेतून उठल्यावर सगळेजण थांबलेले पाहून त्यांना खूप संकोच वाटला. पण प्रकृतीसाठी विश्रांतीही आवश्यकच होती. दर्शन घेऊन निघताना प.पू. महाराजांचे एखादे वापरलेले उपरणे प्रसाद म्हणून मिळावे अशी डॉ. दिलीपनी इच्छा प्रगट केली. पण त्यांनी 'जुने कशाला- नवेच घेऊन जा' म्हणून स्वतःच्या सामानातील नवे उपरणे कुंकू लावून दिले. आम्हाला खूप आनंद झाला.

द्वादशीच्या उत्सवाची सांगता झाल्यावर आम्ही घरी परतलो. थोड्याच दिवसात प.पू. महाराजांचे 'श्रीलक्षचंडी'च्या संदर्भात पुण्याहून पत्र आले. ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १९-११-९३

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन, वि. क्षेम

वाडीस आपली सर्वांची भेट झाल्याने समाधान झाले. आपणासही तीर्थस्नान, देवदर्शनाचा लाभ झाला. मध्ये मध्ये असे तीर्थक्षेत्री जाण्याचा योग आल्यास पुण्यकर्म घडते. असो.

आपण यापुढे लक्षचंडीचा संकल्प करणेपेक्षा अयुतचंडीचा (दहा हजार पाठ) करणे योग्य होईल. लक्षचंडीला पाठ पूर्ण होण्यास बराच काळ लागेल. शतांश हवन करण्याचे ठरले तरी हवनास कुंडे अनेक घालावी लागतील. ब्राह्मणही बरेच लागतील. जागाही मोठी लागेल. यापेक्षा थांबून थांबून अयुतचंडीचा संकल्प पूर्ण करावा. यालाही शतांश हवन केल्यास एका कुंडावर घरातच होऊ शकेल.

तेथील ब्राह्मणांचाही विचार घेऊन दक्षिणायन संपल्यावर आरंभ करावा. श्री जगदंबेची प्रार्थना करुन सुरुवात करावी. भगवतीच्या कृपेने सर्व निर्विघ्न पूर्ण होईल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी प्रापंचिक व व्यावहारिक अडचणी जाणून लक्षचंडी ऐवजी अयुतचंडीचा संकल्प करावा अशी आज्ञा केली व दक्षिणायन संपले की, श्री अयुतचंडीचा संकल्प करणे विषयीच्या तिथी संदर्भात पुढील पत्र पाठविले, ते असे...

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १-२-९४

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. प्रकृति बरी रहात नसल्याने उत्तरास विलंब होतो. २४ फेब्रुवारी तारीख बरी दिसते. तथापि तेथे वे. कोकीळ ज्योतिषी यांना विचारुन निश्चित ठरवावे. ते आपली पत्रिका पाहून योग्य ते ठरवतील.

सध्या येथे श्री गुरुमहाराजांचा पुण्यतिथी महोत्सव सुरु असून ३ फेब्रुवारीस पुण्यतिथी आहे. पुढील महिन्यात २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारीपर्यंत श्री प.प. लोकनाथतीर्थ महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव असून २८ फेब्रुवारीस पुण्यतिथी आहे.

घरी सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****


प.पू. महाराजांची प्रकृती अशक्त झाली असल्यामुळे व त्यांना प्रवासाची दगदग होऊ नये म्हणून या नियोजित तारखेस 'संकल्पविधी' श्री वासुदेव निवासमध्येच करावा असे ठरविण्यात आले.

बीडहून आम्ही घरातील सर्वजण, सासूबाई, सासरे, माझे वडील व आई, ३-४ ब्रह्मवृंद सर्वजण मोठी गाडी घेऊन २३ फेब्रुवारीस रात्री मुक्कामास श्री वासुदेव निवासमध्ये पोहोचलो.

वडिलांना मागच्या आजारपणामुळे पक्षाघात झालेला होता. पण त्यांची प.पू. महाराजांच्या दर्शनाची तीव्र इच्छा होती, त्यामुळे त्यांनाही आणले. औरंगाबादहून माझे थोरले काका ती. जगन्नाथराव कहाळेकर त्यांच्या दोन्हीही चिरंजीवांसह व धाकट्या सुनेसह इथे येऊन पोहोचले.

२४ फेब्रुवारीस प.पू. महाराज संकल्प सांगणार आहेत हे आश्रमात पोहोचल्यावर तेथील निवासी मंडळींच्या कानावर घातले. श्री. वासुदेराव करंबेळकर त्यावेळी कोकणात गेले असल्यामुळे एवढी सगळी तयारी, प्रसाद भोजन, नैवेद्य वगैरे कसे काय जमणार? याबद्दल तेथील लोकांनी शंका उपस्थित केली. पण मनोमन वाटत होते की, 'प.पू. महाराजांनी ही तिथी काढून दिलेली आहे, त्यामुळे कोणतीही अडचण येऊच शकणार नाही.' अन् सुदैवाने दुसरे दिवशी पहाटेच श्री. वासुदेवरावजी आश्रमात येऊन पोहोचले. तेथील सर्वांनाच आश्चर्य वाटले. पुढील २-३ दिवसांचा मुक्काम तेथील काम झाल्यामुळे त्यांनी तो रहित केला व ते योग्य वेळी येथे येऊन पोहोचले व आल्या आल्या पाकसिद्धीस त्यांनी सुरुवात केली.

प.पू. महाराजांची प्रकृती बरी नसल्यामुळे कार्यक्रमाची सुरुवात उशीरा करावी अशी सूचना देण्यात आली. आमची सकाळीच सर्व तयारी झाली होती. उशीराची वेळ प.पू.महाराजांना कळविली गेली होती. पण ते त्याआधीच सकाळीच आश्रमात येऊन स्थानापन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्री अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तने झाली. प.पू. महाराजांनी संकल्प सांगितला, तो असा-


श्रीदत्त

[illegible]

त्यानंतर विधीवत पाद्यपूजा झाली. देवाचा नैवेद्य झाल्यावर सर्वांना प्रसाद दिला. ८०-९० पात्रे झाली. आम्हा सर्वांना खूपच आनंद झाला. माझ्या चुलतभावांना व सौ. वहिनीला मंत्रोपदेश मिळाला, त्यामुळे ती. काकांनाही आनंद झाला. प.पू. महाराजांच्या दर्शनाने माझ्या वडिलांना खूप समाधान वाटले. सर्व कार्यक्रम यथासांग झाल्यावर आम्ही संध्याकाळी पुण्याहून निघून रात्री उशिरा बीडला पोहचलो.

१ मार्च १९९४ पासून ब्राह्मणद्वारा पाठांना आरंभ झाला व पुढे चि. नारायणच्या मौंजीनंतर २४ जानेवारी ते २८ जानेवारी १९९६ ला अयुतचंडीचा सांगता समारोह बीड मुक्कामी प.पू. ताईमहाराजांच्या उपस्थितीत त्यांचे आशीर्वादाने संपन्न झाला.

एप्रिल १९९४ मध्ये प.पू. महाराजांना ८५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रौद्रीशांती महोत्सव देऊळगावराजा येथे संपन्न होणार होता. त्यानिमित्ताने एप्रिलच्या सुरुवातीस त्यांचे पुण्याहून पत्र आले. त्यात त्यांनी बीडला येण्याची इच्छा प्रगट केली व डॉ. दिलीपना पुणे ते जालना गाडीची व्यवस्था करण्यास सांगितले. त्यांचे त्या संदर्भात सविस्तर पत्र आले. ते या प्रमाणे होते---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ११-४-९४

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आमची प्रकृती ठीक आहे. वैद्यांचे औषध चालू आहे. वयोमानाप्रमाणे चढउतार असणारच.

देऊळगावची मंडळी येथे मुद्दाम येऊन कार्यक्रमाचे आमंत्रण देऊन गेली. त्यांच्या आत्मीयतेमुळे तिकडे जाण्याचे आम्ही ठरवित आहोत. येथून १९ एप्रिलला सकाळी लवकर निघून मध्ये औरंगाबादला श्री नगरकरांकडे भोजन, विश्रांती करुन मुक्कामास जालन्यास जावयाचे आहे. २० तारखेस जालन्यास सौ. ताईमहाराजांचे कडे मुक्काम करुन २१ तारखेस मुक्कामाला देऊळगावी पोहचू. तेथे २५ ते २७ पर्यंत पंचयाग, देवतायाग, रौद्रीशांती हा कार्यक्रम होईल. नंतर १ ते ५ मे जालन्यास सौ. ताईमहाराजांचे कडे पंचायतनदेवता याग आहेत. ते करुन इकडे येणेस निघावयाचे आहे.

आपण निघताना गाड्यांची व्यवस्था केली आहे, त्याप्रमाणे गाड्या येथे १८ एप्रिलला संध्याकाळपर्यंत आल्या म्हणजे १९ला सकाळी घरुन निघता येईल.

जालन्याहून ६ तारखेस निघावयाचे आहे. त्याकरिता दि. ६ मे ला जालन्याला गाड्या आल्या तर इकडे भोजनोत्तर निघता येईल.

आम्ही २-४ मंडळी ईंगोलीस काही कार्याच्या करिता २-३ दिवस जाऊन परत येताना बीड वरुन येणेची इच्छा आहे. ईशेच्छेप्रमाणे घडेल.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे. आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

ठरल्याप्रमाणे गाड्या पुण्याला रवाना झाल्या व तेथून सर्व मंडळी देऊळगावी मुक्कामास पोहोचली. आम्ही सर्वजण त्या कार्यक्रमास आपापल्या सवडीने गेलो. सासूबाई त्यांच्या मैत्रिणीसह सुरुवातीपासूनच होत्या. अतिभव्य व अवर्णनीय असा तो कार्यक्रम होता. प्रत्यक्ष श्री बालाजींच्या दरबारात गुरुमहाराजांचा कौतुक सोहळा अप्रतिमच होता. आजुबाजूच्या पंचक्रोशीतील लोकांची गर्दी तर होतीच पण अगदी दुरुन भक्त मंडळी आली होती. सर्वांचे नेत्र व मने तृप्त झाली. देऊळगावकर वासियांचे प.पू. महाराजांच्या वरील प्रेम तर असीमच होते. पण आलेल्या लोकांची त्यांनी केलेली व्यवस्था-सगळ्यांशी वागण्यातील त्यांची ऋजुता-नम्रता खरोखरच शिकण्यासारखे होते. जेवणावळी सारख्या चालू होत्या. सगळ्यांना व्यवस्थित हवे नको ते बघितले जाई. प.पू. महाराजांना मराठवाड्यात होणाऱ्या अन्नदानाबद्दल नेहमीच कौतुक असायचे. एवढा मोठा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी मनापासून सर्वजण अहोरात्र झटत होते.

प्रसाद घेऊन आम्ही दुपारच्या वेळी निघालो तेव्हा प.पू. महाराजांनी आठवणीने-'आता गाड्या पाठवू नको, हिंगोलीचे लोक ती सोय करणार आहेत' असे सांगितले.

तो भव्य दिव्य सोहळा पाहून घरी आलो. कितीतरी काळ त्याबद्दल आठवणी जागविल्या गेल्या.

त्यानंतर प.पू. महाराज सर्व मंडळींसह हिंगोलीला श्री देवडार्जींच्याकडे गेले. इथे येण्याची तारीखही निश्चित झाली होती. त्यामुळे आम्ही सर्वजण तयारीस लागलो. वैशाखातील ऊन व कार्यक्रमाची दगदग याचा प.पू. महाराजांना त्रास झाला असावा. त्यामुळे इथे येण्याआधीच्या दिवशी सकाळी हिंगोलीहून फोन आला की, 'प.पू. महाराजांची प्रकृती ठीक नाहीये, त्यामुळे पुढील सर्व दौरा रद्द करुन ते पुण्यास जाणार आहेत.'

त्यांच्या प्रकृतीबद्दल खूप काळजी वाटू लागली. त्यामुळे डॉ. दिलीप व सासूबाई लगेच हिंगोलीला गाडीने रवाना झाले. रात्री पोहोचेपर्यंत बराच उशीरा झाला होता. प.पू. महाराजांची हत्तीवरुन मिरवणूक संपून ते विश्रांतीसाठी निवासात रवाना झाले होते. डॉ. दिलीप त्यांना जाऊन भेटले. प्रकृतीची चौकशी केली. आजूबाजूच्या मंडळींकडे पाहून प.पू. महाराज म्हणाले, 'आता डॉक्टरसाहेब आम्हाला नेण्याकरिता आले आहेत. तेव्हा आम्हाला बीडला जावेच लागेल.' सर्वांना खूप आश्चर्य वाटले.

दुसरे दिवशी सकाळी पहाटेच प.पू. महाराजांच्या सोबत सर्व मंडळी गाड्यांनी बीडकडे येण्यासाठी निघाली. प.पू. महाराजांच्या गाडीवर श्री. देवडार्जींचे चिरंजीव चक्रधराचे काम करीत होते. परभणीत आल्यावर गाडी बिघडल्याचे लक्षात आले. तिथे माझी बहीण सौ. सुषमा व तिचे यजमान श्री. रमाकांत कुलकर्णी त्यांच्या दोन्ही कन्येसह रहात होते. बहीण प.पू. महाराजांच्या दर्शनासाठी बीडला पुढे आली होती. डॉ. दिलीपनी सर्वांना थोडावेळ विश्रांतीसाठी त्यांच्या घरी नेले तिच्या मुली लहानच होत्या. पण प.पू. महाराज घरी आले की त्यांना औक्षण करायचे हे त्यांना माहीत होते. त्यांनी

पाय धुवून-औक्षण करुन सर्वांना घरात बसविले. नंतर सासूबाईंनी सर्वांची अल्पोपहाराची सोय केली अन् गाड्या दुरुस्त झाल्यावर सर्वजण बीडला येण्यासाठी निघाले.

अगदी रणरणत्या उन्हात पूर्ण प्रवास झाला व दुपारी उशीरा सर्व गाड्या बीडला घरी येऊन पोहोचल्या. प.पू. महाराजांना व ती. सौ. आईसाहेबांना खुर्चीतून उचलूनच घरात आणले गेले. सर्वांना खूप आनंद झाला व श्री. डॉ. भातलवंडे व व. सौ. सुमनताई भोजनोत्तर लगेचच वैरागला रवाना झाले.

दुसरे दिवशी सकाळी प.पू. श्री. अशोक महाराजांनी त्यांच्या घरच्या देवांची- जे त्यांनी सोबत आणले होते, इथे पूजा केली अन् आमची वास्तु कृतार्थ केली. प.पू. महाराजांचे आरोग्यप्रीत्यर्थ येथील ब्रह्मवृंदानी पाठाची नवचंडी केली नंतर भोजन प्रसाद सर्वांना मिळाला. पाद्यपूजाही यथासांग संपन्न झाली.

यावेळी प.पू. महाराजांचे सोबत प.पू.आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज व त्यांच्या विहीणबाई, श्री. शरदभाऊ जोशी, श्री.अमोद कवीश्वर, श्री. सूरज तांबोळी, श्री. विद्याधर फडके,श्री. पटवर्धन आदि मंडळी होती. इतर काहीही कार्यक्रम नसल्यामुळे सर्वांशी निवांतपणे गप्पा झाल्या. खूप बरे वाटले. भोजनोत्तर त्याच दिवशी प.पू. श्री अशोक महाराज व सौ. सविता वहिनी देवासह पुण्यास गाडीने रवाना झाले.

सर्व मंडळी दुसरे दिवशी सकाळी येथून निघून वैरागला गेले व प.पू. महाराजांनी तेथून पुण्यास प्रयाण केले. हा कालावधी त्यांच्या उभयतांच्या प्रकृतीला खूप दगदगीचा पण सर्वांना खूप आनंद देऊन

गेला. इथे सुरु असलेल्या अयुतचंडीच्या पाठाच्या संदर्भात प.पू. महाराजांनी समाधान व्यक्त केले.

पुण्याला पोहोचल्यावर प.पू. महाराजांनी सविस्तर पत्र लिहिले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २५-५-९४

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आम्ही सर्व प्रवास आटोपून ईशकृपेने येथे सुखरुप परत आलो. प्रकृती बरी आहे. येथीलही वर्धापन कार्यक्रम तीन दिवसांचा ईशकृपेने व्यवस्थित पार पडला.

आपल्या घरीही नित्य देवीमाहात्म्य पाठ प्रार्थना चालू आहे. ही भगवतीचीच कृपा आहे. श्री देवी कृपेने तेही आपले संकल्पित कार्य व्यवस्थित पार पडेलच. काळजीचे कारण नाही. आपली सर्वांची श्रद्धाभक्ती सर्वांनाच मार्गदर्शक आदर्श आहे. इकडे सर्व ठीक आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

तब्येतीत थकवा जाणवत असला तरी प.पू. महाराज लगेच पत्र पाठवित व नेमक्या शब्दात सारे काही सांगून जात. वाचल्यानंतर कितीतरी काळ त्या समाधानाच्या लहरी मनात उठत. यावेळी झालेल्या प.पू. महाराजांच्या दर्शनाने व पत्ररुपी आशीर्वादाने

साधनाभ्यास व्यवस्थित होण्यास मदत होत होती. यामुळे यावेळी येणारे वेगवेगळे अनुभव त्यांना पत्राने कळविताना खूप आनंद होई. चि. मानसीची एस.एस.सी. एव्हाना पार पडली होती व पुढे कुठे शिक्षणासाठी ठेवावे याबद्दल संभ्रम होत होता. तसे प.पू. महाराजांना कळविले असता त्यांनी पत्रात लिहिले की---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २२-६-९४

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपली दोन्ही पत्रे मिळाली. कु.मानसीच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था बीडलाच झाली तर खाण्याची सर्व व्यवस्था चांगली राहून सर्वांचे लक्षही राहील. जसे जमेल तसे करावे.

श्री गुरुमहाराजांचे कृपेने आपला साधनाभ्यास व्यवस्थित सुरु आहे, तो नित्य व्हावा. त्यावेळी जे होईल सर्व ईशशक्तीचेच कार्य आहे. आपले जीवाचे कर्तृत्व तेथे काहीच नसते. या दृष्टीने प्राणायामादि क्रियाही ईशप्रेरणेनेच चालू होतात. आसनेही होतात. आपण तटस्थ साक्षीभावाने राहणे बरे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

आमची दोघांचीही प्रकृती बरी आहे. वैद्याचे औषध चालू आहे. डॉक्टरांचीही मध्ये मध्ये तपासणी होते. ईशेच्छेने प्रारब्धानुसार सर्व घडत आहे.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

हे पत्र आता वाचताना जाणवते की, चि. कु. मानसीस औरंगाबादला शिक्षणासाठी न ठेवता बीडलाच ठेवावे असे प.पू. महाराजांचे मत होते. याचा संदर्भ पुढे येईलच. पण पुढे होणाऱ्या अनर्थ घटनेस टाळण्याचा संकेत प.पू. महाराजांनी दिला होता. कदाचित प्रारब्धात होणाऱ्या घटना टळल्या गेल्या नसत्या म्हणून हा त्यांचा आग्रह लक्षात आला नाही.

साधनेच्या संदर्भात त्यांनी लिहिलेल्या गोष्टी वाचल्यावर अभ्यास व्यवस्थित होण्यास मदत होई व खूप बरे वाटे.

पुढे नोव्हेंबर ९४ म्हणजे दिवाळीच्या काळात आम्ही उभयता मुलांसह राजस्थानमध्ये उदयपूर, नाथद्वार, एकलिंगजी, माऊंटअबु व गुजराथमध्ये गरुडेश्वरला जाऊन आलो. आल्यावर प.पू.महाराजांना सविस्तर पत्र पाठविले. त्यावेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती. अशक्तपणा प्रचंड जाणवत होता. तरीही त्यांनी डिसेंबरमध्ये पत्र पाठविले. ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २७-१२-९४

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. प्रकृती बरी रहात नसल्यामुळे उत्तरास विलंब होतो. ईश्वराची इच्छा. असो.

आपला प्रवास, तीर्थदर्शन, स्नान वगैरे पुण्यकर्म घडले. चांगला योग आला.

प्रपंचात मध्ये-मध्ये सवडीने असा योग येणे कल्याणकारक आहे. तिकडील सर्वांचे क्षेम समजून संतोष झाला. येथेही आमची

दोघांची प्रकृती ठीक आहे. औषध, पथ्य, विश्रांती चालू आहे. कर्मभोग आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांच्या प्रकृतीची आताशा खूप काळजी वाटायची. त्यांचे पत्र लिहिणे थांबत नव्हते, पण आलेल्या पत्रातील हस्ताक्षरावरुन त्यांच्या अशक्तपणाची तीव्रता कळत असे. ते पाहिले की भडभडून येई. लगेच त्यांचे दर्शन घ्यावे असे वाटू लागे. लवकरच तसा योग आला. डॉ. दिलीपची कॉन्फरन्स मुंबईला होती व ते ती संपली की पुण्यात मुक्कामास येणार होते. त्याच दिवशी सकाळी मी पुण्यास पोहोचण्याचे ठरविले. दुपारी माझी मावसबहीण सौ. संध्या देशपांडे-देऊळगावकर हिच्याबरोबर श्री रेणुकानिवास मध्ये गेले. प.पू. महाराजांची प्रकृती खूपच अशक्त झाली होती. चेहरा पांढुरका झाला होता. स्पष्ट आवाज निघत नव्हता. त्यांनी पलंगावर त्यांचे शेजारी बसण्यास सांगितले.मला अजिबात अश्रू आवरेनात. मी त्यांच्या पायाशी बसले व थोडेसे बोलणे झाले की बाहेर निघून आले. एकतर त्यांना अधिक बोलण्याचा त्रास नको होता व मलाही त्यांना या अवस्थेत पहाणे जड जात होते.

आम्ही दोघीही सौ. सविता ताईशी बोलून चालत घरी निघालो. रिक्षा मिळाली नाही म्हणून जवळजवळ बालभारती पर्यंत चालत होतो. पुढे सौ. सविता वहिनींची भेट झाल्यावर त्यांनी सांगितले की,

'तुम्ही दोघीही घराच्या बाहेर पडल्यावर प.पू. महाराजांनी मला बोलावले व सुरेखाताई कुठे आहेत, त्यांना बोलवा मला त्यांना काही सांगायचं आहे'. सौ. सविता वहिनी म्हणाल्या 'मी सोसायटीच्या गेटपर्यंत म्हणजे गल्लीच्या तोंडाशी तुम्हाला बघायला आले पण तुम्ही दिसला नाहीत.'

खरं म्हणजे आम्ही चालत गेलो पण आमचे दुर्दैव- तो निरोप आमच्यापर्यंत पोहोचू शकला नाही. प.पू. महाराजांना काय सांगायचे होते हे कळू शकले नाही. घरी आल्यावर प.पू.महाराजांच्या प्रकृतीची अवस्था आठवून खूप गलबलल्यासारखे होई. अजिबात करमत नसे.

बीडपासून जवळच १२-१३ कि.मी. अंतरावर श्रीक्षेत्र नामलगाव हे गणपतीचे जाज्वल्य स्थान आहे. भ्रुशुंडी ऋषींना तेथे तपश्चर्येनंतर गणपती सारखी सोंड पाप्त झाली होती. तसेच तेथे तीन नद्यांचा संगमही आहे. प.पू. महाराज प्रवचनात बरेचदा ह्या आशापूरक गणपतीचा उल्लेख करीत व त्याचे दर्शनाने मनोरथ पूर्ण होतात असे सांगत. बीडला गावात एक अथर्वशीर्ष सहस्त्रावर्तने करणारे मंडळ आहे. ते सर्व साठ सदस्य व अठरा इतर ब्रह्मवृंद या सगळ्यांना घेऊन नामलगाव येथे दि. ८ जानेवारी १९९५ ला सहस्त्रावर्तन सोहळा संपन्न झाला. डॉ. दिलीपची बरेच दिवसांची इच्छा होती. प्रसादादि कार्यक्रम बीडला घरी करण्यात आला. दोन अडीचशे मंडळी जेवावयास होती. या सर्व कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत प.पू. महाराजांना पत्राने कळविला असता त्यांचे त्या संदर्भात पत्र आले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ९-२-९५

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. श्री डॉक्टरांची व सौ. आईंची भेट झाली. त्यांचेकडून आपली दक्षिणाही मिळाली. प्रकृती व उत्सवकार्य व्यग्रता यामुळे उत्तरास विलंब होतो. देवाची इच्छा.

नामलगावचा सहस्त्रावर्तनाचा कार्यक्रम उत्तम झाला. ईश्वरकृपेने आपणा सर्वांना सद्वासनेचा लाभ झाल्याने अशी पुण्यकर्मे आपणाकडून नित्य घडत राहून दुरितक्षय बुद्धी शुद्धि ही ईश्वरकृपा घडत आहे. पूर्वसुकृतही आहे.

आता आम्हाला वैद्यांचे औषध, विश्रांती आहे. ईशेच्छेने कर्मभोग संपून जाईल.

येथे आश्रमात दि. १२ ते १८ फेब्रुवारी श्री प.प. श्री लोकनाथतीर्थ महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव असून १८ तारखेस पुण्यतिथी आहे. १९-२० दोन दिवस पारायण व २१ तारखेस वर्धापन कार्यक्रम होऊन समाप्ती होईल.

सौ.ताई महाराज येथे आल्या. येथील कार्य आटोपून परवा जातील. जालन्याचा कार्यक्रम पुढील महिन्यात होईल.

यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांनी वरील पत्रात नमूद केल्याप्रमाणे पुण्यकर्मे, अर्चन, पूजा नित्य घडत जावी असे मनापासून वाटते. त्यांचे अस्तित्व आपले घरी पादुकांच्या रुपात असावे असे मनोमन वाटू लागले. त्याप्रमाणे त्या आकाराच्या चांदीच्या पादुका इथे तयार करुन घेतल्या. सासूबाई आधीच २४ जानेवारीच्या पुण्यतिथी महोत्सवास पुण्यास श्री वासुदेव निवास मध्ये जाऊन राहिल्या होत्या. डॉ. दिलीप येथून त्या पादुका घेऊन २७ जानेवारीस श्री वासुदेव निवास मध्ये पोहोचले.

२८ जानेवारीस सकाळी या पादुकांवर आश्रमातील पादुकां समवेत पंचामृताचा अभिषेक केला गेला. दुपारी प्रसादाचे भोजन झाले. अन्नदानही झाले. प.पू. महाराजांनी पादुकांना पदस्पर्श करण्यास नकार दिला. 'पादुका ह्या देवांच्या आहेत. त्याला आम्ही पदस्पर्श करु शकत नाही. मोठ्या महाराजांनी आम्हाला तशी परवानगी दिली नाही.' म्हणाले. प. पू. महाराजांची ही विनयशीलता व भक्तिभाव वर्णन करताना डॉ. दिलीपना गहिवरुन आले. इथे परत आल्यावर गुरुवारी त्या पादुका देवघरात आसनस्थ झाल्या.

देवघरात साधनेस बसले की, प.पू. महाराजांची निरंतर आठवण येते व पादुकांच्या रुपात त्यांचे सदैव दर्शन होत रहाते.

प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. महाराज व प.पू. सौ. ताई महाराज यांच्या वास्तव्याने ही वास्तू धन्यधन्य झाली आहे. त्यांचे हे दर्शनसुख इतके भरभरुन मिळाले की आयुष्यात याहून अधिक काहीच मागणे उरले नाही.

मार्च-एप्रिल १९९५ मध्ये प.पू. महाराजांचे काही काळासाठी मराठवाड्यात वास्तव्य झाले. प्रकृती तशी बरी होती. अर्थात अशक्तपणा जाणवत होता. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात त्यांचे बीडला रहाणे झाले. कार्यक्रम असा काहीच नव्हता. त्यांना फक्त विश्रांती मिळावी एवढाच उद्देश होता. त्यामुळे फारसे कुणाला कळविले गेले नाही. त्यामुळे घरात गर्दी पण झाली नाही.

दुसरे दिवशी त्यांना लातूरला नेण्यास काही साधक मंडळी आली. व.रघुनाथकाका व सर्वांना वाटले की, लातूरला जाण्याने प्रवासाची दगदग होईल. त्यामुळे प.पू. महाराजांना त्रास होईल. तेथे श्रीगणेशयाग चालू होता व त्याच दिवशी पूर्णाहुती होती. ठरविल्याप्रमाणे प्रत्येकजण जाऊन त्यांना 'आपण इथेच विश्रांती घ्यावी-लातूरला जाण्याने प्रवासाची जास्त दगदग होईल' असे सांगू लागले. प.पू. महाराज शांत बसले. थोड्या वेळाने त्यांनी डॉ. दिलीपना बोलावून घेतले व समजावणीच्या सुरात म्हणाले की, 'आपली काळजी आम्ही समजू शकतो-पण आम्ही तेथे गेलो नाहीतर पूर्णाहुती होणार नाही, देवाला नैवेद्य होणार नाही, देव मग उपाशी रहातील.' आम्हाला एकदम गहिवरुन आले. आम्ही लगेच त्यांच्या प्रस्थानाची तयारी केली. थोडासा फलाहार व फोडणीचे पोहे त्यांनी खाल्ले. दूध घेतले व त्वरेने ते लातूरकडे रवाना झाले. त्यांच्या युक्तीवादापुढे आम्हाला काहीच बोलता आले नाही.

पुढे पुण्याला पोहोचल्यावर त्यांनी पत्र पाठविले ते असे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १०-४-९५

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले कुशल पत्र मिळाले. आम्ही लातूर, खर्डा, बार्शीचा प्रवास आटोपून ४-५ दिवसांपूर्वी येथे आलो. लातूरला सुरु असलेल्या श्री गणेशयागाच्या पूर्णाहुतीच्या वेळीच आम्ही पोहोचल्याने सर्वांना समाधान झाले. बीडलाही दोन दिवस मुक्काम झाला. खर्ड्याला मात्र एक आठवडा मुक्काम झाला. तेथून पाडव्यास जेवण करुन संध्याकाळी मुक्कामास आम्ही बार्शीत पोहोचलो. तेथेच ३ एप्रिलला पू. पिताजींचे श्राद्ध करुन इकडे परत आलो.

सध्या प्रकृती बरी आहे. उन्हाळा बाधला नाही. येथे वैद्यांचे औषध, विश्रांती चालू आहे.

दि. १३ ते २८ पर्यंत येथे आश्रमात श्री प्रसाद पादुकांवर श्री. रघुनाथराव अतिरुद्राभिषेक व महारुद्रस्वाहाकार करणार आहेत. मोठे अनुष्ठान खर्चाचे आहे. रोज ११ दिवस ३३ ब्राह्मण आहेत. पुण्यवासना आहे. पूर्वसुकृत व ईश्वरकृपा आहे, म्हणून असे मोठे पुण्यकर्म त्यांचे हातून घडत आहे.

श्री. डॉ. दिलीपराव यांचाही मोठा संकल्प आहे. भगवतीच्या कृपेने ते पूर्ण होईल. उत्तम सत्कर्म करण्याची त्यांची इच्छा असून घरातील सर्वांचे त्यांना सहकार्य आहे.

पुढील वर्षांपर्यंत दहा हजार पाठ पूर्ण होऊन आयुष्यमान नारायणची मुंजही होणार आहे. त्यावेळीही आम्हाला सर्व पहाण्यास

मिळेल. पुन: दहा हजार पाठांचा संकल्प डॉक्टरांचा होईल. चांगले पुण्य आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद, कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

सौ. मंडळींची प्रकृती बरी आहे. इंजेक्शने चालू आहेत. कर्मभोग आहे. द.धु.क.

****

व्यवसायाच्या व्यापामुळे गुरुपौर्णिमेस पुण्यास जाणे होत नसे. एकट्या सासूबाईच कधीकधी जात असत. पण आता समाधान याचे होते की, प.पू. महाराजांच्या पादुकांचे घरात आगमन झाले होते, प्रतिष्ठापना झाली होती. त्यामुळे यावर्षी बीडला घरीच गुरुपौर्णिमेच्या दिवशी त्या पादुकांवर पंचसुक्त पवमानाचा अभिषेक व्हावा, मंगल पूजन व्हावे असा विचार ठरला. सर्व साधक मंडळी व जवळपासचे नातेवाईकांना निमंत्रणे पाठविली. सर्वजण आले. जवळपास २१ ब्राह्मण मंडळी जमली. सकाळची दवाखान्याची वेळ संपल्यावर शांतपणे दुपारी कार्यक्रम सुरु झाला. नव्यानेच पूजा होत असल्यामुळे ती संपन्न होण्यास साडेतीन चार तास लागले. त्यानंतर प्रसादाचे जेवण झाले. सगळ्यांना खूप समाधान वाटले.

त्यानंतर डॉ. दिलीप व सासूबाई पुण्यास प.पू. महाराजांचे दर्शनास जाऊन आले. प.पू. महाराजांनी पत्र पाठविले ते याप्रमाणे---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. ४-८-९५

मंगल आशीर्वाद वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. दक्षिणाही चि. अशोक कवीश्वरकडून आपण पाठविलेली मिळाली. प्रकृती बरी रहात नसल्याने उत्तरे वेळेवर लिहिली जात नाही. देवाची इच्छा आहे.

डॉ. दिलीपराव व सौ. सिंधूताई दोघांचीही भेट झाली होती. सर्वांचे, मुलाबाळांचे कुशल, अभ्यास वृत्त समजून संतोष झाला. सध्या डॉक्टरांचे सांगणेप्रमाणे प्रवास बंद झाल्यामुळे २-३ वर्षांपासून तुळजापूर-गाणगापूर यात्रा बंद आहे. कर्मभोग अपरिहार्य आहे. असो.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. आम्हाला दोघांनाही औषध, विश्रांती चालू आहे.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

वि. माघपर्यंत पाठ संख्या पूर्ण होईल. लगेच त्याची सांगता करुन पुढील अयुत संख्येचा संकल्पही करता येईल. चि. नारायणची मुंजही करता येईल. श्री रामनामाचा जप चालू आहे व चातुर्मास उपासही आहे. नियम पाळून जप होतो हे उत्तम आहे.

सर्व मुलांना मंगल आशीर्वाद. कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

यावर्षीच्या गुरुद्वादशीस वाडीस जावे असे आम्ही ठरवले. मुलांना ३-४ दिवस आधीच सुट्या लागल्या होत्या. गुरुद्वादशीचा उत्सव झाला की, दिवाळी गोव्यात करुन पुढे श्री गोकर्ण महाबळेश्वर-मुरुडेश्वर क्षेत्री दर्शन घ्यावे असा विचार होता. एकादशीस म्हणजे २० ऑक्टोबरला वाडीला पोहोचलो आणि आनंदाची गोष्ट म्हणजे प.पू. महाराज, प.पू. सौ. आईसाहेब, प.पू.सौ. ताई महाराज सर्वांचा मुक्काम श्री अमरेश्वरला होता. तेथील बांधकाम पूर्ण झाले होते. सर्वचजण तिथे रहाण्यास आले होते. अनपेक्षितपणे अलभ्य लाभ झाला. प.पू. सौ. आईसाहेबांची प्रकृती बरी नव्हती. त्या निजूनच होत्या. आम्ही दर्शनासाठी गेलो. 'मी सुरेखा बीडहून आलेय' असे त्यांना सांगितल्यावर त्या अंथरुणावरुन उठून बसल्या. माझा हात हातात घेतला. प्रेमळ नजरेने आमच्याकडे पाहिले. त्यांची अशी प्रकृती बघून खूप भडभडून आले. 'बस, इथेच माझ्या सोबत' म्हणून त्या आग्रह करु लागल्या. पण त्यांना बोलण्याचा त्रास होईल, बसण्याची दगदग होईल म्हणून त्यांना झोपवून-थोपटून आम्ही हळूच तिथून उठलो. प.पू. महाराजांचे वाडीमध्ये दर्शन घेतले व तिथेच मुक्काम केला.

गुरुद्वादशी २१ ऑक्टोबरला शनिवारी होती. त्यादिवशी सुंदर सजविलेल्या नावेमध्ये प.पू. सौ. ताईमहाराज व इतर भक्त मंडळी बसले. कृष्णेला वस्त्र अर्पण करण्याचा सोहळा होता. वाडीच्या तीरावरुन इतके अनुपम दृश्य दिसत होते. 'दिगंबराची' धून चालू होती. प.पू. ताई महाराज हात जोडून अंतर्मुख होऊन देवाकडे एकटक पहात असलेल्या दिसल्या. जणू समाधी अवस्थेतच होत्या

त्या. वाडीच्या तीराला नावा लागल्या. कृष्णेच्या पात्रात असताना साड्या गुंडाळल्या जात होत्या. दोन्ही तीरामधल्या अंतराइतक्या मापाच्या साड्या आणल्या गेल्या.

तीरावर उतरल्यावर मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत सुरेख मिरवणूक निघाली. सगळ्याजणी फुगड्या, टाळ वाजवित, गाणे म्हणत, हळदीकुंकवाचा सडा शिंपडीत मिरवणूकीत सामील झाल्या होत्या. आम्हाला तर हे सगळे अनपेक्षित व नवीन होते. प.पू. सौ. ताई महाराज, प.पू. सौ. सविताववहिनी व सगळ्या भगिनींचा सहभाग अवर्णनीय असा होता. मुक्कामाच्या ठिकाणी पोहचल्यावर सर्व सुवासिनींसाठी हळदी-कुंकवाचा, प्रसादाचा कार्यक्रम झाला. कृष्णेला अर्पण केलेल्या प्रसादाच्या साड्या वाडीकर सुवासिनींना हळदी कुंकू ओटी घेऊन घरोघरी नेऊन देण्यात आल्या. अतिशय दुर्मिळ व अप्रतिम सोहळा आमच्या पहाण्यात आला.

दुसरे दिवशी २२ ऑक्टोबरला श्रीक्षेत्र अमरेश्वरी प.पू. महाराजांच्या दर्शनासाठी आम्ही गेलो व श्री. माधवराव तांबोळी काकांनी प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताई महाराज व प.पू. महाराजांची पूजा केली. त्यांच्या मस्तकावर चांदीचे बिल्वपत्र वाहीले. अगदी चंद्रमौळी सारखे दिसत होते महाराज !

आम्ही दर्शन घेतले. 'गुरुद्वादशीची प्रतिवार्षिक वारी करत चला.' असे प.पू. महाराज म्हणाले. आम्ही पुढे सांगितले की, मुलांना घेऊन दोन-चार दिवसांसाठी गोव्यात जात आहोत. पुढे श्री क्षेत्र गोकर्णाचे दर्शन घ्यावे असा मानस आहे. ते 'बरे आहे.' म्हणाले, 'पण यापुढील दिवाळी-लक्ष्मीपूजन घरीच करीत चला'

असे त्यांनी सांगितले. 'येताना धारवाडला जाऊ का ?' असे विचारले असता 'नको' असे त्यांनी सांगितले. या त्यांच्या दोन्ही गोष्टींचा उलगडा प्रवास पूर्ण झाल्यावर झाला.

येताना धारवाडला न गेल्याने अलमट्टीच्या पुढे संध्याकाळीच आमची गाडी बंद पडली. जर धारवाडला गेलो असतो, जे मुख्य रस्त्याच्या तीस कि.मी. आत होते. तर हा प्रसंग रात्री उशीरा कुठेतरी रस्त्यात झाला असता. गाडी दुरुस्तीस वेळ लागल्यामुळे रात्री विजापुरात लॉजमध्ये मुक्काम करावा लागला.

या दिवाळीच्या आधी पाच-सात वर्षांपासून प्रत्येक सुट्टीत आम्ही मुलांना घेऊन बाहेर जात असू. ती. काका व सासूबाई, डॉ. दिलीपचे धाकटे भाऊ श्री. शाम हे बीडलाच रहात. त्यांचेकडे दिवाळीसाठी रहायला जायचे. प.पू महाराजांनी ह्या दिवाळीच्या आधी 'पुढच्या दिवाळीपासून घरीच थांबत जा' असे सांगितले अन् पुढच्या म्हणजे १९९६ च्या दिवाळीच्या आधीच म्हणजे ३० सप्टेंबरला श्री. शामचे अकस्मात निधन झाले. पुढचे भविष्य प.पू. महाराजांना ज्ञात होते. त्यामुळे त्यांनी असे उद्‌गार काढले असावे.

त्यावर्षीच्या दिवाळीत अमावस्येला अनायासे समुद्रस्नान झाले. श्री क्षेत्र गोकर्णाचे व्यवस्थित दर्शन झाले. श्री मुरुडेश्वरला मुक्काम करुन तिथल्या भव्य मंदिराची शोभा पाहिली. दाक्षिणात्य मंदिरातील शुचिता व स्वच्छता वाखाणण्याजोगी असते. एकंदर प्रवास व्यवस्थित झाला. परत आल्यानंतर प.पू. महाराजांना सवयीप्रमाणे सविस्तर पत्र लिहिले. त्यांचे पण पत्र मिळाले. ते याप्रमाणे होते---

॥ श्री दत्त ॥

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. २७-११-९५

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपले व कु. मानसीताईचे पत्र मिळाले. आपले संपूर्ण यात्रावृत्त समजून समाधान वाटले. प्रपंच सांभाळून मध्ये मध्ये अशी तीर्थस्थाने पहावीत. कार्यक्रम सवडीने ईशकृपेने घडल्यास दुरितक्षय होऊन जाऊन कल्याण होते. आपली सगळ्यांची श्रद्धा भक्ती आहेच.

कु. मानसीताईस मंगल आशीर्वाद. तिचा अभ्यास सध्या तेथेच चालू आहे. बरे आहे.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद. खर्ड्यास चालू असलेल्या महोत्सवास निमंत्रण होते. पण प्रवास तूर्त नको असे डॉक्टरांनी सांगितल्यामुळे ते जाणे रहित केले. दोघांची प्रकृती बरी आहे. औषधे/विश्रांती चालू आहे.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

चि. नारायणला आता आठवे वर्ष सुरु झाले होते. त्यामुळे मौंजीसाठीचे हे योग्य वय होते. अयुतचंडीचे पाठही बरेच झाले होते. या यागाचा सांगता समारोह व चि. नारायणच्या मौंजीचा मुहूर्त जवळ जवळ असावा म्हणजे प.पू. महाराजांना बीडला येणे सोयीचे होईल. असे वाटत होते. त्याप्रमाणे नियोजन चालू होते. परगावची ब्राह्मण

मंडळी घरी इथे मुक्कामास येऊन दररोज दोन पाठ करुन पाठसंख्येची पूर्तता करण्यासाठी हातभार लावत होती. त्यामुळे कधीकधी दररोज ५० पाठसंख्या होत असे.

मौंजी बद्दल दोन्हीही आजींमध्ये उत्साह पसरला होता. त्यांची त्यांच्यापरीने तयारी जोरात सुरु होती. प.पू. महाराजांनी पण मौंजीस व यज्ञास येण्याचे कबूल केलेले असल्यामुळे सगळ्यांमध्ये खूप समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. पुन्हा एकदा प.पू. महाराजांचे पाय या वास्तुला लागणार ही बाबच रोजचा दिवस धन्य करणारी होती.

जानेवारी ९६ मधील पुण्यतिथीचा कार्यक्रम आटोपून सासूबाई बीडला परत आल्या. 'प.पू. महाराजांची विश्रांती चालू आहे' असे म्हणाल्या. पुढे लगेचच काही दिवसात सौ. भोपटकर मावशींचा फोन आला की, 'प.पू.महाराजांची प्रकृती खूप बिघडली आहे. ३-४ दिवस ते बेशुद्धच होते.' आम्हाला खूपच धक्का बसला. खूप काळजी वाटू लागली. काहीच सुचेनासे झाले. त्वरित आम्ही तिघेही-मी, डॉ. दिलीप व सासूबाई पुण्यात रेणुका निवास मध्ये त्यांच्या दर्शनासाठी गेलो. आम्हाला समजून तिथे पोहोचेपर्यंत त्यांना थोडे बरे वाटू लागले होते. अर्थात दर्शनाला येणाऱ्यांची रीघ लागलेलीच होती. आमचे संध्याकाळी दर्शन झाले. त्यांच्या खोलीतच ते बसले होते. सोबत वे. कृष्णाशास्त्री आर्विकरही होते. आम्हाला पाहून प.पू. महाराजांनी 'याऽऽ' असे स्वागत केले व वे. कृष्णाशास्त्रींच्याकडे वळून म्हणाले, 'यांचे येथील श्री अयुतचंडी यागाचा सांगता समारंभ पुढच्या महिन्यात करावयाचा आहे. येणे कसे जमते ते पहा' आम्ही तर थक्कच झालो.

पुढे ते म्हणाले की, 'आमची प्रकृती अशी अशक्त झाली आहे. मौंजीचे कसे.' आम्ही क्षणाचाही विलंब न लावता म्हणालो, की, 'महाराज आपल्याला यत्कींचितही त्रास न होता जर आपण म्हणत असाल तर चि. नारायणचे मौंजीबंधन इथे आपणासमोर झाले तर बरे होईल. आपणच त्याला गायत्रीचा उपदेश द्यावा, अशी आमची इच्छा आहे.'

प.पू. महाराज म्हणाले, 'पण मौंजीला उपस्थित रहावे असे सर्वांना वाटेल. मंडळीही बरीच आहेत. इथे व्यवस्था होणे शक्य होणार नाही. कसे काय करावे ?' मी लगेच म्हणाले, 'महाराज आपल्याला अजिबात त्रास होऊ नये अशीच आमची इच्छा आहे.फक्त त्याच्या आजोबांना - ती. आण्णाकाकांना बोलावून अगदीच शक्य झाले तर इथे श्री रेणुका निवासच्या अंगणात आपण त्याच्यावर अक्षदा टाकून त्याला गायत्रीचा उपदेश द्यावा.' प.पू. महाराजांनी थोडे थांबून 'ठीक आहे-इथे वासुदेव निवासमध्ये मौंज होईल. इथून लगेच गेले की यज्ञाच्या सांगता समारोहास सुरुवात करुन समाप्तीस सर्व मंडळींना येता येईल. यज्ञाचा प्रसाद घेऊन बटूचेही दर्शन होईल. फक्त फार थोड्याच मंडळींना श्री वासुदेव निवासमध्ये येणे सोयीचे होईल.' चि. नारायणची रास वृश्चिक आहे, असे सांगितल्यावर लगेच बोटावर मोजून प.पू. महाराज म्हणाले, 'बटूला गुरुबळ-चंद्रबळ चांगले आहे. फेब्रुवारीची २२ तारीख मौंजीसाठी निश्चित करावी' व अयुतचंडीच्या सांगतेचीही तारीख वे. कृष्णाशास्त्रींना विचारुन सर्व सोयीप्रमाणे २४ ते २८ फेब्रुवारी १९९६ ही निश्चित करण्यात आली.

प्रकृती अस्वास्थ्यामुळे शक्य नसले तरी चि. नारायणची मौंज त्यांच्या समोर श्री वासुदेव निवासमध्ये करण्याचे प.पू. महाराजांनी ठरविले. आमच्या आयुष्यातील परमभाग्याचा तो क्षण होता. चि. नारायणचे तर कल्याणच होते. आम्ही अतिशय आनंदाने खोलीबाहेर पडलो व प.पू. सौ. आईसाहेबांच्या दर्शनासाठी त्यांच्या खोलीत गेलो. त्यांची प्रकृती बरी होती. ति. सौ. सासूबाईंनी सगळी बोलणी त्यांच्या कानावर घातली. त्यांनाही नणंदेची थट्टा करण्याची लहर आली असावी. 'काय सिंधूताई ! महाराज महाराज काय करताय ! चांगलं एकुलत्या एक नातवाची मौंज आहे. दारात भव्य मंडप घालायचा. जोरदार वाजंत्री लावून भिक्षावळ मिरवायची. ते सोडून इथे महाराजांच्या समोर मौंज करण्याचा आग्रह काय धरुन बसलाय ?' आम्ही पण म्हणालो, 'आपण उभयतांनी अक्षदा टाकून आशीर्वाद दिलात की तो त्याला जन्मभर पुरेल. बाकी काहीही नको.' मग त्या मधाळ हसल्या. त्यांनी लगेच केळवण करुन आहेर केला. दुसरे दिवशी आम्ही पुण्याहून निघालो.

घरी आल्यानंतर सर्वांना ही बातमी सांगितली. श्री वासुदेव निवासमध्ये नित्य व नैमित्तिक उत्सवाखेरीज मौंजी-लग्नाचे कार्यक्रम पाहिले नव्हते. पण हा सुयोग प.पू. महाराजांच्या आशीर्वादाने घडून येणार होता. आम्हा सर्वांना खूप खूप आनंद झाला होता.

२१ फेब्रुवारीस देवब्राह्मण करुन संध्याकाळ पर्यंत पुण्यात पोहोचायचे. दुसरे दिवशी म्हणजे २२ तारखेस सकाळी देवक बसवून, मातृभोजन सोहळा झाल्यावर मौंज संपन्न होईल व त्यानंतर सर्व विधी झाल्यानंतर रात्री बीडला परत यावयाचे. दुसरे दिवशीच्या विश्रांतीनंतर

२४ तारखेस सकाळी श्री गणपती अथर्वशीर्षाची सहस्त्रावर्तने, त्यानंतर २५, २६, २७ व २८ ला अयुतचंडी याग व पुर्णाहुती असे कार्यक्रम ठरविण्यात आले. वे. कृष्णाशास्त्रींचे आगमन २३ तारखेस संध्याकाळपर्यंत होणार होते.

असे सगळे व्यवस्थित ठरले गेले. प.पू. महाराजांनी प.पू. अशोक महाराजांना मौंजीच्या व्यवस्थेच्या संदर्भात एक पत्र बीडला पाठविण्यास सांगितले. त्यांचे आज्ञेनुसार प.पू. अशोक महाराजांनी सविस्तर पत्र 'श्री रेणुका निवास'मधून पाठविले, ते याप्रमाणे होते---

॥ श्री दत्त ॥

'श्री रेणुका निवास' पुणे-१९
दि. १५-२-९६

श्रीमान डॉ. दिलीपराव
सप्रेम सादर निवेदन

प.पू. महाराजांची प्रकृती आता सुधारत आहे. आपणास पू. महाराजांनी पुढील गोष्टींची आठवण करण्यास सांगितले आहे.

१) येताना आपल्या उपाध्यायांना ज्योतिषशास्त्र दृष्ट्या नीट मुहूर्त विचारुन त्यांना बरोबर घेऊन यावे.

२) येताना मुंजीसाठी लागणारी सामग्री (दर्भ, मुंज वगैरे) आणण्यास आपल्या उपाध्यायांना सांगावे. आपण इथे आदल्या दिवशी संध्याकाळी आल्यावर सामानासाठी कदाचित ते वेळेवर आणण्यास वेळ मिळणार नाही.

३) आपले इथले मौंजीबंधनाचे कार्य पार पडल्यावर आपल्याबरोबर प.पू. सौ. ताई महाराज बीडला येतील. आपल्या तेथील यज्ञाची सांगता झाल्यावर त्या तेथूनच जालन्याला जातील. असा पू. महाराजांनी निरोप दिला आहे. बाकी सर्व ठीक आहे. प्रत्यक्ष भेटीअंती बोलूच!

सौ. सिंधूताई, सौ. डॉ. सुरेखाताई आणि चि. नारायण यांना मंगल आशीर्वाद. कळावे,

श्री गुरु आज्ञेवरुन<br>
अशोक कवीश्वर

प.पू. महाराज सत्यवचनी आहेत हे दृढ झाले. त्यांनी मागील पत्रात चि. नारायणच्या मौंजीला उपस्थित रहाण्याचा मानस व्यक्त केला होता आणि व्यक्तिगत अडचणी व प्रकृतीकडे लक्ष न देता त्यांनी चि. नारायणची मौंज श्री वासुदेव निवासात करण्याचे योजिले जेणेकरुन प.पू. गुळवणी महाराजांचेही दर्शन होईल आणि घडलेही तसेच.

मौंजीची तिथी ठरल्यानंतर श्री रेणुका निवास मधून आम्ही श्री वासुदेव निवास मध्ये दर्शनासाठी गेलो होतो. तिथे कार्यालयात सर्व नमूद केले. त्यांनी सांगितले की, 'तुम्ही श्री वासुदेव निवासमध्ये उतरु शकाल पण मौंज श्री वामन निवास मध्ये करावी लागेल.' डॉ. दिलीप म्हणाले की, 'जशी प.पू. महाराजांची आज्ञा होईल, त्याप्रमाणे घडेल. आम्ही त्यांच्या आज्ञेबाहेर नाहीत.' प.पू. महाराजांच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यांनी रघुनाथराव काकांना बीडला पत्र पाठवून 'मुक्काम व मौंजीचे व सर्व आन्हिक श्री वासुदेव मध्येच होतील. याविषयी संभ्रम नको !' असे कळविण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मौंज २२ फेब्रुवारीस सकाळी अकरा वाजता श्री वासुदेव निवासमध्ये करण्याची प.पू. महाराजांची आज्ञा झाली.

आम्ही २१ तारखेस सकाळी बीडला देवब्राह्मण आटोपून घरातील सर्व लहान-मोठी मंडळी मिळून १८-२० जण एक मोठी गाडी व एक छोटी गाडी घेऊन रात्री अंमळ उशीराच मुक्कामास पोहोचलो. प.पू. महाराजांनी वाट पाहिल्याचे कळले. रात्री वरच्या मजल्यावर निजानीज झाली. डॉ. दिलीपनी पहाटे तीनलाच आम्हाला उठविले. कारण त्यांना एक भव्य स्वप्न पडले होते. स्वप्नात 'चि. नारायण मौंजीसाठी देवासमोर उभा आहे. समोर अंतरपाटाआड डॉ. दिलीप पाटावर बसले आहेत. त्यांना देवासमोरील हॉलच्या उजव्या बाजूच्या दरवाज्यातून प.पू. गुळवणी महाराज आत येताना दिसू लागले. त्यांनी घाईघाईने स्वतः उठून त्यांना प.पू. दत्तमहाराजांच्या शेजारच्या आसनावर बसवले. प.पू. महाराजांनी छान स्मित केले अन् स्वप्न अंतर्धान पावले...'

आम्हा सर्वांना खूप आनंद झाला. म्हणजे आता प.पू. गुळवणी महाराजही आशीर्वाद देण्यासाठी इथे अस्तित्वात आहेत ही खूप परमसुख देणारी गोष्ट नारायण साठी भाग्याचीच होती. सकाळी सर्वांनी आन्हिक आटोपले. लवकरच मी, डॉ. दिलीप व सौ. सासूबाई प.पू. महाराजांचे घरी अक्षदा घेऊन आमंत्रण देण्यासाठी गेलो. प.पू.महाराज, प.पू. सौ.आईसाहेब, प.पू.सौ. ताईमहाराज व घरातील इतर सर्वांना अक्षदा देऊन, चांदीच्या वाटीत मोत्यांची अक्षदा प.पू.महाराजांचे समोर ठेवली. हस्तलिखित पत्रिका समोर ठेवली.

चि. नारायणच्या मौंजी संदर्भात प.पू. महाराजांच्या आज्ञेवरुन श्री. रघुनाथराव काकांनी लिहिलेले पत्र---

॥ श्री गुरुःशरणम् ॥

१२, मातृकृपा
९६२, सदाशिव पेठ
दि. २९-१-९६

डॉ. दिलीप यास,

सादर सप्रेम निवेदन,

ठरल्याप्रमाणे मुंजीबंधन दि. २१ रोजी होणार परंतु श्री वासुदेव निवासात होणार. आपल्या आरंभीच्या इच्छेप्रमाणे श्री वासुदेव निवासातच होणार ! बाकी काही फरक नाही. विचार व काळजी करण्याचे कारण नाही.

श्री. प्रभाकरपंतांना सादर नमस्कार, सौ. सिंधूताईंना नमस्कार, सौ. सुरेखास आशीर्वाद, कु.मानसी, प्राजक्ता, नारायण यांना गोड आशीर्वाद.

क. आ. रघुनाथ

****

सर्वांना मौंजीसाठी व भोजनाचे निमंत्रण देऊन श्री वासुदेव निवासमध्ये परतलो. तोपर्यंत आमच्या उपाध्यायांनी देवप्रतिष्ठेची मांडामांड केली होती. देवक बसविण्याचा सर्वविधी संपन्न झाला. मातृभोजनाचा थाट करण्यात आला. सर्व बटूंना आमंत्रण देऊन व्यवस्थित पंगतीची सजावट वगेरे करण्यात आली होती. प.पू. सौ. आईसाहेबांनी स्वत: मातृभोजनाच्या पंक्तीसाठी गाणे म्हटले. मला तर स्वर्गसुखाचा अनुभव येत होता. आज खरेच गरुकृपांकित चि. नारायणला जन्म देऊन धन्य झाल्याचे जाणवले. प्रत्यक्ष

लक्ष्मीनारायणांची उपस्थिती या मौंजीत होती. प.पू. गुळवणी महाराज, प.पू. दत्त महाराज अन् इतर सर्व साधक मंडळी- सर्वांत सौख्याचा क्षण होता तो !---

प.पू. महाराजांची प्रकृती बरी नव्हती. खूपच अशक्तपणा आलेला होता. ते घरुन गाडीतून आले व आश्रमाच्या दरवाज्यापासून देवघराच्या हॉलमध्ये त्यांना खुर्चीतून उचलून आणले व ते आसनस्थ झाले. ती. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताई महाराज, व. सौ. सविता वहिनी, व. सौ. अनिता वहिनी, व. सौ. सुलभाताई व इतर मंडळी स्थानापन्न झाली. तेवढ्या गडबडीत प.पू.सौ.आईसाहेबांनी खिडकीतून उभे राहून मला 'सावकाश जेव, घाई करु नकोस !' - मुंज्याच्या आईने अक्षदा टाकायच्या नसतात ना'... अशा सूचना दिल्या.

मंगलाष्टक संपन्न झाली. पूर्ण हॉल जेमतेम भरला होता. प.पू. महाराजांना अक्षदांची चांदीची वाटी दिली. त्यांनी चि. नारायणवर अक्षदा टाकल्या. नंतर त्याला जवळ बसवून मस्तकावर अक्षदा टाकल्या. त्याला सोवळे, उपरणे व सोन्याची अंगठी दिली. आम्हा सर्वांना आहेर केले. डॉ. दिलीपनी सर्वांना आहेर केले. प.पू. महाराजांच्या बोटात अंगठी घातली. प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताई महाराज, सौ. सासूबाई, सौ. आई (माझी) यांना आहेरासोबत सौभाग्यवायन म्हणजे मणी मंगळसूत्र, जोडवे, करंडा इत्यादी गोष्टी अर्पण केल्या. सौ. सासूबाईंनी प.पू. सौ. आईसाहेबांना हातातील सोन्याचे तोडे दाखवून 'सुरेखानी मला मौंजीच्या निमित्ताने तोडे केलेत' असे सांगितले. प.पू सौ. आईसाहेबांनी मला समोर बसवून घेतले. माझ्या चेहऱ्यावरुन हात फिरविला, व गोड हसून म्हणाल्या, 'नावाप्रमाणेच सुरेख आहेस हो !' मला कृतार्थ

झाल्यासारखे वाटले. जीव ओवाळून टाकावा असे कौतुकाचे बोल होते ते !

सर्वजण जेवावयास बसले. आग्रह सुरु झाला. प.पू.महाराजांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांना खुर्चीतून उचलून गाडीपर्यंत नेले गेले. आम्ही सर्वजण बाहेरच्या द्वारापर्यंत पोहचविण्यास गेलो. गाडीत चढण्यापूर्वी प.पू. महाराज म्हणाले, 'चि. बटूसाठी गायत्रीमंत्र हाच जपाचा मंत्र आहे. कल्याण आहे. तो नित्य करावा.'

प.पू. महाराज श्री रेणुकानिवासमध्ये परतले. प.पू. सौ. आईसाहेब, प.पू. सौ. ताईमहाराज यांची सर्वांची पंगत स्वयंपाक घराच्या बाजूच्या खोलीत बसली.प.पू. सौ. आईसाहेबांसाठी घरुनच दशमी आणलेली होती. सर्वांचे हसत खेळत गाणी म्हणत पंगत झाली.

निघताना प.पू. महाराजांच्या प्रकृतीबद्दल चर्चा सुरु असताना प.पू. सौ. आईसाहेब अस्वस्थ झालेल्या दिसल्या. सासूबाई म्हणाल्या, 'आईसाहेब, काही काळजी करु नका. प.पू. महाराजांनी बीडला असताना एकदा सांगितले आहे की, 'आपण असताना त्यांना काहीही त्रास होणार नाही.' प.पू. सौ. आईसाहेबांनी सासूबाईंचा हात हातात घेतला व म्हणाल्या, 'माझ्या डोक्यावर हात ठेवून सांगा की, ह्यांच्या आधी मीच जाणार. तुम्ही सवाष्ण आहात..' वातावरण थोडेसे गंभीर झाले. प.पू. सौ. ताईमहाराज लगेच म्हणाल्या, 'जाण्याच्या काय गोष्टी करताहात आईसाहेब... आम्हाला तुम्ही दोघेही जण खूप काळासाठी हवे आहात...'

सर्वजणी श्री रेणुका निवासमध्ये जाण्यासाठी निघाल्या. निरोप दिले, घेतले गेले. आम्ही श्री वासुदेव निवासच्या वरच्या हॉलमध्ये

परतलो. मौंजीचे सर्व आन्हिक पार पडले व संध्याकाळी पुण्याहून निघून रात्री उशिरा आम्ही बीडला पोहोचलो.

दुसरे दिवशी थोडी विश्रांती होती. परगावचे सर्व ऋत्वीज संध्याकाळपर्यंत पोहोचले. मौंजीनिमित्त आलेली मंडळी राहिली. व यज्ञासाठी येणारे पाहुणे हळूहळू येऊ लागले. प.पू. ताईमहाराज, व. श्री अनिलराव, व. सौ. अनिताताई, व. चि. कु. रमा यांचे सह पुण्याहून इथे यावयास निघाले. प.पू. महाराज त्यांना बाहेरच्या गेटपर्यंत हळू हळू चालत येऊन निरोप द्यावयास आले. रात्रीपर्यंत ही सर्व मंडळी पोहोचली. घर अगदी भरुन गेले.

सोलापूरहून वे.राजाभाऊ ल. जोशी पण येऊन पोहोचले. दुसरे दिवशी सकाळीच वे. देविदास राव धर्माधिकारी, वे. देवधरसर, त्यांचे चिरंजीव श्री. गिरीश देवधर सर्वजण येऊन पोहोचले. सगळेजण आले. सगळीकडे आनंद भरुन होता. प.पू. महाराज व प.पू.सौ. आईसाहेबांची उणीव मात्र तीव्रतेने भासत होती. अर्थात प.पू. सौ. ताईमहाराजांच्या रुपाने घरात चैतन्य वास करीत होते. त्या अगदी शांतपणे-एकाग्रतेने जप करीत बसलेल्या असायच्या.

खाली अंगणात शेडमध्ये यज्ञवेदीचे बांधकाम करण्यात आले. चहूबाजूंनी फुलांच्या माळा व पताका लावण्यात आल्या. आंब्याच्या पानांचे तोरण सुशोभित करीत होते. यज्ञमंडपात दोन आसने घातली गेली. एका आसनावर प.पू.महाराजांची मोठी प्रतिमा ठेवण्यात आली. प.पू.सौ. ताईमहाराज यज्ञ मंडपात आल्या. त्यांनी प.पू. महाराजांना नमस्कार केला व दुसऱ्या आसनावर न बसता त्या यज्ञमंडपाला लागून असलेल्या खोलीत-ज्याच्या खिडकीतून यज्ञवेदी स्पष्ट दिसत होती. तिथे एका साध्या लाकडी टेबलवर कोणतेही आसन न घालता

बसल्या. पाठीला टेकण्यासाठीही काही घेतले नाही. तिथून त्या एकाग्रपणे संपूर्ण यज्ञमंडपाचे निरीक्षण करु शकत होत्या. अशा अवघड स्थितीत त्या रोज त्याच जागी पूर्ण वेळ बसून रहात असत. हातात जपाची माळ असे व दृष्टी एकाग्रतेने ध्यानात लागलेली वाटे. त्यांच्या अस्तित्वाने समोरच्या उपचारातील न्यूनाधिक दोष नष्ट होत असावेत.

वे.श्री. रा.ल. जोशीकाकांनी पूर्णाहुतीच्या आधीच्या दिवशी 'यज्ञसंस्थे'वर व्याख्यान दिले व श्रोत्यांना या संदर्भातील अधिक माहिती मिळाली. प.पू. महाराजांचे प्रत्यक्ष अस्तित्व तिथे होतेच. त्यामुळे सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. सर्व ब्रह्मवृंदही समाधान पावले. कार्यक्रम आटोपल्यावर प.पू. सौ. ताईमहाराज जालन्यास गेल्या व व. श्री अनिलराव, व. सौ. अनिता वहिनी व कन्यका पुण्यास रवाना झाले. या यज्ञ समाप्तीनंतर वे. श्री. कृष्णाशास्त्री आर्वीकरांनी दुसऱ्या अयुतचंडीचा संकल्प केला जी पुढे प.पू. शंकराचार्य (क्षेत्र करवीर पिठ) यांचे उपस्थितीत सन २००७ मध्ये संपन्न झाली.

येथील कार्यक्रम सानंद संपन्न झाल्यावर प.पू. महाराजांना पत्र पाठविले. त्यांचेही लगेचच पत्र आले, ते असे...

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. ७-४-९६

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. सौ. सुरेखाताईंचेही मिळाले. अयुतचंडीची सांगता निर्विघ्न व्यवस्थित भगवतीचे कृपेने पार पडल्याचे समजून समाधान वाटले.

दुसरा अयुतचंडीचा संकल्पही झाला. बरे झाले. गडबड न होता स्वस्थपणे सोयीस्कर कार्य होणेचे दृष्टीने बरे आहे. एकदम लक्षचंडीचा हिशोब ठेवून एकदम सांगता करणे पाच दिवसात होणार नाही. गडबड होईल. या दृष्टीने असेच थोडे थोडे करणे बरे असे वाटते.

आमची दोघांची प्रकृती बरी नसल्याने यावेळी शरीराने जरी आम्हाला उपस्थित रहाता आले नाही तरी मनाने आम्ही तेथेच होतो.

आपणासारख्या धर्मश्रद्धाळू ईशभक्तांचे कडून होणारे पुण्यकर्म मुद्दाम पहाणेकरिता अवश्य जावे म्हणजे पापक्षय होऊन कल्याण होते.

घरातील सर्व मंडळींची धर्मश्रद्धा अनुकरणीय आहे. इतरांनाही मार्गदर्शन होते. आपणाकडे अन्नदानही बरेच झाले हे मुख्य आहे.

सर्वही मंडळीस यथोचित नमस्कार व आशीर्वाद. चि. नारायणची मुंजही बरी आटोपली. बरे झाले. त्याला व इतर सर्व लहानांना मंगल आशीर्वाद.

आमची प्रकृती हळूहळू सुधारत आहे. कर्मभोग आहे.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

चि. नारायणचा जन्मच प.पू. सौ. आईसाहेब व प.पू. महाराजांच्या संकल्पातून झाला होता. त्याचे मौंजीचे संस्कार त्या उभयतांसमोर व्हावेत व त्याला गायत्री मंत्र त्यांचेकडून प्रदान व्हावा हीच आम्हा उभयतांची इच्छा होती. त्यातच आयुष्याचे सार्थक आहे.

त्यामुळे त्याची मौंज बरी काय-अगदी उत्तमच झाली. प.पू. महाराजांनी मागील पत्रात दिलेले वचन पाळले. प्रकृती बरी नसतानाही ते मौंजीला 'श्री वासुदेव निवास'मध्ये आले. आशीर्वाद दिले अन् आम्हा सर्वांना कृतार्थ केले. सद्भाग्य याहून वेगळे काही असूच शकत नाही.

मध्यंतरी त्या उभयतांची प्रकृती अधूनमधून बरी नसल्याचे कळायचे. प.पू. सौ. आईसाहेबांना मधुमेहामुळे त्रास व्हावयचा सर्वांगाला कंड सुटायचा. त्यांना खूप सहन करायला लागायचे. पुण्याला रेणुका निवासमध्ये भेटीसाठी गेलो की आल्यावर करमत नसे. त्यामुळे पत्र पाठवूनच क्षेम कुशल जाणून घेत असू.

मोठा अश्वत्थ वृक्ष असलेली शहराच्या मध्यवर्ती ठिकाणावरची जागा-तो अश्वत्थ वृक्ष प.पू. महाराजांनी पत्राद्वारे केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे काढून त्या समिधा वे. सेलुकर महाराजांच्या गंगाखेडच्या आश्रमात पाठविल्या. आता त्याचा रस्ता मोठा झाल्याने त्या जागेला व्यवस्थित किंमत आली व तेथे 'पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचे' मुख्य ऑफिसची इमारत झाली. ते सर्व प.पू. महाराजांना पत्राद्वारे कळविले असता त्यांचेही पत्र आले, ते याप्रमाणे---

**।। श्री दत्त ।।**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. २४-८-९६

मंगल आशीर्वाद, वि. क्षेम

आपले पत्र मिळाले. कुशल वृत्त समजून समाधान वाटले. आमची दोघांचीही प्रकृती बरी नसल्याने उत्तरास वेळ होतो. कर्मभोग आहे. ईश्वरेच्छा. असो.

नवीन जागेत यथाविधी मुंजाची स्थापना झाली व पिंपळाच्या झाडाची लाकडे वेदमूर्ती सेलुकरांचे घरी पोचविण्याचे ठरले. हे यथाशास्त्र झाले.

आता परस्पर पत्र व्यवहारांनीच एकमेकांचे कुशल समजून घ्यावे लागेल. नाईलाज आहे. बाकी सर्व ठीक आहे.

चि. नारायणचा अभ्यास-संध्या करुन चालू आहे ही ईश्वराची कृपा आहे. आपली सर्वांची श्रद्धाभक्ती उत्तम असल्याने काळजीचे कारण नाही.

आश्रमांतील सर्व व्यवस्थित चालू आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

आता सर्वकाही व्यवस्थित चालले होते. चि. नारायणची संध्या वगैरे नीट होत होती. मुलींचेही अभ्यास वगैरे व्यवस्थित होते. आम्हा सर्वांचे दैनंदिन व्यवहार नित्याप्रमाणे होत होते. संध्याकाळचा साधनाभ्यास ही नियमित होत होता. कोणतीही काळजी नव्हती. प.पू. महाराज व प.पू. सौ. आईसाहेबांच्या प्रकृतीबद्दल कळले की अस्वस्थ व्हायला होई. पण सगळं व्यवस्थित राहील असे वाटायचे. चातुर्मासही सुरु झालेला होता. त्यामुळे नित्यव्यवहारात दिवस भराभर जात होते. श्रावण अमावस्या संपली अन् दुसरे दिवशी श्री. शाम- माझे दीर यांचे दौऱ्यावर निघाले असता डोके प्रचंड दुखू लागले. तसे वर्ष सहा महिन्यापासून त्यांना वाढलेल्या रक्तदाबाचा अधून-मधून त्रास होत

असे. त्यादिवशी सकाळी प्रचंड डोकेदुखीमुळे ते हैराण झाले व नेहमीच्या डॉ. कुलकर्णींकडे गेले. तिथेच त्यांना मोठी उलटी झाली व चक्कर आली. डॉक्टरांनी आमच्या दवाखान्यात फोन केला. आम्ही त्यांना तिथे थोडे बरे वाटल्यावर इथे आमच्या घरी घेऊन आलो. रक्तदाब खूपच वाढलेला होता. योग्य उपचार सुरु होते, पण म्हणावे तसे बरे वाटत नव्हते. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या दिवशी त्यांना डॉ. दिलीप औरंगाबादला घेऊन गेले. तिथे स्कॅनच्या रिपोर्टमध्ये मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचे कळले. त्यांना ताबडतोब मुंबईला डॉ. भगवतींच्याकडे 'बॉम्बे हॉस्पीटल' मध्ये हलविण्यात आले. ताबडतोब त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यात आली. प.पू. महाराजांच्या कानावर फोनने ही गोष्ट घातली. त्यांनी 'प्रार्थना सतत चालू ठेवा' असे सांगितले. सासूबाई व डॉ. दिलीप तिथे मुंबईला त्यांचे सोबत होते. दोघांनीही सतत नामस्मरण सुरु केले होते. बीडला घरी ती. अण्णाकाका, श्री. शामची पत्नी-सौ. वैजयंती व मुले होती. शिवाय हॉस्पीटलचाही व्याप होताच. इथे पण ब्राह्मणद्वारा संपुटित नवचंडी करवून घेतली. 'महामृत्युंजयाचा जप करुन घे' म्हणून सासूबाईंनी निरोप पाठविला, पण तोपर्यंत पितृपक्ष सुरु झाले होते. ब्राह्मण मिळाले नाहीत. रोज काळजीने जीव पोखरुन निघत होता. अवघे चव्वेचाळीस वय त्यांचे सगळ्यांचे जीवनच अंधकारमय झाले होते.

अखेर त्यांच्या शरीराने ऑपरेशनला दाद दिली नाही अन् पितृपक्षातील चतुर्थीला त्यांची प्राणज्योत मावळली. ती. आण्णाकाका व सासूबाईंना अकाली पुत्रशोक झाला. डॉ. दिलीपचा एकुलता एक भाऊ गेला. वैजयंतीचे सौभाग्य हरपले. मुलींच्या डोक्यावरचे

पितृछत्र नाहीसे झाले. अन् मला भावासमान असणारा दीर गेला. चि. नारायणच्या मौंजीतील त्यांचा उत्साहवर्धक सहवास आठवत होता. सुखासमाधानाने चाललेल्या घरावर नियतीचा अभद्र घाला पडला. श्री. शामवर सासूबाईंचे चांगले संस्कार होते. त्यांना देवाधर्माची आवड होती. तीर्थक्षेत्री दर्शन घेण्यास त्यांना आवडे. प्रत्येक ठिकाणी अन्नदानाची पावती ते आवर्जून देत असत. दुर्दैवाने या सगळ्या गोष्टींचा अंत झाला.

प.पू. महाराजांना हे वृत्त समजले. त्यांनी सांवत्वनपर पत्र पाठवून आम्हा सर्वांना शांत केले. ते पत्र याप्रमाणे होते---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास

दि. २-१०-९६

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन

श्री शामरावांचे देहावसान झाल्याचे वृत्त समजून वाईट वाटले. प्रयत्नांना यश मिळाले नाही. माता, पिता, पत्नी, बंधु इत्यादि सर्वांनाच हा मोठा दुःखाचा आघात झाला. अल्पावधीतच त्यांचे जीवन संपले. आयुष्यापुढे इलाज नाही. ईश्वराची इच्छा. विवेकाने दुःख कमी करण्याचा प्रयत्न करुन इतरांचेही सांत्वन करुन प्रकृती याकडे लक्ष दिले पाहिजे.

त्यांना सद्‌गती देणेस परमात्मा समर्थ आहे. आम्हीही आपले दुःखात सहभागी आहोत.

कळावे,

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

श्री. शाम गेल्याच्या तिसरे दिवशीच वृत्त समजले की, प.पू. महाराजांनी ताबडतोब पत्र पाठविले. त्यांचा व प.पू. महाराजांचा नेहमी सहवास होत असे. कारण ऑफिसच्या कामानिमित्त त्यांचे पुण्यास जाणे होई. शिवाय प.पू. महाराजांच्या बीडसाठीच्या प्रवासात त्यांचे प.पू. महाराजांच्या सोबत येणे-जाणे होई. शिवाय इथेही उत्सवामध्ये त्यांचे पूर्णपणे सहकार्य असे.

त्यांच्या अकाली जाण्याने घरातील सर्वांना, मित्रपरिवार, आप्तेष्टांना खूपच मोठा धक्का बसला होता. वैजयंती नोकरी करीत असल्यामुळे आर्थिक झळ फारशी नव्हती. पण स्वतंत्र वृत्तीच्या स्वभावामुळे सर्वांनी एकत्र रहाणे शक्य होणार नव्हते.

प.पू. महाराजांना खूपच तळमळ वाटत होती. त्यांनी पुढे लगेच दहावे दिवशी पुनः एक पत्र पाठविले, ते याप्रमाणे होते---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास<br>
दि. ९-१०-९६

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आपले बंधु श्री. शामराव यांचे देहावसान झाल्याचे वृत्त आज आपले पत्रावरुन समजून वाईट वाटले. मागील आठवड्यात एक सांत्वन पत्र पाठविले आहे. तेही मिळेलच.

श्री. काकांना पुत्रशोक आवरुन पुत्राचे क्रियाकर्मांतर करावे लागते. कर्मभोग आहे. श्री. शामरावांचा स्वभाव प्रेमळ होता. प्रयत्नाला यश आले नाही. ईश्वराची इच्छा.

विवेकाने दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करुन इतरांचेही सांत्वन करुन भ्रातृकर्तव्य केले पाहिजे.

श्री. शामरावांना उत्तम गती देण्यास परमात्मा समर्थ आहे. आम्हीही आपले दु:खात सहभागी आहोत. कळावे.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

प.पू. महाराजांवरील असीम श्रद्धेमुळे सासूबाईंनी स्वत:ला सावरले. पुढे लगेच नवरात्र होते. त्यांनी स्वत:हून त्याची तयारी केली. देवघराची साफसफाई केली. नंदादीपाची तयारी केली. घटस्थापनेच्या दिवशी सोवळ्यात स्वयंपाक करुन नैवेद्य-आरती करवून घेतली. ब्राह्मण सुवासिनी भोजन केले. मला त्यांच्या या धैर्याबद्दल खूप कौतुक वाटले. ही सगळी प.पू. महाराजांच्या सांत्वनाचीच कृपा ! आठवणी तर विसरता येतच नाहीत, पण घर बरच सावरल्यासारखे वाटू लागले. ती. काकांना फार उदास वाटायचे- ओक्साबोक्सी रडायचे. पण तेवढे घडणारच होते. सगळ्या मुली त्यांची समजूत काढायच्या. चि. नारायण ही त्यांच्या अवतीभवती रहायचा. असे दिवस जात होते. थोडे फार स्थिरस्थावर झाल्यासारखे वाटत होते. व्यवसायामुळे वेळ जायचा. सौ. सासूबाईंनी पण कामात स्वत:ला पूर्ण गुंतवून घेतले. शेजारी पाटांगणावर दुपारचे कथा कीर्तन त्यांचा विरंगुळा होता. पण कुठलाही सण आला की, श्री शामची खूप आठवण व्हायची. मुलांमध्ये पण ते खूप रमायचे.

एक संकट मागे पडले होते पण दुसऱ्या अप्रिय घटनेची चाहूल लागत होती. अर्थात आम्हाला त्याची जाणीव नव्हती.

चि. मानसीचा अकरावीचा अभ्यासक्रम इथे पूर्ण झाला होता. तिच्या स्वत:बद्दलच्या किंबहुना आमच्या तिच्याबद्दलच्या अपेक्षा जास्त असाव्यात, त्यामुळे येथील शैक्षणिक वातावरण कदाचित तिच्या प्रगतीमध्ये बाधक ठरेल म्हणून तिला औरंगाबादला शिक्षणासाठी पाठवावे असे ठरविले. माझे आईवडील तिथेच रहात असल्यामुळे रहाण्याची व खाण्यापिण्याची गैरसोय होण्याची शक्यताच नव्हती. कॉलेज जरी दूर असले तरी वाहनांची सोय केली गेली होती. मग सवयीप्रमाणे प.पू. महाराजांच्या कानावर पत्राद्वारे ही गोष्ट घातली. त्यांनी दिनांक २२-६-९४ च्या पत्रात नमूद केले होते की,

'कु. मानसीच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था बीडलाच झाली तर खाण्याची सर्व व्यवस्था चांगली राहून सर्वांचे लक्षही राहील. जसे जमेल तसे करावे.'...

आम्हाला वाटले की, औरंगाबादला तिची व्यवस्था चांगली होईल. म्हणून प.पू. महाराजांनी पत्रात केलेल्या संकेताकडे दुर्लक्ष केले गेले. कदाचित आमच्या विधीलिखीतात या घटना टळणाऱ्या नसाव्यात.

चि. मानसी औरंगाबादला शिक्षणासाठी राहिली. पुढच्या तीन वर्षात तिने पदवी प्राप्त केली. शेवटच्या वर्षात I.C.F.A.I. चे वर्ग तिने जॉईन केले. परीक्षा अवघड होती. गणित त्यात प्रामुख्याने होते. त्याच क्लासमध्ये येणारे श्री. सचिन आजेगावकर यांच्या मदतीने ती तो अभ्यासक्रम समजून घेण्याचा प्रयत्न करत होती. पुढे दोघेही जवळीकेने प्रेमात पडले व त्यांनी लग्न करण्याचे ठरविले. मानसी तेव्हा अवघी एकोणीस वर्षांची होती. स्थळ म्हणून त्यात फारसे

विरोध करण्यासारखे नव्हते तरी सुद्धा एवढ्या लवकर तिचे लग्न व्हावे हे आम्हाला पटत नव्हते. शेवटी त्यांचे घरचे लोक जे डॉ. दिलीपच्या आजोळकडून नात्यात होते ते येऊन भेटले व सामंजस्याने हे लग्न २१ डिसेंबर १९९७ ला करण्याचे निश्चित केले गेले.

घरातील या पिढीचे पहिलेच लग्नकार्य म्हणून जोरात तयारी सुरु झाली. दोन्हीही आर्जींचा उत्साह ओसंडत होता. लग्नापूर्वी प.पू. महाराजांचे दर्शन घेण्यासाठी आम्ही पुण्यास गेलो. ते फारसे बोलले नाहीत. 'ठीक आहे.' असे म्हणाले. प.पू. सौ. आईसाहेब मात्र उत्साहात होत्या. त्यांनी आम्हाला आहेर करावयास सौ. सविता वहिनीस सांगितले. मला अजूनही या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, प्रत्येक गोष्टीत प.पू. महाराजांना कळविणारे आम्ही अगदी लग्नाची बोलणी वगैरे करुन नंतर त्यांचेकडे आलो. 'नियती' एवढेच या गोष्टीवर उत्तर असावे.

लग्नाची निमंत्रणे सगळीकडे पाठविली. कार्यालय व इतर बाबी व्यवस्थित ठरविल्या. सर्वांना पत्रेही पाठविली. कपडा-दागिने वगैरेंची खरेदी झाली. दवाखान्यात काम भरपूर होते. तरीही रात्रंदिवस वेळ काढून लग्नाची तयारी सुरु ठेवली होती.

'रेणुका निवास' मध्येही वेगळे पत्र -पत्रिका पाठवून सर्वांना आमंत्रण केले गेले. प.पू. महाराजांचे घरुन प.पू. श्री. अशोक महाराज व व. सौ. सवितावहिनी लग्नासाठी बीडला आले. त्यांनी सोबत येताना प.पू. महाराजांनी पाठविलेले पत्र आम्हास दिले. त्याच दिवशी श्री. नगरकरांच्या चिरंजीवांचे ही बीडलाच विवाहकार्य संपन्न होणार होते. प.पू. महाराजांनी दोघांच्यासाठीही वेगवेगळी पत्रे

लिहून वेगळ्या पाकिटात बंद करुन दिले व 'ज्यांचे त्यांना व्यवस्थित द्या. पत्रात अदलाबदल करु नका' अशी सूचना प.पू. अशोक महाराजांना दिली होती.

लग्नाच्या काही दिवस आधीच नवरदेवास ताप येऊन बारीक पुरळ अंगावर उठू लागले. औरंगाबादला योग्य त्या डॉक्टरांच्याकडे दाखवून सर्व तपासण्या करुन घेतल्या. त्यामुळे त्या काळात आराम पडला.

लग्नाच्या दिवशी सकाळी प.पू. अशोक महाराजांनी प.पू. महाराजांचे पत्र दिले, ते पुढीलप्रमाणे---

**॥ श्री दत्त ॥**

पुणे ४, श्री वासुदेव निवास
दि. १९-१२-९७

श्री. रा. डॉ. दिलीप देशमुख व डॉ. सौ. सुरेखाताई यांना
सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन वि. क्षेम

आपणाकडील विवाहाची पत्रिका, पत्र मिळाले. समक्षही आपण निमंत्रण केले आहेच.

प्रकृति बरी नसल्याने आम्ही कार्यास येणे अशक्य आहे. चि. अशोक व सौ. सूनबाई त्याकरिता येत आहेत. कार्य झाल्यानंतर परत येतील.

चि. सौ. कां. मानसीताईंचे मंगलकार्य निर्विघ्न व्यवस्थित पार पडावे याबद्दल श्री जगदंबेजवळ प्रार्थना आहे.

आयुष्यमान वधुवरांस मंगल आशीर्वाद. श्री जगदंबेची आपणावर पूर्ण कृपा आहे. यामुळे हे कार्य लवकर जमून आले. इतरही मुलामुलींची कार्ये, शिक्षण व्यवस्थित होतील.

सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

कळावे, आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

सर्वांच्या सहकार्याने कार्य उत्तमरित्या पार पडले. चि. सौ. मानसीची सासरी पाठवणी केली. पण २-३ दिवसातच जावईबापूंच्या प्रकृतीची तक्रार सुरु झाली. खूप ज्वर चढायचा-खूप थकवा यायचा व अंगावर पुरळ उठायचे. पुन्हा दवाखान्याच्या चकरा सुरु झाल्या. रोगाचे निदान झालेच नाही. तात्पुरत्या औषधाने तेवढाच फरक पडायचा. पाच-सहा दिवसानंतर त्याला झटका आला. लगेच तेथील एका हॉस्पीटलच्या अतिदक्षता विभागात भरती केले गेले. आम्ही दोघेही इथून ताबडतोब निघालो. प.पू. महाराजांचा सारखा धावा करीत होतो. तेथे गेल्यावर पाहिले तर तो खूपच अस्वस्थ झालेला होता. अधून-मधून झटके येतच होते. त्याच्याजवळ जाऊन शांत करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या उशाशी बसून त्याचे डोके हलकेच थोपटू लागताच तो हळू हळू शांत होत गेला व त्याला झोप लागली. माझी एक चुलत बहीण बाजूला उभी होती. ती म्हणाली, 'रेखाताई मला तुझ्या हाताच्या जागी वृद्ध व्यक्तीचा त्याला थोपटतानाचा हात दिसला.'

लग्नानंतर कुणावरही असे भयानक संकट आले नव्हते. ते आमच्यावर कोसळले. सगळ्याच नातेवाईकांना, मित्रमंडळींना या

गंडांतराबद्दल हळहळ वाटू लागली. पुढे पाच-सहा दिवस दवाखान्यात रहावे लागले. चि. सचिनला आता खूपच बरे वाटू लागले. सर्व रिपार्टस् जवळपास नॉर्मल आले होते. पण हे असे का झाले याचे निदान मात्र झाले नाही.

तेथील डॉक्टरांच्या परवानगीने चि. सौ. मानसी व चि. श्री. सचिनला आम्ही बीडला घेऊन आलो. विश्रांती व औषधोपचाराने त्याला बरे वाटू लागले. पण हे फार थोडेच काळ टिकले. एखाद्या आठवड्यानंतर पुन्हा ज्वर खूप वाढला. तो तसा सतत वाढतच गेला. मग तेथील डॉक्टर मित्रांच्या सल्ल्याने पुण्याला 'रुबी हॉल' मध्ये नेण्याचे ठरविले. त्याच्या मातापित्यांना तेथेच बोलावून घेतले. पुण्यात गेल्याबरोबर आधी 'श्री रेणुका निवास' मध्ये गेलो. प.पू. महाराजांचे दर्शन घेतले. त्यांच्या घरी सर्वांनाच हळहळ वाटली. चि. सौ. मानसीच्या लग्नाची मेंदीही अजून तशीच होती.

प.पू. सौ. ताई महाराजांचा मुक्कामही श्री रेणुका निवासमध्ये होता. सर्वांचे दर्शन घेऊन आम्ही रूबी हॉल हॉस्पीटलमध्ये गेलो. व त्याला तिथे ॲडमिट केले गेले. डॉ. ग्रॅन्ट ने त्याला तपासले. निदान नक्की झाले नाही. पुढे एक दोन दिवसातच त्याला जोरात दुसरा झटका येऊन बेशुद्ध झाला. अतिदक्षता विभागात त्याला नेण्यात आले व पुढील उपचार सुरु केले. त्यापुढील तपासणीत ऑटोइम्यून डिसीज् शक्यता वर्तविली गेली. म्हणजे स्वतः शरिरातील पेशीच स्वत:ला मारक ठरून नॉर्मल पेशींना जायबंदी करतात. ही प्रक्रिया जर अतिमहत्त्वाच्या अवयवात सुरु झाली तर सर्व यंत्रणाच बंद पडते.

डॉक्टरी इलाज तर चालूच होते. पण रोज प.पू. महाराजांच्या दर्शनाला आम्ही तिघेही नियमित जात असू. त्याकाळात श्री वासुदेव निवासमध्ये उत्सव सुरु होता. त्यामुळे तिथेही नियमीत दर्शन होईल. प.पू. महाराजांच्या सांगण्यावरुन वे. कृष्णाशास्त्रींना सोबत घेऊन श्री वामननिवास मध्ये वे. कोडणीकर शास्त्रींच्या कडे दोघांच्याही पत्रिका दाखविण्यास गेलो. त्यांनी पत्रिका पाहून चि. सचिनला 'पैतृक दोष' आहे व इतरही ग्रहमान अनुकूल फारसे नाही असे सांगितले. चि. मानसीची पत्रिका मात्र चांगली आहे असे ते म्हणाले.

सर्वजण आपापल्या परीने पूजा-पाठ-अनुष्ठाने करीत होते. त्याकाळात पुण्यात रिक्षावाल्यांचा संप चालू होता. पण कुणाची न कुणाची गाडी घेऊन आम्ही तिघेही- मी, डॉ. दिलीप व चि. मानसी दररोज प.पू. महाराजांचे दर्शनास जात असू. अतिशय कसोटीचा व आयुष्यातील सर्वात वाईट काळ होता तो !

प.पू. सौ. ताई महाराज चि. मानसीला जवळ बसवून घेऊन तिच्याशी वार्तालाप करायच्या. एवढे दु:खात होतो तरी श्री रेणुकानिवास मध्ये दर्शनास आले की, समाधान वाटायचे. मला आठवते, एकदा गाडी मिळण्यास उशीर झाल्याने तिथे जाण्यास आम्हाला रात्रीचे साडे दहा वाजून गेले. गेटजवळ गेलो अन् पाहिले तर घरातील सर्व दिवे बंद झालेले होते. आत एकच छोटा दिवा लावलेला दिसला. दर्शन होणार नाही याबद्दल रुखरुख वाटली. डॉ. दिलीपनी दारापुढे दंडवत घातले. त्यावेळी गेटला थोडा धक्का लागून त्याचा आवाज झाला. त्यावेळी समोरच्या बैठकीचे दार उघडून चि. रमा बाहेर आली व म्हणाली, 'दिलीप काका, घरात

चला, आजोबा तुमची वाट बघताहेत !' आम्हाला एकदम गहिवरुन आले. आत दर्शनासाठी गेलो. प.पू. महाराज त्यांच्या खोलीत तक्क्याला टेकून बसले होते. काळजीच्या सुरात त्यांनी चि. सचिनच्या प्रकृतीची चौकशी केली. पण विशेष फरक नसल्याचे निराशाजनक सूर आमच्याकडून ऐकताच- 'तुम्हाला उगाच हेलपाटा...' असे म्हणत त्यांनी मान फिरविली. आम्हालाही खूप वाईट वाटले.

दुसरे दिवशी आम्ही लवकरच सकाळी जाण्याचे ठरवले. अकरा-बाराच्या सुमारास आम्ही श्री रेणुका निवास मध्ये पोहोचलो. प.पू. महाराजांचे देवघरात आन्हिक सुरु होते. त्यांनी त्यांच्यासमोरच आम्हा तिघांना जेवावयास वाढण्यास सांगितले. पुनः पुन्हा आग्रह करुन आम्हास वाढले. जेवण झाल्यावर त्यांचे, प.पू. सौ. आईसाहेबांचे दर्शन घेऊन आम्ही निघालो. प.पू.सौ. ताई महाराजांनी माझ्या ओटीत ब्लाऊजपीस टाकले. मला कुंकु लावले व चि. मानसीकडे पाहिले पण नाही. मला म्हणाल्या, 'तुमच्यावरील संकट दूर होऊन सगळे यापुढे व्यवस्थित होईल.'

आम्ही तिथून निघून हॉस्पीटलला येऊन पोहोचलो अन् अवघ्या अर्ध्या तासातच चि. सचिनची प्राणज्योत मालवली. हे सगळं सहन करण्याच्या पलिकडचे होते. २१ डिसेंबरला लग्न झाले अन् २५ जानेवारीला सगळे काही संपले. विचारांच्या पलिकडचे हे विदारक सत्य होते. या सगळ्या काळात प.पू. महाराजांनी आम्हाला खूप सांभाळले. डॉक्टरांच्या दृष्टीने हा मृत्यू अटळच होता. पण आमची पूर्ण श्रद्धा असल्याने आम्ही सैरभैर त्याकाळात झालो नाहीत. प.पू. महाराजांनीही अपमृत्यू टाळण्यासाठी प्रयत्न केले पण महामृत्यू

असल्यामुळे तो टळू शकला नाही. जेव्हा आम्ही 'वरुन बऱ्याच पांढऱ्या पेशी देऊनही त्याच्या पेशी वाढतच नाही' असे त्यांच्या कानावर घातल्यावर 'अरेरे ! आता तुम्हाला हेलपाटा नको' असे उद्‌गार त्यांनी काढले.

अतीव दुःखीत अंतःकरणाने आम्ही औरंगाबादला आलो. अंतिम संस्कार झाल्यावर पुढे चि. मानसीसह तिथे त्यांचे घरी पंधरा दिवस राहून तिला घेऊन बीडला परत आलो. डोळ्यांपुढे पूर्ण अंधःकार पसरला होता. मागचे वर्षीचा श्री. शामचा मृत्यू व यावर्षी ही अशी दुर्घटना. रोजचे जगणेही असह्य व्हायचे. मनात नेहमी विचार यायचा की, आपण जर प.पू. महाराजांचे ऐकले असते अन् मानसीला बीडलाच शिक्षणासाठी ठेवले असते तर त्या दोघांची भेटही झाली नसती. अन् पुढचे सारेच टळले असते. पण प्रारब्धात आलेल्या या दुःखाचा सामना केवळ प.पू. महाराजांवरील असणाऱ्या श्रद्धेनेच करु शकलो. त्यांनीच पुरते पाठबळ दिले. सांत्वन केले. चि. मानसीच्या लग्नात विघ्न येऊ नये यासाठी प.पू. महाराजांनी नक्कीच भगवतीची प्रार्थना केली असणार. कारण लग्नानंतर तीन-चार दिवसात त्याला झटका आला तो जर लग्नाच्या दिवशीच आला असता तर केवढा हाहाःकार झाला असता ? प.पू. महाराजांनी या कठीण प्रसंगातून बाहेर काढले. पुण्याला हॉस्पीटलमध्ये असताना सुद्धा त्यांच्या मायेचा खूप आधार वाटे.

या दुःखद प्रसंगातून बाहेर येण्यासाठी जवळपास पाच वर्षे लागली. ही घटना झाल्याबरोबर प.पू. महाराजांनी श्री रेणुका निवास मधून सांत्वनपर पत्र पाठविले, ते असे---

॥ श्री दत्त ॥

“श्री रेणुका निवास” अत्रेय सोसायटी
गोखले नगर रस्ता, शिवाजीनगर
पुणे-४११ ०१६

॥ श्री दत्त ॥

पुणे दि. ४-२-९८

श्री. डॉ. दिलीप, सौ. सुरेखाताई, श्री.मानसीताई यांना

सप्रेम सादर स्मरणपूर्वक निवेदन

आपणावर हा मोठाच दुःखाचा आघात झाला आहे. कर्मभोग आहे. ईश्वराची इच्छा.

सर्व ठीक झाले म्हणून सुख मानावे तोच हा दुःखाचा प्रसंग उद्भवला काय करावे ?

विवेकाने दुःख कमी करण्याचा प्रयत्न करुन सर्वांचे सांत्वन करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे. श्री. जावईबापूंना उत्तम गती देणेस परमेश्वर समर्थ आहे. त्यांच्या मातापितरांनाही दुःखाचा प्रसंग उद्भवला आहे. ईश्वरेच्छा बलियसी, प्रयत्नही, औषधोपचारही पुष्कळ झाला पण आयुष्यापुढे इलाज नाही.

श्री. मानसीताई, सौ. सुरेखाताईंचे समाधान कोणत्या शब्दाने करावे कळत नाही. आम्हालाही अशक्तपणा वाटत असल्याने तिकडे येता येत नाही. आम्हीही आपले दुःखात सहभागी आहोत.

आ. दत्तात्रेय कवीश्वर

****

या पत्रात प.पू. महाराजांनी व्यक्त केलेले दु:ख बघून आम्हालाच भडभडून आले. थोडे स्थिरस्थावर झाले की आम्ही उभयता चि. मानसीला घेऊन प.पू.महाराजांचे दर्शनास श्री रेणुका निवास मध्ये गेलो. त्यांना पाहिले की आवेग आवरता आला नाही. त्यांनी डॉ. दिलीपना स्वत:जवळ बसवून घेतले. पाठीवर थोपटून हलक्या आवाजात सांत्वन केले. चि. मानसी बाजूलाच उभी होती. तिच्याकडे बघत बोट दाखवून ते म्हणाले, 'मानसीताईंचे ३-४ वर्षात सगळे व्यवस्थित होईल !' त्यांच्या या आश्वासक वाणीने साठलेले सारे मळभ दूर झाले.

डॉ. दिलीप त्यांना म्हणाले, 'महाराज ! सध्या कुठेच लक्ष लागत नाही. सैरभैर झाले आहे.' प.पू. महाराज म्हणाले, 'सतत नामस्मरण करीत जा.' 'नामस्मरणातही फारसे लक्ष लागत नाही.' असे सांगितल्यावर 'तरीही सतत नामस्मरण करत रहा. आपोआप तिकडे लक्ष जाईल. दु:खावेगही हळूहळू कमी होत जाईल.' असे प.पू. महाराजांनी सांगितले.

दु:ख तर सोबत होतेच. पण प.पू. महाराजांचे दर्शन-एक उत्कट समाधान देऊन गेले. चि. मानसी सुद्धा शांत झाल्यासारखी वाटली. आम्ही बीडला परत आलो.

दवाखान्याचा व्याप होताच. इतर दोन्ही मुलांची शाळा, अभ्यास घरातील पै पाहुणा व इतर गोष्टींमध्ये दिवस जात होते. पण चि. मानसीकडे बघून अस्वस्थ होत होतो. या घटनेमुळे तिच्या पुढील शिक्षणाचा विचार करणेही अशक्यच होते. काळ पुढे सरकत होता. एप्रिल संपून मे महिना उजाडला. तिच्या मनात हळुहळू पुढील

शिक्षणाच्या संदर्भात विचार येऊ लागले. जूनमध्ये सुरवातीस पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये ॲडमिशन घेण्याचे ठरले पण पुढे गोखले इन्स्टिट्यूट मध्ये प्रवेश मिळाला. आम्हा उभयतांना ती पुण्याला प.पू. महाराजांच्या छायेत रहाणार असल्यामुळे मनाला निश्चिंती मिळाली.

तिला प्रवेशासाठी पुण्याला घेऊन गेलो असता, 'मानसीताईंना बाहेर कशाला? इथे रेणुका निवासमध्येच राहू देत ना!' असे प.पू. महाराज म्हणाले. 'पण, ती पुण्यात रहाणार म्हणजे आपल्या सान्निध्यात रहाणार आहे.' असे सांगितल्यावर त्यांनी तिला होस्टेलवर ठेवण्याची परवानगी दिली.

सुदैवाने तिची श्रद्धा अजिबात कमी झाली नाही. ही त्यांची मोठीच कृपा होती. ती पण बरेचवेळा गुरुवारी पंचपदीस संध्याकाळी श्री रेणुका निवास मध्ये जात असे. प.पू. महाराज तिची खूप काळजी घेत. तिला रिक्षापर्यंत सोडविण्यासाठी कुणालातरी आवर्जून सांगत. 'पोचल्यावर फोन कर' अशी सूचना तिला दिली गेली असल्यामुळे, तिचा फोन आला की नाही याची जातीने चौकशी करीत. तिच्या प्रकृतीची-जेवणाखाण्याच्या सोयींची चौकशी करीत अतिशय मायेने त्यांनी तिला सांभाळले. तिचे पूर्ण कल्याण केले. तिची श्रद्धा अजिबात कमी होऊ दिली नाही. तिचेही मन पुण्यामध्ये रमले.

प.पू. सौ. ताई महाराजांनी सुद्धा हे संकट दूर करुन पुढे तिचे दुसरे लग्न करुन देण्याबद्दल संकेत दिला. पुढे पाच वर्षानंतर सगळे काही व्यवस्थित झाले. इ.स. २००२ मध्ये सुयोग्य व्यक्तीशी तिचा पुनर्विवाह होऊन दोन मुले झाली. एक तपाचा तिचा संसार बहरुन गेला. सगळ्या गोष्टींमध्ये प.पू.महाराजांचे आशीर्वाद-माया भरुन राहिली आहे.

प्रवचनातून प.पू.महाराज नेहमी म्हणायचे- 'संसारातील उणीवांसाठी देवाकडे याचना करावी, त्यानी दिलेले पुरुन उरते. माणसांकडे मागणी करु नये.' सुदैवाने आमच्या देवाकडे-प.पू. महाराजांच्याकडे वेळोवेळी मागणी केली अन् त्यांनी आम्हाला खूप सावरले-भरभरुन दिले. आता यापुढे त्यांच्या उक्तीप्रमाणे संसार परिपूर्ण झाला आहे, परमार्थाकडे मने लागावे.

प.पू. महाराजांनी ध्वनिमुद्रीत केलेली प्रवचने ऐकताना खूप खूप आनंद होतो. मन भरुन येते. दरवेळी नव्यानेच त्यांच्या सांगण्याचा नवा अर्थ उलगडत जातो. सदैव त्यांच्या दर्शनाचा ध्यास लागलेला असतो.

प.पू. महाराजांची प्रकृती वयोमानाप्रमाणे कधी कधी गंभीर व्हायची. आम्ही लगेच जाऊन दर्शन घ्यायचो. त्यांच्या निर्वाणाच्या आधीच्याच आठवड्यात रेणुका निवासमध्ये गेलो होतो. डॉ. सरदेसाई येऊन त्यांना तपासत होते. प.पू. सौ. आईसाहेबांच्या निर्वाणानंतर प.पू.महाराज एकदम शांत व अबोल झाले होते. त्यांच्या रोजच्या सहवासातील व्यक्तींनी त्यांचे प्रकृतीबद्दल सांगितले की, खूप उदास वाटे. 'प.पू. महाराजांच्या शिवाय हे जग' ही कल्पनाच करवत नसे.

शेवटी महानिर्वाणाचा दिवस उजाडलाच. दि. १ मार्च १९९९ रोजी प.पू. महाराज पंचतत्वात विलीन झाले. सगळे भक्तगण साधक मंडळी शोकसागरात बुडाली. प्रचंड जनसुमदाय जमला होता. देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक आले होते. त्या महायात्रेचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडले.

आज या क्षणी सुद्धा प.पू. महाराज आपल्यामध्ये देहाने नाहीत ही कल्पनासुद्धा सहन होत नाही. बीडच्या घरात ज्या खोलीत प.पू. महाराज वावरायचे, विश्रांती घ्यायचे, पत्रलेखन करायचे ते त्यांचे पुजा घर म्हणूनच सजले आहे.

प.पू.सौ. आईसाहेबांच्या जाण्याने सर्वचजण शोकसागरात बुडाले होते. शेवटच्या घडीला त्यांच्या सोबत दारापर्यंत येताना विद्ध झालेले प.पू.महाराज पहाताना सर्वांचे डोळे पाणावले होते. आतल्या बैठकीत प.पू. सौ. ताईमहाराजांचे सोबत इतर सगळ्याजणी प.पू. सौ. आईसाहेबांच्या एकेक आठवणी सांगत होत्या. त्यात स्व. नीलाताईंनी सांगितलेली आठवण अजून आठवते. प.पू.सौ. आईसाहेब म्हणायच्या, 'थोरला अशोक-पुजारी, मधला अनिल बाजारी, अन् धाकटा अजित-शेजारी' म्हणजे प.पू. श्री. अशोक महाराज कायम पूजाअर्चेत मग्न असायचे. मधले श्री. अनिलराव घरातील बाजारहाट, आणणे-नेणे पहायचे अन् श्री. अजितराव रोज संध्याकाळी येऊन चौकशी करायचे. खूप मार्मिक स्वभावाच्या होत्या प.पू.सौ.आईसाहेब.

पुढे पण पुण्याला गेलो की, प.पू. महाराजांच्या रेणुका निवासमध्ये नित्य जाणे व्हायचेच. प.पू. अशोक महाराज व व. सौ. सविता वहिनी मनोभावे स्वागत करायचे. त्यांच्याशी खूप मोकळेपणाने गप्पा व्हायच्या. चि. नारायणचे पण ते खूप कौतुक करीत. आम्ही उभयता व ते एकाच व्यवसायातील असल्यामुळे त्याबद्दल भरभरुन बोलणे व्हायचे. ते नेहमी म्हणत, 'वैद्यकीय व्यवसाय हा असा एक व्यवसाय आहे ज्यामुळे उपजीविकाही चांगली होते व लोकांचे आशीर्वाद ही भरभरुन मिळतात."

जालन्यालाही गेले की, प.पू.अशोक महाराज तिथे असले की, व्यवस्थित दर्शन व्हायचे. खूप गप्पा व्हायच्या. प.पू.महाराजांचे नसणे त्यांनी कधीही जाणवू दिले नाही.

कालांतराने ती. आण्णाकाका वर्षभर अंथरुणला खिळून होते व शेवटी २१ डिसेंबर २००० साली त्यांची प्राणज्योत मालवली. प.पू. अशोक महाराजांना हे वृत्त कळताच त्यांनी सांत्वनपर पत्र पाठविले, ते याप्रमाणे---

**॥ श्री दत्त ॥**

"श्री रेणुका निवास" पुणे - १६
दि. ३-१-२००१

श्रीमान डॉ. दिलीपराव

सप्रेम सादर निवेदन !

आपल्या पूज्य पिताश्रींचे दुःखद निधन झाले. वाईट वाटले ईश्वरेच्छा. बरेच दिवस आपण त्यांची मनोभावे सेवा केली आहे. पित्याबद्दलचे कर्तव्य श्रद्धेने पार पाडले आहे.

आपले दुःख कमी होण्यास काळच जावा लागेल. हळूहळू प्राप्त कर्तव्याकडे वळून गं.भां. सिंधूआत्यांचे सांत्वन आता एक डॉक्टर आणि पुत्र म्हणून या दोन्ही भूमिकेतून तुम्हालाच करावे लागणार आहे.

श्री. जगदंबा आपल्या पिताश्रींना सद्गति देण्यास समर्थ आहे. आपल्या दुःखात आम्हीही सहभागी आहोत. आपल्या धर्मशील अंतःकरणाने आपण सर्व विहीत कार्य करालच.

कळावे. सदैव प्रेमरज्जूंनी चिराबद्ध,

अशोक कवीश्वर

प.पू. अशोक महाराजांच्या सोबतचे हे आदराचे-आपुलकीचे नातेही फार काळ राहू शकले नाही. प.पू. महाराजांच्या श्राद्धतिथीच्या दिवशीच ते अनंतात विलीन झाले. पिताश्रींशिवाय जणू त्यांना वेगळे अस्तितत्व नव्हतेच.

प.पू.थोरले स्वामी-श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी प.पू. शंकरकाका आजेगावकरांना जवळ केले. त्यांचा उद्धार केला. प.पू. श्री गुळवणी महाराजांनी त्यांच्या कन्यका ति. सौ. सिंधूताईंना दीक्षा प्रदान करुन आपली मुलगीच मानले. प.पू. दत्तमहाराजांनी आम्हा उभयतांना शिष्यत्व देऊन आमचे सर्व अपराध पोटात घातले. आमचेकडून स्वत: जातीने उपस्थित राहून देवीचे कार्य करवून घेतले. श्री लक्षचंडीचा संकल्प केला. योगक्षेमाची काळजी वाहिली. दु:खाच्या क्षणी झेलून धरले आणि आता सर्वांना प.पू. ताई महाराजांचे स्वाधीन केले.

ही परंपरेची गंगा उगमाजवळून दूर-दूर गेली तरी तिचे पात्र विशाल होत जाते. ती कधीच आटत नाही. सागरात विलीन होताना तर तिचे पात्र अधिकच भव्य होते. प.पू. महाराजांनी सन्मार्गाला लावले. आता या संसारात परमार्थाचे लेणे लेऊन अंत:काळाचे स्मरण नित्य रहावे ही सद्गुरुचरणी नित्य प्रार्थना !!

**॥ अवधुत चिंतन श्री गुरुदेव दत्त॥**

# - नोंद -

कर्ममार्गात श्रद्धेला विशेष महत्त्व आहे. भगवतीची शुद्ध भक्ती, श्रद्धा, औदार्य इ. गुणांमुळे ईशकृपेने कर्माचे पूर्ण फल पदरात पडते. प्रपंचात राहून यथाशक्ती परमार्थ करुन घ्यावा.

साधनाभ्यास उघड्या जागेत न करता, देवाजवळ जागा नसली तरी, आपल्या खोलीत दार झाकून केली तरी चालेल. नित्य साधनाभ्यास श्रद्धेने चालू ठेवणे हितावह आहे.

प्रपंचात चढ़उतार चालू असतोच. राष्ट्रावरही असा प्रसंग येतो. शांत राहून शास्त्रीय उपाय, ईशप्रार्थना करुन संकटपरिहार करण्याचा असतो. निराश न होता शांतपणाने सर्व करावे.

श्री गुरुमहाराजांचे कृपेने आपला साधनाभ्यास व्यवस्थित सुरु आहे, तो नित्य व्हावा. त्यावेळी जे होईल ते सर्व ईशशक्तीचेच कार्य आहे. आपले जीवाचे कर्तृत्व तेथे काहीच नसते. या दृष्टीने प्राणायामादी क्रियाही ईशप्रेरणेनेच चालू होतात. आसनेही होतात. आपण तटस्थ साक्षीभावाने राहणे बरे.